१२२९

म. ग्रं. सं. ठाणे.

विषय ........ चरित्र ........

सं. क्र. ७२७८

REFBK-0003880

REFBK-0003880

# जार्ज वाशिंग्टन यांचें चरित्र.

ग्रंथ संग्रहालय
रु. प. ३२२
३८८०

## भाग १ ला.

### उपोद्घात.

आमच्या प्रिय हिंदुस्थानदेशाच्या व त्यांतील देशबंधूंच्या सांप्रतच्या संकटाच्या व दुःखाच्या स्थितींत, आह्मांमध्यें या नीचावस्थेंतून काढण्यास, पूर्वींच्या अवतारी पुरुषांप्रमाणें, यो- ग्य व थोर पुरुष निपजण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ते पुरुष, विद्वान्, ज्ञानवान्, तन, मन व सदाचरण यांच्या सा- मर्थ्यानें संपन्न आणि स्वकीय व परकीय लोकांनीं भरंवसा ठेवण्यास सर्व प्रकारें लायक, असे असले पाहिजेत. केवळ शरीरसामर्थ्यानें संपन्न व सदृढ, केवळ महा- विद्वान् व ज्ञानी पंडित, किंवा ऐहिक संसाराचा त्याग करून उत्तमाचरण संपन्न साधु असे एकाकी पुरुषांकडून आह्मांला व्हावा तसा हल्लींच्या स्थितींत उपयोग व्हावयाचा नाहीं. आतां देखील आमच्यामध्यें शरीरानें सदृढ असे नुस्ते बळवान, किंवा जुन्या अथवा नव्या प्रकारचे केवळ विद्वान् पंडित, तसेच केवळ विरक्त साधु देखील क्वचित् क्वचित् सांप- डतील; परंतु असा एक एकच गुण संपादन केलेल्या पुरुषांपा- सून आमच्या देशास व लोकांस जसा व ज्या प्रकारचा लाभ व्हावयास पाहिजे आहे तसा व त्या प्रकारचा लाभ व्हा-

वयाचा नाहीं यास्तव तन, मन व आचरण यांजमध्यें उत्त सुधारगा होऊन त्यांच्या सामर्थ्यांनीं संपन्न व सर्व प्रकारच्या लो कांनीं भरंवसा ठेवण्यासारखे व प्रसंगानुसार सर्वस्व वेंचून लो कांच्या व स्वदेशजननीच्या सेवेस नेहमीं तयार असणारे पुरुष आह्मांमध्यें निपजले पाहिजेत. आतां असे पुरुष व कोठून उत्पन्न व्हावे, हा मोठा विचारच खरा. परमेश्वरा असे थोर पुरुष प्रसंगविशेषीं अनायासें निपजल्याचीं कांहीं उ दाहरणें पूर्वीं घडलेलीं आहेत, ही गोष्ट खरी आहे. तथापि, तीं उदाहरणें मनांत आणून आपग स्वस्थ बसणें बरोबर नाहीं आपल्या सामर्थ्यानुरूप आपल्याकडून होईल तितकी आपण प्रथम पराकाष्ठेची खटपट व उद्योग करावा; नंतर परमेश्वराचें साह्य मागावें, ह्मणजे तो कृपा करून आपल्या मनकाम पूर्ण करितो, असा सर्वत्र सिद्धांत आहे. या सर्वमान्य सिद्धां तास अनुलक्षून आपण आपल्या सामर्थ्यानुरूप पूर्वोक्त मह दुद्योगास आरंभ केला पाहिजे. कारण, थोर असे पुरु तर केवळ परमेश्वरकृपेनेंच प्रसंगविशेषीं बहुधा निपजतात हेंही खरेंच; तथापि, अशा प्रकारच्या पुरुषांच्या उत्पत्तीस बीजारोपण होऊन त्यांची खेती तयार करण्याचा उद्द आपग केला पाहिजे. कारण आपग उद्योग केल्यावां परमेश्वराकडून फलप्राप्तीस साह्य मिळणार नाहीं, सर्व सामान्य सिद्धांतच आहे. तेव्हां उद्योग केला पाहि हें उघड आहे.

आतां योग्य पुरुषांच्या निपजण्याकरितां हा उद्योग ण्यास आपण उद्युक्त झालों असतां आपल्यास सृष्टिनियमां लक्ष पुरविलें पाहिजे. मनुष्यप्राण्यामध्यें दोन गुण स्व

जन्य आहेत. एक, दुसऱ्याचें उदाहरण पाहून आपण त्याप्रमाणें करणें; व दुसरा, तो केवळ जन्मतः लोखंडाच्या वगैरे खाणींतून निघालेल्या दगडासारखा असून सहवासजन्य अग्नीच्या योगानें त्याचा रस होऊन, आचरणांच्या नियमांचा जसा त्याजकरितां सांचा तयार केलेला असेल, त्याप्रमाणें त्याची मूर्ति बनावयाची असा गुण आहे. तेव्हां आह्मांस पाहिजेत तशीं माणसें तयार होण्यासाठीं लोकांपुढें उत्तम उदाहरणें नमुना पाहण्याकरितां आणि आचरणांच्या नियमांचा सांचा तयार करण्याकरितां योजिलीं पाहिजेत. आमच्या देशांत प्राचीन काळीं हरिश्चंद्र, रामचंद्र, भीष्म, धर्मराज यांजसारखे कितीएक महाविख्यात कीर्तिमान् व थोर पुरुष निपजले आणि त्यांना अवतारी पुरुष असें समजतात. तसेंच अलीकडे शिवाजीमहाराज, रामदास स्वामी, थोरले बाजीराव व माधवराव, रामशास्त्रीबावा असेही विख्यात पुरुष झाले. सारांश आमच्या देशांमध्यें व लोकांमध्यें पुष्कळ योग्य व उदाहरण घेण्यासारखे पुरुष होऊन गेले, व त्यांची चरित्रही लिहिलेलीं आहेत. परंतु हल्लींच्या काळास उपयोगीं पडण्यासारखीं त्यांचीं चरित्रें लिहिलेलीं नाहींत यामुळें परदेशीय योग्य व थोर पुरुषांचीं उदाहरणें व त्यांचीं लिहिलेलीं चरित्रें घेणें जरूर आहे. चांगलें व हितकर असें कांहीं व कोठेंही सांपडलें असतां त्याचा स्वीकार करावा, हा जगाचा परिपाठ आहे. त्याप्रमाणें जगांत पाहूं गेलें असतां उत्तम, निष्कलंक, अनुरूप, सन्मान्य व निर्व्याजपणें कित्ता घेण्यालायक, आणि हल्लींच्या काळास व लोकस्थितीस सर्व प्रकारें उपयोगी पडण्यासारखे असे जे अमेरिकेंतील प्रसिद्ध स्वदेशभक्त जनरल

जार्ज वाशिंग्टन यांचें उदाहरण आढळतें, तें आमच्या लोकांपुढें व विशेषतः तरुण व होतकरू जनांपुढें मांडण्याकरितां, आह्मी त्या थोर सत्पुरुषाचें चरित्र थोडक्यांत लिहिण्याचा विचार केला आहे.

जार्ज वाशिंग्टन यांचें चरित्र लिहिण्याचें कारण व त्याज पासून होणारा वांछित उपयोग हीं लोकांस कळलीं पाहिजेत. आमच्या लोकांमध्यें पुष्कळ प्रकारचे सद्गुण आहेत; परंतु सांप्रत काळीं ज्या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे, ते गुण आह्मांमध्यें कमी आहेत. आज जीं मोठीं, पराक्रमी व सुधारणेच्या अत्युच्चपदास चढलेलीं राष्ट्रें आहेत, त्या सर्वांस स्वदेशप्रीति व स्वदेशभक्ति हे गुण योग्यतेस येण्यास विशेष कारण झाले आहेत. आणि ते गुण आमच्या लोकांच्या अंतःकरणांत व्हावे तसे अद्यापि उत्पन्न झाले नाहींत. तेव्हां त्यांचें बीजारोपण चांगल्या प्रकारें अवश्य झालें पाहिजे. हा कार्यभाग साधण्यास आमच्या तरुण लोकांपुढें तशा प्रकारचें उदाहरण पाहिजे आणि या हेतूनें पाहिलें ह्मणजे आज सर्व जगांत जार्ज वाशिंग्टन यांजसारखें उत्तम दुसरें उदाहरण मिळणें कठीण आहे. आजपर्यंत जगांत विशेषतः ग्रीक व रोमन लोकांच्या वेळेपासून जी स्वदेशभक्त मंडळी आढळण्यांत येते, तींत वाशिंग्टन यांच्या योग्यतेचा पुरुषच निपजला नाहीं असें ह्मटल्यास चालेल. स्वदेशभक्त मंडळीचे ते मुकुटमणी आहेत. फारतर काय पण स्वदेशप्रीति व स्वदेशभक्ति यांचा केवळ ते मूर्तिमंत अवतारच होते असें ह्मटलें तरी शोभेल. त्यांचे उदाहरण अगदीं साधारण प्रतीच्या मनुष्यापासून तों मोठ्या योग्यतेच्या पुरुषापर्यंत सर्वांस घेतां येण्याजोगें आहे. कारण

ते अगदीं साधारण स्थितीपासून केवळ आपल्या सद्गुणानें व योग्यतेनें अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांच्या राज्याध्यक्षाच्या मुख्यपदास पोंचले आणि त्यांस तेथील लोक प्रेमानें स्वदेशाचा पिता असें मानितात. तसेंच त्यांच्या उदाहरणावरून असें सिद्ध होतें कीं, मनुष्यास जर कांहीं महत्कृत्य किंवा सत्कृत्य करावयाचें असेल, व यशस्वी व्हावयाचें असेल, तर तन, मन, बुद्धि व आचरण यांची उत्तम प्रकारची सुधारणा झाली पाहिजे, शरीरसामर्थ्य पाहिजे, मनुष्यामध्यें [illegible] पाहिजे, व आचरण उत्तम प्रकारचें निर्मळ व नीतिसंपन्न असें पाहिजे. शिवाय या तीनही प्रकारच्या सुधारणा एकदम व अल्प काळांत करतां येतात असें नाहीं. तेव्हां हा मार्ग लहानपणापासून आईबापांनीं व गुरूंनीं लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शरीरसामर्थ्यावांचून कोणतेंच काम किंवा हालचाल मनुष्याकडून होत नाहीं. परंतु तेवढें एकटेंच शरीरसामर्थ्य असून उपयोगीं पडत नाहीं. मनुष्यामध्यें ज्ञान उत्तम प्रकारचें पाहिजे. तें नसेल तर नुसत्या शरीरसामर्थ्याचा उपयोग नाहीं. तसेंच नुसतें ज्ञान पुष्कळ असून शरीरसामर्थ्य नसेल तर त्याचाही उपयोग होत नाहीं. आतां यदाकदाचित् शरीरसामर्थ्य असून मनुष्य ज्ञानी असेल तरी देखील त्याचा जगास अथवा लोकांस उपयोग व्हावयाचा नाहीं. कारण कोणतेंही मोठें व सार्वजनिकहिताचें कृत्य करावयाचें असेल तर तें एकट्याच्यानें होत नाहीं. त्यास लोकांचें साह्य लागतें. आतां हें साह्य मिळण्यास लोकांचा त्याजवर भरंवसा पाहिजे, आणि तो भरंवसा तर नीतिसंपन्न आचरण असल्यावांचून कधींही बसावयाचा नाहीं. यास्तव शरीरसामर्थ्य व

ज्ञान हीं असलीं तरी मनुष्यास मोठी व खरी योग्यता होण्यास व जगाच्या उपयोगीं पडण्यास नीतिमानपणाची अत्यंत आवश्यकता आहे. सारांश सुदृढ शरीर, सुसंस्कृत मन, आणि शुद्ध आचरण यांचें एकीकरण मनुष्यामध्यें झाल्यावांचून तो यावा तसा उदयास व योग्यतेस यावयाचा नाहीं. हें जार्ज वाशिंग्टन यांच्या उदाहरणावरून उत्तमप्रकारें सिद्ध होतें. कारण ते शरीरानें फार सदृढ असून, चांगले ज्ञानी व समजूतदार होते. शिवाय त्यांचें आचरण अत्यंत शुद्ध होतें. आणि या तिन्ही गुणांच्या प्राप्त्यर्थ त्यांचा लहानपणापासून तों सरासरी अखेर पर्यंत जसा काय एकसारखा अभ्यास चालू होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तसेंच त्यांजसारखा निरपेक्ष स्वदेशभक्त आजपर्यंत जगांत झालाच नाहीं. आलेक्झांडर धि ग्रेट, जुलियस सीझर, व नेपोलियन बोनापार्ट हे मोठे विख्यात पुरुष होऊन गेले; राजसत्तेच्या आशेनें व अधिकारलोभानें ते घसरले, आणि लोकांचें कल्याण कर्त्याच्या उच्च व योग्य पदास न पोंचतां अकल्याणकर्ते व नाशकर्त्ते या नीचपदाप्रत पोंचले, आणि त्यांचा परिणामही दुःखप्रद झाला वाशिंग्टन यांची गोष्ट अगदीं निराळी आहे. त्यांनीं आपलें सर्व आयुष्य स्वदेशसेवेंत घालविलें; परंतु त्यानीं आपल्या घरच्या प्रपंचाच्या खर्चाकरितां कधीं एक पैसा देखील घेतला नाहीं; इतकेंच नव्हे; पण त्यांस उलटी पुष्कळ झीज सोसावी लागली. शिवाय आठ वर्षें सारखें मोठ्या संकटकाळीं स्वदेशाच्या स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ फौजेच्या सेनापतीचें काम त्यांनीं करून पूर्ण यश संपादन केलें. अशा समयीं फौजेच्या सर्व लोकांच्या मनांत त्यांनीं आपल्या देशाचा राजा व्हावें असें

आलें, व त्यांणीं त्याप्रमाणें मोठ्या लष्करी सरदारांमार्फत त्यांस सूचना करून विनंति केली. परंतु त्यांनीं त्या सरदारांस व त्यांच्या मार्फत सर्व फौजेस, हें तुमचें ह्मणणें वेडेपणाचें व गैर आहे असें लिहून सांगून, त्यांची उत्तम प्रकारें समजूत घालून, राज्यपदास लाथ मारून त्यांचें ह्मणणें अमान्य केलें. पुढें आपली कामगिरी बजाविल्यावर स्वसंतोषानें सेनापतीचा अधिकार सोडून ते पुनः आपला नेहमीचा शेतीचा धंदा करण्यास घरीं गेले. पुढें कांहीं वर्षांनीं लोकांनीं त्यांला देशाचें राज्याध्यक्षत्व स्वीकारून राज्यकारभार सुरळीत चालू करून द्यावा अशी विनंति केली. त्याप्रमाणें त्यांनीं तें काम पतकरून त्या देशाची व्यवस्था सुरळीत लावून दिली. परंतु परराज्यांशीं तहनामे होण्याचें महत्वाचें काम शेवटास गेलें नव्हतें सबब लोकांनीं पुनः त्यांस त्या कामावर नेमिलें, व त्यांचें ह्मणणें केवळ देशहितावर नजर देऊन त्यांनीं मान्य केलें. शेवटीं ती चार वर्षांची मुदत संपल्यावर पुनः लोक त्यांस ताहयात अध्यक्ष नेमावयास तयार झाले, आणि निदान आणखी चार वर्षें पर्यंत त्या कामावर राहण्याकरितां आग्रह करूं लागले. परंतु त्यांनीं हें राज्यपद सोडून देऊन पुनः आपलें स्वतःचें शेतकीचें काम आनंदानें स्वीकारलें, आणि ते शेतकरी बनले. याजवरून त्यांची योग्यता, विलक्षण स्वदेशभक्ति व अनुपमेय निरपेक्षबुद्धि हीं उत्तमप्रकारें दिसून येतात. तेव्हां अशा प्रकारच्या योग्य पुरुषाचें चरित्र लिहिण्याचें आह्मीं मनांत आणिलें आहे. सर्वांस वाशिंग्टनसारखी स्वदेशसेवेची कामगिरी बजाविण्याचा प्रसंग येईल व त्यांस तसें वर्तन करतां यावें अगर येईल असें नाहीं; परंतु, त्यांच्या गुणांचा नेहमीं

विचार करून त्यांचें उदाहरण निरंतर पुढें असलें तर प्रत्येक मनुष्यास आपापल्या स्थित्यनुरूप आपल्या स्वदेशाची व स्वदेशबांधवांची सेवा करण्याची इच्छा उत्पन्न होईल, व त्याजपासून आपल्या देशास व लोकांस पुष्कळ उपयोग होईल. यास्तव लोक या चरित्राचा यथायोग्य उपयोग करतील अशी आशा आहे.

आतां जार्ज वाशिंग्टन यांच्या चरित्रास आरंभ करण्यापूर्वी ज्या देशांत ते जन्मले, व ज्या देशाची त्यांणीं सेवा केली, त्याची व त्यांतील लोकस्थितीची हकीकत थोडी सांगितली पाहिजे. ज्या देशांत हा सत्पुरुष निपजला त्यास "यूनैटेड स्टेट्स आफ् अमेरिका" अगर अमेरिकेतलीं संयुक्त संस्थानें ह्मणतात. हा देश अथवा हीं संस्थानें उत्तर अमेरिकेंत आहेत. या देशांत मूळ रेड इंडियन ह्मणून कांहीं रानटी लोकांची वस्ती होती. इंग्लंड, स्काटलंड व ऐरलंड या देशांतील कित्येक दरिद्र व संकट यांणीं पीडिलले लोक उद्योगधंद्यांच्या आशेनें व कित्येक त्या देशांतील धर्मसंबंधी व राजकीय संबंधाच्या त्रासामुळें उत्तर अमेरिकेंतील या प्रदेशांत गेले, आणि त्यांनीं तेथें वसाहत केली. तेथें सुपीक जमीन पुष्कळ होती, जंगल जबरदस्त, तेथें मोठमोठीं अरण्यें होतीं. शिवाय नद्या वगैरेच्या संबंधानें व्यापाराची सोय उत्तम होती. या सर्व गोष्टींचा फायदा करून घेण्याच्या इराद्यानें या वसाहत करणाऱ्या लोकांनीं स्थाईक राहण्याचा विचार करून पाहिजे तितक्या जमिनी आपल्या ताब्यांत करून घेतल्या. आतां, हे तेथें रहावयास लागले तेव्हां तेथील मूळचे रहवासी लोक हा सर्व प्रदेश आपला, व परकी लोक येथें येऊन तो बळका-

वयास लागले हें पाहून ते त्यांस त्रास देऊं लागले. तसेंच हे या नवीन लोकांनीं त्या मुळच्या रहिवाशांस मारहाण करून त्यांस जमिनींवरून व जंगलांतून हाकून लावण्याचा सपाटा चालविला. युरोपांतील कोणतेही लोक व त्यांत विशेषतः इंग्लिश लोक जेथें जेथें ह्मणून वसाहत करावयास गेले, तेथें तेथें त्यांणीं साम, दाम, दंड व भेद यांचा पूर्ण उपयोग करून शेवटीं तेथील लोकांचा समूळ नाश केला असाच प्रकार बहुधा आढळतो. त्यांचा ख्रिस्तीधर्म व समदृष्टीपणा स्वार्थापुढें नष्ट होतो. असो. त्या प्रदेशांत रानटी लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या व त्यांचे राजासारखे प्रमुख सरदार असत व त्यांच्यांत परस्परांमध्यें नेहमीं कलागती व भांडणें आणि मारामाऱ्या व लढाया चालू असतच. या भेदाचा व विरोधाचा फायदा या नवीन वसाहत करणाऱ्या लोकांनीं करून घेतला. परस्परांमध्यें कलह लावून द्यावा, एकाचा पक्ष घेऊन त्याजकडून दुसऱ्याचा नाश करवून घ्यावा आणि मग त्याची शक्ति क्षीण झाली ह्मणजे त्याचाही नाश करून टाकावा असा प्रकार चालविला, त्याचा मासला पाहाण्यास फार दूर जावयास नको. हिंदुस्थानांत त्यांनीं आपली राज्यसत्ता कशी स्थापित केली, ह्याचा इतिहास लक्षपूर्वक पाहिला ह्मणजे त्यांत हें सगळें कृत्य दिसून येत. फार तर काय; पण वाघ, लांडगे वगैरे घातक जनावरांप्रमाणें त्या रानटी लोकांच्या पारधी करून त्यांस त्यांनीं ठार मारलें असें देखील ह्मणतात. आतां त्या देशांत ते मूळचे लोक फारच थोडे आहेत असें समजतें. इंग्लंड वगैरे देशांतून आपल्या लोकांनीं वसाहती करून शेती

व्यापारधंदे चालवून देशाचें उत्पन्न वगैरे वाढविलें. तेथें इंग्लंडच्या राजाचा अधिकार चालू होऊन राज्यव्यवस्था इंग्लंडच्या धोरणावर चालू झाली. प्रत्येक संस्थानांत अगर जिल्ह्यांत लोकांच्या तर्फे निवडलेल्या लोकांची पार्लमेंटसारखी लहान सभा असे, व त्याजवर अध्यक्ष अगर मुख्याधिकारी गव्हर्नर इंग्लंडच्या राजाकडून नेमून येत असे. फौज व आरमार यांची व्यवस्था व बंदोबस्त इंग्लंडच्या राजाकडून होत असे. सारांश राज्यव्यवस्था चालविण्याचा खर्च वसाहत झालेल्या लोकांकडून मिळावा आणि राज्याधिकार इंग्लंडानें लोकसंमतीनें चालवावा, असा प्रकार होता. इंग्लंडाप्रमाणें फ्रान्स देशांतील लोकांनींही त्यांच्या शेजारीं वसाहत केली होती व त्या प्रदेशाचा राज्याधिकार फ्रान्सचे सरकाराकडे होता. या दोन प्रदेशांमधील सरहद्दीच्या तंट्यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें तंटे व लढाया देखील चालू असत. यूनैटेड स्टेटस या देशांची स्थिति जार्ज वाशिंग्टन यांच्या जन्माच्या सुमारास अशी होती. तसेंच तेथील लोकस्थिति त्या वेळेस चांगली होती. लोक शेतीच्या व व्यापाराच्या योगानें चांगले सुखी व श्रीमान झाले होते. इंग्लंड देशांतील लोक व त्यांचें सरकार यांच्या मनांत या वसाहतींतील लोकांच्या उत्कर्षामुळें हेवा व द्वेष उत्पन्न होऊन, तो वाढावयास नुक्ताच आरंभ झाला होता. वाशिंग्टन यांच्या जन्माच्या पूर्वीं बरींच वर्षें लोकांनीं वसाहतीस आरंभ केला होता, व त्यांच्या तेथें दोन दोन तीन तीन पिढ्या तरी निदान होऊन गेल्या होत्या असें दिसतें. या प्रमाणें वाशिंग्टन यांच्या जन्माच्या वेळीं अमेरिकेची स्थिति होती. अशा वेळीं या पुरुषानें आपलें सर्व आयुष्य,

ए आपली शक्ति, आपलें ज्ञान, आपलें धन सर्व स्वदेशाकरितां अर्पण करून आपल्या देशाचें व आपलें नांव जगाच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें, याचें साद्यंत वर्णन पुढें येईल. आमच्या वाचकांच्या मनांत हें चरित्र वाचून अल्पस्वल्प देशसेवा करण्याचा अंकुर उत्पन्न झाल्यास आह्मी आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें समजूं.

---

## भाग २ रा.

### वाशिंग्टन यांचा जन्म व शिक्षण.

जार्ज वाशिंग्टन यांचा कोणी जॉन वाशिंगटन नांवाचा पूर्वज इंग्लंडाहून अमेरिकेंत सुमारें इसवी सन १६५० व १६५६ यांच्या दरम्यान आला असावा, व त्यानें यूनैटेडस्टेट्स यांजपैकीं वर्जिनिया प्रांतांत पोपस क्रीक या ठिकाणाजवळ वसाहत केली असावी, असें ह्मणतात. जार्ज वाशिंग्टन यांच्या बापाचें नांव आगस्टिन वाशिंग्टन होतें, व आईचें नांव मेरी होतें. ही बाई आगस्टिन वाशिंग्टनची दुसरी बायको होती, व तिचें जार्ज वाशिंग्टन हें सर्वांत लहान मूल होतें. यांच्या वर्जिनिया संस्थानांतील, वेस्ट मोर कौंटींत वाशिंग्टन पारिश नांवाच्या गांवांत तारीख २२ फेब्रुवारी सन १७३२ रोजीं जार्ज वाशिंग्टन जन्मले. ते मोठ्या प्रसिद्ध व श्रीमान घराण्यांत जन्मले नव्हते. त्यांचा बाप साधारण शेतकरी होता. त्याची जमीन बरीच होती; तथापि त्यास मुलें पुष्कळ होतीं याजमुळें जार्ज वाशिंग्टन यांच्या वांट्यास कांहीं विशेष आलें नाहीं. ते मूळचे साधारण

एका मनुष्याच्या शाळेंत झाला. हा मनुष्य वाशिंग्टन यांच्या वडिलांच्या जमिनींत शेत करणारें एक कूळ होतें. वाशिंग्टन हे उत्तम योग्यतेस येत तोंपर्यंत हा पंतोजी जिवंत होता, आणि आपण यांच्या मोठेपणाचा पाया घातला असें मोठ्या डौलानें तो ह्मणत असे. यांत कितपत अर्थ असेल कोण जाणे. एरवीं वाशिंग्टन यांचें बहुतेक सर्व शिक्षण घरांतीलच होतें. हल्लीं जशा त्या देशांत शिकण्याच्या विपुल सोयी आहेत, त्या प्रमाणें त्या वेळेस मुळींच नव्हत्या. त्यांतून विशेष चांगलें उंच प्रतीचें शिक्षण तर त्या देशांत होत नसे इतकेंच नाहीं, पण तें इकडे कधींही व्हावयाचें नाहीं, असा देखील त्या वेळच्या लोकांचा समज होता. त्या शिक्षणाकरितां बाह्यप्रदेशीं अगर इंग्लंडासच विद्यार्थ्यास पाठविलें पाहिजे, असा ग्रह होता. असो; तशा शिक्षणाचा लाभ वाशिंग्टन यांस गरीबीमुळें मिळाला नाहीं. त्यांचें खरें व अवश्य असें शिक्षण घरांत आई बापांजवळच झालें. वाशिंग्टन हे लहान दहा वर्षांचे असतांच त्यांचा बाप वारला. पुढें कांहीं दिवसांनीं वेस्ट मोरलंड प्रांतांत त्यांचा सावत्र भाऊ आगस्टिन होता, त्याजकडे त्यांस पाठविलें; तेथें ते मि. विलियम्स नांवाच्या एका नांवाजलेल्या शिक्षकाच्या शाळेंत शिकावयास गेले. पंधरावें वर्षीं त्यांनीं शाळेंत जाणें सोडलें. त्यावेळेस त्यांचें ज्ञान कितपत होतें, याची माहिती नाहीं; परंतु साधारण प्रतीचें इंग्रजी शिक्षण मिळून त्यांस कामापुरतें ज्ञान प्राप्त झालेलें होतें. त्यांस चोहोंकडची चांगली माहिती व विशेष ज्ञान हीं केवळ त्यांच्या पुढच्या स्वतःच्या अभ्यासानें व ग्रंथवाचनानें प्राप्त झालेलीं होतीं.

याप्रमाणें त्यांच्या मानसिक शिक्षणाचा प्रकार होता. आतां वाशिंग्टन यांजपेक्षां अधिक मानसिक ज्ञान मिळालेले पुष्कळ लोक त्या देशांत त्यावेळेस होते, आणि हल्लीं आपल्या देशांत देखील पुष्कळ लोक सांपडतील; तथापि त्यांजसारखी योग्यता कोणालाही मिळणें कठीण आहे ह्याचें कारण इतकेंच कीं त्यांचें शिक्षण एकदेशीय अ‍ एकाच प्रकारचें नव्हतें. आमच्या इकडे शिक्षण मिळतें त केवळ मानसिकच असतें; त्यामुळें तें शिक्षण खरें व पू‍ असें मानतां येत नाहीं. वाशिंग्टन यांच्या शिक्षणाचा प्रकार अगदीं वेगळा होता. मानसिक शिक्षणासारखेंच व त्याच्य बरोबरीनें, कदाचित् त्याहीपेक्षां विशेष अधिक काळजीनें, त्यांस नीतिशिक्षण मिळालें होतें. त्याच्या योगानें ते एवढ्‍ योग्यतेस चढले, व एवढीं मोठीं कामें करण्यास समर्थ झाले. यद्यपि त्यांचा बाप लहानपणीं वारला, तथापि त्याच्या मरणापूर्वीं त्याणें जार्ज वाशिंग्टन यांच्या मनांत नीतिशिक्षणाचें उत्तम प्रकारचें बीजारोपण करून, तें, पुढें त्याचा चांगल्या प्रकारचा सुफलित वृक्ष व्हावा, अशा वाढीस लाविलें होतें. सत्य, न्याय व औदार्य या गुणांची लागवड त्याणें वाशिंग्टन यांच्या मनांत गोष्टी सांगून व उदाहरणें देऊन चांगलीच केली होती. तसेंच दररोजच्या शिकण्याच्या धड्याबरोबर धर्माच्या मूलतत्वांचें बीजारोपण केलें, आणि तीं त्यांच्या मनांत चांगलीं ठसविलीं. वाशिंग्टन यांचा बाप चांगला, सद्गृहस्थ होता, व त्याणें आपले मुलांच्या संगोपनाचें आणि शिक्षणाचें काम चांगल्या प्रका‍ बजाविलें. त्याजमुळें वाशिंग्टन हे उदयास येण्यास तें कारण झालें. हें आमच्या लोकांनीं चांगलें ध्यानांत ठेविलें पाहिजे

नीतिशिक्षण हा मुलाच्या भावी आयुष्यक्रमाचा पाया आहे. आणि तो जितका मजबूत व चांगला असेल, त्यामानानें मुलांचें आचरण बरें वाईट होण्याचा संभव आहे. असो. वाशिंग्टन यांच्या बापानें आपली थोडी बहुत कामगिरी तर केली होतीच; परंतु त्या बीजारोपणास सतत पाणी घालून त्याची जोपासना करून त्यास मोठा सुफल वृक्ष बनविण्याचें मोठें जोखीम यांच्या आईच्या शिरावर पडलें. ती बाईही या पुढच्या कार्यास सर्व प्रकारें योग्य होती. ती साध्वी पोक्त असून दृढनिश्चयी, पाणीदार व उदार होती. मुलांनीं मर्यादा ठेवणें व आज्ञापालन करणें यांजविषयीं ती फार कडक असे. जार्ज हा तिचा सर्वांहून लहान व आवडता मुलगा होता; तथापि वर्त्तनाच्या कामांत तिजकडून कधींही त्यांचे लाड होत नसत. आल्या गेल्याचा सत्कार करणें, त्यांस साह्य करणें हा तिच्यामध्यें मोठा चांगला गुण होता. अशा सद्गुणी, समंजस व दृढमनाच्या आईपाशीं घरीं वाशिंग्टन यांचें शिक्षण झालें. तिला लिहितां वाचतां चांगलें येत असून स्वभाषेचें, इतिहासाचें वगैरे ज्ञान चांगलें होतें, हें येथें सांगण्याची विशेष जरूर नाहीं. कारण त्या लोकांत स्त्रियांस पुरुषांप्रमाणेंच मानसिक शिक्षण देण्याचा सांप्रदाय आहे, व त्याजमुळेंच ते लोक इतके हुशार होऊन उत्कर्ष पावले आहेत. हीच वाशिंग्टन यांची आई आमच्या इकडील आयांप्रमाणें अडाणी, असमंजस व अस्थिर स्वभावाची असती, तर वाशिंग्टन हे कधींही उदयास आले नसते व येवढ्या मोठ्या योग्यतेस चढले नसते. आमच्या देशांत बाप मेला ह्मणजे मुलांचें संगोपन व शिक्षण नीट न होतां तीं बहुधां स्वच्छंदी व वाईट होतात. आयांचें वजन त्यांजवर मुळींच

राहत नसतें. ह्याचें कारण त्यांचें अज्ञान होय. तेव्हां आपल्या देशाचा उत्कर्ष होऊन लोक सुखी, स्वतंत्र व योग्य व्हावे अशी आपली इच्छा असेल तर स्त्रियांस चांगल्याप्रकारें शिक्षण मिळून त्या आपल्या मुलांचें यथायोग्य संगोपनाचें व शिक्षणाचें कर्त्तव्य बजावण्यास तयार झाल्या पाहिजेत. स्त्रियांस शिक्षण देऊन विद्या शिकविली असतां त्या गृहकार्यास उपयोगीं पडावयाच्या नाहींत, व गैर चालीच्या होतील, असें कित्येकांचें ह्मणणें आहे, तें अगदीं व्यर्थ आहे. हल्लीं युरोपियन लोकांत हजारों व लाखों मध्यम स्थितींतील कुटुंबें स्त्रियांच्या ज्ञानामुळें, समंजसपणामुळें व खरें कर्तव्य त्यांस कळत असल्यामुळें अत्यंत सुखी आहेत. वाशिंगटन यांचीच आई. पहा, शिकलेली, शहाणी, समंजस व आपलें प्रपंच संबंधाचें व मुलांच्या शिक्षण संबंधाचें कर्तव्य चांगलें समजत होती, तरी ती गृहसंबंधी कामाची हेळसांड करणारी, पतीचा अपमान करणारी, किंवा मुलांबद्दल निष्काळजी अशी नव्हती. उलटें ती साध्वी, महापतिव्रता, व उत्तम वीरमाता होती. साध्वी, साधी व पतिव्रता पत्नी व उत्तम प्रकारची मातुश्री अशा योग्यतेस पात्रहोण्यांतच ती भूषण मानीत असे. त्या बाईनें आपल्या पतीच्या मागें त्याच्या सर्व मालमत्तेचा उत्तम बंदोबस्त राखून नेकीनें व काटकसरीनें आपला प्रपंच चालवून, मुलांस उत्तम प्रकारचें मानासिक धर्मसंबंधीं व नीतिसंबंधी आणि व्यवहारसंबंधी शिक्षण देऊन, पुढच्या आयुष्यक्रमास त्यांस योग्य केलें. परमेश्वरकृपेनें तिचा आवडता मुलगा जार्ज स्वदेशाचा उद्धारकर्त्ता होऊन लोकांनीं त्यास आपला कल्याणकर्त्ता आहे असें मानून प्रेमानें व सन्मान देतांनां तिणें आपल्या डोळ्यांनीं

पाहिलें, तेव्हां तिला आपलें कर्त्तव्य बजावल्याचें उत्तम फळ मिळून किती आनंद झाला असेल, याचा विचार वाचकांनींच करावा. यावरून स्त्रीशिक्षणाची आवश्यकता अत्यंत आहे आणि तें चांगल्या प्रकारचें मिळण्याची योजना झालीच पाहिजे, असें सिद्ध होतें. आतां तें कोठें व कसें व्हावें व कोणाकडून व्हावें हें येथें सांगण्याचा मुख्य उद्देश नाहीं; तथापि हल्लींच्या आमच्या लोकस्थितींत व गृहस्थितींत तें शाळेंत वगैरे आरंभ होऊन घरीं व नवऱ्याकडूनच विशेषतः व लक्षपूर्वक वाढलें पाहिजे, असें वाटतें.

असो. वाशिंग्टन यांचें बहुतेक शिक्षण घरींच झालें, असें वर लिहिलेंच आहे. हेंच शिक्षण सर्व इतर शिक्षणांपेक्षां मनुष्यास भावी आयुष्यक्रमास तयार करतें, आणि तें बहुधा आईकडूनच होतें, व व्हावें; कारण बापापेक्षांही तिचाच मुलांशीं विशेष संबंध व सहवास असतो. तेव्हां तिच्या गुणदोषांची प्रतिमा पुढें मुलांत दृश्यमान होते. यास्तव दृढनिश्चयी, मायाळू, जपणारी, व समंजस अशी आई मिळणें ही परमेश्वराची मोठी व उत्तम देणगीच समजली पाहिजे; आणि तशी आई वाशिंग्टन यांस मिळाली, त्याजमुळेंच ते येवढ्या योग्यतेस आले व तिलाही आपलें कर्तव्य यथास्थित बजाविल्याबद्दल तसेंच अपूर्व बक्षीस मिळालें. ती आपल्या मुलांकडून जें योग्य व अवश्य कर्तव्य तें निश्चयानें करून घेई. सर्व कामें वेळच्यावेळीं करून घेई व जें बोले तें करविण्याविषयीं व करून घेण्याविषयीं अगदीं नियमित रीतीनें आणि निश्चयानें जपत असे. तसेंच प्रामाणिकपणा व सत्य या गुणांच्या पालनाविषयीं ती मोठी दक्ष व सावध असे; न्याय्य तेंच झालें पाहिजे, असा

तिचा मोठा कटाक्ष असे. सारांश वाशिंग्टन यांची ज्या सद्गुणांविषयीं ख्याति होती, व ज्यांच्या योगानें त्यांणीं ही अपूर्व प्रतिष्ठा संपादन केली, ते गुण त्यांच्या आईमध्यें पूर्णपणें वसत असून तिनें आपल्या मुलांकडून पाळवून त्यांचें आचरण उत्तम होई असें केलें.

आतां वाशिंग्टन यांचे विचार इतके पवित्र, इतके थोर व उदार आणि इतके धर्मपरायण कसे व कशाच्या योगानें झाले असतील, तें येथें सांगणें अवश्य आहे. त्यांची आई दुसरीं पुष्कळ पुस्तकें मुलांकडून वाचवीत असे; परंतु त्या सर्वांत "नीति व परमेश्वर यांजसंबंधीं विचार" ह्मणून एक जुनें पुस्तक सन १६८९ मध्यें छापलेलें होतें, त्या पुस्तकाचीं व त्यांतील कांहीं भागांचीं ती विशेषतः मुलांकडून नित्य वाचवून वारंवार जशीं काय पारायणेंच करवी. हें पुस्तक सर माथ्यू हेल नांवाच्या इंग्लंदांतील परम विख्यात उत्तम न्यायाधिशानें लिहिलेलें होतें. त्यांत त्या सत्पुरुषानें परमेश्वर, धर्म, नीति व स्वतांचें आचरण या संबंधाचे विचार दाखल केले होते. या पुस्तकावर त्या बाईची फार आवड असे, व त्याजवर तिनें स्वतां मेरी वाशिंग्टन ह्मणून आपलें नांव घातलेलें होतें. त्यांतील भक्ति, नीति व शहाणपण या संबंधाचें धडे दररोज मुलांकडून ती वाचवीत असे. त्यांतील "ग्रेट आडिट" या धड्यावर तर तिचें विशेष प्रेम असे. खरोखरच ह्यांतील जे थोडे उतारे पाहण्यांत आले आहेत, त्यांतले विचार फारच सुंदर व निरंतर ध्यानांत वागवून आचरणांत आणण्यासारखे आहेत. यामुळेंच वाशिंग्टन यांचें आचरण इतकें पवित्र व निष्कलंक झालें असावें त्या उताऱ्यांचें भाषांतर न देतां, फक्त

त्यांतील विषयांचें धोरण मात्र येथें थोडक्यांत कळवितों.

सर माथ्यू हेल यांणीं परमेश्वरापुढें आपण आपल्या आचरणाची व कृतींची झडती देत आहों अशा प्रकारचा लेख लिहिलेला आहे. त्यांत सदसद्विवेक बुद्धीस न दुखविण्याकरितां नेहमी आपण प्रयत्न केला, असें एका लेखांत दर्शविलें आहे. तसेंच जगाच्या व्यवहारांतील चतुरस्रपणा, या संबंधानें त्यांनीं असें ह्मटलें आहे कीं, त्याचा उपयोग करतांना न्याय व प्रामाणिकपणा हीं ज्या शहाणपणांत असतील तेंच खरें शहाणपण समजावें. कारण परमेश्वरानें शहाणपण व समजूत हीं दिलीं आहेत, यांचा उपयोग कपट, असत्य व अन्याय यांस अनुसरून करणें हा प्रकार अत्यंत गैर असून, त्याच्या देणगीचा निंद्य उपयोग केला असें होतें. तशांत व्यापारी व विशेषतः राजकारणी पुरुषांनीं असा उपयोग करणें तर परमावधीचेंच वाईट कर्म आहे; कारण त्याजपासून फार मोठ्या जनसमूहाचें नुकसान होतें. तेव्हां सर्व कृत्यांत प्रामाणिकपणा व निस्पृहतेचें वर्तन असणें हेंच खरें व उत्तम शहाणपण होय. कारण कपटापेक्षां खरेपणामुळें लोकांचा भरंवसा आपल्यावर बसतो आणि एकंदरींत अधिक लाभ होतो. आतां हें त्या सत्पुरुषाचें सांगणें किती सुंदर, हितप्रद व खरें आहे, हें सहज लोकांच्या लक्षांत येईल. शहाणपणाच्या उपयोगाच्या संबंधानें त्यांनीं आणखी असें ह्मटलें आहे कीं, कितीही योग्य सत्कार्याच्या सिध्यर्थ देखील शहाणपणामध्यें खोटेपणा व कपट यांचें मिश्रण केलें असतां त्याचा असद्व्यय होतो. तर मग दुष्कर्माच्या सिध्यर्थ ह्मणजे परमेश्वराचा अपमान करणें, परमेश्वराची

मुळें जो लोकसमूह यांजवर जुलूम करणें, त्याची भक्ति व सत्य यांचा बिघाड करणें, अथवा कोणासही ठकाविणें अशा कामांत त्यांचा उपयोग करणें, अतिशय निंद्य आहे. परमेश्वराच्या सत्याचें रक्षण करून त्यास मदत करणें, दुष्ट व फितुरी लोकांच्या बेतांचा धिक्कार करणें, त्यांचा पत्ता लावून ते उघडकीस आणणें, व ते बेत फसतील व व्यर्थ होतील असें करणें; जुलमानें त्रस्त झालेल्यांची त्रासापासून मुक्तता करणें; अन्याय झालेल्यास न्याय मिळवून देणें; लढाया व तंटे बंद करणें; जेथें आपण असूं तेथील लोकांत जी परमेश्वर इच्छेनें आपल्याकडे कामें येतील, त्यांत स्वस्थता व शांतता राखणें; अशा कामांत शहाणपणाचा उपयोग केला असतां तो त्याचा खरा, योग्य व उत्तम उपयोग झाला असें समजावें; असें त्यांचें ह्मणणें आहे.

शेवटीं शहाणपणाच्या उपयोगाच्या संबंधानें अशी एक विशेष सूचना त्यांणीं केली आहे कीं, एखादें सत्कृत्य करावयाचें मनांत आणिलें ह्मणजे आपण त्याच्या चांगुलपणास भुलून त्याच्या सिध्यर्थ असत् उपायांचा उपयोग करतों, आणि परमेश्वर त्या उपायांचा वाईटपणा मनावर घेणार नाहीं व त्याजबद्दल आपल्यास क्षमा करील, अशी आपण कल्पना करतों. तर ही आपली कल्पना अगदीं गैर व चुकीची आहे. कारण परमेश्वर जसा दयाभूत आहे, तसाच न्यायी आहे. तेव्हां तसें करण्यांत आपण दया स्मरतों, आणि न्याय विसरतों असें होतें. तेव्हां हें बरोबर नाहीं. शिवाय प्रत्येक सत्कार्यांत परमेश्वराचा कांहीं अंशीं संबंध असतो. तेव्हां त्याच्या सिध्यर्थ वाईट उपायांची योजना करण्यानें

आपण त्याच्या पवित्र नांवास व योग्यतेस कलंक लावतों, हा दोष होतो, हें पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

आतां सरकारी हुद्दे अगर दुसऱ्या सार्वजनिक कामांच्या महत्वाच्या जागा यांजसंबंधाचें त्यांच्या अनुभवाचें ह्मणणें असें आहे कीं, त्या मिळाव्या ह्मणून मीं प्रयत्न केला नाहीं, कारण त्यांत माझें जोखीम, ओझें व हिशेब अधिक वाढून, मनाचें समाधान व स्वस्थता कमी होते, असें मला वाटे. हुद्यांच्या संबंधानें बाह्यमहत्व व गौरव यांत कांहीं अर्थ नाहीं, असा माझा समज आहे. हें केवळ औषधाची कडू गोळी साखरेंत घोळल्यासारखें आहे. कारण, त्या शोभेच्या देखाव्याखालीं भय, काळजी, त्रास, द्वेष, अस्वस्थता वगैरे प्रकार झांकलेले असतात. त्याप्रमाणेंच आपल्या मनांत गर्व, पोकळ डौल, उद्दामपणा, सूड घेण्याची बुद्धि,इत्यादि अशा प्रकारच्या दुर्विकारांचे अंकुर असल्यास त्यांस बाहेर पडण्यास या जागा कारण होतात, व त्याच्या योगानें अनर्थ होतो. यद्यपि ते, विकार वाढले नाहींत, तरी त्यांस दाबून ठेवण्यास महत्प्रयास लागतात.

हा सर्व विचार मनांत आणून एखादें काम अगर हुद्दा पतकरला तर आपल्या स्वतांच्या हिताच्या लोभानें न पतकरतां केवळ परमेश्वराची इच्छा असें समजून तो पतकरला पाहिजे; तसेंच तें काम करण्यास आपल्यामध्यें शहाणपण व सामर्थ्य पाहिजे तितकें आहे किंवा नाहीं हेंही पाहिलें पाहिजे. शिवाय तो हुद्दा पतकरण्याचा हेतु अहंपणा, लोभ अगर डौल यांची तृप्ति करण्याचा नसून परमेश्वराची व जनसमूहाची सेवा प्रामाणिकपणानें व इमानेंइतबारें बजाविण्याचा असावा. कामा-

वर असतांना, त्याजवर आपण नाहीं अशा बेतानें व अशा प्रकारच्या स्वभावानें वागून लागलीच ते सोडण्याचा प्रसंग आला तरी निष्कलंक रीतीनें तें सोडतां येईल, अशा प्रकारचें वर्तन ठेविलें पाहिजे. आतां जें काम करणें त्यांत आपल्या मनोवृति तृप्त करण्याचा, द्रव्यसंचयाचा, अथवा एखाद्यावर जुलूम करण्याचा, अगर एखाद्यानें आपल्यास इजा केल्याबद्दल त्याच्या सूड घेण्याचा, किंवा एखाद्या अन्यायाच्या कार्यास मदत करण्याचा उद्देश अथवा प्रकार नसावा. तसेंच सर्वांस अब्रूची आवड असतेच, तथापि तो प्रकार केवळ लोकांचा आपल्याविषयींच्या समजुतीवर असल्यामुळें ती परस्वाधीन आहे आपण आपणाकडून तिला इजा होऊं नये ह्मणून जपावें; परंतु ती सुरक्षीत राहणें, सर्वस्वी परमेश्वरकृपेवर अवलंबून आहे. यास्तव आपलें कर्त्तव्य इमानें इतबारें बजवावें, आणि परमेश्वरावर भार टाकून स्वस्थ असावें. इतरांकडे विशेष लक्ष देऊं नये. आतां त्याच्या कृपेनें आपल्यास अब्रू प्राप्त झाली तर तिचा उपयोग करणें तो परमेश्वराचा गौरव राखण्यांत व स्वदेशाचें हित संपादण्यांत करावा. कारण ईश्वरानें ही जी योग्यता व अब्रू दिली आहे, ती अशाच प्रसंगाकरितां कदाचित् दिलेली. असेल, असें समजलें पाहिजे. याप्रमाणें त्या पुस्तकांतील उताऱ्यांचें तात्पर्य व धोरण आहे. याजवरून लहानपणीं वाशिंग्टन यांच्या मनांवर या मूलतत्वांचा ठसा उत्तम रीतीनें व दृढ उमटल्यामुळें, त्यांच्या थोरपणाच्या आयुष्याच्या वर्त्तनक्रमांत तो उत्तम प्रकारें विकासित झाला. आणि त्यामुळें वाशिंग्टन हे अनुपमेय व अपूर्व योग्यतेस पात्र झाले, असें दिसतें. तेव्हांहा प्रकार ध्यानांत आणून आपल्या देशांतील

तरुण विद्यार्थ्यांस नीतिसंबंधी शिक्षण. मिळण्याची योजना होणें किती अवश्य आहे, हें सर्वांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे.

आतां वाशिंग्टन यांच्या मनावर लहानपणापासून या नीतिशिक्षणाचा चांगला परिणाम झाला होता, व त्यांस सत्यानें वागण्याविषयीं किती धैर्य प्राप्त झालें होतें, हें पुढील त्यांच्या लहानपणांतील दोन गोष्टींवरून कळून येईल. एकदां अगदीं लहानपणीं त्यांचा बाप जीवंत असतां, त्यांला एक सुंदर लहानशी कुऱ्हाड बक्षीस मिळाली होती. ती घेऊन ते बागेंत गेले, आणि आपली कुऱ्हाड कशी चालते हें पाहाण्यासाठीं जें दृष्टीस पडेल त्यावर मारूं लागले. त्यांत त्यांच्या बापाच्या आवडीचें एक झाड त्यांनीं तोडलें. कांहीं वेळानें त्यांचा बाप बागेंत जाऊन पाहतो तों आपल्या आवडीचें झाड तोडलेलें त्याच्या दृष्टीस पडलें; त्याजमुळें त्यास फार राग आला, आणि तो त्याबद्दल गडी माणसांत विचारपूस करूं लागला. इतक्यांत एकानें सांगितलें कीं, कांहीं वेळापूर्वीं धाकटा बाबा हातांत लहानशी कुऱ्हाड घेऊन गेलेला दृष्टीस पडला होता. तें ऐकून तो त्या मुलाकडे गेला आणि त्यानें त्यास विचारलें; तेव्हां त्याणें न भितां एकदम आपल्याकडून झालेला अपराध कबूल केला. त्यामुळें बापाचा राग लागलीच शांत होऊन मुलानें न भीतां खरें सांगितलें, ह्मणून त्यास मोठा आनंद होऊन त्यानें त्याच्या अपराधाची क्षमा केली. त्याप्रमाणें बाप मेल्यावरची दुसरी अशीच एक गोष्ट घडली. वाशिंगटन यांच्या आईस घोड्यांचा फार शोक होता. त्यामुळें तीं नेहमीं चांगले चांगले घोडे जवळ बाळगी; एकदां तिणें एक नवीन सुंदर कराड्या

रंगाचें शिंगरू घेतलें होतें त्याजवर तिची फार मर्जी होती. त्याजवर स्वारी केलेली नवती, त्यामुळें त्यावर कोणासच बसण्याची परवानगी नवती तिचीं घोडीं, तीं आपल्या घरा समोर कुरणांत चरावयास मोकळीं सोडी आणि तीं सर्व तिच्या बसण्याच्या खोलींतून सहज दृष्टीस पडत असत. एके दिवशीं वाशिंग्टन यांची बाळमित्र मंडळी त्यांच्या घरीं जमली होती. ती जेवणखाण झाल्यावर खेळावयास बाहेर पडली. त्या मंडळीमध्यें त्या शिंगरावर बसून कुरणास प्रदक्षिणा करण्याविषयीं विचार निघाला. सर्वांनीं खटपट करून पाहिली; कितीएकांचा प्रयत्न त्याजवर चढतांनाच व्यर्थ गेला, कितीएक शिंगरावर बसून पडले, कोणाच्यानें ती प्रदक्षिणा शेवटास नेववली नाहीं. अखेरीस वाशिंगटन यांची पाळी आली. ते चटदिशीं उडी मारून त्याजवर बसले, आणि त्या शिंगरास इतकें जोरानें धांवविलें कीं, तें चक्कर फिरून येऊन उतरतात तोंच तें पटदिशी पडून तात्काळ मेलें. हा प्रकार झाल्याबरोबर मंडळी घाबरली; परंतु वाशिंग्टन तसेच आपल्या आईकडे गेले, आणि त्यांनीं झालेली सर्व हकीकत तिला सांगितली. अशा प्रसंगीं साधारण प्रकार कसा घडतो, हें सांगावयास नकोच कारण याचा बहुतेकांस अनुभव आहे; परंतु तो मुलगाही योग्य आणि त्याची आईही योग्य, इतकेंच ह्मटलें पाहिजे. त्यांनीं हें सांगितल्यावर नुकसान, राग लोभ वगैरेचा विचार मनांत न आणितां तुझ्यामध्यें एकदम मला येऊन सांगण्याचें धैर्य आहे हें पाहून मी तुला क्षमा करतें, जर तूं तोंड लपविलें असतेंस तर तुझा धिक्कार केला असता, इतकेंच ती बोलली.

याप्रमाणें त्यांचें नीतिशिक्षण घरामध्यें उत्तम प्रकारचें झालें होतें, त्याच्या योगानें शाळेंत असतां मुलांमध्यें प्रामाणिकपणाविषयीं त्यांची मोठी ख्याति होती. कसाही तंटा असला आणि त्यांत यांनीं एखादी गोष्ट सांगितली कीं, त्याप्रमाणें त्याचा निर्णय होत असे, व तो सर्व आनंदानें मान्य करीत. मुलांमध्यें खरेपणाप्रमाणेंच धैर्य, दृढ निश्चय व शरीरसामर्थ्य यांविषयीं त्यांची मोठी आख्या होती त्यांमुळें त्यांशीं कोणी दांडगाई अगर त्यांचा अपमान करीत नसत. सर्व मुलें त्यांचा मान ठेवीत, व त्याप्रमाणेंच त्यांजवर प्रेमही करीत असत. ते शाळा सोडून गेले त्या वेळेस तर मुलें रडलीं असें ह्मणतात. पुढें थोरपणींही सर्व लोकांमध्यें प्रामाणिकपणाविषयीं त्यांची मोठी कीर्ति झाली आणि त्यामुळेंच त्यांजवर सर्व लोकांचा पूर्ण भरंवसा बसला, व एवढा मोठा स्वदेश स्वतंत्र करण्याचा अत्यंत संकटाचा कार्यभाग त्यांच्या हातानें पार पडला. तेव्हां या गोष्टीचा चांगला विचार आमच्या लोकांनीं करून मुलांस नीतिशिक्षण चांगलें मिळेल असें केलें पाहिजे.

वाशिंग्टन यांचें या वेळपर्यंत शाळेंतील व घरांतील मानसिक नीतिशिक्षण व विद्याभ्यास यांविषयीं हकीकत सांगितली. आतां या दोन प्रकारांप्रमाणेंच तिसरा एक प्रकार शिक्षणाच्या अत्यंत आवश्यकतेचा आहे. तो हा कीं, शरीराची सुधारणा व्हावी लागते शरीरसामर्थ्य सर्व गोष्टींस अवश्य आहे. मानासिक शिक्षण होण्यास देखील शरीर चांगलें लागतें. याकरितां व्यायाम व निरनिराळ्या प्रकारच्या कसरती करणें अगदीं जरूर आहे. वाशिंग्टन यांची मूळची प्रकृति सशक्त होती. त्यांचा बाप अगोदर शरीरानें मोठा सामर्थ्यवान

होता, त्यामुळें वाशिंग्टन यांजमध्यें पिढीजाद निरोगीपणा व सामर्थ्य होतें तशांत त्यांस ल्हानपणापासून व्यायाम व निरनिराळ्या प्रकारच्या कसरती करण्याची हौस होती. शिवाय त्यांस फुरसत सांपडली कीं ते आपला वेळ कसरती करण्यांत घालवीत. यामुळें पळणें, कुस्ती करणें व घोड्यावर बसणें या तीन गोष्टींत तर त्यांची मोठी ख्याती होती. त्यांतून घोड्यावर बसण्यामध्यें तर त्या वेळेस त्या प्रदेशांत त्यांच्यासारखा दुसरा कोणी नव्हताच, असें ह्मणतात. सारांश, या प्रमाणें निरनिराळ्या प्रकारचे व्यायाम व कसरती करून जी सुदृढ शरीरसंपत्ति त्यांनीं संपादन केली ती जणूं काय त्यांनीं पुढच्या अतिशय संकटाच्या श्रमाच्या व हाल अपेष्टेच्या प्रसंगांकरितां तयारीच करून ठेविली होती. वाशिंग्टन यांजसारखें श्रमाचें व संग्रामाचें काम वारंवार लोकांस येईल, अशी कल्पना करावयास नको; तथापि कोणत्याही प्रकारचीं मोठीं कामें करण्यास लायक होण्यास सुदृढ शरीर, सुशिक्षित मन, व सदाचरण यांची अत्यंत आवश्यकता असते. तेव्हां आपणांस जगांतील जीं साधारण कर्तव्यें करावयाचीं असतात, त्यांस देखील शरीर, मन व आचरण यांची चांगल्या प्रकारची सुधारणा होण्याची जरूर असते. यास्तव आमच्या लोकांनीं व विशेषतः तरुण होतकरू मंडळीनें ह्याप्रकारची नेहमीं तयारी ठेविली पाहिजे.

## भाग ३ रा.

### वाशिंग्टन यांचा शिक्षणानंतरचा उद्योग.

वाशिंग्टन हे मूळचे श्रीमान् नव्हते, ही एक प्रकारची चांगलीच गोष्ट होती. कारण त्यांस लवकर आपल्या पोटाच्या धंद्याकरितां उद्योग आणि आपल्या बुद्धीचा व ज्ञानाचा उपयोग करावा लागला. त्यांच्या बापाची स्थावर मिळकत मोठी होती खरी; परंतु ती पुष्कळ मुलांस वांटावयाची होती. वेस्ट मोरलंडमधील शाळा सोडल्यापासून ते उद्योग धंदा करूं लागण्यासारखे होत तोंपर्यंत कधीं रापाहानाक नदीच्या कांठच्या त्यांच्या आईच्या स्थावर मिळकतीवर व कधीं मौंट वर्नान येथें त्यांचा सावत्रभाऊ लारेन्स वाशिंग्टन याच्या येथें राहत असत. या अवकाशांत वेळ फावला कीं तो ते कसरती वगैरे करण्यांत घालवीत. हा व्यायाम करण्याचा त्यांचा प्रकार यावज्जीव चालू होता, त्यामुळें त्यांचें शरीर सदृढ राहून मनास मोठी बळकटी असे. पुढें थोर झाल्यावर कसरतीप्रमाणेंच फुरसतीचा कांहीं काळ वाचनांत अभ्यास व मनन करण्यांत ते घालवीत. हा प्रकार त्यांची योग्यता वाढविण्यास फार कारण झाला. त्यांस लढाईच्या वेळीं संग्रामाचीं, बिकट संकटाचीं व धाडसाचीं, व स्वस्थतेच्या वेळीं राज्यकारभार चालविण्याच्या प्रसंगीं विचाराचीं, न्यायाचीं, व देशहिताचीं कामें करावीं लागलीं; आणि अशा समयीं मनुष्याच्या मनांतील दुर्विकार बाहेर पडण्याची मोठी संधी असते; परंतु त्या सर्व प्रसंगांतून हा पुरुष अगदीं निर्मळ, काडीमात्र संशयाची देखील कालिमा न लागतां, पार पडला.

देशांतील गृहकलह, मतभेद, व पक्षभिन्नता आणि परदेशांशीं राजकारणासंबंधानें, व्यापारासंबंधानें, व विरुद्धपणाच्या कारणानें वगैरे प्रकारच्या अडचणी अनेक असतां या सर्वांमध्यें अगदीं निर्विवाद निर्दोष असा तो जगापुढें सूर्यासारखा सोज्वळ उभा राहिला, हा मोठा चमत्कार आहे. या सर्वांस कारण त्यांचें शरीर, मन व आचरण यासंबंधाचें शिक्षण होय.

लहानपणीं दांडगाई करण्याचा मुलांचा स्वभावच असतो त्यामुळें कोणामध्यें खरा शिपाईगिरीचा स्वभाव व कल आहे, हें बरोबर समजत नाहीं, हें तर खरेंच; तथापि वाशिंग्टन यांजमध्यें तो शिपाईगिरीचा स्वभाविकगुण लहानपणापासून दिसत होता. त्यांनीं चौदा वर्षांचे असतांच तारवावर मिडशिपमनच्या जाग्याकरितां अर्ज केला, आणि ती जागा त्यांस मिळाली. परंतु परमेश्वराची इच्छा निराळी होती. तें काम त्यांनीं पतकरावें असें त्याच्या मनांत नव्हतें, त्यामुळें त्यांची आई या कामास आड आली. त्यांचें सामान सुमान देखील जहाजावर गेलें होतें; परंतु त्यांच्या आईच्या विनवण्यामुळें तो बेत त्यांस सोडून द्यावा लागला. तें काम त्यांस मिळून ते गेले असते तर फार झालें तर जहाजावरच्या कपतानाची जागा त्यांस मिळाली असती आणि कोणीकडे गेले असते याचा नेम नवता. परमेश्वराच्या मनांत त्यांस त्यांच्या देशाचा उद्धारकर्त्ता व जगास उत्तम कित्ता करावयाचें होतें. त्यामुळें त्यानें तो बेत त्यांजकडून रहीत करविला, असें ह्मटल्यास चालेल.

वाशिंग्टन यांनीं शाळा सोडल्यावर ते आईकडे अथवा सावत्र भावाकडे असत. एकदां ते आपला भाऊ लारेन्स याजकडे असतांना त्यांच्या भावानें मि० विलियम फेरफाक्स

नांवाच्या गृहस्थाची ओळख करून दिली. हे गृहस्थ लारेन्सचे मेव्हणे होते. त्यांची वहीण लारेन्सची बायको होती. मि० फेरफाक्स हे वार्जिनीया प्रांतांतील लार्ड फेरफाक्स या एक मोठ्या जमीनदाराचे जवळचे नातलग होते मि० विलियम फेरफाक्सानीं वाशिंग्टनचा लार्ड फेरफाक्स यांशीं परिचय करून दिला होता. त्यामुळें त्यांणीं आपल्या मोठ्या जमीनदारीचें सर्वेयरचें काम वाशिंग्टन यांस सांगितलें. ही जमीनदारी फार विस्तीर्ण असून कितीएक भागांत वस्ती देखील नवती अशा जमीनीचा शोध लावून पाहणी करावयाची होती. त्याजमुळें त्यांस विशेष श्रम करावे लागले. व अडचणी आणि संकटें सोसावीं लागलीं. कारण तीं सर्व जंगलें होतीं. श्रमाच्या व साहसाच्या कामामुळें थंडी, वारा, ऊन, पाऊस वगैरे सोसण्याचें त्यांस विशेष सामर्थ्य प्राप्त झालें. लार्ड फेरफाक्स हे वाशिंग्टन यांचा लढाईमध्यें जय होई तोंपर्यंत जीवंत होते, व आपल्या पूर्वींच्या सुर्वेयरच्या हातानें एवढें महत्कृत्य झाल्याचें ऐकून त्यांस मोठें समाधान वाटलें.

वाशिंग्टन यांस शिपाईगिरीच्या धंद्याची स्वाभाविक आवड होती. त्यामुळें त्यांणीं वेस्टमोरलंडचे अजिटंट म्यूज ह्मणून एक अनुभविक सरदार होता त्याजवळ ते तरवार खेळण्याची कसरत शिकले, व ते त्या कामांत लवकरच चांगले तरबेज झाले. शिवाय त्या गृहस्थापाशीं युद्धकलेचीं कांहीं पुस्तकें होतीं, तीं आणून वाचून त्यांनीं साधारण माहिती संपादन केली. तरवारीच्या कसरतीमध्यें उत्तम व विशेष प्रवीण होण्या करितां मोशो वान ब्राम नांवाच्या एका फ्रेंच गृहस्थापाशीं त्यांनीं ·णखी अभ्यास केला. सारांश, शिपाईगिरीच्या धंद्यास ला-

गणाऱ्या ज्ञानाची त्यांनीं अशी अनेक प्रकारें प्राप्ती करून घेतलं व ती त्यांच्या भावी उत्कर्षास कारण झाली. या समया फ्रेंच सरकार व इंग्लिश सरकार यांजमध्यें सरहद्दीचा तंट होता. त्यामुळें लढाईचा प्रसंग येईल असें समजून वर्जिनिय प्रांतांत लोकांस कवाईत वगैरे शिकविण्याचें काम सरकारा कडून सुरू झालें होतें. उत्तर अमेरिकेंत फ्रेंच व इंग्लि यांचाच अधिकार चालू होता व दोघांचा हक्क काय तो मुलूर शोधून काढल्याबद्दलचा होता. फ्रेंच लोकांकडे आतां त्य प्रदेशापैकीं कांहीं राहिलें नाहीं. परंतु त्या वेळेस दोन्ही पक्ष अधिकारानें सारखेच होते, आणि एका रानाबद्दल त्या दोघा मध्यें तंटा होता; परंतु त्या दोघांसही त्या रानाच्या मर्याद अथवा विस्तार यांची माहिती नव्हती; सारांश हा सर्व खेळा सारखाच प्रकार होता. या तंट्यामुळें त्या मुलखांतल्या रहि वासी लोकांच्या मात्र प्राणांशीं गांठ पडे. असो. फ्रेंच हळू हळू पुढें सरकत सरकत ओहिओ नदीपर्यंत सरकले. पुढें आलेघानी व मानोनगेहला या नद्यांच्या संगमाजवळ त्यांनीं किल्ला बांधला. त्यांच्या मनांत इंग्लिश लोकांस आलिघानी पर्वताच्या पलीकडे दाबून ठेवावें आणि बाकीच्या सर्व प्रदे- शांत आपलें वर्चस्व संपादन करावें असें होतें. हें धोरण मनांत आणून वर्जिनियाच्या हद्दीवर लोकांस फार त्रास होईल या भीतीनें इंग्लिश सरकारानें पलटणींत लोक भरून कवाईत शिकविण्यास सुरवात केली. तेव्हां आरंभींच एकदम वाशि- ग्टन यांची वर्जिनिया प्रांताच्या डेप्युटी अजिटंट जनरल या महत्वाच्या सरदारीच्या जाग्यावर नेमणूक झाली आणि हा हुद्दा केवळ त्यांस युद्धकलेचें वगैरे ज्ञान असल्याबद्दल लोकां

माहिती झालेली होती, याजमुळेंच मिळाला असावा असें दिसतें. या हुद्याबरोबर त्यांस मेजरची लष्करी योग्यता व पदवी मिळाली. या वेळेस वर्जिनिया प्रांताचे इंग्लिश सरकारचे लेफ्टेनेंट गवर्नर डिनविडी हे मुख्याधिकारी होते. फ्रेंच सरकारचा झोंक पाहून त्यांच्या मनांत भीति उत्पन्न झाली, व त्यांजप्रमाणेंच इतर लोकांस धास्ती वाटली. कारण, आलेघानीच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेश ओसाड रान होतें. आणि त्यांत हिंसक जनावरें व त्यांसारखेच क्रूर व रानवट लोक फिरत असत. शिनान डोआचि खिंड, जी आतां हजारों लोकांनीं भरलेली आहे, ती त्या वेळेस अगदींच थोडे गोरे युरोपियन लोकांनीं वसाहात केलेली होती. लोक फार दूर दूर राहात, व एक्या घराच्या धुरांड्याचा धूर देखील दुसऱ्या घरास दिसत नसे. या लोकांस वारंवार तेथील रानटी इंडियन लोकांच्या स्वाऱ्यांपासून त्रास सोसावा लागत असे. ते आले ह्मणजे लुटीत, मनुष्यें मारीत, व मेलेल्या मनुष्यांच्या प्रेतांची देखील दुर्दशा करीत. शिवाय ते बायका, पुरुष किंवा लहान मुलें किंवा ह्मातारे यांचा कांहीं विचार किंवा विधीनिषेध मानीत नसत. सांपडेल त्यास मारावें एवढाच कायतो विचार. याजमुळें फ्रेंच लोक जवळ आल्यामुळें हा कहर विशेष माजेल, कारण फ्रेंच लोकांचा या रानटी लोकांशीं बरेपणा होता, तेव्हां हा पुढचा अनर्थ टळावा, फ्रेंच लोकास बजावून सांगावें, इंडियन लोकांचा कसा काय विचार आहे याचा अजमास पाहावा, व त्यांशीं होईल तितका स्नेहभाव वाढवावा, या हेतूनें ओहिओ येथील फ्रेंच सरदार ...र पियरे यांजकडें पत्र देऊन वकील पाठवावा असा गवर्नर

गणाऱ्या ज्ञानाची त्यांनीं अशी अनेक प्रकारें प्राप्ती करून घेतली व ती त्यांच्या भावी उत्कर्षास कारण झाली. या समयास फ्रेंच सरकार व इंग्लिश सरकार यांजमध्यें सरहद्दीचा तंटा होता. त्यामुळें लढाईचा प्रसंग येईल असें समजून वर्जिनिया प्रांतांत लोकांस कवाईत वगैरे शिकविण्याचें काम सरकाराकडून सुरू झालें होतें. उत्तर अमेरिकेंत फ्रेंच व इंग्लिश यांचाच अधिकार चालू होता व दोघांचा हक्क काय तो मुलूख शोधून काढल्याबद्दलचा होता. फ्रेंच लोकांकडे आतां त्या प्रदेशापैकीं कांहीं राहिलें नाहीं. परंतु त्या वेळेस दोन्ही पक्ष अधिकारानें सारखेच होते, आणि एका रानाबद्दल त्या दोघामध्यें तंटा होता; परंतु त्या दोघांसही त्या रानाच्या मर्यादा अथवा विस्तार यांची माहिती नव्हती; सारांश हा सर्व खेळासारखाच प्रकार होता. या तंट्यामुळें त्या मुलखांतल्या रहिवासी लोकांच्या मात्र प्राणांशीं गांठ पडे. असो. फ्रेंच हळू हळू पुढें सरकत सरकत ओहिओ नदीपर्यंत सरकले. पुढें आलेघानी व मानोनगेहला या नद्यांच्या संगमाजवळ त्यांनीं किल्ला बांधला. त्यांच्या मनांत इंग्लिश लोकांस आलिघानी पर्वताच्या पलीकडे दाबून ठेवावें आणि बाकीच्या सर्व प्रदेशांत आपलें वर्चस्व संपादन करावें असें होतें. हें धोरण मनांत आणून वर्जिनियाच्या हद्दीवर लोकांस फार त्रास होईल या भीतीनें इंग्लिश सरकारानें पलटणींत लोक भरून कवाईत शिकविण्यास सुरवात केली. तेव्हां आरंभींच एकदम वाशिंग्टन यांची वर्जिनिया प्रांताच्या डेप्युटी अजिटंट जनरल या महत्वाच्या सरदारीच्या जाग्यावर नेमणूक झाली आणि हा हुद्दा केवळ त्यांस युद्धकलेचें वगैरे ज्ञान असल्याबद्दल लोकांत

माहिती झालेली होती, याजमुळेंच मिळाला असावा असें दिसतें. या हुद्याबरोबर त्यांस मेजरची लष्करी योग्यता व पदवी मिळाली. या वेळेस वर्जिनिया प्रांताचे इंग्लिश सरकारचे लेफ्टेनेंट गवर्नर डिनविडी हे मुख्याधिकारी होते. फ्रेंच सरकारचा झोंक पाहून त्यांच्या मनांत भीति उत्पन्न झाली, व त्यांजप्रमाणेंच इतर लोकांस धास्ती वाटली. कारण, आलेघानीच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेश ओसाड रान होतें. आणि त्यांत हिंस्रक जनावरें व त्यांसारखेच क्रूर व रानवट लोक फिरत असत. शिनान डोआचि खिंड, जी आतां हजारों लोकांनीं भरलेली आहे, ती त्या वेळेस अगदींच थोडे गोरे युरोपियन लोकांनीं वसाहात केलेली होती. लोक फार दूर दूर राहात, व एक्या घराच्या धुरांड्याचा धूर देखील दुसऱ्या घरास दिसत नसे. या लोकांस वारंवार तेथील रानटी इंडियन लोकांच्या स्वाऱ्यांपासून त्रास सोसावा लागत असे. ते आले ह्मणजे लुटीत, मनुष्यें मारीत, व मेलेल्या मनुष्यांच्या प्रेतांची देखील दुर्दशा करीत. शिवाय ते बायका, पुरुष किंवा लहान मुलें किंवा ह्मातारे यांचा कांहीं विचार किंवा विधीनिषेध मानीत नसत. सांपडेल त्यास मारावें एवढाच कायतो विचार. याजमुळें फ्रेंच लोक जवळ आल्यामुळें हा कहर विशेष माजेल, कारण फ्रेंच लोकांचा या रानटी लोकांशीं बरेपणा होता, तेव्हां हा पुढचा अनर्थ टळावा, फ्रेंच लोकास बजावून सांगावें, इंडियन लोकांचा कसा काय विचार आहे याचा अजमास पाहावा, व त्यांशीं होईल तितका स्नेहभाव वाढवावा, या हेतूनें ओहिओ येथील फ्रेंच सरदार ले पियरे यांजकडें पत्र देऊन वकील पाठवावा असा गवर्नर

डिनविडी यांणीं विचार केला. हें काम डामडौलाचें व दरबारी घाटाचें नव्हतें. उलटें भीतीचें व संकटाचें होतें. या कामास धैर्य, दृढनिश्चय, उद्योगीपणा व वाटेंत होणारा त्रास व संकटें सोसण्याचें स्वतांचें सामर्थ्य पाहिजे होतें. हा अडचणीचा प्रकार पाहून कोणी तें काम करण्यास धजेना. गवर्नराच्या जवळचे कामगार देखील कोणी जाण्यास कबूल होईनात. अशा प्रसंगीं वाशिंग्टन यांनीं आपण होऊन पुढें सरसावून मी हें काम पतकरून जातों असें सांगितलें. त्याजवरून त्या गवर्नरास मोठें समाधान वाटून तो वाशिंग्टन यांस बोलला कीं, मुला तूं धैर्यवान आहेस, आणि तूं जर हें काम नीट बजाविलेंस, तर तुझें कल्याण होईल. याप्रमाणें हें संकटाचें व जोखिमाचें काम त्यांनीं पतकरलें.

वाशिंग्टन यांची तयारी सारी एक दिवसांत झाली. तरवारीची कसरत शिकविणारा त्यांचा पूर्वींचा गुरुजी वान ब्राम यास दुभाषी ह्मणून त्यांनीं बरोबर घेतला. शिवाय दोन चाकर बरोबर घेतले. गवर्नर डिनविडी यांणीं फ्रेंच फौजेचे सरदार यांस एक पत्र दिलें होतें, तें घेऊन जावयाचें होतें. तें घेतलें आणि ते चालते झाले. हा पर्जन्यकाळचा समय होता. वाटेनें वारा, पाऊस, जागोजागच्या नद्या पावसाच्या व बर्फ वितळल्याच्या पाण्यानें भरलेल्या होत्या; विल्स क्रिक या ठिकाणापर्यंत साधारण लष्करी रस्ता केलेला होता, तेथपर्यंत मंडळी गेली. पुढें वाटाडी घ्यावा लागला. शिवाय आणखी चार चाकर घेऊन ते पुढें गेले. वाटेंत फार हाल होऊन अतिशय त्रास सोसावा लागला. विल्स क्रीक सोडल्यापासून आंठव्या दिवशीं आलेघानी व मानोनगेहला या नद्यांच्या संगमाजवळ

पोंचले. अडचणीचा व संकटाचा रस्ता पुढें आहे असें त्यांस वाटलें ह्मणजे ते मनुष्यें व सामान मागें टाकून आपण एकटेच पुढें जात, आणि नानातऱ्हेच्या गोष्टी पाहून विचार करून आपल्या रोजनिशींत लिहून ठेवीत. याजवरून त्यांचें शहाणपण व धूर्तता उत्तम दिसून येते. त्या सवयीप्रमाणें मनुष्यें व सामान मागें टाकून त्या नद्यांच्या संगमाजवळ येऊन सर्व आसपास फिरून पाहून त्यांच्या प्रवाहाचे ओघ व जोर व मधील ( दुभळण्याची ) जागा व आसपासचें जंगल पाहून तेथें किल्ला बांधला असतां फार उपयोग होईल असें त्यांना वाटलें. या त्यांच्या विचाराप्रमाणेंच पुढें थोड्या दिवसांनीं फ्रेंच लोकांनीं तेथें व त्यांनीं कल्पना केलेल्या ठिकाणावरच किल्ला बांधला. जागा उत्तम पाहून किल्ले बांधण्याच्या कामांत फ्रेंच लोकांची मोठी कीर्ति होती, व ती अद्याप कायम आहे. तेव्हां त्यांनीं पसंत केलेल्या ठिकाणींच किल्ला बांधला, हें कृत्य वाशिंग्टन केवळ एकोणीस वर्षांचे असतांच घडलें. हें त्यांच्या अल्प वयांतील बुद्धिमत्तेचें द्योतक आहे. व हें सामर्थ्य लक्षपूर्वक अवलोकनाचा उपयोग व्यवहारांत करण्याच्या संवईनें त्यांस प्राप्त झालें होतें.

याप्रमाणें प्रवास करीत करीत ते फ्रेंच सरदार होता तेथें पोंचले. त्या सरदारास भेटून त्यास तें पत्र दिलें. तेथील इंडियन लोकांच्या सरदारांस एकत्र जमवून त्यांजशीं बोलणें चालणें करण्याचा त्यांनीं उद्योग केला. हा त्यांचा हेतु सिद्धीस न जावा या बुद्धीनें त्या फ्रेंच सरदारानें पुष्कळ खटपट केली. शेवटीं वाशिंग्टन यांनीं हळूच युक्तीनें मोशो जानकेर वगैरे फ्रेंच सरदारांकडून त्यांच्या सरकारचा काय हेतु होता तो काढून

घेतला. त्यांच्या मनांत ओहिओ प्रांत आपल्या ताब्यांत घ्याव-याचा होता असें कळलें. याप्रमाणें त्यांनीं कामगिरी बजाविली आणि नंतर ते परत यावयास निघाले.

ते परत यावयास निघाले तों त्यांच्या बरोबरचीं घोडीं अगदीं थकून ओझें नेण्याच्या कामीं निरुपयोगीं झाल्यामुळें त्यांस सोडून देऊन घोडे मिळण्याच्या ठिकाणापर्यंत पायानींच चालत जाण्याचा त्यांनीं निश्चय केला. कागदपत्र,कपडे, खाण्याचे पदार्थ वगैरे पाठीशीं बांधून घेऊन वरून एक मोठा डगला घालून हा-तांत बंदूक घेऊन मि. गिस्ट नांवाच्या मनुष्यास बरोबर घेऊन ते ता. २६ डिसेंबर रोजीं तेथून निघाले. दुसऱ्या दिवशीं "मर्डरिंग टौन" नांवाच्या गांवाजवळून गेल्यावर वाटेंत कांहीं फ्रेंच व इंडियन लोक यांची त्यांना धरण्यास एक टोळी छपून बसली होती, त्यांपैकीं एकानें पंधरा पावलांवरून वाशिंग्टन-यांवर गोळी घातली; परंतु ती चुकली. तेव्हां त्या मनुष्यास धरून बरोबर घेतलें. रात्रीं नऊ वाजत तोंपर्यंत ते चालते राहिले; आणि शेवटीं त्यास सोडून दिलें, व स्वतां पुढें वाट चालत; कारण उजाडल्याबरोबर हे लोक पाठलाग करीत येतील अशी त्यांस भीति होतीच. दुसऱ्या दिवशींही अंधार पडे तोंपर्यंत वाट चालले, आणि एका नदीजवळ पोंचले. नदींत बर्फ असेल व तिजवरून चालत जातां येईल अशा समजुतीनें ते गेले;परंतु बर्फ फुटून पाणी वाहात होते. उजाड-ल्यावर दुसऱ्या दिवशीं सर्व दिवस एक लहानशी कुऱ्हाड होती तिणें लाकडाचे ओंडके तोडून त्यांची सांगड बांधण्यांत त्यांनीं घालविला. ती लांकडाची सांगड नदींत सोडून बरेच मध्यावर गेले, तों बर्फाच्या योगानें ती अडकल्यासारखी

झाली. इतक्यांत ती चालविण्याच्या काठीनें बर्फ जाण्याकरितां सांगड थांबविण्याचा जोरानें प्रयत्न करीत असतां, त्या काठीवर एकदम भार पडून ती मोडली. त्या धक्यानें वाशिंग्टन हे दहा फूट खोल पाण्यांत उडून पडले; परंतु त्यांनीं सांगडीच्या एक्या ओंडक्यास धरून आपला प्राण वांचविला. पुढें कांठास लागावें ह्मणून त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. शेवटीं ती सांगड सोडून देऊन जवळ एक बेट होतें, त्या बेटाकडे पोहत जाऊन पोंचले. त्या वेळीं त्यांचें शरीरसामर्थ्य, पोहण्याचें ज्ञान व मनाची हिंमत, हीं चांगल्या प्रकारें दिसून आलीं. त्या दिवशीं थंडी अतिशय पडली त्यामुळें पाणी चांगलें थिजलें, तेव्हां दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या बेटांतून बर्फावरून जाण्यास अडचण पडली नाहीं. वाटेंत वीस शिपाई जाणारे भेटले, त्यांणीं कांहीं इंडियन लोकांनीं सात मनुष्यें मारून त्यांचीं डोकीच्या कंवट्या कापून नेलेलीं अशीं प्रेतें पाहिलीं, ह्मणन सांगितलें. ज्या गांवाजवळ हा अनर्थ झाला होता, तेथेंच त्यांस घोडे खरेदी करावयाचे होते, त्याजमुळें त्या गांवीं जाऊन घोडे घेतले, तेथून तीन मैलांवर योहोगनी येथें इंडियन सरदारांची एक क्वीन आलेपो ह्मणून राणी होती, तिची भेट घेतली, व तिला तो अंगावरचा मोठा डगला व दारूची एक बाटली बक्षीस दिली.

याप्रमाणें संकटाचा व दुःखाचा प्रवास करीत करीत वर्जिनिया प्रांताच्या राजधानीचें स्थान जें विलियम्सबर्ग शहर येथें येऊन पोंचले. आणि गवर्नर साहेबांची गांठ घेतली, व त्यांस फ्रेंच सरदारानें दिलेलें उत्तर दिलें. आणि वाटेंतील

सर्व हकीकत कळविली. वाशिंग्टन यांनीं कामगिरी उत्तम रीतीनें बजाविल्याबद्दल गवर्नर साहेब यांस फार समाधान वाटलें. तेथील लोकांनीं निवडलेल्या मंडळीची सभा त्या वेळेस भरलेली होती तेथें वाशिंग्टन त्यांस पाहून त्यावेळेचा सभेचा अध्यक्ष यांनें अशी एकदम सूचना केली कीं, गवर्नर डिनविडी साहेबांनीं मेजर वाशिंग्टन जे येथें हल्लीं येऊन बसले आहेत, त्यांस एक मोठी जोखमाची कामगिरी सांगितली होती, ती त्यांणीं फार चांगल्याप्रकारें व मोठ्या हिमतीनें बजाविली, सबब ही सभा त्यांचे फार आभार मानते. ही सूचना झाल्या बरोबर त्या सभेच्या प्रत्येक सभासदानें उठून वाशिंग्टन यांस सलाम केला. त्यावेळेस वाशिंग्टन हे उठून उभे राहून चार शब्द बोलून समाधान व उपकार प्रदर्शित करण्याचा प्रयत्न करीत होते; परंतु या मित्रमंडळींत ते अगदीं गांगरून गेले. ही त्यांची अडचणीची स्थिति पाहून अध्यक्ष पुनः बोलले, बसा मेजर वाशिंग्टन बसा; आपल्या इतर सद्गुणांसारखाच आपला भिडस्तपणा व आपली मर्यादशीलता स्तुत्य आहे. याप्रमाणें त्यांनीं आपली स्वदेशाची पहिली कामगिरी बजावली तिचा योग्य परिणाम झाला. हा भिडस्तपणा व ही मर्यादशीलता अखेरपर्यंत त्यांमध्यें नेहमीं कायम होती. यामुळें ते कधीं कोणावर जहाल गेले नाहींत किंवा त्यांनीं कोणाचा कधींही अपमान केला नाहीं. या हकीकतीवरून त्यांचें शरीर सामर्थ्य, मानसिक ज्ञान व उत्तम आचरण हीं चांगल्या प्रकारें दिसून येतात आणि तीं सर्वांस अवश्य आहेत असें सिद्ध होतें. सारांश खऱ्या व उत्तम प्रकारच्या योग्यतेस येण्यास सद्गुण, धैर्य व स्वदेशप्रीति यांची अत्यंत आवश्यकता आहे

कारण हें यश संपादण्यास हे गुण मुख्यत्वें कारण झाले. स्वदेशप्रीति जर त्यांच्या अंतःकरणांत असावी तितकी प्रज्व-लित नसती, तर हें आपल्या देशाचें असें संकटाचें, दुःखाचें व महत् प्रयासाचें नाजूक काम आपण होऊन त्यांनीं पतकरलें नसतें. सारांश प्रत्येक मनुष्यांत खरोखर स्वदेशाचें प्रेम उत्पन्न होतें, तेव्हांच तो सर्व प्रकारें झीज सोसण्यास प्र-वृत्त होतो.

याप्रमाणें ही स्वदेशाची पहिली कामगिरी बजाविल्यावर ते आपल्या भावाजवळ होते. त्यांचा वडील सावत्रभाऊ लारेन्स वाशिंग्टन यांची जार्ज वाशिंग्टन यांजवर फार ममता होती, व ते नेहमीं आपल्याजवळ असावे, असें त्यास वाटे ह्मणून ते मौंट वर्नान येथें बहुधा राहात असत. परतु तसें राहणें वाशिंग्टन यांस आवडत नसे. त्यांच्या मनांत आपल्या श्रमानें आपण योग्यतेस यावें अशी मोठी जबरदस्त इच्छा असे. निकामीं मेलें अन्न खाण्याचें आणि दुसऱ्याच्या वाशी-ल्यानें वाढण्याचें या दोन्ही गोष्टी त्यांस आवडत नसत. याज-मुळेंच त्यांनीं लार्ड फेरफाक्स यांच्या ईस्टेटीवर सर्वेयरचें काम पतकरलें; परंतु लारेन्स वाशिंग्टन यास क्षयरोग होऊन तो थकत चालला होता, याजमुळें तो उद्योग सोडून देऊन वाशिं-ग्टन हे आपल्या भावाबरोबर हवा पालटण्यासाठीं बरमुडा बेटावर राहवयास गेले.

# भाग चौथा.

## फ्रेंच व इंग्रज यांचा तंटा.

मध्यंतरीं फ्रेंच आणि इंग्लिश लोकांमधील तंटा अधिक वाढून इंग्लिश सरकारानें विचार करून उत्तर अमेरिकेंतील आपल्या ताब्यांतील सर्व प्रांत अगर संस्थानें यांचें ऐक्य करून लढाईची तयारी चालविली. त्यांत जवळ आणि दूर अशा प्रदेशांच्या मानानें तयारी मोठी व झपाट्यानें चालविली. पैसे व मनुष्यें जमवून पलटणी भरल्या. त्यांत वर्जिनिया प्रांताचा निकट संबंध होता, यामुळें त्यास विशेष तयारी करावी लागली. एक पलटण भरून तयार केली व तीवर सरदार नेमिले त्यांत वाशिंग्टन यांस लेफ्टेनेंट कर्नल ह्म० दुय्यम सरदार नेमिलें. या नेमणुकेच्या संबंधानें एक चमत्कारिक गोष्ट झाली ती लिहिल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. त्या गोष्टीवरून, त्यांच्या स्वतांच्या हितापेक्षां प्रिय स्वदेशाच्या हिताकडे त्यांचें लक्ष विशेष होतें, हें उघड दिसून येईल; आणि हें उदाहरण आमच्या वाचकांनीं उत्तमप्रकारें नेहमीं आपल्या ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. वर्जिनियामध्यें पलटण भरण्याची सुरुवात झाल्यापासून वाशिंग्टन यांस तिच्या मुख्य सरदारीचा ह्मणजे कर्नेलचा हुद्दा मिळावा अशी लोकांची इच्छा होती, व तो मिळेल असेंही दिसत होतें. कारण त्यांचे सद्गुण, त्यांची सर्व प्रकारची योग्यता हीं मोठीं होतीं, व त्यांनीं नुक्तीच एक नाजूक परंतु मोठी बहादुरीची कामगिरी बजाविली होती. आतां या समयास त्यांचें वय एकविसांच्या आतच होतें. ही दाट वदंता त्यांच्याही कानावर आली होती. त्या वेळेस तेथील पार्लमेंटच्या एका सभासदास त्यांनीं एक पत्र लिहिलें होतें. त्यांत ते आं

ग्रंथ संग्रहालय. ठाणे.
ह्मणतात कीं, "या सर्व फौजेच्या मुख्याधिकाराची जागा मला मिळावी, असें वाटत नाहीं, व तिची आशाही मी करीत नाहीं. अगर मला तिची इच्छा देखील नाहीं. कारण मी आपल्यास निष्पक्षपातानें कळवितों कीं, माझ्या अल्पवयस्कपणास व कमी अनुभवास मला ती जागा अगदीं योग्य नाहीं. यास्तव ज्या योगानें माझ्या देशाच्या हितास धक्का बसेल, असें काम माझी स्वदेशावरची ममता मला पतकरूं देत नाहीं, तथापि आपल्यास मी लेफटेनेंट कर्नलच्या जाग्यास योग्य आहें, असें वाटत असेल तर, सरदारांच्या नेमणुका होण्याच्या प्रसंगीं आपण माझें नांव कळविलें असतां आपण मजवर मेहरबानी केली असें मी समजेन." आतां या पत्राच्या तात्पर्यावरून वाचकांनीं वाशिंग्टन यांजविषयीं काय कल्पना करावयाची असेल ती करावी. असें निष्प्रांजल स्वदेशप्रेमाचें व हिताचें उदाहरण जगांत देखील आपल्या ऐकण्यांत येण्याची भ्रांति आहे. मग आमच्या दुर्दैवी, स्वदेश व स्वदेशप्रीति यांजविषयीं अजाण, व नेहमीं कलहानें, फितुरानें व स्वार्थपरायणतेनें व्यापिलेल्या हिंदुस्थानांत कोठून ऐकूं येणार? आमचा देश त्याच्या लेंकरांनीं प्रीति करण्यास अपात्र आहे, किंवा आमच्या स्वदेशबांधवांत असा गुण असण्याची लायकी नाहीं, असें नाहीं. स्वदेश ही आपली जननी आहे, व तिजवर प्रेम करणें व तिच्या व तिच्या लेंकरांच्या हितार्थ उद्योग करणें हा एक मुख्य सद्गुण असून तो आपला धर्म आहे, अशी आह्मांमध्यें कल्पना नाहीं. याजमुळेंच आह्मांमध्यें आपलीं पोटें जाळण्याकरितां किंवा द्वेषाकरितां अगर अल्पशा स्वार्थाकरितां संस्थानें व राज्यें बुडविलीं; अशा निंद्य गोष्टीच विशेष ऐकण्यांत येतात. असो.

झालें तें गेलें. आतां ज्यांस कळतें त्यांणीं या ज्ञानाची प्राप्ति व आवड सर्व देशांतील लोकांमध्यें उत्पन्न होण्यास्तव मनःपूर्वक प्रयत्न केला पाहिजे, एवढें आमचें सांगणें आहे.

वाशिंग्टन यांस सन १७५४ मध्यें वर्जिनिया प्रांतांतील पलटणीची दुय्यमसरदारी ह्मणजे लेफ्टेनेंट कर्नलची जागा मिळाली, आणि ते आपल्या कामावर हजर झाले. कर्नल फ्राय हा मुख्यसरदार होता. परंतु हा हुद्दा मिळाल्यावर तो लवकरच मेला. त्याजमुळें त्या पलटणीच्या मुख्य सरदारीचें काम वाशिंग्टन यांचेकडे आलें. त्या पलटणीच्या दोन कंपन्या घेऊन आलिघानी पर्वतांतील ग्रेट मेडोज या ठिकाणीं ते गेले. ब्लू रिज्ज ही जागा वर्जिनिया प्रांताची सरहद्द होती. त्या पलीकडील खिंडींत कांहीं थोड्या लोकांची वस्ती होती; परंतु त्यांचा संबंध राजकीय रीतीनें कोणाशींच नव्हता. त्यांस वाटेल तसें ते स्वतंत्र वागत असत. वाशिंग्टन हे तिकडे गेल्यावर सरहद्दीचें संरक्षण करण्यास बरेंच सांपडलें. हें ठिकाण फ्रेंच लोकांच्या अगदीं तोंडावर होतें. हे ग्रेट मेडोज येथें असतां फ्रेंच लोकांनीं तंटा सुरू केला असें त्यांस समजलें. ओहिओ कंपनीच्या कामावरचे लोक त्यांणीं हांकून लावून तंट्यास आरंभ केला. हें पाहून वाशिंग्टन यांनीं एके अंधारे रात्रीं पाऊस पडत असतां कांहीं लोक बरोबर घेऊन फ्रेंच फौजेची टोळी एका ठिकाणीं होती तिच्यावर पहाटे एकाएकीं हल्ला करून गोळी सुरू केली. तेव्हां फ्रेंच लोकांचा सरदार मारला गेला, आणि बाकीचे सर्व लोक हस्तगत झाले. एकजण मात्र पळून गेला.

पुढें पलटणीच्या दोन कंपन्या व इतर लोक येऊन ग्रेड

मेडोज येथें पोंचले. तेव्हां वाशिंग्टन यांनीं तेथें किल्ल्यासारखा एक कोट बांधला, व त्यास फोर्ट नेसेसिटी असें नांव दिलें. हा किल्ला बांधण्याच्या कामास आपण सरदार असतां सर्वांबरोबर ते काम करूं लागले. नंतर तेथें बंदोबस्त करून ते फोर्ट डयु केसने किल्यावर चाल करून गेले. हा किल्ला वाशिंग्टन यांनीं पूर्वीं ज्या जाग्यावर किल्ला बांधला असतां सोयकर होईल ह्मणून कल्पना करून आपल्या रोजनिशींत लिहून ठेविलें होतें, त्याच जागावर फ्रेंच सरकारानें बांधलेला होता. पुढें ते जात असतां, वाटेंत इंग्लिशांच्या दोस्तींपैकीं कांहीं इंडियन लोक त्यांस भेटले, व त्यांनीं सांगितलें कीं, फ्रेंच लोक व इंडियन लोक यांचा मोठा जमाव फार त्वरेनें येत आहे हें कळल्यावर वाशिंग्टन यांनीं सरदारांचे कौन्सिल भरून विचार केला, तेव्हां फोर्ट नेसेसिटीकडे लवकर परत जावें, हें बरें असें ठरलें. सबब ती लहानशी फौज लागलीच परतली; परंतु संरक्षणाकरितां पुरता बंदोबस्त करण्याच्या पूर्वींच फ्रेंच फौजेचा सरदार डी विलियर पंधराशें लोक घेऊन तेथें येऊन पोंचला. त्या वेळीं वाशिंग्टन यांजजवळ तीनशें शिपाई होते; त्यांनीं तो किल्ला बरेच दिवसपर्यंत संभाळला. बाकीची येणारी कुमक फ्रेंच लोकांची फौज मोठी आहे असें ऐकूनच परतली. निरुपाय झाल्यावर फ्रेंच सरदारानें किल्ला स्वाधीन करून देऊन, लोकांनीं हस्तगत झालें पाहिजे असें सुचविलें. त्या वेळीं निरुपायामुळें शर्ती वगैरे ठरून वाशिंग्टन यांस फौजेसुद्धां त्यांच्या हस्तगत व्हावें लागलें. लष्करी संप्रदायाप्रमाणें सामान व आपलीं हत्यारें घेऊन सुरक्षित परत घरीं जाण्यास परवानगी मिळाली. त्याप्रमाणें ते सर्व लोक परत गेले.

आतां या प्रसंगीं वाशिंग्टन यांचा पराजय झाला; तथापि त्यांनीं आपल्याकडून करावयाचें तेवढें काम उत्तम प्रकारें केलें होतें, फौजच फार कमी पडली तेव्हां त्यांचा इलाज नाहींसा झाला. हें समजून व्हर्जिनिया संस्थानच्या राज्याधिकाऱ्यांनीं शिपाई लोकांस पैसा बक्षीस दिला व सरदार लोक व त्यांचा कमांडर वाशिंग्टन यांचे प्रसिद्धपणें आभार मानिले. याप्रमाणें वाशिंग्टन यांस अल्पवयस्क असतां दोन वेळ सरकारानें चांगली कामगिरी बजावल्याबद्दल शाबासकी देऊन त्यांचे आभार मानून त्यांचा सत्कार केला.

ही गोष्ट घडून आल्यावर थोडे दिवसांनीं वाशिंग्टन यांची लष्करी कारकीर्द मध्यंतरीं बंद पडली; गव्हर्नर डिनविडी यांणीं लष्करी खात्याच्या संबंधानें नवीन नियम केले त्यांच्या योगानें इंग्लिश सरकारच्या फौजेच्या सरदारांची योग्यता स्थानिक फौजेच्या सरदारांच्या योग्यतेपेक्षां अधिक मानली जाऊन नेमणुकेच्या काळाचा देखील विचार राहिला नाहीं. संस्थानांतील फौजेच्या सरदारांस पदव्या व हुद्दे सरासरी नाहींसे होऊन त्यांचा अपमान होऊन त्यांस न्याय मिळेनासा झाला. तेव्हां हा प्रकार वाशिंग्टन यांनीं पाहून तेथील स्थानिक सरकारास स्पष्टपणें कळविलें कीं, मी स्वदेशाची सेवा करावयास नेहमीं तयार आहें; परंतु हा अन्यायाचा व अपमानाचा प्रकार मला सोसवत नाहीं. सबब मी कामाचा राजीनामा देतों. याप्रमाणें त्यांनीं काम सोडून देऊन ते घरीं स्वस्थ बसले.

आतां वाशिंग्टन हे आपला भाऊ आजारी असतांच ही कामगिरी पतकरून ग्रेट मेडोजकडे गेले होते. वाशिंग्टन

यांच्या उत्कर्षाविषयीं वारंवार वर्तमान त्याच्या कानांवर येत असे. त्याजमुळें लारेन्स वाशिंग्टन यास मोठें समाधान वाटत असे, आणि हा मोठ्या योग्यतेस येईल असें त्याणें भाकीत देखील केलें होतें. मागें लारेन्स अधिक आजारी होऊन वारला. दोघां भावांच्या पुढें गांठी पडल्या नाहींत. लारेन्स वाशिंग्टन याणें मरणसमयीं आपली मौंट वर्नान येथील ईस्टेट जार्ज वाशिंग्टन यांस दिली. ही ईस्टेट वाशिंग्टन यांजकडे नवीन आली तेव्हां तिची व्यवस्था लावावयाची होती. ह्मणून लष्करी जागा सोडल्यावर ते आपला शेतीचा धंदा चालवून व्यायाम व कसरती वगैरे करण्यांत आनंदानें काळ घालविण्यास मौंट वर्नन येथें गेले. या उद्योगास नुक्तेच ते कोठें लागले व व्यवस्था वगैरे झाली तों लागलाच १७९९ च्या आरंभीं पोटोमाक नदीच्या बाजूस मोठा तंटा सुरू झाला. इंग्लिशसरकारची फौज जनरल ब्राडाक यांच्या ताब्यांत बेलहेवन येथें रवाना झाली. जनरल ब्राडाक तेथून गवर्नर डिनविडी यांजशीं विचार करण्याकरितां विलियम्सबर्ग येथें आला. त्याणें कर्नल वाशिंग्टन यांची कीर्ति ऐकली होती ते कोठें आहेत ह्मणून त्यानें तपास केला. त्यांच्या राजीनाम्याचें कारण व सर्व हकीकत कळल्यावर तो ह्मणाला कीं, तो तरुण मुलगा शहाणा व पाणीदार आहे. त्याणें बाणेदार शिपाईपणास योग्य असेंच वर्तन केलें, अशी यांस शाबासकी दिली. त्याणें लागलीच वाशिंग्टन यांस मोठ्या जरूरीचें व आग्रहाचें पत्र लिहून, त्यांत सरदारी हुद्यांचा संबंध नाहीं अशी वालंटीयर आडीकांगची जागा पतकरा, कसेंही करून याच, असें कळविलें. या पत्रावरून

वाशिंग्टन यांनीं आपल्या घरांतील मंडळीचा विचार घेऊन तो हुद्दा पतकरला आणि बेलहेवन येथील ब्रिटिश फौजेच्या छावणींत येऊन ते पुनः लष्करी धंद्यांत पडले. या फौजेस स्थानिक फौजेच्या नवीन भरतीच्या तीन कंपन्या येऊन मिळाल्यावर दोन हजार लोक बरोबर घेऊन जनरल ब्राडाक सन १७५५ च्या जून महिन्यांत स्वारी करण्याकरितां जंगलांतून चालता झाला.

जनरल ब्राडाक, आपल्या ताब्यांतील फौजेचे दोन भाग करून, लिटल मेडोज या जुन्या ठिकाणीं गेला. वाटेंत वाशिंग्टन हे तापानें इतके आजारी पडले कीं, त्या सरदारानें त्यांस अत्यंत आग्रहानें मागें ठेविलें आणि कर्नल डनबार याजबरोबर मागचा फौजेचा भाग येत आहे त्याजबरोबर या असें सांगितलें. ते बरे झाल्याबरोबर लागलेच जनरल ब्राडाक होता तेथें गेले. हे तेथें पोंचतांच त्यांनीं तिकडील इंडियन लोकांविषयींच्या अनुभवावरून विशेष सावधगिरी राखण्याविषयीं ब्राडाक यास सुचविलें; परंतु त्या सरदारानें अहंपणानें व जिकडे तिकडे सामसूम दिसल्यावरून त्या योग्य सूचनेची उपेक्षा केली. त्यामुळें त्यास देहांत प्रायश्चित भोगावें लागलें तें असें. इंग्लिश सरदार लोकांचा अभिमान व बेपर्वाई हीं नेहमीं अमेरिकेंत दिसून येत असत. कंबरलंड येथें फौजेचा कांहीं दिवस मुक्काम होऊन ती पुढें चालू झाली. वाटेनें वाशिंग्टन यांनीं सांगितलें कीं वर्जिनिया प्रांतांतील शिपाईलोकांस इकडच्या लढाईच्या प्रकाराचा अनुभव आहे, तेव्हां मी यांस घेऊन जातों व मागाहून इंग्लिश फौजेस येऊंद्या; परंतु

त्याणें ऐकलें नाहीं. इंग्लिश ग्रेनेडियर शिपाई अर्धा मैल पुढें चालवून मागून वर्जिनियाच्या फौजेस चालविलें आणि बाकीची इंग्लिश फौज मागून चालविली. वाटेंतलीं झुडपें घोड्यांच्या पोटापर्यंत उंच होतीं त्यांच्या योगानें फार त्रास झाला शेवटीं तें एका टेंकडीच्या माथ्यांशीं तें सैन्य पोंचलें तेथून पुढें रस्ता दरींतून होता. पुढें जाणें फार संकटाचें दिसलें; जनरल ब्राडाक याणें सरदार लोक जमवून विचार केला; परंतु त्यांस कांहीं सुचेनासें झालें. तो अगदीं स्तब्ध झाला. कांहीं वेळ विचार केल्यावर पायदळ पुढें करून त्या दरींतून ते निघाले. फोर्ट ड्युक्वेसनेच्या सात मैल अलीकडे एका लहान अरुंद दरींतून जात असतां, त्यांवर शत्रूचा घाला पडून झाडींतून गोळ्यांचा मार सुरू झाला. बंदूक मारणारे डोळ्यांनीं दिसेनात. फक्त बंदुकीचा धूर मात्र उंच दिसे. बंदुकीच्या आवाजाखेरीज दुसरा आवाजही ऐकूं येईना. गोळ्या लागून शिपाई पटापट मरूं लागले. फ्रेंच व त्यांचे दोस्त इंडियन कोणींच दृष्टीस पडेनात. सर्व मारा झाडाच्या आडून छपून चालला होता. जनरल ब्राडाक व त्यांची फौज पहिल्यानें अगदीं गोंधळून गेली त्याजमुळें हल्ला कसा करावा किंवा आपला बचाव कसा करावा, हेंही कोणास सुचेना. जनरलच्या बरोबरचे दुसरे सर्व एडिकांग पहिल्या सपाट्याबरोबर पडले. फक्त वाशिंगटन हे मात्र उरले. तेव्हां त्यांचें सर्वांचें काम त्यांस करावें लागलें. शिवाय बचाव करण्याचें काम त्यांच्या वर्जिनिया प्रांताच्या शिपाई लोकांवरच पडलें.

स्वतां इतके त्या गर्दींतून फिरत होते कीं, यांचे दोन घोडे जखमी झाले. व त्यांच्या अंगावरील मोठ्या डगल्यांतून चार गोळ्या निघून गेल्या तथापि त्यांस एकही गोळी

लागली नाहीं, व जखम वगैरे झाली नाहीं, ही केवळ ईश्वरी कृपा समजली पाहिजे. या लढाईंत इंडियन लोकांचा एक झातारा सरदार होता. तो पुढें लोकांस सांगत असे कीं वाशिंग्टन हा मनुष्य गोळीनें कधींही मरावयाचा नाहीं; कारण मी स्वतां त्यास सत्रा गोळ्या नेमानें मारल्या; परंतु तो पडला नाहीं, तेव्हां मीं असें भाकीत केलें होतें. असो. त्या प्रसंगीं जनरल ब्राडाक हे मोठे शौर्यानें लढले, व ते वरचेवर शिपायांस हिंमत देऊन सारखे ओरडत हुकूम करीत होते; परंतु शेवटीं त्यांसही गोळी लागली, आणि ते पडले. यावेळपर्यंत कोणी तोफेचा उपयोग केला नव्हता. तेव्हां वाशिंग्टन याणें आवेशाच्या भरांत एक पितळेची तोफ काठीसारखी उचलून तिचें तोंड फिरविलें, आणि भरून तिचा मार स्वतां सुरू केला. तो सारखा कांहीं वेळ चालल्यावर झाडांची साल नाहींशी होऊन इंडियन लोक पटापट पडूं लागले. शेवटीं त्या राकाहिल्ल ठिकाणीं इंडियन लोकांचे पांचशें लोक पडले. या लढाईंत एकंदरीनें ब्राडाकच्या फौजेचा अगदीं मोड झाला. जीवंत राहिलेले लोक मोनोनगेहला नदीच्या पलीकडे जाऊन त्यांणीं विश्रांति घेतली. जनरल ब्राडाक नंतर तेथें वारले. पुढें कर्नल डनबार हे मुख्याधिकारी झाले. त्यांणीं जेवढें अवश्य तेवढेंच सामान बरोबर घेऊन बाकीच्याचा नाश करून, फिलेडेल्फिया शहराकडे आपली युरोपियन फौज वेऊन जाऊन वार्जीनिया प्रांताचें आपलें संरक्षणाचें काम सोडून देऊन हिंवाळा घालवीत स्वस्थ बसणें आरंभिलें वर्जिनि[redacted] प्रांताचें संरक्षण त्या प्रांतांतील शिपाईलोकांवरच प[redacted] एकंदरीनें पाहतां या लढाईच्या प्रसंगीं ब्रिटिश सरदा[redacted]

मोठी मर्दुमकी केली; परंतु त्यांच्या लोकांनीं आपल्या वर्त्तनानें भित्रेपणा, गोंधळ व हुकूम तोडण्याचा प्रकार दर्शविला. यामुळें वाशिंग्टन यांच्या मनांतील ब्रिटिश फौजेविषयींची पूज्यबुद्धि नष्ट झाली. वर्जिनियाचे लोक त्या प्रसंगीं होते, व ते चांगले लढले ह्मणून राहिलेल्या लोकांस मागें परतावयास वेळ सांपडला व त्यांचा जीव वांचला. वर्जिनियाच्या लोकांच्या तीन कंपन्यांपैकीं फक्त तीस मनुष्यें वांचलीं. एरवीं ब्रिटिश ग्रेनेडियर पलटणीचे लोक तर इंडियन लोकांच्या मारापुढें मेंढरांसारखे पळत सुटले. त्यांस थांबऊन धरण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो व्यर्थ गेला.

सारांश वाशिंग्टन यांचा अनुभव, त्यांचें शरीरसामर्थ्य, व योग्य प्रसंगावधान या गुणांचा त्या प्रसंगीं अत्यंत उपयोग झाला आणि ते थोडे लोक तरी वांचले. त्यांच्या सुचनेप्रमाणें व्यवस्था व बंदोबस्त केला असता, तर एवढा अनर्थ झाला नसता. परंतु इंग्लिश लोकांचा झोंक, स्वाभिमान व हेकडपणा एवढ्या भयंकर नाशास कारण झाला. आतां या भयंकर दुःखप्रसंगानें वाशिंग्टन यांची नजर खुली झाली. आणि इंग्लिश फौजेच्या अजिंक्यपणाच्या ग्रहाचा निकाल झाला. शिवाय त्यांस अनुभवज्ञान विशेष प्राप्त झालें. त्याप्रमाणेंच त्यांच्या देशबांधवांची त्यांजविषयीं पूज्यबुद्धि झाली, व त्याचें सामर्थ्य व शहाणपण प्रसंगास उपयोगी पडण्यासारखें आहे असा भरंवसाही दृढ झाला. फार तर काय, पण त्या अनर्थाच्या संबंधानें एका देवळांत रेवरेंड मि. डेवीस यांनीं आपल्या उपदेशांत या तरूण पुरुषास परमेश्वरानें पुढें आपल्या देशाचें रक्षण करण्याकरितांच याप्रसंगीं वांचविलें आहे असें वाटतें,

अशा प्रकारचें भाकीत केल्यासारखें बोलून दाखविलें, लोकांचा पूर्ण भरंवसा वाशिंग्टन यांजवर त्यांच्या गुणानें व कृतीनें बसला.

ज्या वेळेस हा भयंकर पराजय झाला, त्या वेळेस वर्जिनिया प्रांताच्या पार्लमेंटचें काम चालू होतें. जेव्हां हें ब्राडाक साहेब वारल्याचें व कर्नल डनबार यांनीं संरक्षणाचें काम सोडून देऊन स्वस्थ बसण्याचें नीच काम केल्याचें वर्त्तमान कळलें, तेव्हां त्या प्रांताची अत्यंत संकटाची स्थिति त्यांच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. त्यांनीं लगलीच नवीन सोळा कंपन्यांची भरती केली व त्यांजवर पूर्ण अधिकार वाशिंग्टन यांस दिला. इतकेंच नव्हे, पण त्या लोकांवर सरदार नेमण्याचें अत्यंत जोखमाचें काम देखील त्यांजवरच सोपविलें. वाशिंग्टन यांस या वेळेस त्या लोकांनीं मोठेंच संकटाचें, श्रमाचें व विचाराचें सरहद्दीच्या संरक्षणाचें काम सांगितलें. ती सरहद्द तीनशें साठ मैल होती. सर्व मिळून त्यांच्या हातांखालीं सुमारें सातशें लोक होते. इकडे शत्रूंचा विचार केला तर संरक्षणाचें मुख्यस्थान ड्यु केसनेचा सरहद्दीवरचा किल्ला, तो फ्रेंचलोकांच्या हातांत होता. त्यांचे दोस्त जे रानटी इंडियन लोक यांचे पंधराशें लोक होते. त्यांनीं लहान लहान टोळ्या केल्या, आणि जागोजाग हल्ले करण्याचा सपाटा चालविला होता. फ्रेंचलोकांसारख्याच शूर व सुधारलेल्या लोकांचे मूळ वांकडें, त्यांत त्यांस या रानटी व रानच्या माहितगार इंडियन लोकांसारख्या लोकांचें पूर्ण साह्य, तशांत यालोकांस दया माया नसून म्हातारे किंवा मुलें, स्त्रिया किंवा पुरुष, तसेंच जीवंत किंवा मेलेल्यांचीं प्रेतें यांचा कोणत्याच गोष्टींचा विधिनिषेध नसू

त्यांचा मुलूख या नवीन युरोपियन लोकांनीं घेतल्यामुळें, त्यांची सूड घेण्याची इच्छा अतिप्रबळ झालेली होती, तेव्हां या सर्व गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे तीनशें साठ मैलांच्या विस्तीर्ण सरहद्दीचें व चोहोंकडे पसरलेल्या तुरळक लोकवस्तीचें संरक्षण करणें किती कठीण काम होतें, याची कांहीं कल्पना मनांत आणितां येईल. हें इतक्या महत्वाचें काम वाशिंग्टनसारख्या बावीस वर्षांच्या पोरावर त्या प्रांतस्थ लोकांनीं भरंवशानें टाकिलें तेव्हां अर्थात त्याची या अल्पवयांत योग्यता केवढी वाढलेली असावी हें वाचकांच्या लक्षांत येईल. हें सर्व शरीर, मन व आचरण यांचें उत्तम शिक्षण व सुधारणा याचें फल होय. ही ध्यानांत ठेवण्यासारखी मुख्य गोष्ट एवढीच येथें सांगावयाची आहे.

तसेंच वाशिंग्टन यांनीं अशा प्रसंगीं हें जोखिमाचें, संकटाचें व अपयशाचें काम आपल्या जीवितवित्ताची देखील पर्वा न करितां पतकरलें, याचें कारण त्यांची केवळ निष्प्रांजल अप्रतिम स्वदेशप्रीति हेंच होय. अपयश व मरण हें क्षणोक्षणीं पुढें उभें होतें. परंतु त्यांच्या मनाचा निश्चय स्वदेशहितार्थ आपल्याकडून करवेल तितकें काम आमरणांत झटून करावयाचेंच, असा होता. त्यांत आपण आपलें स्वदेशसेवेचें कर्त्तव्य यथास्थित रीत्या इमानें इतबारें बजाविलें अशी परमेश्वर स्मरून आपल्या मनाची खात्री व समाधान झालें ह्मणजे त्यांस बस्स होतें. तसेंच त्यांनीं एकदां एखादें काम पतकरलें, ह्मणजे मग त्यांत कितीही अडचणी येवोत, कितीही संकटें भोगावीं लागोत, दुष्ट लोक कितीही विघ्नें आणोत व शत्रु कितीही निंदा करोत, कांहीं होवो, ते आपलें काम अचल पर्वताप्रमाणें स्थिर राहून, आपलें ह्मणणें निश्चयानें,

थोड्क्यांत, सकारण पण नम्रपणानें व मर्यादेनें आपल्या वरिष्ठां-पुढें मांडून, ते सांगतील त्याप्रमाणें तितक्यांत आपलें शहाणपण लढवून, करीत असत. आमच्या कितीएक स्वदेशहितेच्छु मित्रां-प्रमाणें आरंभीं नाना प्रकारचे तरंग व कुकल्पना काढून, संकटें पुढें आणून स्वस्थ बसावयाचें, अथवा आरंभ केल्यावर शिथिल-पणानें काम करून अडचणी दिसल्या कीं स्वदेशहिताचा उद्योग सोडून देऊन आपण निराश होऊन लोकांसही निराश करावयाचें. तशांतील प्रकार वाशिंग्टन यांचा नव्हता. त्यांच्यामध्यें व आह्मांमध्यें भेद इतकाच कीं, ते खरे स्वदेशभक्त असून स्वदेश-जननीवर त्यांचें प्रेम होतें, त्याजमुळें तिच्या सेवेंत सर्वस्व वेंचण्यास ते सर्वकाल तत्पर होते; आणि आमचें स्वदेश-भक्तीचें सोंग असतें, व आह्मांमध्यें खरें प्रेम नसल्यामुळें आमच्यानें यत्किंचित झीज सोसवत नाहीं व कांहीं करवत नाहीं. तेव्हां आह्मांमध्यें स्वदेशाचें खरें प्रेम उत्पन्न झालें पाहिजे, आणि तें होण्यास वाशिंग्टनसारख्या सत्पुरुषांचीं उदाहरणें लोकांपुढें लहानपणापासून असलीं पाहिजेत. असो, वाशिंग्टन यांस या प्रसंगीं काय करावें लागलें, किती अडचणी सोसाव्या लागल्या इत्यादिकांचा विचार करूं, ह्मणजे त्यांची खरी योग्यता वाचकांच्या लक्षांत येईल.

वर्जिनिया प्रांताची विस्तीर्ण सरहद्द संभाळावयाची, त्या कामास शिपायांची पुर्ती संख्याही नवती. ही छोटीशी फौज एका ठिकाणी ठेवावी, तर बहुतेक भागांतील लोक मरावयाचे, व लहान लहान टोळ्या करून देशभर पसराव्या, तर त्यांचाच नाश व्हावयाचा. बरें इतकीशी थोडी फौज असून तिला साम देखील पुरें मिळत नवतें. शत्रूशीं उघड रीतीनें सामना क

लढावें तर पराजय व्हावयाचाच. शत्रूशीं प्रसंगच न आणिला तर लोक दोष ठेवणार. एखादा खून झाला व एखाद्या झोंपडीस आग लागली कीं त्याजबद्दल लोकांचा राग व्हावयाचा, हा सर्व प्रकार असून गवर्नर डिनविडी यांस वाशिंग्टन यांजवर लोकांचें प्रेम जडत चाललें, हें पाहून, व त्यांचें वरचेवर अमुक रीतीनें व्यवस्था करा असें खरें व स्पष्टपणें सांगणें, व निकरानें मदत मागणें याजबद्दल वाईट वाटून, राग येऊं लागला. यामुळें त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें कांहीं होईनासें झालें. अशा प्रसंगीं दुसरा एखादा असता तर तो तेव्हांच त्रासानें कंटाळून तें काम सोडून चालता झाला असता; परंतु ते तशा प्रकारचे मनुष्य नव्हते. कितीही अडचणी व संकटें सत्कार्याच्या कामांत आलीं तरी तें कार्य ह्मणून सोडावयाचें नाहींच, असा त्यांचा बाणा व निश्चय असे व दुसऱ्यांनीं हात पाय गाळले व मदत दिली नाहीं तर त्यांस विशेष झटून उद्योग करण्याची ईर्षा व हिंमत येत असे; या गुणांमुळें त्यांचें कर्तव्य यथास्थित रीत्या बजाविलें गेलें, लोकांचें प्रेम व भरंवसा त्यांजवर दृढ बसला, आणि अपूर्व यश व कीर्ति प्राप्त झाली.

ते गवर्नर व स्थानिक पार्लमेंटास वारंवार विनवण्या करून सुचवीत कीं, फौज थोडीशी वाढवा आणि एकदां फोर्ट डयू केसने किल्ला जो संकटाचें स्थान तो हल्ला करून घेऊन कलहाचें बीजच खणून टाका; परंतु ह्या त्यांच्या ह्मणण्याकडे कोणी लक्ष देईना. त्यांचें ह्मणणें, आहे तेवढ्यांत आपल्या हद्दीचें संरक्षण करावें. तेव्हां हें होतें कसें. शेवटीं त्यांनीं त्यांतल्या त्यांतच सरहद्दीवर थोडथोड्या अंतरावर लहान

लहान कोट बांधून तेथें आसपासच्या प्रदेशाच्या संरक्षण करितां थोडेथोडे लोक ठेवून आपण स्वतां बरोबर कांहीं लोक घेऊन सारखे देखरेख करीत, बंदोबस्त राखीत, शत्रूंच्या टोळ्या येण्यास प्रतिबंध करीत, व प्रसंगीं त्यांशीं लढत फिरत. ही विलक्षण कामगिरी त्यांनीं इतक्या शिताफीनें व झपाट्यानें केली कीं, वर्जिनीयाच्या लोकांच्या मनांतून ती कधींही नाहींशीं व्हावयाची नाहीं. हें काम त्यांनीं सारखें तीन वर्षें केलें. त्याच्या योगानें त्यांमध्यें सहनशीलता, धैर्य, दृढनिश्चय व सतत झटण्याचें सामर्थ्य हे उत्तम गुण कायम झाले, आणि तेच त्यांस पुढें एकंदर देशाच्या संकटसमयीं उपयोगी पडले.

ही कामगिरी ते बजावीत असतां, अनेक दुःखकारक व अत्यंत भयंकर कृत्यें वारंवार त्यांच्या दृष्टीस पडत असत. त्यांपैकीं एकदां त्यांनीं एका प्रसंगाची गोष्ट एका मित्राजवळ सांगितली. ती अशी:—एके दिवशीं आह्मी सरहद्दीवर फिरत असतां एका झाडींत एक झोंपडी होती, तिच्या जवळ जातों तों बंदुकीचा आवाज ऐकला त्याजबरोबर नेहमींप्रमाणें कांहींतरी अनर्थाचा प्रसंग आला असें आह्मी समजलों; आणि सावधगिरीनें आडपांतून छपत छपत तिच्या अगदीं जवळ गेलों. तों घरांतून धूर निघत आहे असें दृष्टीस पडलें. इतक्यांत इंडियन लोकांची टोळी घरांतील लुटलेलें सामान, व सुऱ्या हातांत घेऊन रक्तानें निथळत बाहेर आलेली दृष्टीस पडली. आह्मी लागल्याच त्यांजवर गोळ्या घालून त्या सर्वांस ठार मारलें. नंतर घरांत जाऊन पाहतों तों, आह्मांस नेहमीं अशीं भयंकर कृत्यें पाहण्याचे प्रसंग येत असत, तरी त्या दिवशीं त्या घरांत झालेला अनर्थ पाहून आह्मी अगदीं थक्क झालों. एक तरुण स्त्री

बिछान्यावर रक्तांत लोळत पडलेली व कुऱ्हाडीनें तिचें कपाळ फोडलेलें, व तिच्या उरावर दोन दहाबारा महिन्यांचीं जुळीं वालकें त्याचींही डोकीं चिरलेलीं, व त्या तिघांचेंही मुळचें एक रक्त ते पुनः एकत्र होत आहे असें दृष्टीस पडलें. हा दुःखाचा देखावा पुढें नेहमीं माझ्या मनांत वागत होता. याशिवाय एक मुलगा व त्याचा बाप घरापासून थोड्या अंत-रावर नागर हांकीत होते ते तेथें शेतांत ठार मारलेले दृष्टीस पडले. हा दुःखाचा देखावा सुद्धां पुढें नेहमीं माझ्या मनांत वागत होता. सारांश त्या कुटुंबापैकीं एकही प्राणी पुढें वार्ता सांगा-वयास बचावला नाहीं. यामुळें जेथें जावें तेथें बायका मुलें आमच्या पायां पडून आमच्या संरक्षणार्थ रहा ह्मणून रडत, व विनवण्या करीत. त्या वेळेस मला असें वाटे कीं, या सर्वांस दुःखापासून मुक्त करण्याकरितां माझें जर कोणी कुऱ्हा-डीनें अगर सुरीनें डोकें कापील, तर मी तें आनंदानें कापून देईन. सारांश वाशिंग्टन हे असें दुःखाचें काम करीत असतां, व होईल तेवढें लोकांचें संरक्षण करीत असतां, कांहीं लबाड व नीच लोकांनीं गवर्नर डिनविडी यांजपाशीं त्यांची कांहीं निंदा केली. व खोट्या चाहाड्या सांगितल्या हें वाशिंग्टन यांनीं ऐकल्यावर त्यांनीं गवर्नर साहेबांस निक्षून लिहून कळविलें, आणि त्या दुष्ट लोकांचीं नांवें विचारलीं. परंतु त्याबद्दल त्यांनीं फारशी पर्वा केली नाहीं. येथें इतकेंच सांगावयाचें कीं दुष्ट लोक सर्वत्र आहेतच ते आपलें दुष्टपणाचें काम तत्परतेनें करतात; परंतु सुज्ञ व खऱ्या स्वदेशहितेच्छु मनुष्यानें त्याचें विशेष वाईट न मानतां आपलें कर्तव्य यथास्थित रीतीनें व निश्चयानें वाशिंग्टन यांजसारखें बजावीत राहिलें पाहिजे. तरच

त्यांत मोठेपणा आहे. सारांश कितीएक लोक ज्या वेळेस आपलें आयुष्य चैनींत व दुर्वर्तनांत घालवून आयुष्य व शरीर यांचें मातेरें करीत असत, त्या वेळेस हा योग्य व थोर मनुष्य आपलें आयुष्य स्वदेश व स्वदेशबांधव यांच्या संरक्षणाचें अति पवित्र व अति थोर काम करून आपल्या अमूल्य व निर्मल कीर्तीचा पाया घालीत होता.

याप्रमाणें वर्जिनिया प्रांताच्या संरक्षणाचें काम वाशिंग्टन करीत असतां, दुर्दैवानें गवर्नर डिनविडीची बदली झाली, त्यांच्या जाग्यावर लार्ड लौडन या गृहस्थाची गवर्नर व कमांडर इनचीफ ह्मणून नेमणूक झाली. हे गृहस्थ अत्यंत अस्थिर स्वभावाचे व आळशी होते. तशांत त्यांचें लक्ष कानडा प्रांत जिंकण्याकडे वळलें. मध्यंतरीं मि. ब्लेर काम पाहात होते, त्यांस वाशिंग्टन यांच्या सूचना व उपाय हे पसंत वाटले होते; ते कामावर फार थोडे दिवस होते. लार्ड लौडन आल्यावर त्यांनीं वाशिंग्टन यांच्या फोर्ट डयु केसनेवर हल्ला करण्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून कानडाप्रांताच्या नादीं लागले. त्यांनीं बहुतेक दक्षिण प्रांतांतील फौज कानडा प्रदेशवर हल्ला करण्याकरितां ह्मणून पाठविण्याची योजना केली, आणि फक्त बाराशें लोक वर्जिनिया व दक्षिणेकडील दुसरे प्रांतांच्या संरक्षणार्थ ठेविले या योगानें वाशिंग्टन यांस पहिल्यापेक्षा जास्त संकट प्राप्त झालें. लार्ड लौडन कामावर फार दि[वस] राहिले नाहींत त्यांस लवकरच स्वदेशीं इंग्लंडास परत ज[ावें] लागलें. पुढें अमेरिकेंतील सर्व वसाहतीच्या प्रांतांचे काम[ां]डर इनचीफच्या कामावर जनरल आबरक्रांबी नांवाच्या सरदाराची नेमणूक झाली. त्यांनीं दक्षिणेकडील प्रांतांच्या लढा[ई]

काम जनरल फार्बूस यांजवर सोंपविलें. वाशिंग्टन यांच्या विशेष विनवण्यावरून त्या सरदारानें फोर्ट डयु केसने किल्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला; परंतु त्यांचेंही काम फार दिरंगाईचें होतें त्याजमुळें इंडियन लोकांस त्यांची तिसरी वार्षिक स्वारी वारून लुटालूट व मारहाण करून परत रानांत पळून जाण्यास सवड सांपडली. प्रत्येक वर्षी हल्ला करण्याचा त्या लोकांचा पाठ होता. तेव्हां वाशिंग्टन यांची या कामावर नेमणूक झाल्यापासून तीन वेळ या भयंकर स्वाऱ्या झाल्या.

शेवटीं सन १७५८ सालीं जनरल फार्बस यांनीं आले-घानी व मोनानगेहला या नद्यांच्या संगमावरचा किल्ला डयू केसने याजवर हल्ला करण्याच्या इराद्यानें फौज एकदांची हाल-विली. तसेंच वाशिंग्टन यांनीं सुचविलेला बेतही त्यांनीं मान्य केला; परंतु जलदी करण्याकरितां जी विशेष सूचना केली होती, तिकडे दुर्लक्ष केलें. त्या धोरणानें इंडियन लोकांस भेटून त्यांचें सहाय मिळेल अशी योजना केली होती. कारण त्यांचा घाट नेहमीं असा असें कीं, जे बळकट दिसतील त्यांजशीं सामील व्हावयाचें. या प्रसंगीं कानडा प्रांतावर इंग्लिश लोकांचें लक्ष लागलें हें पाहून फ्रेंच सरदारांनीं या बाजूची फौज कानडा प्रांताकडे नेली, आणि त्या किल्यांत तीनशें लोक ठेविले होते. जनरल फार्बूस यांच्या दिरंगाईनें उशीर झाल्यामुळें इंडिअन लोक या इंग्लिश फौजेची वाट पाहून कंटाळून घरोघर निघून गेले. ते गेल्यावर विंचेस्टर येथें ही फौज पोंचली. जून महिन्याच्या अखेरीस फौज तेथून निघाली; परंतु, पुनः त्या सर-दारानें आणखी दुसऱ्यानेंही उशीर लावला. वाशिंग्टन यांनीं ब्राडाक साहेब ज्या रस्त्यानें गेले होते, तो रस्ता एता

तयार होता, तिकडून लवकर चला असें सुचविलें परंतु त्या सरदारानें तें न ऐकतां जंगलांतून नवा रस्ता करण्याचा यत्न केला याजमुळें उशीर होऊन फौजेची कामगिरी न होतां, मध्येंच लार्ल हिल्ल येथें हिंवाळ्यानिमित्त छावणी करून राहावें लागेल असें त्यांनीं भाकीत केलें, आणि त्याप्रमाणें नवा रस्ता तयार होऊन फौज लार्ल हिल्ल येथें नोवेंबर महिन्यांत पोंचली. तेव्हां निरुपाय होऊन सरदार लोकांचें कौन्सिल भरून तेथें हिंवाळ्याचा मुक्काम करावा असें ठरलें. आणि त्याप्रमाणें व्यवस्था चालू झाली. इतक्यांत कांहीं कैदी हातीं सांपडले तेव्हां त्यांच्या जवळून माहिती मिळाली तिजवरून खरोखरच तीनशें लोक किल्ल्यांत होते व त्यांच्यानें आपला व किल्ल्याचा बचाव करवणार नाहीं अशी स्थिति होती अशी पक्की खात्री झाल्यावर जनरल फार्बस यांनीं पहिला बेत बदलला आणि फोर्ट डयू केसनेवर चाल केली. ती फौज जवळ येते, असें आंतील लोकांस समजतांच त्यांनीं इमारतींस आग लावून देऊन किल्ला सोडून बोटींत बसून नद्यांतून चालते झाले. याप्रमाणें फ्रेंच लोकांचा तिकडील अधिकार नाहींसा झाला, आणि सर्वत्र वर्जिनिया प्रांतांत स्वस्थता झाली.

वाशिंग्टन यांनीं याप्रमाणें तीन वर्षे होईल तेवढें त्या प्रांताचें संरक्षण करून आपला हेतु सिद्धीस नेला. नंतर त्यांणीं आपला हुद्दा सोडला आणि ते आनंदानें मौंट वर्नान येथें राहवयास गेले. तीन वर्षांच्या रात्रंदिवसांच्या त्रासानें काळजीनें व प्रकृतीकडे दुर्लक्ष झाल्या कारणानें त्यांची प्रकृति सुदृढ असतांही बरीच बिघडली. शिवाय त्यांच्या घरच्या इस्टेटी अव्यवस्था झाली होती. तेव्हां या दोन गोष्टींकरितां ते स

१७५८ च्या अखेरीस काम सोडून स्वगृहीं गेले. त्यांचें वय या वेळेस सतावीस वर्षांचें होतें. यापूर्वीं त्यांस दोन वेळ लोकांच्या प्रतिनिधींकडून शाबासकी मिळाली होती, व आतां तर त्यांचा प्रामाणिकपणा, दृढनिश्चय, स्वदेशभक्ती व युद्धकौशल्याचें ज्ञान यांजविषयीं लोकांची पक्की खात्री झाली व त्यांचें प्रेम व भरंवसा हीं अत्यंत मूल्यवान् बक्षीसें संपादन करून स्वगृहीं पुढचा महान् प्रसंग येई तोंपर्यंत ते स्वस्थ जाऊन बसले. अल्पवयांत शरीर, मन व आचरण यांची उत्तम प्रकारची सुधारणा झाल्याचें हें सुंदर फल होय. हें वाचकांनीं ध्यानांत ठेविलें पाहिजे.

वाशिंग्टन यांचीं पुढचीं पंधरा वर्षें घरगुती कामांत गेलीं. त्यांचा धंदा शेतीचा होता तेव्हां ते धंदा चालवून शेतीसंबंधी व्यायामाचे व कसरतीचे प्रकार यांचा उपभोग घेत तसेंच गृहस्थाश्रमाचें सुख अनुभवीत त्यांचा काळ गेला; मधून मधून जस्टिस आफ धी पीस व वर्जिनियाच्या स्थानिक पार्लमेंटच्या सभासदांचीं कामें करण्यांत कांहीं काळ जाई. ते ा घरीं जाऊन राहिल्यावर थोड्याच दिवसांनीं त्यांचें ालें. त्यांची व त्यांच्या पुढें होणाऱ्या पत्नीची सहज गांठ पडली. एके दिवशीं कांहीं विशेष जरूरीच्या करितां ते विलियम्स बर्ग येथें जात असतां, वाटेंत एका र्णीं मि. चेंबरलेन नांवाच्या गृहस्थाची व त्यांची गांठ ा. त्यांनीं वर्जिनियांतील सांप्रदायाप्रमाणें, आपल्या दाराजात असलेल्या गृहस्थांस आदरसत्कारार्थ आपल्या नेऊन थोडेवेळ तरी ठेऊन घेऊन मग जाऊ द्या-त्याप्रमाणें वाशिंग्टन यांस चाहा काफी वगैरे दे-

ऊन दोन तास तरी राहून जावें अशी विनंति करून सांगून घरीं नेलें. परंतु तेथें गेल्यावर मिसेस मार्था कस्टिस नांवाच्या, वर्जिनिया प्रांतांतील न्यू केंट कोंटी मधील, व्हैट हौस या ठिकाणच्या सुंदर, श्रीमान् गतभर्तृका बाईची गांठ पडल्यामुळें, ते तेथें बराच वेळ राहिले, त्यांच्या तेथें गांठी पडल्यापासून उभयतांच्या मनांत मोह उत्पन्न झाला. त्या बाईचें वय त्यांच्या बरोबरीचें होतें व ती रूपवति व सद्गुणी होती. त्यामुळें सन १७५९ सालच्या हिंवाळ्यांत त्यांचें लग्न झालें. पहिल्या भेटी नंतर हे विलियम्सबर्ग येथून परत वरीं आल्यावर पुनः या बाईची भेट होऊन विचार ठरून सर्व परमेश्वरसूत्रें जमून आलीं. ही बाई लग्न होऊन घरीं आल्यावर मौंट वर्नान येथील घर जें साधारण होतें, तें चांगल्या-प्रकारचें बांधलें. ही बाई मुळची डाड्रिज उपनांवाच्या चांगल्या कुलांत जन्मलेली असून लग्न झाल्यावर कस्टिस उपनांवाच्या कुलांतील होऊन पुढें वाशिंग्टन घराण्यांतील झाली.

याप्रमाणें लग्न झाल्यावर ते मौंट वर्नान येथेंच नेहमीं राहत असत. तेथें त्यांनीं सर्व कामांत नियमितपणा व व्यवस्थित पणा उत्तम रतीनें अमलांत आणिला. त्यांचा सर्व वेळ मो लेला व निरनिराळ्या कामांकरितां नेमलेला उ त्यांचा उठण्याचा व निजण्याचा वेळ सर्व ऋतूंत व घर अगर बाहेरची मंडळी आलेली असो, सारखा नेमलेला हो प्रातःकाळीं मोठ्या पहांटेस उठून हजामत, पोशाख व पत्रां उत्तरें लिहिणें हीं सर्व कामें दिव्यानें सूर्योदयापूर्वीं ते आटपी रात्रीं नऊ वाजतां निजावयाचें, मंडळी घरीं आलेली अस तरी जागावयाचें नाहीं असा बेत असे. सकाळीं उन्हाळ

सात वाजतां व हिंवाळ्यांत आठ वाजतां उपहार व्हावयाचा. दुपारीं दोन वाजतां जेवण होत असे. सायंकाळीं लवकरच ते चाहा घेत असत. ते रात्रीस जेवीत नसत. चाहाची त्यांस फार आवड असे. घरांतील मंडळीशीं मोठ्या प्रेमानें वागत असत, व चाकर लोकांशीं बेतानें वागून नेमलेलें काम त्यांजकडून करून घेण्याच्या कामांत कडक असत. ज्यांचीं त्यांनीं कामें बेतानें केलीं ह्मणजे त्यांची कुरकुर नसे. ते सर्व काम स्वतां पहात, यामुळें कामांत हयगय होत नसे व ती झाल्यास अगर गैरवर्तणूक दृष्टीस पडल्यास त्याची कधीं उपेक्षा होत नसे. त्यांस स्वतां आळशीपणा आवडत नसे. याजमुळें त्यांच्या ताब्यांतील चाकर माणसें वगैरे ते आळशी होऊं देत नसत. खर्चाच्या कामांत अगदीं काटकसर व बेत ठेवीत असत. प्रसंगीं ते मोठे उदार असत; परंतु एरवी एखादा तास कधीं व्यर्थ रेंगाळत घालविण्याचें अथवा एक पैसा चैनीकडे खर्च करण्याचें नांवच त्यांस नको होतें. शेतीचा मोठा पसारा होता, तरी त्यांचें काम नियमित बांधलेलें असे. अमुक जागा नांगरली, पेरली अथवा पिकाची कापणी केली ह्मणून सर्वांचें लेखी टांचण ठेविलेलें असे. सारांश शेतीचा स्वतंत्र धंदा ते मोठ्या बेतानें व आनंदानें करीत असत. शिवाय त्यांच्या आसपासच्या रानांत हरणें पुष्कळ असत, व त्यांला पारधीचा शोक असे. त्यांत घोड्यावर बसण्याची जी त्यांस हौस असे ती पुरी होई. या कामांप्रमाणेंच त्यांचें वाचन फार असे. वाचनाकरितां निराळा वेळ नेमिलेला असून त्यावेळेस ते एकीकडच्या खोलींत बसत, तेथें त्यांस अगदीं कोणी उपसर्ग करूं नये असा बंदोबस्त होता

याप्रमाणें आनंदानें प्रपंचसुखांत वाशिंग्टन यांनीं बराच काळ घालविला. या अवकाशांत ते वेळोवेळीं व कधीं तर सारखे पुष्कळ दिवस वर्जिनिया प्रांताची मुखत्यारांची असेंब्ली ह्मणजे स्थानिक पार्लमेंटमध्यें ते सभासद होते. त्या सभेंत असतां ते विशेष चांगले बोलणारे अथवा वक्ते ह्मणून मानलेले नव्हते. योग्य विचार थोडक्यांत व निश्चयानें बोलावयाचें, असा त्यांचा पाठ होता. त्या सभेंत पुष्कळ लोकहिताचे चांगले कायदे झाले. लोकही सुखी व संपन्न झाले. इंग्लंडचे गव्हर्नर वगैरे अधिकारी अमेरिकेंत असत, तेव्हा त्यांस तेथील लोकांकडून मेजवान्या वगैरे होत, त्या वेळेस त्यांची संपत्ति दृष्टीस पडे, आणि मग ते इंग्लंडांत हे लोक फार श्रीमान् झाले असें कळवीत. त्याच्या योगानें तेथील अधिकाऱ्यांस व सरकारास अमेरिकेंतील लोकांवर कर बसविण्याची इच्छा उत्पन्न होई ही इच्छा दिवसानुदिवस अधिकाधिक वाढत चालली, त्यामुळें अमेरिकेंतील वसाहतींच्या प्रांतांवर संरक्षणाच्या निमित्तानें पार्लमेंटमार्फत कर बसविण्याचा मनसोबा होऊन त्यांचे विशेष उद्गार बाहेर पडूं लागले. अशी एक गोष्ट सांगतात कीं, अमेरिकेंतील वर्जिनिया प्रांतांतील एक श्रीमान गृहस्थ इंग्लंडांत गेला, आणि तेथें ड्यूक आफ कंबरलंडशीं कांहीं खेळ खेळत असतां दोन लक्ष रुपये हरला. ते रुपये त्यानें चटदिशीं ब्यांकेवर हुंडी करून दिले. त्याजमुळें तर अमेरिकेंतील लोकांच्या संपत्तीविषयीं विशेष ख्याती वाढून इंग्लंडानें सरासरी कर बसविण्याचा दृढ निश्चयच केला. अशीं हीं अप्रत्यक्ष कारणें झालीं, परंतु कांहीं तावडतोबीचीं व प्रत्यक्ष कारणें उत्पन्न होऊन इंग्लडांत पार्लमेंटांत स्टाम्प

भाषणें होऊन वाटाघाटी सुरू झाल्या. एक वेळ पार्लमेंट-मध्यें एका प्रधानानें भाषणाच्या ओघामध्यें विचारलें कीं, अमेरिकन लोक हीं आपलीं लेंकरें नाहींत काय ? आपल्या साह्यानें त्यांची तेथें वस्ती झाली नाहीं काय ? आपल्या काळजीनें त्यांचें पोषण झालें नाहीं काय ? आणि आपल्या शस्त्रांनीं त्यांचें संरक्षण झालें नाहीं काय ? त्याजवर कर्नल बारे या वक्त्यानें असें चमत्कारिक उत्तर दिलें कीं, त्यांची वस्ती तुमच्या साह्यानें तेथें झाली ! नाहीं हो; तुमच्या जुलमानें त्यांस अमेरिकेंत वसाहात करावी लागली. तुमच्या जुलमामुळें ते पळून गेले, आणि जेथें ओसाड पडलेली जमीन होती व क्रूर व रानटी लोकांनीं भरलेलें जंगल होतें, त्यांजकडून जीं अनंत प्रकारचीं दुःखें होण्याचा संभव होता, अशा रानांत ते जाऊन राहिले. तथापि त्यांचे संरक्षणकर्ते जे तुह्मीं त्या तुह्मांपासून जें स्वदेशीं दुःख सोसावें लागे त्यापेक्षां त्यांजमध्यें इंग्लिश स्वातंत्र्याचें खरें पाणी वागत असल्यामुळें परदेशांतील दुःख बरें असें त्यांस वाटून ते गेले.

तुमच्या काळजीनें त्यांचें पोषण झालें ? नाहीं. तुमच्या हेळसांडीनें ते वाढले. त्यांचें स्वातंत्र्य हरण करून त्यांस त्रास देण्याकरितां, त्यांजविषयीं गैर समज उत्पन्न करण्याकरितां, व त्यांचें सत्व खाण्याकरितां बुभुक्षित मंडळी पाठविण्यांत तुमची काळजी होती. होय, तुह्मीं अशीं मनुष्यें तिकडे पाठविलींत कीं त्यांच्या वर्तणुकीनें त्या ( स्वातंत्र्यप्रिय-लेंकरांचे ) रक्त संतापून गरम होई; तीं मनुष्यें अशीं होतीं कीं ज्यांस स्वदेशीं न्यायकोर्टापुढें उभें राहण्याची भीति होती, त्यांस तेथें न्यायाच्या मुख्याधिकारावर बढती देऊन पाठविलें.

त्यांचें संरक्षण तुमच्या शस्त्रांनीं झालें काय? नाहीं. त्यांणीं स्वतांकरितां नव्हे, पण तुमच्या कार्यार्थ, शस्त्रें हातीं घेतलीं. स्वताच्या हिताकरितां नव्हे, पण तुमच्या लोभास्तव ते लढाया करीत आहेत. त्यांणीं आपल्या दररोजच्या श्रमाच्या कामांत नेहमीं रक्तानें भरलेली जी सरहद्द, तिच्या संरक्षणार्थ प्रयत्न करण्यांत विलक्षण धैर्य दाखविलें; आणि देशांत जें श्रमानें उत्पन्न झालें, त्यापैकीं जें राहिलें तें तुमच्या नेमणुकांची भरती करण्यांत खर्च झालें.

या वरील उद्गारावरून अमेरिकेंतील लोकांशीं इंग्लंडच्या वर्त्तणुकीचें खरें स्वरूप व धोरण दिसून येईल. अशा स्थितींत इंग्लंडानें कर बसविण्याची सक्ती चालविली. तेव्हां वाशिंग्टन वगैरे मंडळीनें त्यांच्या ह्मणण्याचा उघडपणें धिःक्कार केला. इंग्लिश सरकार आपणास कर बसविण्यास हक्क आहे असें अधिकाराच्या जोरानें ह्मणे. तसेंच अमेरिकन लोकांनीं निवडलेल्या पार्लमेंटांतील प्रतिनिधींशिवाय इतरांस आपल्यावर कर बसविण्यास हक्क नाहीं असें अमेरिकन लोक ह्मणत असत. सरकारानें या कामांत विशेष आग्रह धरला तेव्हां लोकांचा विरुद्धपणाचा हेकाही वाढत चालला. पुढें सरकार त्या सर्व लोकांस बंडखोर असें मानावयाच्या बेतावर आलें. दांडगाईवर प्रकरण जात चाललें. अमेरिकन लोकांनीं आपलें घरदार व स्वदेश हीं सर्व जुलमांतून मुक्त होण्याकरितां सोडलें आणि येथेंही पुनः तसाच प्रसंग आला. तेव्हां तो त्रास निरंतर सोशीत रहावें, अगर संबंध तोडावा, अशावर येऊन ठेपलें. अर्ज करून समजुती घालण्याचा प्रयत्न करून लोक थकले. शेवटीं मास्तचुसेटस प्रांताच्या सूचनेवरून सर्व निरनिराळ्या तेर

प्रांतांतील लोकांचे मुक्त्यारांनीं एका ठिकाणीं कांग्रेस ह्मणजे मोठी सभा भरविली, व एकंदरीचें ह्मणून ह्मणणें कळविण्याचा प्रयत्न केला. ही पहिली कांग्रेस सभा फिलडेल्फिया येथें ता० २० सेपटेंबर सन १७७४ इसवी रोजीं सर्वांच्या सारख्या हिताचा विचार करण्याकरितां व प्रसंगीं संकटाच्या निवारणार्थ उपाय योजण्याकरितां ह्मणून भरली. या वेळीं लोकांचा सर्वत्र कल व धोरण हीं समजून आलीं. सरकार आपलें न ऐकेल तर आपणास भांडलें व लढलें पाहिजे, असा सरासरी इत्यर्थ ठरला. ही कांग्रेस सभा प्रथम भरावयाचें ठरलें व सर्वांनीं मुक्त्यार पाठविण्याचा विचार झाला. त्या वेळेस वाशिंग्टन हे वर्जिनिया प्रांताच्या तर्फें एक मुक्त्यार ह्मणून गेले. या प्रसंगीं निरनिराळ्या प्रदेशांतील व वेगवेगळ्या धर्मपंथाचे लोक जमून येऊन बसले. सर्वांच्या मनांत या महत्कार्यास आपण सर्वजण जमलों आहों तेव्हां आरंभीं परमेश्वर जो सर्वांचा प्रभू त्याची प्रार्थना केल्यावांचून कामास आरंभ होऊं नये, असें आलें. परंतु बहुतेक सर्व निरनिराळ्या पंथाचे लोक, व ते एकमेकांच्या देवळांत ईश्वरभक्तीसाठीं देखील जात नसत. तेव्हां अशा प्रसंगीं कोणी व कोणत्या पंथाच्या मनुष्यानें प्रार्थना करावी, याचा मोठा विचार पडला. सर्व टकमक एकमेकांकडे पहात तटस्थ बसले. शेवटीं एक सुज्ञ व पोक्त पुरुष पुढें होऊन मोठ्या धैर्यानें, कळवळ्यानें व पूर्ण धर्मबुद्धीनें अभिमान सोडून बोलला कीं, येथें आपण सर्व देशहिताच्या विचारासाठीं जमलों आहों. आपले धर्मसंबंधीं विचार व पंथ जरी निरनिराळे असले, तरी परमेश्वर जो आपला पिता, तो सर्वांचा एकच आहे, आणि आपला सर्वांचा

हेतु स्वदेशसंबंधानें हित व्हावें असा जो आहे, तोही एकच आहे. मग धर्मपंथाच्या मतभेदाचा व अभिमानाचा विचार करण्याचें आपणास कारण नाहीं. परमेश्वराची प्रार्थना करण्यांत आपला विचार एकच आहे. तेव्हां मित्रांनो, हा अभिमानाचा विचार सोडा आणि एक विचारानें जो आपल्या सर्वांचा पिता त्यास सर्व मिळून प्रार्थू. हें आपलें बोलणें मनःपूर्वक आहे असें दर्शविण्याकरितां त्याच्या पंथाच्या अगदीं विरुद्ध मताच्या एक सद्गृहस्थास प्रार्थना करण्याविषयीं त्याणें सूचना केली. त्याचें खऱ्या कळवळ्याचें व योग्य भाषण ऐकून वृथाभिमान गळून जाऊन मतभेदाचा विचार सोडून देऊन सर्वांनीं आनंदानें त्यांची सूचना मान्य केली. आणि कामाची सुरुवात झाली. सारांश जेव्हां सर्व देशाचें व सार्वजनिक हिताचें काम पुढें येतें, या वेळेस खासगी किरकोळ स्वतांच्या मतभेदाचा व स्वाभिमानाचा विचार, राग लोभ वगैरे सर्व एकीकडे ठेवून आपलें कर्तव्य बजाविणें, हा मुख्य धर्म होय हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

या कांग्रेस सभेनें तारीख १४ आक्टोबर सन १७७४ इसवी रोजीं आपल्या एकंदरीच्या हक्कांविषयीं विचार करून दहा ठराव प्रसिद्ध केले. हा पहिला हक्कांविषयीं ह्मणून जाहीरनामाच प्रसिद्ध झाला. या मुक्त्यार मंडळीनीं कांहीं विशेष जरूरीच्या कामाची योजना करून पुनः दुसऱ्यानें कांग्रेस सभा भरावी अशी शिफारस केली, त्याजवर सन १७७५ च्या मे महिन्यांत पुनः कांग्रेस भरली, आणि लढाई करण्याचा विचार ठरला, व वाशिंग्टन यांची सेनापतीच्या हुद्यावर नेमणूक झाली. आतां हा प्रसंग येण्यास मध्यंतरीं कोणतीं

कारणें झालीं, त्यांचा येथें सर्व अनुसंधान जमण्याकरितां थोडा उल्लेख केला पाहिजे.

---

## भाग ५ वा.

## स्वतंत्रतेच्या लढाईचीं कारणें व सुरुवात.

इंग्लंडचा विचार संरक्षणानिमित्त अमेरिकन प्रदेशावर कर बसविण्याचा होता, त्याप्रमाणें त्यांणीं आपला उद्योग व क्रम सुरू केला. तसाच अमेरिकन लोकांचा निश्चय होता कीं, इंग्लंडनें आपल्या पार्लमेंटमध्यें आमचे मुक्त्यार घेतल्यावांचून कर बसवूं द्यावयाचा नाहीं. दोन्हीकडे आग्रहाचा प्रकार माजत चालला, इतक्यांत इंग्लंडानें अमेरिकेंत स्टांप आक्ट चालू केला, आणि त्याजमुळें सर्व कायदेशीर लेखांस स्टांप कागद पाहिजे असें झालें. आतां या बाबतींत विशेष खर्च पडणार होता अगर लोकांस विशेष त्रास होणार होता असें नाहीं; तथापि यांत पार्लमेंटचें वर्चस्व होऊन लोकांच्या, आपल्या संमतीवांचून कर बसविण्यास कोणास अधिकार नाहीं, या हक्कास धक्का बसावयास लागला. आणि एका गोष्टींत हा एकादा प्रकार सुरू झाला, व लोक स्वस्थ बसले ह्मणजे मग तो गाडा चालू झाला असें होईल. हें पाहून लोकांनीं विचार करून तक्रार करणें ती आतांच केली पाहिजे; नाहीं तर पुढें कांहीं चालावयाचें नाहीं असें समजून त्यांणीं तक्रार करण्याचा निश्चय केला. बहुधा लोक जुलूम झाल्यावर तक्रार करावयास लागतात; परंतु अमेरिकन लोकांनीं पुढें होणाऱ्या जुलमाविरुद्धच शहाणपणानें तक्रार सुरू केली.

अमेरिकन लोकांनीं लागलीच एकसारखी ओरड करून सर्व प्रदेशांतून उत्तम रीतीचे, खुबीदार, नम्र व सन्मानपूर्वक शब्दांनीं व विचारांनीं पूरिपर्ण असे शेंकडों अर्ज विलायतेस पाठविले. त्यामुळें त्या वेळेस तो कायदा तर सरकारानें रद्द केला, परंतु पार्लमेंटास त्या प्रदेशावर कर बसविण्यास अधिकार आहे असें नुस्तें त्या ठरावांत ह्मणून ठेविलें. सारांश, कलहाचें मूळ कायम ठेवून फक्त प्रसंग टाळला असें झालें. त्यामुळें अमेरिकन लोक फार नाखूष झाले, व त्यांच्या पोटांत धास्ती कायम राहिली.

तसाच दुसरा एक प्रकार असा होता कीं, इंग्लंडानें मुलखाच्या लोभामुळें व वैमनस्यामुळें परराष्ट्रांशीं लढाया केल्या त्यांच्या खर्चास कर्ज झालें. त्या कर्जाचें व्याज देण्यांत अमेरिकेस वांटेकरी करावयाचें होतें. हें कर्ज करते वेळीं त्यांची संमति घेतली नव्हती किंवा त्या लोकांच्या हितार्थ कर्जही कधीं केलें नव्हतें; असें असतां त्याचें व्याज देण्यास्तव करानें पैसा उत्पन्न करावयाचा होता. तेव्हां स्टांप आक्ट रद्द केल्यावर थोड्याच दिवसांनीं चाहावर जकात बसविण्याचा बेत केला, आणि अजमासांत ही एक बाब दाखल करून ठेविली. पुनः लोकांनीं अर्ज पाठविण्याचा क्रम सुरू केला. ते अर्ज फारच चांगल्याप्रकारचे दृढनिश्चयाचे व पोक्त विचारानें लिहिले होते. तसेंच इंग्लंडच्या लोकांस विनंति ह्मणून सुंदर व मनास द्रव उत्पन्न होण्यासारखे लेख लिहिले होते. त्यांत जॉन जे या नांवाच्या गृहस्थानें फारच उत्तम लेख लिहिला होता. त्यांत त्याणें विचारानें व प्रमाणानें असें सिद्ध करून दाखविलें कीं, ज्याप्रमाणें इंग्लंडांतील प्रजेस

हक्क आहेत, त्याप्रमाणेंच अमेरिकेंतील लोकांस हक्क आहेत. व ज्याप्रमाणें त्यांच्या संमतीवांचून त्यांच्या मालमत्तेपैकीं कोणासही कांहीं एक घेण्याचा अधिकार नाहीं, त्याप्रमाणेंच अमेरिकन लोकांच्या संमतीवांचून त्यांच्या मालमत्तेपैकीं कोणासही कांहींएक घेण्यास अधिकार नाहीं. ज्याप्रमाणें इंग्लंडचे लोक आपल्या मालमत्तेचे मालक आहेत त्या प्रमाणेंच अमेरिकेचे लोकही आपल्या मालमत्तेचे मालक आहेत. असें असतां वारंवार तुह्मी ही तक्रार उपस्थित करतां हें अगदीं अयोग्य आहे. सारांश, या व अशा प्रकारच्या लेखांनीं इंग्लंडच्या लोकांचीं मनें द्रवलीं व वळलीं; परंतु त्याप्रमाणें अमेरिकन लोकांस न्याय मिळण्यासारखें लोकांचें वजन पार्लमेंटावर व प्रधानमंडळावर न पडल्यामुळें ते लेख व्यर्थ होऊन गेले. त्याप्रमाणेंच बर्क व पिट्ट या विख्यात वक्त्यांनीं व त्यांसारख्या दुसऱ्या सभासदांनीं पार्लमेंटांत मोठ्या आवेशानें भाषणें केलीं; परंतु तीं सर्व फुकट गेलीं. पिट्ट साहेबांनीं तर एका प्रसंगीं स्पष्टपणें सांगण्याची व समजूत घालण्याची पराकाष्ठाही केली. पुढें हे पिट्ट साहेब लार्ड होऊन लार्ड चाथम असें त्यांस नामाभिधान प्राप्त झालें होतें. ते वयानें फार वृद्ध होते व आजारानें अगदीं थकलेले होते; तथापि ते मोठ्या संकटानें पार्लमेंटमध्यें गेले आणि तेथें त्यांणीं भाषण केलें. ते त्या प्रसंगीं हौस आफ लार्डसमध्यें बोलले कीं, परमेश्वराकरितां तरी बाबांनो, तंटा मिटविण्याचा ताबडतोब उद्योग करा. नाहीं-तर उशीर होईल. अमेरिकन लोक तुह्मांस स्पष्ट सांगतात कीं, आमच्या संमतीवांचून आह्मी कर बसूं देणार नाहीं, व आह्मी तुमचें करणें मान्य करणार नाहीं, हें ह्मणणें तीस लक्ष

हत्यारबंद लोकांचें आहे हें पक्कें ध्यानांत ठेवा. हा त्यांचा *अधिकार आहे असें ते मानतात.* ते तुह्मांपाशीं भिक्षा मागत नाहींत. त्यांचें ह्मणणें रास्त आहे आणि तें मान्य केलेंच पाहिजे. तुमचें कांहींएक चाकणार नाहीं. शिवाय तुह्मी तो कायदा रद्द केला असें पोकळ ह्मणून कागदाचा तुकडा रद्द करून उपयोग नाहीं. तुह्मी स्पष्ट कबूल केलें पाहिजे कीं, आह्मांला तुह्मांवर कर बसविण्याचा अधिकार नाहीं. असें ह्मणाल तरच त्यांचा भरंवसा तुह्मांवर बसेल. इंग्लंडांत तर अमेरिकेपेक्षां दुप्पट व्हिग लोक आहेत आणि ते सर्व संबंधी असल्यामुळें एक होतील आणि मोठा अनर्थ होईल. हा अनर्थाचा प्रसंग पाहून मी अगदीं जरेनें व रोगानें थकलों असतांही तुह्मांस हें सांगण्याकरितां केवळ खुरडत खुरडत आलों आहें. राजे साहेबांस विनंति करून जनरल गेज यांची फौज बोस्टन येथून उठविण्याची तजवीज करा. फौज तेथें असल्यामुळें संशय व त्रास जागृत राहील. कारण, त्यांच्या उराशीं बागनेट धरलें असतां त्यांचा विश्वास तुह्मांवर कसा बसेल? त्यांची पक्की खात्री आहे कीं, तुह्मी त्यांस ठार मारणार किंवा गुलाम करणार. तेव्हां उशीर करूं नका. केव्हां काय होईल याचा नेम नाहीं. एकदां एक रक्ताचा थेंब पडला कीं भयंकर जखम होऊन सर्वस्वी नाश होईल. याप्रमाणें त्या वृद्धपुरुषानें शहाणपणाचा उपदेश केला. परंतु इंग्रज लोक पडले हेकेखोर; त्याजमुळें त्या भाषणाचा उपयोग न होतां अनर्थ झाला, आणि इंग्लंडचा व अमेरिकेचा संबंध तुटून त्या थोर राजकारस्थानी पुरुषाचें भाकित खरें झालें.

आतां पहिलें तंट्याचें कारण असें झालें होतें कीं, सरकारानें बोस्टन येथें चाहा पाठविण्याची योजना केली, आणि एका पौंडाच्या किंमतीच्या चाहावर तीन पेन्स जकात घेण्याचा विचार केला. हा कर वस्तुतः जरब होता असें नाहीं; परंतु लोकांच्या संमतीवांचून कर घेण्याचा प्रकार लोकांस मान्य नव्हता. या मूलतत्वाच्या अनुरोधानें कांहीं धाडसी मंडळींनीं इंडियन लोकांचा वेष घेऊन रात्रीं जहाजावर चढून जाऊन सर्व माल समुद्रांत लोटून दिला. आतां हें कृत्य कोणी केलें याचा पत्ता अद्यापपर्यंत देखील चांगलासा लागला नाहीं. सरकारानें आपल्याकडून पुष्कळ पुसतपास केला; परंतु कांहीं शोध लागला नाहीं. ही गोष्ट इंग्लंडांत कळल्यावर प्रधानमंडळाची अगदीं आग होऊन जाऊन, त्यांणीं पार्लमेंटाच्या संमत्तीनें बोस्टनचें बंदर व्यापारास अगदीं बंद करण्याचा ठराव केला, आणि जनरल गेज यांच्या मदतीस आणखी फौज पाठविली. हा प्रकार पाहून अमेरिकन लोकांच्या पोटांत धास्ती उत्पन्न झाली व त्यांचें पित्त अधिक खवळलें. बोस्टन शहरावर गुदरलेला प्रसंग हा सार्वजनिक संबंधाचा आहे, असें सर्व अमेरिकन लोकांनीं मानून तो प्रसंग आपणा सर्वांवर आहे असें समजून कांग्रेसची सभा भरविली. आपल्या लोकांच्या हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि हे हक्क कायम राखून आपल्या पुढील प्रजेस प्राप्त होण्यास्तव सर्वस्व वेंचण्याचा त्यांचा निश्चय ठरला. या मुक्त्यारांच्या ठरावास सर्व लोक मान्य झाले आणि इंग्लंडचे रोजच्या उपयोगाचे व उपभोगाचे पदार्थ देशांत कोणी घ्यावयाचे नाहींत असा सर्वांचा विचार झाला.

अर्थात लोकांस यामुळें मोठी अडचण पडली; परंतु सर्वांनीं ती मोठ्या आनंदानें पतकरली.

अशा समयास जशी एखादी ठिणगी दारूच्या पोत्यावर पडावी, आणि एकदम भडका व्हावा! तसा प्रकार झाला. कांग्रेसनें बोस्टनच्या जवळ तेरा मैलांवर कांकार्ड या गांवीं दारूगोळा वगैरे सामान ठेवण्याचा हुकूम केला. ही बातमी कळून जनरल गेज यांणीं या सामानाचा नाश करण्याकरितां आठशें पलटणींचे लोक पाठविले. हें वर्तमान डाक्टर वारेन नांवाच्या स्वदेशभक्तानें कान्कार्ड व आसपासच्या ठिकाणीं तावडतोब कळविलें. त्याच्या योगानें लोकांची जमाजम झाली. ब्रिटिश फौज लेग्सिंग्टन येथें आली तों तेवीस मिलिशिया (लष्करी पोलिस) शिपाई व तीस चाळीस विन हत्यारी लोक त्यांच्या दृष्टीस पडले. मेजर पिटकेर्न नांवाच्या ब्रिटिश सरदारानें त्यांच्या जवळ धांवत घोडा नेऊन तुह्मी बंडवाले लोक आहां, हत्यारें ठेवा, चला, निघा, चालते व्हा, असें रागाच्या आवेशांत सांगितलें; परंतु हा अपमानकारक हुकूम तावडतोब ऐकला न गेल्यामुळें त्याणें आपलें पिस्तुल झाडलें, आणि आपल्या शिपाई लोकांस गोळ्या घाला असा हुकूम केला. शिपाई लोकांनीं तसें केलें तों लागलेच ते लोक पळत सुटले. शिपायांनीं तो बंदुकांचा मार चालू ठेविला तेव्हां जमलेल्या लोकांनींही गोळ्या वातल्या. त्याणें दोन्ही पक्षांकडील कांहीं लोक मरून व जखमी होऊन पडले. हा प्रथम रक्तपाताचा प्रसंग ता० १८ एप्रिल सन १७७५ इसवी रोजीं घडला. ब्रिटिश फौज तशीच कान्कार्ड गांवावर चालली, तों इतक्यांत

लेक्सिग्टन येथें झालेल्या अनर्थाची बातमी तावडतोब चोहोंकडे पसरून लोकांनीं आपलीं शेतींचीं वगैरे कामें तशींच टाकून ते बंदुका घेऊन धांवले. त्यावेळेस लोक जसे भुईंतील उद्भीज निघतात, अशासारखे वाटावयास लागले. भराभर लोक जमले, परंतु फौजेची संख्या बरीच मोठी आहे असें पाहून एका पुलाच्या मागें जागा धरून मदत येण्याची वाट पहात उभे राहिले. इतक्यांत ब्रिटिश फौजेनें आपलें सामान नाहींसें करण्याचें काम पुरें करून पुलाजवळच्या जमलेल्या लोकांस हाकून लावण्यासाठीं चाल केली. पुनः त्यांनींच पहिल्यानें लोकांवर गोळ्या घातल्या. मग काय! लोकांनीं सडकून भडिमार केला. त्याच्या योगानें त्या फौजेच्या लोकांस माघार घ्यावी लागली. लोक अगदीं बेहोष झालेले होते, तेव्हां त्यांनीं त्या फौजेचा चांगला पाठलाग केला. हे शिपाई बोस्टनकडे परत जात असतां चोहों कडून त्यांच्यावर भडिमार होत गेला, त्याच्या योगानें बोस्टन येथें पोंचेतोंपर्यंत त्यांचे मेले, जखमी झाले व लोकांच्या हातीं सांपडले मिळून २७३ मनुष्यांचा नाश झाला. यांत सामान नाहींसें केलें खरें; परंतु शेवटीं फजिती होऊन इतकें नुकसान झालें. याप्रमाणें स्वातंत्र्याच्या पहिल्या रक्त-पाताच्या प्रसंगीं परिणाम झाला. लोकांकडील लेक्सिग्टनच्या वालंटीयर मिलिशियाचीं सात मनुष्यें मेलीं, व दहा जखमी झालीं, असें ह्मणतात. या प्रसंगीं कांहीं लोकांनीं दृढनिश्च-याची पराकाष्ठा केली. त्यांच्या वर्तनास ग्रीस मधील थरमापली सारख्या प्रसंगाची उपमा दिली पाहिजे. जोनस पार्कर नांवाच्या एका मनुष्यानें कांहीं होवो मी शत्रूपा-सून पळून जाणार नाहीं असें निश्चयानें बोलून दाखविलें

होतें आणि त्या प्रमाणें त्यानें केलें. हातांत बंदूक घेऊन खालीं पायांमध्यें टोपींत कार्तुसें ठेऊन गोळी मारण्याचें काम त्यानें चालविलें. त्यास पहिल्यानें एक गोळी लागली. तेव्हां गुडघे टेकून पुनः तेंच काम चालू ठेवलें. इतक्यांत दुसरी गोळी लागली, तथापि पुनः हा आपली बंदूक सोडीत होता इतक्यांत शत्रूकडील लोकांनीं धांवत येऊन बागने-टानें त्यास ठार मारलें. सारांश तो तेथून न हा-लता जागच्या जागीं धैर्यानें मरेपर्यंत लढला. अखेरीस स्वदेशसेवेंत आपला जीव घालविला. हें व अशीं झालेलीं उदाहरणें लोकांनीं आपल्या पुढें नेहमीं मनांत ठेवावीं आणि आपण आपल्या स्वदेशजननीच्या सेवेंत काय वेंचतों याचा विचार करीत असावें. असो, लेक्सिंग्टन् व कान्कार्ड येथें स्वातंत्र्यासाठीं पहिली लढाई झाली आणि स्वदेशभक्तांच्या रक्तपातास आरंभ झाला.

याप्रमाणेंच दुसरा लढाईचा प्रसंग बंकर हिल्ल या डोंग-रावर घडून आला. जनरल गेज यांच्या मदतीस इंग्लंडाहून फौज आली होती. लोकही आपल्या तयारींत होते. एका रात्रीं अमेरिकन लोक डोंगरावर गेले, आणि तेथें एक खळगा होता व त्याच्या पुढें उंचवटा होता त्याच्या आधा-रानें जागा धरून उभे राहिले. ठिकाण बळकट नव्हतेंच, तसेंच लोकांजवळ तोफा किंवा बागनेटें देखील नव्हती. त्यांची सत्का-र्याचें काम ह्मणून हिंमत आणि निशाण मारण्याचें कौशल्य हीच काय ती त्यांस मदत होती, पहाटेस जनरल गेज यांच्या हे लोक डोंगरावर आहेत असें नजरेस आलें, व त्यांणीं लागलेंच ज जावरून त्यांस हाकून लावण्याकरितां तोफांचा मारा

केला; परंतु लोकांनीं त्याची फारशी पर्वा न करितां आशा होती तटबंदीचें काम सारखें चालू ठेविलें. हा प्रकार पाहतां मुकाट्यानें हजार लोक तोफखान्यासह हौ व पिगट या सरदारांच्या आज्ञेचा ताब्यांत देऊन चार्लसटौन जवळ जमिनीवर उतरले. त्यांनी गांवास आग लाविली आणि मग ते त्या टेंकडीकडे निघून होऊन ब्रिटिश फौज व बोस्टन शहरचे लोक काय होतें हें उत्सुकतेने पणें पाहात होते. टेंकडीवरील लोक सारखे बंदुकी घेऊन तयार उभे राहिले होते. त्यांच्याजवळ दारूगोळ्याची फारशी कमताई होती याजमुळें त्यांच्यापैकीं पटनाम् ह्मणून एक प्रमुख होता त्यानें सर्वांस सांगून ठेविलें होतें कीं, डोळ्यांतील पांढरा भाग दिसावयास लागे इतक्याजवळ शत्रु येई तोंपर्यंत बंदुकी-सोडूं नका. त्याप्रमाणें ते प्रत्येकीं निशाण धरून उभे होते आणि सूचनेप्रमाणें ब्रिटिश फौजेचे लोक त्या बेतावर आले तों त्यांच्या एक हजार बंदुकी जसा कांहीं एकच बार व्हावा अशा एकदम सुटल्या. त्या सपाट्याबरोबर, शत्रूचें सैन्य मोठ्या शौर्यानें व दिमाखानें येत होतें त्यांतील मनुष्यें पटापट पडून त्याचा घोंटाळा झाला व ते सर्व तेथें थबकले. त्यांनीं गोळ्यांचा मारा सुरू केला, परंतु या लोकांकडून गोळी आली कीं बहुदा व्यर्थ जात नसे. त्यांनीं त्या जागेवरून लढाई चालू ठेविली; पुढें फार नाश झालासा पाहून ते शिपाई लोक आपल्या सरदारांचा हुकूम न ऐकतां मागें परतले आणि डोंगराच्या खालीं गेले. इतक्यांत त्यांच्या सरदारांनीं पुनः त्यांस ऊमवून पुढें आणिलें परंतु तो लोकांचा भडिमार सोसवेनासा होऊन ते पुनः मागें फिरले. तेव्हां ब्रिटिश फौजेची आणखी त्यांस कुमक आली आणि पुनः जमून लोकांवर चाल करून

यांत अमेरिकन लोकांचा दारूगोळा संपत
ं ते आपलें ठिकाण सोडून शत्रूवर भडि-
त परत निघाले. शेवटीं दारूगोळा संपल्यावर
दुकीच्या दस्त्यांनीं मार सुरू केला. अर्थात अशा
ा फार वेळ निभाव लागला नाहीं. शत्रूचा अखेरीस
झाला. परंतु त्या जयापासून मुस्ती एका टेकडीची
र प्राप्ति झाली आणि सरदार व शिपाईलोक मिळून
राशें लोक पडले. अमेरिकन लोकही बरेच मेले; परंतु त्यां-
क्षां फार कमी. या लोकांपैकीं डाक्टर जोसेफ वारेन नांवाचा
ालंटीयर गृहस्थ मारला गेला ह्मणून लोक फार हळहळले. या-
माणें दुसरी लढाई झाली. ह्या दोनही आरंभाच्या लढाया
ू इंग्लंड प्रांतांत व तेथील लोकांकडून झाल्या. दुसऱ्या
प्रदेशांत ही बातमी कळून मदत येण्यास अवकाशच झाला
नाहीं. पहिलें स्वदेशसेवेचें व रक्तार्पण करण्याचें श्रेय मासा-
चुसेट्स या प्रदेशास मिळालें आणि लढाईची सुरुवात झाली.
हें झाल्यावर तारीख १२ जून सन १७७५ इसवी रोजीं गव्ह-
र्नर गेज यांणीं मासाचुसेट्स प्रांत बंडखोर झाला असा जाही-
रनामा प्रसिद्ध केला. त्यांत, सर्व बंडखोर लोकांस जबरदस्त
शासन केलें जाईल व जे मुकाट्यानें हुकुम मानतील त्यांस
क्षमा केली जाईल; फक्त साम्युअल आडाम व जान हानकाक
या दोघांस मात्र माफी केली जाणार नाहीं असें कळविलें
होतें. जान हानकाक हे कांग्रेसचे अध्यक्ष होते. इतकें झालें
तरी उभयपक्षांकडे आशा होती. अमेरिकन लोकांच्या
मनांत, इंग्लंड फार दूरवर जाणार नाहीं, आमचा निश्च
पाहून आपला कर बसविण्याचा विचार सोडून देई

ल, असें होतें. तसेंच प्रधानमंडळ व पार्लमेंट यांस आशा होती कीं अमेरिकन लोक यापुढें दांडगाई न करतां मुकाट्यानें आमचें ह्मणणें मान्य करतील. परंतु दोन्हीकडच्या आशेचा भग्न झाला. आणि तें प्रकरण पुढें वाढतच गेलें.

याप्रमाणें अमेरिकेंत व इंग्लंडांत एकदम गडबड होऊन गेली. दोन वेळ प्रजेच्या व राजाच्या चकमकी झडल्या व उभयपक्षीं प्राणहानि झाली. सरकारानें मासाचुसेट्स प्रांतांतील लोकांस तर बंडवाले ठरविलें. तेव्हां अशा स्थितींत व अशा भयंकर संकटाच्या वेळीं वाशिंग्टन हे वर्जिनिया प्रांताचे मुक्त्यार ह्मणून कांग्रेसमध्यें असतां लोकांनीं सर्वानुमतें युनैटेड कालोनीज ह्मणजे एकत्र झालेले प्रदेश यांच्या तर्फे त्यांस फौजेचे सेनापति नेमलें. त्या वेळेस त्यांचें वय ४३ वर्षांचें होतें. ते शरीरानें धिप्पाड पुरुष होते. त्यांची उंची सहा फूटांवर होती व सर्व अंग बेताचें मोठें व सदृढ, श्रमसाहस सोसण्यासारखें होतें. अंगांत शक्ति चांगली असून तरतरी व चपलपणा विशेष होता. मध्यंतरींच्या पंधरा वर्षांच्या विश्रांतीनें शरीरास हितकर अशा शेतीच्या धंद्यानें व गृहसुख उत्तम॰ प्रकारें उपभोगण्यानें त्यांची प्रकृति त्या वेळेस फार चांगली होती. शिवाय वाचन, विचार व मनन यांच्या योगानें त्यांचें ज्ञान वाढून शहाणपणा व पोक्तपणा हा त्यांच्या अंगीं चांगला आला होता. ते दिसण्यांत भव्य व कांहींसे कडकअसे दिसत; परंतु मनानें फार पवित्र, उदार व दयाळू होते. त्यांच्यामध्यें सौजन्य, मर्यादशीलता व प्रामाणिकपणा असल्यामुळें ते अत्यंत लोकप्रिय असून लोकांचा त्यांजवर पूर्ण भरंवसा होता. फिलेडेल्फिया येथून निघण्यापूर्वीं त्यांनीं आपल्या बायकोस पत्रें पाठ॰

विलीं. त्यांत त्या प्रसंगाचें महत्व, आपली कमी योग्यता व परमेश्वरावर पूर्ण भरंवसा या गोष्टींचा उल्लेख केलेला होता. त्यांनीं हें काम पतकरण्यांत आपल्या सर्वस्वावर पाणी सोडलें. बंडवाल्यांचें प्रमुखत्व पतकरल्यावर घरदार, मालमत्ता व जीवित या सर्वांची आशा सोडावी लागते. रणभूमीवर पडणें हें शूर पुरुषास भूषण वाटतें; परंतु या तंट्यांत मरणाची भीति तर होतीच; तथापि बंडवाले ह्मणून कुत्र्याच्या मौतीनें मरण्याची विशेष धास्ती होती. यांत समाधान मानण्यास जागा कायती स्वदेशाचें व स्वातंत्र्याचें काम ह्मणून सत्कार्य, यास देहार्पण करणें हें सर्व जगास व परमेश्वरास मान्य, असें समजण्यांत होती. आतां वाशिंग्टन यांस हें समाधान मानण्यास सर्व लोकांचा त्यांजवर पूर्ण भरंवसा व प्रेम आणि कांग्रेस सभेचा अमेरिकेच्या स्वातंत्र्यसंरक्षणार्थ आपलें वित्त व जीवित अर्पण करण्याविषयींचा निश्चय या दोन मोठ्या गोष्टी होत्या. ते फिलेडेल्फियाहून बोस्टन येथें गेले त्यावेळेस मासाचुसेट्स प्रदेशाच्या पार्लमेंटानें त्यांस प्रेमादरानें मानपत्र दिलें, व कांहीं मंडळी त्यांजबरोबर बोस्टनपर्यंत पोंचविण्यास गेली होती.

वाशिंग्टन बोस्टन येथें जुलईच्या आरंभीं दाखल होऊन त्यांनीं कामाची स्थिति पाहिली ती सर्व प्रकारें नाउमेदीची दृष्टीस पडली. फौज अगोदर मूळची तयार नव्हती, नवीन लोकांची भरती व्हावयाची व त्याजाविषयींही नीटशी योजना झालेली नव्हती. हत्यारें चांगलीं नसून तींही कमी; दारूगोळ्याचें तर नांवच नाहीं. असा सर्व तुटपुंजीचा विलक्षण प्रकार पाहून जयाची आशा कितपत असणार हें

उघडच आहे. तेव्हां वाशिंग्टन यांस सर्व नवीन व्यवस्थेकरितां नेहमीं पत्रें पाठवून मागणें करावयाचें असे. सारांश या सर्व गोष्टींमध्यें वाशिंग्टन हेच सर्व उद्योगाचे जीव समजले पाहिजेत. त्यांनीं वारंवार नम्रपणानें कांग्रेस सभेस पत्रें पाठवून मागणें मागितलें; नानाप्रकारचे शहाणपणाचे उपाय सुचविले; कार्य बिघडूं नये अगर त्यास धक्का बसूं नये अशासाठीं त्यांनीं सारखा व सतत उद्योग केला; बिकट प्रसंगाच्या वेळीं आपली हिंमत कायम राखून लोकांस धीर दिला; सारांश स्वदेशास संकटापासून तारणारा हें पद मिळविण्यास योग्य असें त्यांचें सर्व वर्तन होतें. त्यांनीं यासंबंधीं पत्रव्यवहार कांग्रेसचे प्रेसिडेंट प्रसिद्ध जान हानकाक यांजबरोबर सुरू केला.

---

## भाग ६.

## स्वतंत्रतेची लढाई.

वाशिंग्टन आपल्या कामावर रुजू झाल्यावर पहिल्यानें त्यांनीं आपल्या ताब्यांतील सर्व ठिकाणें पाहिलीं. तशीच शत्रूच्या ठिकाणांची पाहाणी केली. नंतर फौजेच्या स्थितीचा तपास करून संरक्षणास व हल्ला करण्यास आपलें सामर्थ्य व सोय कशीकाय आहे तें पाहिलें. एंजिनियर नाहींत, हत्यारें नाहींत, तंबू नाहींत, धान्यादिक सामानाची कमताई, पैशाची शिल्लक नाहीं. सारांश लढाईकरितां ज्या गोष्टींची जरूरी होती त्या सर्वांची उणीव होती. फक्त सशक्त उत्सुक व धीराचीं अशीं माणसें मात्र पुष्कळ होतीं. ही स्थिति मनांत आणून त्यांनीं कांग्रेसचे प्रेसिडेंट यांस लिहिलें आणि

वारंवार आपल्या सूचनांप्रमाणें व्यवस्था झाली पाहिजे असें दर्शविलें. त्यावरून त्यांचा हेतु स्वतंत्र व जें वाटेल तें यथेच्छ करण्याचा नसून हुकुमाच्या मान्यतेचें धोरण त्यांनीं दाखविलें. कांग्रेसचें प्रतिष्ठारक्षण व तिचें आज्ञापालन यांजविषयीं ते नेहमीं तत्पर असत, ही एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी व वाशिंग्टन यांविषयीं विशेष पूज्यबुद्धि उत्पन्न करण्यासारखी होती. तथापि ते कधीं अर्जव करून अगर हातापायीं पडल्यासारखें करून भिऊन मागणें मागत नसत. सर्व करणें तें उभयपक्षीं प्रतिष्ठा राखून, गंभीरपणानें योग्य कारणें दाखवून त्या प्रकरणाचा निकाल होई तोंपर्यंत वारंवार लिहिण्याचा क्रम चालू ठेवीत असत.

बंकरहिलची लढाई झाल्यावर बोस्टन येथें कांहीं हालचाल झाली नाहीं. वाशिंग्टन यांच्या मनांत जरी ब्रिटिश छावणीवर हल्ला करावयाचा होता; तरी फौजेची तयारी नीट नसल्यामुळें त्यांस तसें करतां आलें नाहीं; तशांत फौजेंत असलेल्या शिपायांच्या भरतीच्या मुदती संपत आल्या व त्यांजमध्यें व त्यांच्या सरदारांमध्यें लष्करी हुकमाप्रमाणें कडकपणानें वागण्याची संवय नवती त्यामुळें वाशिंग्टन यांस विशेष त्रास झाला. याखेरीज निरनिराळ्या प्रांतांतल्या लोकांच्या निराळेपणामुळें त्यांजमध्यें चुरशी उत्पन्न होत असत. शेवटीं हा प्रकार नाहींसा करण्याच्या हेतूनें वाशिंग्टन यांनीं काटकसरीचा फायदा दाखवून पोशाख सारखे करण्याची सूचना केली व ती कांग्रेसनें मान्य केली, परंतु तसें करण्यास सामान न मिळाल्यामुळें ती अमलांत आली नाहीं.

आतां ब्रिटिश लोकांच्या व्यवस्थेकडे पाहिलें तर गव्हर्नर

गेज यांच्या हुकमती खालीं जनरल हौ हे फौजेचे अधिकारी होते व त्यांस अमेरिकन फौजेंत दारूगोळ्याची कमताई आहे असें कळलें होतें परंतु त्यांनीं कदाचित इंग्लंड व अमेरिका यांजमध्यें सलुखा होईल अशा आशेनें हालचाल केली नाहीं. तथापि त्यांनीं अमेरिकन लोकांचा बोस्टन शहरास वेढा घालण्याचा विचार पाहून त्याजपासून थोड्या अंतरावर डार्चेस्टरची टेंकडी अमेरिकन लोकांच्या ताब्यांत होती ह्मणून त्यांस तेथून घालवून देण्याचा प्रयत्न केला. या कामाकरितां त्यांनीं तीन हजार लोक लार्ड पर्सी यांच्या ताब्यांत देऊन नदींतून बोटींत बसवून पाठविले; परंतु नदीच्या तोंडाजवळ अतिशय वादळ झाल्यामुळें त्यांस पाहिजे तेथें जावयास सांपडलें नाहीं. त्या वादळामुळें जें नुकसान झालें होतें त्याची नीट व्यवस्था लावी तोंपर्यंत अमेरिकन लोकांनीं त्या टेंकड्यांच्या संबंधानें विशेष बंदोबस्त केला त्याजमुळें अमेरिकन लोकांवर हल्ला करण्याचा विचार इंग्रजांस सोडून द्यावा लागला.

शेवटीं त्या टेंकड्या अमेरिकन लोकांच्या हातीं राहिल्यानें ब्रिटिश फौजेस इतकें संकट पडलें कीं, त्यांनीं पुनः विशेष उद्योग न करतां तारीख १७ मार्च सन १७७६ इसवी रोजीं बोस्टन शहर सोडून दिलें. हें पहिलें तब्याचें शहर परत हातीं आल्यामुळें सर्वत्र आनंद झाला. कांग्रेसनें वाशिंग्टन यांच्या ताब्यांतील फौजेस पदक दिलें व सरदार, फौज व वाशिंग्टन यांची शहाणपणाबद्दल, शूरत्वाबद्दल व धैर्याबद्दल वाखाणणी केली. ज्या स्वदेशप्रिय शहरानें प्रथम पाऊल पुढें टाकलें तें हातीं आलें; लोकांचा भरंवसा वाशिंग्टन यांजवर अधिक

वाढला व तें सर्वांस सुचिन्ह वाटून त्यांस पुढच्या उद्योगास विशेष उत्तेजन व धैर्य आलें. कारण हे शिपाई अर्धवट कवाईत शिकलेले व त्यांस लष्करी कायदेकानूंची गैरमाहिती, सामानसुमानाची कमताई असा सर्व प्रकार असतां वाशिंग्टन यांच्या शहाणपणानें, आपल्या फौजेशीं व शत्रूशीं विचारपूर्वक वागण्यानें, धैर्यानें व सतत उद्योग करण्यानें, हा हेतु, विशेष रक्तपात न होतां सिद्धीस गेला आणि ब्रिटिश फौजेकडून पाडाव झालेल्या अमेरिकन लोकांवर बंडवाले समजून जुलूम व अपमान होत असे तो या गोष्टीनें कमी झाला. सारांश हा मिळालेला जय अमेरिकन लोकांस मोठा श्रेयस्कर झाला.

ब्रिटिश फौज बोस्टन येथून निघण्याची हालचाल दिसल्या बरोबर जनरल वाशिंग्टन यांणीं केंब्रिज येथील तळ सोडण्यास आरंभ करून ते न्यूयॉर्ककडे जाण्यास निघाले. कारण शत्रू तिकडे जाणार असें त्यांस वाटलें. वाटेनें ते प्राविडेन्स नार्वीच, व न्यू लंडन यांमधून गेले. जागोजाग त्यांनीं बंदोबस्त केला. न्यू लंडन येथें फौज उतरण्याची योजना केली; कानडा प्रांतांत मदतीस फौज पाठविली. शिवाय न्यू लंडन येथें आडमिरल हापकिन्स यांजकडून थोड्या तोफा आणविल्या. सारांश लढाईच्या प्रसंगाकरितां सर्व प्रकारची तयारी करण्याकडे त्यांनीं लक्ष पुरविलें. आणि स्वतःच्या खासगी वजनानें या नजविजी करून घेतल्या. लोकांचा त्यांच्या अकलेवर, प्रामाणिकपणावर व त्यांच्या स्वदेशप्रीतीवर विशेष भरंवसा होता ह्मणून त्यांच्या हातून या गोष्टी घडून आल्या.

वाशिंग्टन न्यूयार्क येथें सन १७७६ च्या एप्रिल

आरंभीं पोंचल्यावर कांग्रेस कडून त्यांस बोस्टन हस्तगत करून घेतल्याबद्दलचें आभारदर्शक पत्र आलें. मी सर्व लोकांचा चाकर आहें आणि माझ्या अमेरिकन देशबांधवांचे योग्य हक्क संपादण्यास मी अंशतः तरी कारणीभूत व्हावें एतदर्थ मी मनापासून झटून उद्योग करीन असें त्यांनीं फार नम्रपणाचें उत्तर पाठविलें. तसेंच फौजेस हें पत्र कळविण्याच्या संबंधानें त्यांनीं इतकेंच लिहिलें कीं हे शिपाई लोक प्रथम केवळ अडाणी शेतकरी होते; परंतु परमेश्वरकृपा असल्यामुळें व त्यांनीं शौर्यानें लक्षपूर्वक काम केल्यानें हें यश प्राप्त झालें आणि मला विशेष प्रिय जें माझ्या स्वदेशीय लोकांचें प्रेम व मान्यता तीं मला मिळालीं. असो. त्या शहराची स्थिति प्रसंग आल्यास बचाव होण्यासारखी नव्हती. त्या प्रांताच्या शिपाईलोकांजवळ हत्यारें नव्हतीं, शिवाय तेथील लोकांमध्यें स्वदेशभक्तिही थोडी कमी होती. याशिवाय टोरी लोकांचें वजन तेथें अधिक होतें. ब्रिटिश फौज थोडी बहुत तरी नेहमीं तेथें असे आणि कितीएक ब्रिटिश सरदारांचा तेथील श्रीमान घराण्यांशीं शरीरसंबंध झालेला होता; खेरीज तेथील वडे जमीनदार लोक राजपक्षाचे होते. इतकें असूनही त्या वेळेस एशिया नांवाचें एक लढाऊ गलबत, लोकांनीं हालचाल केल्यास नाश करण्यास, तेथें तयार होतें. अशा संकटाच्या स्थितींत देखील त्या प्रांतांतील फौजेनें, व स्वदेशभक्तमंडळीनें तें ठिकाण नेटानें आपल्या हातीं ठेविलें. एशिया गलबताच्या सरदारानें तर असें कळविलें होतें तुमच्या फौजेची गडबड दिसली तर शहर जाळून टाकूं. रिकन फौजेचे सरदार जनरल ली यांनीं प्रत्युत्तरांत कळविलें कीं, एका घरास आग लागली कीं शंभर टोरी

गृहस्थांच्या गळ्यास दावें बांधून त्यांस त्या होमकुंडांत जाळून टाकूं. असो. अमेरिकन फौजेनें अशा कचाटींत तें शहर आपल्या ताब्यांत ठेविलें ही गोष्ट विशेष समजावयाची; शिवाय, हें शहर आपल्या ताब्यांत राखणें अमेरिकन लोकांस अनेक कारणांनीं फार महत्वाचें होतें. त्यामुळेंच वाशिंग्टन यांनीं त्याच्या बचावाकरितां विशेष उद्योग केला. तसेंच त्यांच्या शिफारशीवरून कांग्रेसनें नव्या बोटी वगैरे तयार करविल्या व त्यांजवर तोफा चढवून बंदोबस्त करविला. शिवाय त्या प्रांतांत तेरा हजार लोकांची मिलिशियामध्यें भरती करण्याची परवानगी दिली.

या वेळेपर्यंत अमेरिकन लोक इंग्लिश सरकारची एक प्रकारची प्रजा या नात्यानें इंग्लंडशीं भांडत होती; परंतु पुढें तो प्रकार बदलला आणि अमेरिकन लोकांनीं स्वतंत्रपणाचा जाहिरनामा प्रसिद्ध करून इंग्लंडचा सर्व संबंध तोडून टाकला. सन १७६४ पर्यंत इंग्लिश सरकार व त्यांची अमेरिकन रयत यांजमध्यें कोणत्याही प्रकारची कुरकूर नव्हती. परंतु त्या सालीं सरकारच्या मनांत रयतेवर कर बसविण्याचा विचार आला आणि तेव्हांपासून कलहास आरंभ झाला. रयतेचें ह्मणणें पार्लमेंटमध्यें आमचे मुक्त्यार घ्यावे आणि खुशाल कर बसवावे. आणि रयतेस हा हक्क न देतां कर बसविले पाहिजेत व तसें करण्यास पार्लमेंटास अधिकार आहे. असें सरकार. ह्मणे याजबद्दल कुरकुरी वाढत जाऊन लोकांनीं नानाप्रकारचे उत्तम व मुद्देसूद अर्ज पार्लमेंटाकडे पाठविले; परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं प्रकरण दांडगाईवर आलें. सरकारानें रयत लोकां

प्रथम लेक्सिंगटन येथें हल्ला करून रक्तपात झाला. याच्यायोगानें तंटा वाढला. अमेरिकन कांग्रेसनें जनरल वाशिंग्टन यांस आपल्या देशाच्या व प्रजेच्या संरक्षणासाठीं सेनापति नेमिलें. लढाईची तयारी व काम चालू झालें; परंतु अमेरिकन लोकांच्या मनाचा निश्चय होईना. इंग्लंडशींच चिकटून राहून त्याच्या ताब्यांत राहावें तर प्रजेस कधीं सुख होणार नाहीं नेहमीं त्रास होत राहील. संबंध सोडून स्वतंत्र व्हावें तर प्रजेमध्यें तितकें सामर्थ्य नाहीं. परिणाम काय होईल याचा नेम कोणाच्यानेंच सांगवत नव्हता. अशा मनाच्या द्विधा स्थितींत लोक गोंधळून गेले होते. लोकांस स्वतंत्र व्हावें असें वाटे, परंतु त्याचा उद्गार देखील कोणाच्यानें बाहेर काढवत नव्हता. कितीएक सुज्ञ व धाडसी लोकांनीं भीत भीत असे उद्गार लेखांच्या द्वारें बाहेर काढले; परंतु लोकांच्या मनाची स्थिति स्थिर व स्थाईक होईना. अशा प्रसंगीं मि. टॉमस पेन या नांवाच्या स्वदेशभक्तानें मोठ्या चातुर्यानें " कॉमन सेन्स " नांवाचें एक अष्टपत्री सांच्याचें ४७।४८ पृष्ठांचें निनांवी लहानसें पुस्तक सन १७७६ च्या फेब्रुवारीमध्यें छापून कोणास न कळत रात्रीं फिलेडेल्फिया शहरांतील रस्तो रस्तीं चौकांच्या ठिकाणीं त्या पुस्तकाचे ढीग घालून ठेविले. सकाळीं लोक पहातात तो हा चमत्कार दृष्टीस पडला. ज्याला वाटलें त्यानें त्यांतील प्रत नेली आणि वाचली; पहिल्यानें वाचल्याबरोबर तर लोक भेदरून जाऊन थक्क होऊन गेले आणि त्यांत लिहिल्याप्रमाणें करणें बरें नाहीं असें त्यांस वाटे. परंतु पुनः त्यांनीं शांतपणें वाचलें कीं त्यांचें मन वेधलें जाऊन लिहिणाराची सूचना योग्य आहे असें वाटूं लागे.

गृहस्थांच्या गळ्यास दावें बांधून त्यांस त्या होमकुंडांत जाळून टाकूं. असो. अमेरिकन फौजेनें अशा कचाटींत तें शहर आपल्या ताब्यांत ठेविलें ही गोष्ट विशेष समजावयाची; शिवाय, हें शहर आपल्या ताब्यांत राखणें अमेरिकन लोकांस अनेक कारणांनीं फार महत्वाचें होतें. त्यामुळेंच वाशिंग्टन यांनीं त्याच्या बचावाकरितां विशेष उद्योग केला. तसेंच त्यांच्या शिफारशीवरून कांग्रेसनें नव्या बोटी वगैरे तयार करविल्या व त्यांजवर तोफा चढवून बंदोबस्त करविला. शिवाय त्या प्रांतांत तेरा हजार लोकांची मिलिशियामध्यें भरती करण्याची परवानगी दिली.

या वेळेपर्यंत अमेरिकन लोक इंग्लिश सरकारची एक प्रकारची प्रजा या नात्यानें इंग्लंडशीं भांडत होती; परंतु पुढें तो प्रकार बदलला आणि अमेरिकन लोकांनीं स्वतंत्रपणाचा जाहिरनामा प्रसिद्ध करून इंग्लंडचा सर्व संबंध तोडून टाकला. सन १७६४ पर्यंत इंग्लिश सरकार व त्यांची अमेरिकन रयत यांजमध्यें कोणत्याही प्रकारची कुरकूर नव्हती. परंतु त्या सालीं सरकारच्या मनांत रयतेवर कर बसविण्याचा विचार आला आणि तेव्हांपासून कलहास आरंभ झाला. रयतेचें ह्मणणें पार्लमेंटमध्यें आमचे मुक्त्यार घ्यावे आणि खुशाल कर बसवावे. आणि रयतेस हा हक्क न देतां कर बसविले पाहिजेत व तसें करण्यास पार्लमेंटास अधिकार आहे. असें सरकार. ह्मणे याजबद्दल कुरकुरी वाढत जाऊन लोकांनीं नानाप्रकारचे उत्तम व मुद्देसूद अर्ज पार्लमेंटाकडे पाठविले; परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं प्रकरण दांडगाईवर आलें. सरकारानें रयत लोकां

प्रथम लेक्सिंगटन येथें हल्ला करून रक्तपात झाला. याच्यायोगानें तंटा वाढला. अमेरिकन कांग्रेसनें जनरल वाशिंग्टन यांस आपल्या देशाच्या व प्रजेच्या संरक्षणासाठीं सेनापति नेमिलें. लढाईची तयारी व काम चालू झालें; परंतु अमेरिकन लोकांच्या मनाचा निश्चय होईना. इंग्लंडशींच चिकटून राहून त्याच्या ताब्यांत राहावें तर प्रजेस कधीं सुख होणार नाहीं नेहमीं त्रास होत राहील. संबंध सोडून स्वतंत्र व्हावें तर प्रजेमध्यें तितकें सामर्थ्य नाहीं. परिणाम काय होईल याचा नेम कोणाच्यानेंच सांगवत नव्हता. अशा मनाच्या द्विधा स्थितींत लोक गोंधळून गेले होते. लोकांस स्वतंत्र व्हावें असें वाटे, परंतु त्याचा उद्गार देखील कोणाच्यानें बाहेर काढवत नव्हता. कितीएक सुज्ञ व धाडसी लोकांनीं भीत भीत असे उद्गार लेखांच्या द्वारें बाहेर काढले; परंतु लोकांच्या मनाची स्थिति स्थिर व स्थाईक होईना. अशा प्रसंगीं मि. टॉमस पेन या नांवाच्या स्वदेशभक्तानें मोठ्या चातुर्यानें "कॉमन सेन्स" नांवाचें एक अष्टपत्री सांच्याचें ४७।४८ पृष्ठांचें निनांवी लहानसें पुस्तक सन १७७६ च्या फेब्रुवारीमध्यें छापून कोणास न कळत रात्रीं फिलेडेल्फिया शहरांतील रस्तो रस्तीं चौकांच्या ठिकाणीं त्या पुस्तकाचे ढीग घालून ठेविले. सकाळीं लोक पहातात तो हा चमत्कार दृष्टीस पडला. ज्याला वाटलें त्यानें त्यांतील प्रत नेली आणि वाचली; पाहिल्यानें वाचल्याबरोबर तर लोक भेदरून जाऊन थक्क होऊन जात आणि त्यांत लिहिल्याप्रमाणें करणें बरें नाहीं असें त्यांस वाटे. परंतु पुनः त्यांनीं शांतपणें वाचलें कीं त्यांचें मन वेधलें जाऊन लिहिणाराची सूचना योग्य आहे असें वाटं लागे.

सारांश लोक पुनः पुनः वाचीत आणि त्याच्याच मताप्रमाणें केल्यावांचून दुसरा मार्ग नाहीं अशी त्यांची खात्री होई. त्या पुस्तकांतल्या लिहिणारानें कोणा व्यक्तीची निंदा किंवा स्तुति केली नव्हती; साधारण सर्व जगास व सर्व मानवी प्राण्यास सामान्यतः लागू अशा व्यापक विचारांची त्यांत मांडणी केली होती. ग्रंथकारानें प्रथम सरकार, अगर राज्यसत्ता असणें याचा हेतु काय हें थोडक्यांत सांगून, इंग्लिशलोकांच्या राज्यपद्धतीवर थोडी टीका केली होती. नंतर राजा व वंशपरंपरेचे हक्क यांजपासून अनर्थ दाखविले होते. मग अमेरिकन लोकांच्या त्या वेळेच्या स्थितीचें यथार्थ वर्णन करून पुढें अमेरिकेचें त्या वेळचें सामर्थ्य कसें व किती आहे हें उत्तम रीतीनें वाचकांपुढें मांडलें होतें एकंदरींत त्या पुस्तकानें लोकांच्या मनाची इंग्लंडचा संबंध तोडण्याची व लढून स्वातंत्र्य संपादण्याविषयींची पूर्ण तयारी करून सोडली. भाषा अत्यंत सोपी, सरळ, व निश्चयाची होती. विचारसरणी खात्री करण्यासारखी असल्यामुळें हा उद्योग करणारा मनुष्य कोण हें न कळतांही लोक त्यास मनापासून संकटसमयीं बुद्धिवाद व उपदेश करण्यास कोणी देवदूतच आला असें समजून त्याचे उपकार मानून त्याप्रमाणें कार्यास तयार झाले. सर्व देशभर तीं पुस्तकें पसरलीं. आणि एकंदर सर्व प्रांतांत स्वतंत्रतेचा जाहीरनामा प्रसिद्ध करून संबंध तोडण्याचा निश्चय ठरला. त्याप्रमाणें तारीख ७ जून सन १७७६ इसवी रोजीं कांग्रेसमध्यें रिचर्ड हेनरी ली या पुरुषानें त्या प्रदेशांच्या तर्फे स्वतंत्रतेचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याविषयींची पहिल्यानें सूचना केली. त्याचा तीन दिवसांनीं विचार होऊनतो ता. १ जुलै

पर्यंत तहकूब झाला. मध्यंतरीं जाहीरनाम्याचा मसुदा तयार करण्याकरितां वर्जिनियाचे टामस जेफर्सन, मासाचुसेट्सचे जान आडाम्स, पेन्सिल्वेनियाचे बेंजामिन फ्रांकालिन, कनेक्टिकटचे रोजर शेरमन, आणि न्यूयार्कचे राबर्ट आर० लिविंगस्टन या गृहस्थांची कमिटी नेमिली. मि० टामस जेफर्सन यांनीं मसुदा लिहून तयार केला. तो मंडळींत विचार होऊन कमीजास्त केल्यानंतर ठरला. नंतर तो मसुदा कांग्रेसमध्यें वाचला गेला व तो सर्वांनीं शांतपणें ऐकून घेतला, त्या जाहीरनाम्यांत प्रथम मनुष्याचे साधारण हक्क व अधिकार कोणते ते सांगून इंग्रज सरकाराकडून सर्व दुःखें भोगिलेलीं जगास कळविलीं होतीं. त्याजवर लोकांनीं ब्रिटिश सरकारचा संबंध सोडण्याचा निश्चय केला व हा शेवटास नेण्याकरितां आपलें जीवित, वित्त व आपली अब्रू यांचा व्यय करण्यास सिद्ध आहों असें प्रगट केलें. तो जाहीरनामा वाचल्यावर कांग्रेसमध्यें सर्व सभासदांनीं उठून एकेकानें सही केली. हा समय, हा प्रसंग, त्याचें महत्व व ही क्रांति यांचें गांभीर्य व त्याच्या बऱ्यावाईट परिणामाचें धोरण इत्यादि गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे कल्पना करवत नाहीं अशी मनाची स्थिति होऊन जाते. वाईट परिणाम मनांत आणिला ह्मणजे त्या स्वदेशभक्तांनीं त्या वेळेस त्या लेखावर सह्या करण्यानें केवळ आपल्या मृत्यूचें बोलावणें मान्य केलें असें होतें; परंतु सत्कृत्यास परमेश्वर सदोदित यश देतो, त्याप्रमाणें त्या वेळेच्या अमेरिकन लोकांच्या महत्कार्यास यश देऊन त्यांस त्यानें सुखी केलें. त्या लेखाचें महत्व, त्याची योग्यता व त्यांतील अर्थगांभीर्य अवर्णनीय आहेत. त्या लेखाच्या योगानें इंग्लंडचा व त्यांच्या प्रांतील अमेरिकेंतील कांहीं वसाहतींच्या प्रांतांचा संबंध

तुटला एवढेंच नाहीं, तर अमेरिकन लोक सुखी व स्वतंत्र झाले; नव्या व जुन्या पृथ्वीच्या गोलार्धांचा संबंध तुटला; आणि राजाच्या जुलमाचा मोड होऊन लोकांच्या स्वातंत्र्याचा झेंडा उभारला गेला; प्रजासत्ताक राज्यरीतीचा मोठा पाया पडला व सर्व जगास मोठें उदाहरण होऊन उत्तेजनास कारण झालें; असा त्या लेखाचा मोठेपणा आहे. परमेश्वराची लीला अगाध आहे. ज्या कमिटीस हें स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा मसुदा तयार करण्याचें अत्यंत महत्वाचें व जोखमाचें, काम सांगितलें होतें तींतील पुरुषांची दिगंतकीर्ति होऊन ते अत्यंत योग्य व पूज्य ठरले. यांतले दोन गृहस्थ, एक छापखान्याच्या प्रिंटरच्या कामाकरितां व दुसरा तर चांभाराच्या कामाकरितां असे शिकून तयार झालेले होते! परंतु आपल्या बुद्धिकौशल्यानें व शहाणपणानें एवढ्या उच्चपदास चढले. सारांश धंद्याच्या किंवा ज्ञातीच्या योगानें मनुष्यास योग्यता येते असें नाहीं. सत्कार्यार्थ प्रयत्न केला व सदाचरणाचें वर्त्तन असलें ह्मणजे मनुष्यास खरी योग्यता प्राप्त होते हें आमच्या वाचकांनीं ध्यानांत ठेविलें पाहिजे.

हा जाहीरनामा तारीख ४ जुलई सन १७७६ इसवी रोजीं कांग्रेसमध्यें मान्य होऊन त्याजवर ती तारीख पडली व तो दिवस स्वातंत्र्याच्या संबंधानें मोठा आनंदाचा समजला गेला. जुलैच्या ८ व्या तारखेस फिलेडेल्फियाच्या पार्लमेंटमध्यें तो जाहीरनामा वाचला व तो लोकांनीं जयघोष करून आनंदानें मान्य केला. याप्रमाणेंच त्यावेळच्या तेरा प्रांतांत अथ[...] संस्थानांच्या पोट पार्लमेंट सभांत व लष्कराच्या छावण्य[...] समारंभानें तो वाचला जाऊन सर्वत्र आनंद झाला. हा स[...]

रंभ आटपल्यावर चार दिवसांनींच लार्ड हौ पंचवीस हजार लोक बरोबर घेऊन लाँग व स्टेटन ऐलंड या बेटांजवळ जहाजांतून आले. ही फौज चांगली शिकलेली, लढायांत घटलेली, अनुभविक सरदारांच्या ताब्यांत असलेली व सर्व लढाईच्या सामानानें परिपूर्ण अशी होती. आतां त्यांजशीं सामना करणारी व त्यांजपासून देशाचा बचाव करणारी अमेरिकन फौज केवळ सत्रा हजार लोकांची असून, अगदीं नवी होती, आणि तींतले सरदार लोकही अनुभव घेतलेले नसून तींत हत्यारांची व लढाईच्या सामानाची सर्व प्रकारची कमताई होती. परंतु तींतल्या लोकांमध्यें आपलें हक्क संरक्षणाचें सत्कार्य आहे अशी खात्री असून तें अखेरपर्यंत सिद्धीस नेण्याचा त्यांचा दृढनिश्चय होता.

लार्ड हौ यांणीं प्रथम सामोपचाराचा ह्मणजे मिलाफ करण्याचा प्रयत्न केला. त्यांणीं प्रथम सलुयाचें निशाण पाठवून त्याजबरोबर जुने प्रांताचे गवर्नर यांस सर्क्युलर पत्रें व त्यांजबरोबर लोकांस क्षमा करण्याबद्दल जाहीरनामे पाठविले; लोक लवकर स्वस्थ होतील तर त्यांस क्षमा करण्याचा आपल्यास अधिकार आहे असें त्यांत कळविलें होतें. हीं पत्रें वगैरे जनरल वाशिंग्टन यांणीं कांग्रेसकडे पाठविलीं, आणि लोकांस कळविण्यास सुचविलें. लार्ड हौ यांणीं हीं पत्रें पाठविलीं त्याच सुमारास वाशिंग्टन यांस साधारण मनुष्यासारखें "जार्ज वाशिंग्टन एस्क्वायर" असा पत्ता वर लिहून पत्र पाठविलें. तें त्यांणीं आपण घेत नाहीं असें सांगितलें. कारण व्यवहार होणें तो लष्करी हुद्यापमाणें झाला पाहिजे असें त्यांनीं स्पष्ट कळविलें ही गोष्ट त्यांणीं कांग्रेसला कळविली व

त्यांणीं तो प्रकार पसंत केला. पुढें लार्ड हौ यांणीं अमेरिकन जनरल यांजशीं बोलणें चालवून तंटा मिटविण्याकरितां कर्नल पाटर्सन यांस मध्यस्थ वकील ह्मणून पाठविलें. त्या भेटीचा व बोलण्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण, वाशिंग्टन यांणीं त्यांस स्पष्ट सांगितलें कीं, तुह्मांस क्षमा करण्याचा अधिकार दिलेला आहे असें दिसतें; आणि आह्मी तर कांहीं गुन्हा केलेला नाहीं तेव्हां आह्मांस क्षमेची जरूर नाहीं. याप्रमाणें कर्नल पाटर्सन इकडील स्पष्ट उत्तर घेऊन गेले. तेव्हां अर्थात उभयपक्षीं लढाईची तयारी करण्याचा निश्चय झाला.

दोहोंकडच्या फौजा जवळ जवळ होत्या तेव्हां लढाई व्हावयाचीच असें खास दिसलें. त्या वेळेस वाशिंग्टन यांणीं आपली फौज एकीकडे न नेतां सामना करण्याचा विचार केला. कारण त्यांचा असा विचार होता कीं नेहमीं मागें राहिल्यानें किंवा शत्रूची वाट पहात राहिल्यानें फौजेंत हिंमत येत नाहीं. तेव्हां नवीन फौज हुषार करण्याकरितां सामना करावा हें बरें. प्रथम जेव्हां नवे लोक शत्रूशीं लढावयास जातात तेव्हां आपण खास मरणार अशा समजुतीनेंच जातात आणि असे दोन तीन वेळ लढाईत जाऊन वांचले ह्मणजे त्यांस अतिशय हिंमत येऊन ते शूर होतात. हें धोरण मनांत आणून जनरल वाशिंग्टन यांणीं सामना करण्याची तयारी चालविली. शत्रूचा रोंख न्यूयार्क शहरावर यावयाचा होता हें पाहून त्यांणीं मध्यंतरीं बंदोबस्त केला. लाँग ऐलंड या बेटावर जनरल हौ उतरतील ह्मणून तेथें कांहीं फौज ठेविली. बाकीची फौज यॉर्क ऐलंडवर जागोजाग ठेविली फक्त न्यू यॉर्कची मिलिशिया मात्र न्यू राचेल येथें ठेविली होती. वाशि-

ग्टन यांणीं हिमतीनें व शहाणपणानें लढाईची सर्व तयारी केली; परंतु जय मिळण्याची त्यांस आशा नव्हती; तथापि, शत्रूस जय मिळाला तरी तो विशेष नुकसान झाल्यावांचून मिळणार नाहीं अशी त्यांची आपल्या फौजेच्या मनाच्या स्थितीवरून खात्री झाली होती. त्यांणीं हत्यारांची, सामानाची व फौजेच्या व्यवस्थेची सर्व तयारी केली होती. त्याप्रमाणेंच शिपाई लोकांचीं मनेंही उत्तेजक हुकूम लिहून तर्र केलीं होतीं. त्यांस धैर्य व स्वदेशप्रीति, स्वदेशास झालेली इजा, पूर्वींची कृति व पुढची आशा इत्यादि गोष्टींची आठवण देऊन त्यांमध्यें ईर्षा उत्पन्न केली होती. लार्ड हौ आले. लढाईची वेळ अगदीं जवळ येऊन ठेपली तेव्हां वाशिंग्टन यांणीं एका जनरल आर्डरमध्यें निकालाचा समय जवळ आला आहे, त्यावरून अमेरिकन लोक स्वतंत्र होणार किंवा गुलाम होणार याचा निर्णय होईल, असें लिहिलें. त्यांची स्वतःची ह्मणून ह्मणण्यासारखी कांहीं मालमत्ता राहील कीं नाहीं, त्यांचीं घरें व शेतें लुटलीं जाऊन सर्वस्व जातें किंवा राहातें याचा निकाल होईल. पुढें होणाऱ्या संततीच्या नशिबाचा निर्णय आपल्यावरच येऊन ठेपला आहे. शत्रूंनीं तर जिंकावें किंवा मरावें अशा बेतावर आपणांस आणून सोडलें आहे. सर्व देशांतील लोकांचे डोळे आपल्या कृतीवर लागून राहिले आहेत. तेव्हां आपलें कार्य सत्कार्य आहे व परमेश्वर त्यास मदत करील अशा दृढ निश्चयानें आपलें कर्तव्य बजावूं. आपापल्यांमध्यें एकमेकांस धीर देऊन सर्व जगास आपण असें उदाहरण दाखवूं कीं, स्वतंत्र लोक आपल्या देशांत स्वतंत्रतेकरितां लढत असतां, त्यांजवर पृथ्वीतील बाहेरची भा-

डौत्री कितीही फौज आली तरी तिचें वर्चस्व व्हावयाचें नाही. शत्रूंची फौज येऊन ठेपली. लढाईस लवकरच आरंभ होईल. तेव्हां सरदारांनीं व शिपायांनीं हत्यारें व सामान यांसुद्धां तयार असावें. आणि आपलें स्वातंत्र्य, वित्त, जीवित व आपली अब्रू जावयाच्या बेतावर आली आहे; आपल्या देशाचा सर्व आधार आपल्या धैर्यावर व शौर्यावर अवलंबून आहे; आपलीं बायकामुलें व आईबाप यांच्या बचावाचें जोखीम आपणावरच आहे. तेव्हां आपलें कार्य हें सत्कार्य आहे व त्यास परमेश्वर सहाय करीलच अशा दृढनिश्चयानें लढा असें त्यांणीं पुन्हां सुचविलें.

शेवटीं तारीख २२ आगष्ट सन १७७६ इसवी रोजीं सर हेनरी क्लिंटन ब्रिटिश फौजेचा बराच मोठा भाग बरोबर घेऊन लॉंग ऐलंड या बेटावर उतरले आणीं त्यांनीं रोज या ठिकाणापासून प्लाट लॅन्डस् या खेड्यापर्यंत सारखी फौज पसरली. अमेरिकन सरदार जनरल सालिवन यांच्या मदतीस आणखी सहा पलटणी जनरल पटनम यांच्या ताब्यांत देऊन पाठविल्या. जनरल पटनम यांजकडे सर्व रस्ते राखावयाचें काम दिलें. दोन्ही फौजांमध्यें सारें दोन तीन मैलांचें अंतर होतें. सर हेनरी क्लिंटन यांणीं अंधारांतच फौज पुढें चालवून मार्ग हस्तगत करून घेण्याची तजवीज केली. यांच्या फौजेची एका अमेरिकन टोळीशीं गांठ पडली आणि ही फौज अंधारांत व एकाएकीं आल्यामुळें अमेरिकन फौजेचा घोटाळा झाला. ब्रिटिश फौजेनें त्या टोळीचा मोड करून मार्ग आपल्या ताब्यांत घेऊन पुढें चाल केली. इतक्यांत ब्रिटिश फौजेचा दुसरा भाग निराळ्या रस्त्यानें जाऊन अमेरिकन फौजेशीं ऌढूं

लागला. तिसरा भाग आणखी एका बाजूस गेला. अशी सूर्योदयाच्या सुमारास एकंदर लढाई सुरू झाली. दोहींकडचा तोफखाना सुरू झाला. लढाई बरीच वेळ चालली. शेवटीं सर हेनरी क्लिंटन अमेरिकन फौजेच्या डावे बाजूकडे दोन तासांनीं वळले. त्या वेळेस अमेरिकन फौजेस आपण चौहोकडून वेढलों गेलों असें वाटून घोटाळा होऊन तिचा मोड झाला. या लढाईंत अमेरिकन लोक मेले व जखमी झालेले मिळून पांचशें मनुष्यांचा नाश झाला व एक हजार लोक कैदी ह्मणून सांपडले त्यांत तीन मोठे सरदार सांपडले. याजवरून सत्कार्य जरी असलें तथापि त्याकरितां विशेष मूल्य खर्चल्यावांचून तें सिद्धीस जात नाहीं. यास्तव परिश्रम करून, त्याकरितां विशेष झीज सोसावी लागतें असें सिद्ध होतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

असो. ही लढाई झाल्याबरोबर अमेरिकन फौजेची स्थिति अत्यंत बिकट झाली. एका बाजूस रुंद, खोल व मोठ्या झपाट्यानें वाहाणाऱ्या मोठ्या नदीचें पात्र होतें व दुसऱ्या बाजूसही विजयी शत्रूची फौज हल्ला करण्यास सूर्योदयाची वाट पहात होती. जनरल वाशिंग्टन लॉंग ऐलंड या बेटावर लढाई चालली असतांच पोंचले. पुढें ही भयंकर संकटाची स्थिति पाहून त्यांणीं सरदार लोकांस जमवून विचार करून फौज तेथून रातोरात परत घेऊन जाण्याचा निश्चय ठरविला. सायंकाळच्या वेळेस वारा जबरदस्त सुटला त्याजमुळें त्यांस बचावाची आशा दिसेनाशी झाली. इतक्यांत दैवयोगें वाऱ्याचा झोंक फिरून धुकें आलें. ही संधी पाहून ती सर्व फौज, तोफा, घोडे, दारूगोळा, निर्वाहा-

चे पदार्थ वगैरे सर्व गपचूप बोटींवर घालून सुरक्षितपणें पार निघून गेली. पुढें थोड्या वेळानें धुकें नाहींसें झाल्यावर ब्रिटिश फौज त्या ठिकाणाकडे गेली तों अमेरिकन लोक निघून गेले असें दृष्टीस पडलें.

आतां हा मोड झालेला लोकांच्या समजुतीस आला; तथापि लोकांची जनरल वाशिंग्टन यांजविषयींची पूज्यबुद्धि व त्यांजवरचा भरंवसा कमी झाला नाहीं. लोकांनीं आपल्या तयारीच्या व पुरवठ्याच्या कमीपणाकडेस दोष लाविला. कारण वाशिंग्टन यांची स्वदेशभक्ति, प्रामाणिकपणा व हुशारी यांजविषयीं त्यांची पक्की खात्री होती. तेव्हां नीतीमानपणानें प्राप्त झालेली योग्यता किती उपयोगी पडते याचें हें एक मोठें विलक्षण उदाहरण आहे.

ही लढाई झाल्यावर लार्ड हौ यांनीं लागलाच अमेरिकन फौजेचा पाठलाग न करतां लढाईंत सांपडलेले जनरल सलिवन यांस लष्करी संप्रदायाप्रमाणें भाक घेऊन फिलेडेल्फिया येथें कांग्रेसकडे आपलें ह्मणणें कळविण्याकरितां पाठविलें. कांग्रेस त्यांस भेटण्यास प्रथम कबूल होईना; परंतु त्यांनीं आपल्या पैकीं तीन सभासद फ्रांक्लिन, ॲडम्स व रटलेज यांची भेट घेण्यास परवानगी दिली. त्या भेटींत लार्ड हौ क्षमा करावयास तयार आहेत, लोकांनीं त्यांचें ह्मणणें मान्य करावें असें त्यांनीं सांगितलें. त्या सभासदांनीं स्पष्टपणें कळविलें कीं ही गोष्ट कदापि घडून यावयाची नाहीं तेव्हां तो सर्व खटाटोप पुनः व्यर्थ झाला.

लाँग ऐलंडावरील प्रकार आटपल्यावर अमेरिकन लोक अगदीं निराश झाले. मिलिशियाचे लोक आपापल्या घरीं परत जावयास

उत्सुक झाले. न्यूयार्क शहर शत्रूच्या फौजेनें आपल्या ताब्यांत घेतलें. तसेंच त्या शहराचा बराच भाग आगीनें जळाला. या वेळेस कांहीं संस्थानें यूनैटेड स्टेट्सच्या प्रदेशांत नवीन सामील झालीं, परंतु त्यांत राज्यव्यवस्था कोणत्याही प्रकारची नवती याजमुळें केवळ कमिट्या स्थापून कारभार चालवीत होते. याप्रमाणें चोहोंकडे सर्व प्रकारें भयप्रद व घोटाळ्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. परंतु वाशिंग्टन यांच्या मनाची रचना कांहीं निराळीच होती. त्यांस चोहोंकडून संकटांनीं वेढलें ह्मणजे त्यांची हिंमत न खचतां त्यांस अधिक स्फुरण येई आणि ते विशेष जारीनें व अक्कल लढवून काम करीत. न्यूयार्क शहरांतील श्रीमान् लोकांचें मन या कार्याकडे चांगलेंसें नसल्यामुळें त्यांणीं त्यांच्या संरक्षणाचा विचार एकीकडे ठेऊन तें शहर सोडून किंग्स् ब्रिड्ज या जाग्याजवळ मजबूत ठिकाण पाहून तेथें फौजेचा तळ दिला. त्याच्या संरक्षणाकरितां कोट वगैरे बांधण्याची तजवीज केली आणि त्या ठिकाणास वाशिंग्टन असें नांव दिलें. या ठिकाणास जनरल हौ यांणीं वेढा घालण्याचें मनांत आणून पाण्यांतून फौज नेऊन थ्रागस नेक येथें फौजेचा मुख्य भाग उतरला. वाशिंग्टन यांणीं हें पाहून लढाई देण्याचा विचार बरा नाहीं असें मनांत आणून तेथें साधारण थोडी फौज. शत्रूस गुंतवून ठेवण्याकरितां ठेवून बाकीची सर्व फौज हळूच युक्तीनें तेथून काढून नेली. इंग्रज सरदारानें या फौजेचा पाठलाग केला व व्हैट प्लेन्स येथें थोडी चकमक देखील झडली; परंतु त्या सरदारास मोठ्या लढाईचा प्रसंग आणून अमेरिकन फौजेचा मोड करावयाचा होता तें कांहीं साधलें नाहीं. वाशिंग्टन यांणीं त्यास

चुकवून आपली फौज लढाई न करतां सुरक्षित नेली. मग लार्ड हौ यांणीं तो मार्ग सोडिला आणि फौज परत नेऊन ते यॉर्क ऐलंडकडे वळले आणि त्यांनीं वाशिंग्टन कोटास चहूंकडून वेढा घातला. वरीच चांगली लढाई झाल्यावर तो किल्ला स्वाधीन झाला त्यांत तीन हजार लोक इंग्रजांच्या हातीं लागले. त्या प्रसंगीं सांपडलेल्या लोकांचे इंग्रज लोकांच्या फौजेनें अतिशय हाल केले. कर्नल रालिन्स व दुसरे मोठे सरदार जखमी होऊन हातीं लागले त्यांची त्यांणीं गाडीवर बसवून न्यू यॉर्क शहरच्या रस्त्यांतून धिंड काढली, त्यांस व इतर लोकांस अगदीं घाणेरड्या जाग्यांत ठेविलें व त्यांचे खाण्यापिण्याचे अतिशय हाल केले. थंडी, वारा व ऊन यांजपासून निवाऱ्यास वस्त्रें व व्यवस्थित जागा देखील नवती. स्वच्छता राहण्यास मार्गच ठेविला नाहीं. पुढें त्यांस उघड्या जहाजांवर नेऊन ठेविलें. कुरकुर केल्यास व कष्टल्यास, कुंथल्यास उपहास होई व मार देखील मिळे. सारांश अमेरिकन लोकांस धास्ती बसावी व सांपडलेल्या लोकांनीं फितुरीचा उद्योग करण्यास तयार व्हावें अशा दुष्ट हेतूनें त्यांचे हाल हाल केले, परंतु ते लोक हाल अपेष्टा व दुःखें भोगून शेवटीं मेले परंतु फितुराच्या वगैरे नीच कर्मास मुळींच प्रवृत्त झाले नाहींत. ही गोष्ट येथें सांगण्याचा उद्देश इतकाच आहे कीं अमेरिकन लोकांनीं स्वातंत्र्यसुखासाठीं अशीं परमावधींचीं दुःखें भोगिलीं आणि सर्व जगास कित्ता घालून ठेविला. त्या दुःखांचें आजचे अमेरिकन लोक उत्तम प्रकारें फळ उपभोगीत आहेत. आज सर्व पृथ्वीवर त्यांजसारखे सुखी, श्रीमान्, जगमान्य व स्वतंत्र दुसरे लोक नाहींत. शिवाय, स्वातंत्र्य हें अमोलिक बहुमोलाचें व अतिकष्टसाध्य

रत्न आहे. तेव्हां त्याच्या प्राप्त्यर्थ त्या मानानेंच लोकांना झीज सोसावी लागते हें ध्यानांत ठेविलें पाहिजे जनरल हौ यांच्या अशा जुलमाच्या उलट प्रकारापासून त्यांस काडी इतका उपयोग न होतां अमेरिकन लोकांत सर्व देशभर अत्यंत स्फुरण येऊन ईर्षा व विशेष झटून उद्योग करण्याची इच्छा उत्पन्न झाली. कारण जो पाणीदारपणा जुलमानें दबला जात नाहीं तो अनिवय होतो असा साधारण सिद्धांतच आहे.

असो. या प्रकारें अमेरिकन फौज कमी होऊं लागली व इंग्रजांची फौज, त्यांस जर्मनी वगैरे परदेशाहून हेशिग्रन व वालडेकर अशा अर्धवट रानटी मनुष्यांची भरती होऊन पांच हजार लोकांची मदत येऊन, वाढली. याप्रमाणें इंग्रज लोकांनीं आपल्या देशबांधवांस व भावाबंदांस मारण्याकरितां परकी, क्रूर व रानवट लोकांची पैसा खर्चून मदत मिळविली. त्यांतही आणखी गैर प्रकार झाला होता. त्यांस फसवून दुष्ट, रानवट व क्रूर लोकांशीं लढावयास जावयाचें आहे, असें सांगून त्यांची भरती केली होती. हे लोक अमेरिकेंत आल्यावर त्यांणीं अनर्थ करून दिला. जेव्हां जनरल हौ न्यूजर्शी प्रांतांतून जनरल वाशिंग्टन यांच्या फौजेचा पाठलाग करीत गेले तेव्हां वाटेंत त्या हेशियन लोकांनीं दंगे करून लोकांस लुटून जें नेववलें तें नेलें व जें नेववेना तें फोडून तोडून त्याचा नाश केला. जनावरें वगैरे नेववलीं तितकीं नेलीं व निरपराधी मनुष्यांस ठार मारिलें किंवा कैद करून नेलें; तसेंच स्त्रियांची अतिशय निर्भत्सना करून त्यांच्यावर जुलूम केले. अशा अनन्वित व नीच गोष्टी या प्रसंगीं घडल्या. याजमुळें लोक दबून व भिऊन न जातां उलटे अधिक चौताळले. सर्वांनीं शेतीभातीचे वगैरे धंदे

सोडून लहान लहान टोळ्या करून जनरल होच्या फौजेस चोहोंकडून त्रास देऊन बेजार करून सोडिलें. आतां हेशियन लोकांनीं पहिल्या पहिल्यानें असा अनर्थ केला; परंतु पुढें जेव्हां त्यांपैकीं कांहीं अमेरिकन लोकांच्या हातीं सांपडले आणि कैदी असतां त्यांचा चांगल्या प्रकारें सांभाळ झाला व त्यांस लढाईचें खरें कारण कळलें तेव्हां मग ते चाकरी सोडून जाऊं लागले व राहिले तरी त्यांजवरचा इंग्रज लोकांचा भरंवसा नाहींसा झाला. सारांश त्यांच्या वृत्तींत अगदीं फेर पडला.

पुढें जनरल वाशिंग्टन यांणीं मिलिशिया लोकांचें वर्तन लॉंग ऐलंड व फोर्ट वाशिंग्टन येथें पाहून त्यांच्यानें हें लढाईचें काम अखेरपर्यंत निभावणार नाहीं, यास्तव चालीप्रमाणें पगारी फौजेची मदत द्यावी ह्मणून कांग्रेस मंडळीस निकराचें पत्र पाठविलें. परंतु कांग्रेसची मंडळी या कामास कांकूं करूं लागली. त्यांच्या मनांत पगारी फौज विशेष वाढवावयाची नव्हती. कारण असली फौज पगारा पुर्ता विचार करते आणि जो पगार देईल त्याजकडे वेळेस जावयास व त्याचें काम करावयास तयार होते. शिपाईगिरीचा नुस्ता धंदा करीत असले ह्मणजे त्यांच्या मनांतील स्वदेशभक्ति व स्वदेशसुधारणुकेचा विचार कमी होतो व ते एखाद्या विशेष लोकप्रिय सरदाराच्या हाताखालीं असले ह्मणजे तर त्यांजपासून अनर्थ होण्याची भीति असते. असे सरदार व फौज आपल्या देशास दुसऱ्यापासून मुक्त करतात; परंतु आपणच आपल्या देशाच्या उरावर बसतात. इतिहासांत अशीं अनेक उदाहरणें आढळतात. वाशिंग्टनचें उदाहरण मात्र निराळ्या प्रकारचें झालें. तेव्हां पहिल्या कांग्रेसमध्यें जी स्वदेशभक्त मंडळी होती ती या दत्ताला भीत होती ह्मणून

ती या मागण्यांकडे काणाडोळा करी. वाशिंग्टनही हेका न धरतां त्यांतले त्यांत होईल तेवढें झटून काम करीत. सारांश सेनापति व कांग्रेसचे सभासद हे दोनही पक्ष स्वदेशप्रेमानें व स्वदेशभक्तीनें तल्लीन झाले असल्यामुळें परस्परांचा विषाद वगैरे न मानतां महासागरांत सोडलेलें स्वतंत्रतेचें तारूं सुरक्षित बंदरांत नेण्याकरितां आपापल्याकडून सारखे झटत होते. सारांश हत्यारबंद व स्वतंत्रतेच्या हुरुपानें भरलेलें राष्ट्र हेंच स्वदेशाचें मुख्य व उत्तम संरक्षण होय हाच खरा सिद्धांत समजला पाहिजे, कारण जेथें लोक फौजेवर अवलंबून राहतात तेथें ते शिथिल होऊन कालेंकरून स्वदेशसंरक्षणाच्या कामास नालायक व नाखुश होतात आणि मग परिणामीं अनर्थ होतो. लष्कराच्या कडक नियमांमुळें मनुष्यें केवळ यंत्रें बनतात आणि तीं राष्ट्राच्या खऱ्या स्वातंत्र्यरक्षणास निरुपयोगी होतात हें नेहमी ध्यानांत ठेविलें पाहिजे. जनरल वाशिंग्टन यांनीं याजबद्दल बरेंच वेळ लिहिलें व त्या कांग्रेसच्या मंडळीनेंही त्यांची खरी परीक्षा करून ता. २७ डिसेंबर सन १७७६ रोजीं सहा महिन्यांपर्यंत ह्मणून बरीच मोठी पायदळ, स्वार व तोफखान्याची फौज वाटेल त्या खर्चानें वाटतील ते सरदार नेमून ठेवण्याचा त्यांला पूर्ण अधिकार दिला. शिवाय त्या देशांतील पाहिजे त्या प्रांतांतून लागतील ते पदार्थ मागवून व लोक खुषीनें न देतील तर त्यांजपासून ते जबरीनें घेऊन त्यांस पैसा द्यावा असाही अधिकार दिला. सारांश, जनरल वाशिंग्टन यांस अपरिमित सत्ता दिली.

वाशिंग्टन यांचा एक मोठा सद्गुण होता कीं, जरी सर्वांनीं टाळटाळ केली व हातपाय गाळले व सर्व प्रकारची मदत कमी पडली तरी ते कधीं निराश होत नसत. त्यांची पक्की

खात्री होती कीं स्वतंत्रतेचें सत्कार्य एकदा सुरू झालें कीं, परिणामीं यशस्वी व्हावयाचेंच. त्यामुळें आपलें कार्य सत्कार्य आहे तेव्हां त्यास सर्व चांगुलपणाचा जो दाता परमेश्वर त्याचें पाठबळ असावयाचेंच. तशांत, अमेरिकन लोकांत पाणीदारपणा व स्वदेशप्रेम यथास्थित आहे तेव्हां आपल्या स्वताच्या उद्योगास खचित यश येईल अशी त्यांची पूर्ण खात्री होती. त्याजमुळें ते स्वतः झटून उद्योग करीत, निरनिराळ्या प्रांतांच्या गवर्नरांस व कांग्रेस सभेस नानातऱ्हेचीं उत्तेजनपर व सूचनापर पत्रें लिहून त्यांजमध्यें हुरूप आणून कामें करून घेत. ते कां जर त्या वेळेस हवालदिल होऊन कामांत कसर करते किंवा कचरते तर सर्व गोंधळ होऊन व्यर्थ झालें असतें. सर्वांची त्यांच्यावर भिस्त होती. सारांश, या संकटाच्या समयीं त्यांजवळ फक्त तीन हजार लोक मात्र राहिले, तोफखाना नाहीं, दारूगोळा नाहीं, निर्वाहाचे पदर्थ नाहींत, चोहोंकडे नद्या थिजून बर्फमय झालेल्या, त्यांजवरून शिपाई लोकांनीं अनवाणी पळत असावयाचें, अशी स्थिति होती. शत्रू तर त्यांच्या त्या पायांतून बर्फावर पडलेल्या रक्तावरून माग लावून त्यांचा पाठलाग करीत. अशा स्थितींत मिलिशियांतील कितीएक शिपायांच्या मुदती संपत आल्या होत्या. इकडे शत्रूच्या फौजेस वारंवार कुमक येत होती व कार्नवालिससारखा हुशार मनुष्य तिजवर सरदार होता. तशांत इंग्रजांचा जय होण्याचा समय आला असें सर्वांस वाटून अमेरिकेंतील कितीएक टोरी लोक तर बंडावा करून त्या पक्षास मिळावयास तयार झाले होते. या संधीस जनरल हौ यांनीं जाहीरनामा प्रगट केला. त्याजमुळें कितीएक त्यांजकडे गेले. आणि त्यांनीं क्षमा संपादन केली. तेव्हां अशा वेळेस जनरल

वाशिंग्टन यांच्या मनाची स्थिति काय झाली असेल याची कल्पना वाचकांनींच आपल्या मनांत करावी. परंतु त्या महान् स्वदेशभक्तानें आपलें काम त्रासून सोडलें नाहीं व हिंमत खचूं दिली नाहीं. या प्रसंगीं ते आपल्या सैन्यासह पळतच होते; समक्ष लढण्याची सोय मुळींच नव्हती. पळतां पळतां लोक अगदीं थकले असतां त्यांच्या हाताखालचा जनरल रीड नांवाचा एक सरदार कंटाळून व त्रासून ह्मणाला "जनरल वाशिंग्टन, आपण आतां किती वेळ पळूं तरी." त्यावर जनरल वाशिंग्टन यांनीं उत्तर दिलें कीं जरूर पडल्यास आपल्या देशांतलि सर्व नद्या ओलांडून पळूं, नंतर डोंगरांवरून पळूं आणि शेवटीं शत्रूशीं लढून मरूं. अशा विलक्षण हिमतीनें व मोठ्या शहाणपणानें व प्रसंगाच्या धोरणानें ते आपल्या लढाईचें काम चालवीत.

याप्रमाणें जिकडे तिकडे निराशा झालेली होती तरी वाशिंग्टन डोळ्यांत तेल घालून शत्रूच्या फौजेच्या व्यवस्थेवर नजर ठेवून साधेल तेव्हां आपला डाव साधीत असत. इंग्रज लोकांची मुख्य फौज कार्नवालिस व हौ यांच्या हाताखालीं ब्रन्सविक व इतर ठिकाणीं अमेरिकन लोकांचा खात्रीनें मोड करूं ह्मणून डेलेवेर नदी थिजण्याची वाट पाहत व खुशींत गाजरें खात बसली होती. वाशिंग्टन यांनीं ही शत्रूची स्थिति मनांत आणून एकाएकीं हल्ला करून डाव साधावयाचा बेत केला. इतक्यांत त्यांच्या मदतीस पेन्सिल्वेनियाचे गवर्नर मिफ्लिन यांजकडून पंधराशें लोकांची कुमक आली. वाशिंग्टन यांनीं दोन तीन गोष्टी मनांत आणून प्रयत्न चालविला. जयाच्या खात्रीनें फौज उल्हासित असली ह्मणजे त्या फौजेचा बंदोबस्त

असावा तितका कडक व व्यवस्थित राहत नाहीं. त्यांत कांहीं ना कांहींतरी कमीपणा राहातो. तसेंच कितीही मोठी व चांगली फौज असली तरी ती एकाएकीं हल्ला झाला ह्मणजे गोंधळून जाऊन घोटाळते. त्यांत नाताळचा दिवस जवळ आला हें मनांत आणून बेत ठरविला. नाताळच्या दिवशीं रात्रीं निघून उजाडल्या बरोबर ट्रेंटन् वगैरे ठिकाणांवर हल्ला करण्याचा बेत झाला. त्यापूर्वीं शत्रूच्या फौजेची व्यवस्था अशी होती कीं ट्रेंटन व त्याच्या आसपास चार हजार फौज होती. शिवाय प्रिन्सटन, ब्रन्सविक, एलिजाबेथ टौन व हाकेनसाक येथें टोळ्या होत्या. सारांश सर्व न्यूजर्शि प्रांत त्यांच्या हातीं होता. इंग्लिश फौजेचा बेत वाशिंग्टनच्या फौजेशीं सामना करून तिचा मोड करावा. या हेतूनें नदीच्या एका कांठीं ती उतरली व दुसऱ्या कांठावर अमेरिकन फौज उतरलेली होती. फक्त चालू करण्याकरितां थंडीनें नदीचें पाणी चांगलें थिजावयाचा अवकाश होता. हें होई तोंपर्यंत अमेरिकन फौज निघून गेली तर, फिलेडेल्फिया शहरावर हल्ला करून तें घ्यावयाचें असा त्यांचा दुसरा विचार होता. वाशिंग्टनचा विचार या फौजेस नदीपलीकडेसच जाऊं द्यावयाचें नाहीं असा होता. असो, वाशिंग्टन यांनीं आपला बेत अगदीं गुप्तपणानें सिद्धीस नेण्याकरितां दोन निराळ्या टोळ्यांस अमुक वेळेस अमुक ठिकाणीं यावें असें सुचाविलें; आणि त्या दिवशीं रात्रीं जरी अतिशय तुफान व काळोख होता, व शत्रूचे शिपाई व जनावरें देखील घरांत आश्रयानें राहिलीं, तरीं मध्यरात्रीं वाशिंग्टन यांनीं आपली सर्व मुख्य फौज घेऊन होड्यांतून पैलतिरास ती उतरून नेऊन दुसऱ्या

दोन टोळ्यांची वाट न पाहतां लागलीच पुढें चाल केली. व उजेडावयाच्या सुमारास ट्रेंटनच्या फौजेवर हल्ला सुरू केला. त्या फौजेच्या पहारेकऱ्यांस बंदुका सोडावयास देखील अवकाश मिळूं दिला नाहीं. अमेरिकन लोक त्या फौजेचे सरदार कर्नल राले होते तेथें गेले. तो सरदार तर पहिल्या सपाट्यास जखम लागून मरणोन्मुख होऊन पडला. त्याच्या फौजेस चोहोंकडून वेढून हतवीर्य करून हस्तगत व्हावयास लाविलें. दांडगाई केली तर सर्व मनुष्यें मारिलीं जातील अशी त्यांची खात्री झाल्यावरून त्यांनीं वाशिंग्टन यांच्या सांगण्याप्रमाणें हत्यारें ठेवून ते हस्तगत झाले. या हल्यांत त्यांचीं सुमारें तीस मनुष्यें मेलीं आणि सरदार व शिपाई मिळून सुमारें एक हजार मनुष्यें हातीं सांपडलीं. तशींच त्यांचीं हत्यारें व सहा तोफा हातीं लागल्या. अमेरिकन लोकांपैकीं दोन मनुष्यें तर थंडींत थिजून मेलीं व हल्यांत दुसरीं दोन पडलीं व जेम्स मनरो नांवाच्या एका सरदारास जखम झाली. हेच गृहस्थ पुढें यूनैटेड स्टेट्सचे प्रेसिडेंट झाले. या हल्याच्या जयानें इंग्रजी फौजेमध्यें अतिशय धाक उत्पन्न होऊन डेलेवरच्या कांठच्या सर्व ठिकाणच्या छावण्यांतून टोळ्या एकदम परतल्या. वाशिंग्टन हे हल्ला करून डेलेवारच्या कांठीं परत गेले; परंतु शत्रूच्या फौजेचा असा गोंधळ झाला हें पाहून त्यांनीं चोवीस तासांत पुनः ट्रेंटनमध्यें प्रवेश केला. यामुळें वाशिंग्टनची लढाईच्या कामाविषयीं मोठी प्रशंसा झाली व कीर्ति वाढली. कारण त्यांनीं अशा संकटाच्या वेळीं अशा शहाणपणाचा व धाडसाचा बेत मनांत आणून त्याची व वेळेची उत्तम योजना करून सर्व व्यवस्था बिनचूक स्वतां केली. आणि मध्यानरात्रीं अंधारांत, पाऊसवारा असून गारा व

3110

बर्फ पडत असतां दिवसा देखील बर्फांतून होड्या नेण्याचें मोठें संकटाचें काम तें अगदीं हालचाल समजूं न देतां गुप्तपणानें सिद्धीस नेलें. इतिहासांत असे हल्याचे प्रकार क्वचितच आढळतात तेंव्हां अर्थातच या हल्यामुळें युद्धकौशल्यांत वाशिंग्टन यांची मोठीच योग्यता वाढली. तसेंच त्याच्या योगानें अमेरिकेमध्यें सर्वत्र आनंद होऊन विशेष उमेद आली व वाशिंग्टन यांचा जयजयकार झाला. लोकांच्या मनांवर या कृत्याविषयीं चांगला ग्रह व्हावा एतदर्थ त्यांनीं फिलेडेल्फिया शहरांत कैदी, तोफा, निशाणें यांसह मोठ्या थाटानें प्रवेश केला..

पुढें हा झालेला जय पचतो कसा याचा मोठा विचार पडला. जनरल हौ यांनीं आपली सर्व फौज प्रिन्सटन येथें एके ठिकाणीं जमविली आणि अमेरिकन लोकांचा एकंदर मोड करून टाकण्याच्या इराद्यानें तयारी चालविली. त्या फौजेचा पुढचा भाग तर ट्रेंटनपर्यंत येऊन पोंचला मध्यें काय ती असमपिक नांवाची लहानशी नदी मात्र होती. ते पुढें यावयास लागले तों उताराच्या सर्व ठिकाणांवर अमेरिकन लोकांचा चांगला बंदोबस्त होता. परंतु ते लोक भुकेले व थकलेले होते तेंव्हां फौजेनें तेथेंच तळ दिला. या प्रसंगाची एक अशी चमत्कारिक गोष्ट सांगतात कीं, तळ देण्याच्या वेळीं सर विलियम अर्स्किन यांनीं लॉर्ड कार्नवालिस यांस ताबडतोब आतांच वाशिंग्टन यांजवर हल्ला करावा असें आग्रहानें सुचविलें, परंतु ते बोलले कीं, आपले लोक भुकेले व थकले आहेत, आणि वाशिंग्टन वगैरे मंडळी आतां माझ्या हातांत आहे, रात्रींतून त्यांच्यानें कोठें जाववत नाहीं कारण डेलेवरमधील बर्फावरून त्यांस चालत जातां यावयाचें नाहीं आणि तींत होड्याही

घालतां यावयाच्या नाहींत. उद्यां पहाटेस मी त्यांजवर हल्ला करून बंडाचा निर्मूळ करून टाकीन. सर विलियम बोलले कीं, महाराज, वाशिंग्टन उद्यां पहाटेस तेथें सांपडावयाचा नाहीं. आणि खरोखरच तसें झालें. वाशिंग्टन यांनीं ब्रन्सविकवर हल्ला करून तेथील दारूगोळ्याचा व सामानाचा नाश करून तेथील खजिन्यांत सात लक्ष रुपये होते ते लुटावयाचा बेत केला होता; परंतु फौज फार थकलेली होती, दोन दिवस तीस झोप किंवा विश्रांति मिळाली नव्हती. शिवाय शत्रूचा जमाव मोठा जमला व सामन्याचा समय येईल असें वाटूं लागलें तेव्हां त्यांनीं तो बेत फिरविला. आणि आपल्या दुसऱ्या टोळ्यांस ट्रेंटन येथें बोलावून रात्रीं शेकोट्या पेटवून समोर शिकांस खोरे कुदळीनें कांहीं आडोशा करितां भिंती घालण्याचा आव दाखवून सर्व फौज बरोबर घेऊन आडवाटेनें जाऊन सकाळीं प्रिन्सटन येथील फौजेवर एकाएकीं हल्ला केला. तेथील फौजही ट्रेंटनकडे जाण्याच्या तयारींतच होती. परंतु कार्नवालिस सकाळीं उठून पहातात तों समोरच्या तळावर सर्व सामसूम दिसली. ते मोठ्या अचंब्यांत पडून वाशिंग्टन कोठें गेला असावा ह्मणून विचारूं लागले. तों इतक्यांत प्रिन्सटन कडून तोफांचे आवाज ऐकूं आले. आर्स्किन त्यावेळेस पुनः बोलले कीं, पुनः कर्नल राल्लेवर कहर केल्याप्रमाणें दुसरा अनर्थ करावयास तो तिकडे गेला असावा. कार्नवालिस वगैरे मंडळी अगदीं थक्क होऊन गेलीं आणि वाशिंग्टन यांस शाबासकी देऊन असा मनुष्य राजाच्या पदरीं असावयास पाहिजे होता असें बोलले. परंतु

राजाचा गुलाम करण्याच्या कामगिरीपेक्षां उत्तम स्वातंत्र्य स्थापनाचें महत्पवित्र कार्य वाशिंग्टन करीत होते, हें त्यांच्या लक्षांत नव्हतें. इकडे लढाई मोठ्या निकराची झाली. अमेरिकेची फौज दोन तीन वेळां मागें हटली तरी वाशिंग्टन यांनीं त्यांस पुनः उत्तेजन देऊन पुढें नेलें. शेवटीं वाशिंग्टन ऐन संकटाच्या वेळीं आपल्या हातांत निशाण घेऊन मोठ्या झपाट्यानें पु निघाले आणि दोनही फौजांच्या मध्यावर जाऊन गर्दींत मिसळले. अशा संधीस दोहोंकडूनही गोळी लागून मरण्याचा समय होता, एका फौजेंत देवा, राजास तार, दुसऱ्या फौजेंत देवा वाशिंग्टनास तार, असा सारखा शद्ब होत असतां परमेश्वरानें खरोखरच वाशिंग्टन यांस वांचविलें व तारलें. कारण थोड्या वेळांतच त्या निकराच्या लढाईचा शेवट होऊन शत्रूच्या फौजेची दाणादाण होऊन ते चोहोंकडे पळत सुटे इंग्रजांकडील १२० मनुष्यें मेलीं आणि तीनशें कैद झालीं. अमेरिकन लोकांचीं ६३ मनुष्यें मेलीं. त्यांत जनरल मर्सर हा एक मोठा सरदार मेला. शिवाय सात आठ दुसरे सरदार मेले, सारांश अगदीं निराशेच्या वेळीं दहा दिवसांत दोन मोठीं कृत्यें झालीं. त्याच्या योगानें शत्रूंनीं न्यूजर्सी प्रांतांतून आपला सरासरी पायच काढला आणि सर्व मुलूख वाशिंग्टन यांच्या ताब्यांत राहूं देऊन ते हिंवाळ्याकरितां ब्रन्सविक येथें छावणी करून तळ देऊन राहिले. वाशिंग्टन यांचीही फौज हिंवाळ्यानिमित्त मारिसटौन येथें तळ देऊन राहिली. त्यांनीं, कैद करून आणिलेल्या लोकांची त्यांच्या सामर्थ्याप्रमाणें चांगल्याप्रकारें ब्रस्तवारी ठेवून त्यांचा सांभाळ केला. यांत कीरच हेशियन् लोक सांपडले होते. ह्या प्रसंगीं अमेरिकन लोकांच्या

उदारपणाविषयीं त्यांच्या मनाची खात्री झाली आणि पुढें कितीएक हेशियन लोक इंग्रजांची चाकरी सोडून देऊन निघून गेले व कितीएक अमेरिकेंतच स्थाईक रहवाशी होऊन आनंदानें राहिले. वाशिंग्टन यांच्या या उत्तम वर्तणुकीनें व शहाणपणानें शत्रूचा पराभव होऊन दोनहींकडून त्यांस जय झाल्यासारखें झालें. एक शौर्याचा जय व दुसरा चांगुलपणाचा जय. याप्रमाणें सन १७७६ सालची अखेरी आनंददायक झाली.

हिंवाळ्याकरितां तळ देऊन दोहींकडच्या फौजा स्वस्थ राहिल्या; तथापि वाशिंग्टन यांस स्वस्थता नव्हती. पुढच्या स्वारीची तयारी व योजना करावयाची होती. कांग्रेस व निरनिराळ्या प्रांतांचे गवर्नर यांस लिहून मनुष्यें व सामान यांची तयारी करावयाची होती. ती त्यांनीं करण्याचा उद्योग चालविला. तसेंच त्यांस शिपाई लोकांच्या मनांत लढण्याविषयीं उत्साह उत्पन्न करावयाचा होता. कांग्रेसनें सहा महिन्यांपुर्ती वाशिंग्टन यांस सर्व गवर्नरास पत्रें पाठवून मदत करविली होती. त्याची व्यवस्था लावावयाची होतीच. दैवयोगानें सेनापति व कांग्रेसची मंडळी यांची अति उत्तम प्रकारची सांगड जमली होती याजमुळें तें स्वातंत्र्यसंपादनाचें बिकट कार्य सिद्धीस गेलें. इंग्रजांच्या सेनापतींनीं पुढच्या वर्षाच्या स्वारीचा बेत मोठ्या शहाणपणानें चालू केला होता. जनरल हौ यांनीं मोठी फौज घेऊन डेलेवर नदींतून जाऊन फिलेडेल्फिया शहर घ्यावें हा एक बेत केला होता, व पेन्सिल्वेनिया प्रांतावर हल्ला करण्याचा दुसरा बेत होता. दोनही फौजांचे तळ तीस मैलांच्या अंतरावर होते. तेव्हां कोणासही विशेष स्वस्थता नव्हती. जनरल हौ यांनीं वीस हजार लोक घेऊन डेलेवर नदींतून जाण्याचा

पुष्कळ प्रयत्न केला. परंतु वाशिंग्टन यांच्या टारिटन येथील विशेष बंदोबस्तामुळें तो सिद्धीस गेला नाहीं. वाशिंग्टन इकडें गुंतले असतां बरगाईन नांवाचा इंग्रजांचा सरदार दहा हजार लोक घेऊन कानडा प्रांताकडून सर हेनरी क्लिन्टनच्या मदतीस न्यूयार्ककडे गेला. जनरल हौ यांनीं अखेरीस आपला पहिला बेत बदलून ते सेप्टेंबरच्या सुमारास चेसेपीकबेच्या जवळ उतरले आणि पुढें ब्रांडिवैन नांवाच्या नदीकडे गेले. त्यांच्या व वाशिंग्टनच्या फौजांच्या गांठी पडून लढाई झाली; परंतु या लढाईंत अमेरिकन फौजेचा मोड झाला. या लढाईंत फ्रान्स देशाहून लाफेयेट नांवाचे एक थोर पुरुष या स्वतंत्रतेच्या सल्लयास मदत करण्याच्या इरादानें उदारपणानें आपण होऊन आले होते ते जखमी झाले. हे स्वतंत्रतेचे परम भक्त अमेरिकन युद्धाचा अखेर निकाल होई तों मदतीस होते. त्यांच्या योगानें अमेरिकेस फ्रान्स देशाचें मोठें सहाय्य मिळालें. स्वतां हे कितीएक वर्षें आनंदानें वाशिंग्टन यांजबरोबर इंग्रजांशीं लढत होते. असो. इंग्रजांच्या फौजेनें फिलेडेल्फिया शहर घेतलें परंतु वाशिंग्टन यांनीं त्यांवर वारंवार लहान मोठे हल्ले करून त्यांस चैन पडूं दिलें नाहीं. इतक्यांत त्यांस कुमक आल्यामुळें त्यांजवळ सुमारें वीस हजार लोक जमले. तेव्हां ते त्या शहराच्या जवळ जर्मन टौन नांवाचें एक गांव होतें तेथें इंग्रजांची कांहीं फौज होती तिजवर ता. ४ आक्टोबर रोजीं रात्रीं हल्ला करण्याकरितां गेले. त्यांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहाटेस हल्ला केला आणि शत्रूचा पराभव होण्याचा समय होता; परंतु अमेरिकन लोकांच्या सर्व टोळ्या वेळेवर एकदम पोंचल्या नाहींत याजमुळें व

दुसऱ्या कांहीं अडचणी एकाएकीं उत्पन्न झाल्यामुळें उलट परिणाम झाला, व जय न होतां मोड होऊन त्यांस परतावें लागलें. सुमारें वीस मैल मागें हटून ते थांबले. पुनः कुमक आली तेव्हां त्यांनीं फिलेडेल्फियाजवळ जाऊन तळ दिला.

जनरल हौ आपल्या फौजेनिशीं चेसेपीकचे अखाताजवळ गलबतांतून उतरून जमिनीवरील फौजेच्या मदतीस गेले. मडफोर्ट व रेडब्यांक येथें सामान्य लढाया झाल्या व फिलेडेल्फियावरचा हल्ला व्यर्थ झाला. शेवटच्या हल्ल्यांत कौंट डानाप नांवाचा सरदार जखमी होऊन अमेरिकन लोकांच्या हातीं सांपडला. परंतु अमेरिकन लोकांनीं त्याची उत्तम प्रकारची शुश्रुषा ठेविली; व वाशिंग्टन यांजकडून प्रत्यक्ष समाचाराचें विचारणें आलें. ह्या त्यांच्या चांगुलपणामुळें त्या सरदाराच्या डोळ्यांस पाणी आलें आणि त्यानें त्या निरोप आणणारास सांगितलें कीं तुह्मी त्यांस सांगा कीं, मी आतां वांचेन असें नाहीं; परंतु जर कदाचित वांचलों तर पहिल्यानें तुह्मांकडे स्वतः येऊन तुमच्या उपकाराबद्दल आभार मानीन. तो बिचारा मेला, आणि अशा चांगल्या लोकांविरुद्ध लढण्याचें काम पतकरल्याबद्दल त्यास फार वाईट वाटलें. या प्रकारें लढाईचें काम साधारणपणें चाललें होतें. वाशिंग्टन यांजवळ फौज व लढाईचें सामान या दोहींची कमताई नेहमीं असल्यामुळें ते आपल्या फौजेचा बचाव करून जेवढें होईल तेवढें करीत याच्या योगानें शत्रूच्या फौजेचा विशेष उत्कर्ष न होतां लढाई मात्र लांबणीवर पडत गेली.

वाशिंग्टन होते तिकडे याप्रमाणें काम चालू असतां उत्तर व दक्षिण प्रदेशीं लढाईचें काम जारीनें चाललें होतें.

कानडा प्रांतांतून बरगाईन नांवाचे सरदार बरोबर फौज घेऊन शिवाय रानटी इंडियन लोकांचीं मदत मिळून न्यूयार्क प्रांतांत गेले. इंग्रज व इंडियन या लोकांचीं क्रूर व अघोर कर्मे करण्यामध्यें जशी काय चढाओढच लागून गेली होती. त्यामुळें इंग्रज लोकांस हा निरंतरचा कलंक लागला. कदाचित अमेरिकन लोक चांगुलपणाच्या योगानें हट्ट सोडून इंग्रज लोकांच्या क्षमेच्या बोलण्यास कबूल झाले असते; परंतु ईश्वरीलीला अगाध आहे इंग्लिश लोकांची शक्तीची, अन्यायाची व क्रूरकर्मं करण्याचीच बुद्धि वाढत गेल्यामुळें अमेरिकन लोकांचीं मनें विटून अगदीं स्वतंत्र होण्यास प्रवृत्त झालीं. न्यूयार्कमध्यें अनर्थ झाल्यामुळें व मौंट व न्यू हांपशायर या डोंगरांतील लोक, बंदुकी घेऊन आपल्या देशाच्या व देशबांधवांच्या साह्यार्थ उठले. या लोकांस जय मिळाल्याच्या कारणानें त्यांस ग्रीन मौंटन "बॉयज" असें नांव मिळालें होतें. बेनिंगटनच्या उंचवट्यावर यांच्या योगानें हेशियन लोकांचा पुनः मोड झाला फौजेस जनावरें व घोडे यांचा पुरवठा करण्याच्या व अमेरिकन लोकांच्या सामानाचीं कोठारें लुटण्याच्या व नाहींशीं करण्याच्या कामावर इंग्रजांकडील ब्रेमेन व बाम नांवांच्या दोन अनुभविक सरदारांची नेमणुक झाली होती. जनावरें व घोडे मिळविण्याचा उद्योग व्यर्थ होऊन कर्नल बाम हे एक चांगलेंसें ठिकाण धरून आपले जोडीदार ब्रेमन यांची वाट पाहात राहिले. इतक्यांत ग्रीन मौंटन बॉयज या लोकांनीं अशा सपाट्यानें त्यांजवर हल्ला केला कीं, पहिल्या सपाट्याबरोबर कानेडियन लोक पळूं लागले. कर्नल बाम जखमी झाले आणि एकं

बहुतेक लोक मारले गेले व बाकीचे कैद झाले. एक मनुष्य देखील त्या सपाट्यांतून बचावला नाहीं. या प्रसंगीं सहाशें जर्मन हेशियन लोक मेले. थोड्या वेळानें कर्नल ब्रेमन यांस आपल्या सोबत्यांची काय वाट लागली हें न कळल्यामुळें ते तेथें आले. तों अमेरिकन ग्रीन मौंटन बायज लोकांची गांठ पडली. या विलक्षण नेम मारणाऱ्या अमेरिकन लोकांचा थोडासा बिनचूक भडिमार सोसून ते लोक लागलेच जंगलांत पळून गेले. अमेरिकन लोकांनीं हळुहळु शत्रूंचे बहुतेक लोक धरले.

या प्रमाणें कर्नल बाम व ब्रेमन यांच्या टोळ्यांचा निकाल झाला. ह्याच सुमारास कर्नल सेंट लीजर यांच्या ताब्यांतील टोळी-चाही घोटाळा झाला. या टोळीमध्यें इंग्रज व इंडियन लोक होते ते अमेरिकन लोकांशीं कडक सामना झाल्यामुळें व कांहीं खोटी गप्प ऐकिल्यामुळें घाबरले आणि त्यांनीं मोहाक नदीच्या कांठावरील स्टानविक्स किल्यास वेढा घातला होता तो सोडून दिला. इंडियन लोकही मारहाणीचा व लुटीचा प्रसंग नीटसा येईना हें पाहून कंटाळले आणि इंग्रज लोकांस सोडून ते आपल्या जंगलांत निघून गेले. इकडे अमेरिकन लोकांच्या तर्फेचे सरदार जनरल गेट्स हे मुख्य होते. त्यांस रोज चांगल्या शूर लोकांची भरती येत गेली. त्यांच्या मदतीस जनरल आर्नाल्ड व मार्गन हे सरदार होते.

इंग्रज लोकांची फौज बर्गाइन सरदाराबरोबर उत्तरेकडून व सर हेनरी क्लिंटन यांची फौज दक्षिणेकडून येऊन दोघांचा मिलाफ आलबानीं येथें व्हावयाचा होता; परंतु तें सर्व फसलें. बर्गाइन यांच्या अमेरिकन लोकांशीं वरचेवर बऱ्याच निक-

राच्या लढाया झाल्या व अमेरिकन लोकांपैकीं आ
मार्गन, डीयरबार्न, ब्रूक्स वगैरे सरदारांनीं मोठी
मिळविली आणि शेवटीं ता० १७ आक्टोबर सन १७७
रोजीं साराटोगा सरोवराच्या कांठीं, हडसन नदीच्या
एक सुंदर मोठें मैदान आहे तेथें सकाळीं जनरल
यांची फौज शरण येऊन हत्यारें ठेऊन हस्तगत झाली. जनरल बर्गाइन सुद्धां सुमारें पांच हजार लोक, मोठा तोफखाना, सात हजार हत्यारें व सर्व लष्करी सामानासुद्धां अमेरिकन जनरल गेट्स यांच्या स्वाधीन झाले. हा मोठ्या महत्वाचा जय अमेरिकन लोकांस मिळाला. जनरल वाशिंग्टन यांचा या जयाशीं प्रत्यक्ष संबंध नव्हता; परंतु दुसऱ्या दिवशीं त्यांस पत्र पोंचल्याबरोबर देशाच्या उत्कर्षासंबंधानें त्यांना जो आनंद झाला त्यास पारावार नाहींसा झाला; आणि त्या आनंदाच्या भरांत त्यांनीं परमेश्वराचे प्रेमपूर्वक आभार मानिले. कांग्रेस व देशांतील सर्व लोक यांस अत्यंत हर्ष होऊन मोठी हिंमत आली व आतां स्वदेशास स्वातंत्र्यप्राप्ति खास होईल अशी आशा उत्पन्न झाली. सारांश अमेरिकेभर सर्वत्र आनंदच आनंद होऊन गेला.

याप्रमाणें अमेरिकेंत आनंद होत असतां त्याच समयास एक अत्यंत दुष्ट बेताची वाटाघाट चालली होती. कांहीं लष्करी सरदारांच्या मनांत जनरल वाशिंग्टन यांचा पाडाव होऊन फौजेचे सेनाधिपत्य जनरल गेट्स यांस प्राप्त व्हावें असें होतें. या हेतूनें कूट जमून खटपटी चालू झाल्या होत्या. त्यास मुख्यत्वें जनरल कानवे हे अमेरिकेच्या फौजेंत आयरिश सरदार होते ते मुख्य कारण व उत्तेजक होते. जन

बहुते
देखील प यांचें या कामांत किती आंग होतें हें चांगलेंसें कळलें
जर्मन ; तथापि त्या कुटांत त्यांचें मत होतें असें दिसतें. शिवाय
यांस आप गार बराच लांबवर पसरून कांग्रेसमध्यें देखील या
ते तेथें अ कांहीं सभासद अनुकूल झाले होते असें ह्मणतात.
जर्मनटाउन येथें जी लढाई झाली तींत वाशिंग्टन यांस यश
आलें नाहीं हें एक त्या कूटवाल्यांस विशेष उत्तेजन येण्यास
कारण झालें. पुढें जनरल गेट्स यांस जनरल बर्गाईन आपल्या
फौजेसुद्धां शरण आले त्याजमुळें जनरल गेट्स यांची प्रशंसा
होण्यास विशेष कारण झालें. हा लटपटीचा प्रकार जनरल
वाशिंग्टन यांस कळला होता व ते आपल्या ठिकाणीं सावध
होते. सांप्रदायाप्रमाणें जनरल गेट्स यांनीं आपल्या
जयाची हकीकत सेनापति जनरल वाशिंग्टन
यांस कळवावयाची. तसें न करतां त्यांनीं ती कांग्रेसकडे
परस्पर पत्र लिहून कळविली. कांहीं दिवसांनीं वाशिंग्टन
यांनीं जनरल गेट्स यांजकडून पत्र न आल्यामुळें आपल्यास
तिकडील फौजेची खात्रीलायक हकीकत कळली नाहीं, तेव्हां
आपल्यास तिकडे कळली असल्यास ती कळवावी ह्मणून
कांग्रेसला संदिग्धपणें सुचविलें. कांग्रेस यांनीं जनरल गेट्स-
कडील फौज मागवून व्यवस्था करावी असें वाशिंग्टन यांस
लिहिलें आणि जनरल गेट्स यांस वाशिंग्टन यांजकडे फौज
पाठविण्यास लिहिलें. परंतु जनरल गेट्स यांनीं तसें केलें
नाहीं. वाशिंग्टन यांनीं विशेष जलदी करण्याकरितां हामि-
ल्टन नांवाचा सरदार यांजकडे पाठविला. नंतर जनरल
गेट्स यांच्या मनांत फौज पाठविण्याचें दिसत नाहीं असें त्यांचें
पत्र आलें. त्याजवर वाशिंग्टन यांनीं सर्व बेत उघडकीस

आणण्याचा विचार केला. प्रथम त्यांनीं जनरल गेट्स यांस आनंदप्रदर्शनाचें पत्र ता. ३० आक्टोबर रोजीं पाठविलें त्यांत आपल्यास तुह्मांकडून प्रत्यक्ष वर्तमान कळलें नाहीं याजबद्दल दिलगिरी दाखविली. नंतर ता. ९ नोवेंबर रोजीं जनरल वाशिंग्टन यांनीं ब्रिगेडियर जनरल कानवे यांस इतकें सूचक पत्र पाठविलें कीं, काल रात्रीं मला एक पत्र आलें आहे त्यांत एक कलम असें आहे कीं, जनरल कानवे यांजकडून जनरल गेट्स यांस पत्र गेलें त्यांत परमेश्वराच्या मनांत तुमचा देश वांचवावा असा निश्चय होता, नाहीं तर मिळमिळीत सरदार आणि मूर्ख कारभारी यांनीं त्यांचा नाश केला असता असें लिहिलें आहे. या सूचक पत्रावरून बातमी फुटली असें वाटून सर्व घाबरले आणि सर्व खटपट बंद पडली. फौजेंतील सरदार व कांग्रेस मधील सभासद सर्व जागच्या जागीं थिजले. जनरल गेट्स यांनीं बहुतेक गोष्टी जनरल वाशिंग्टन यांस उघडपणें सांगून समजूत घातली त्याजमुळें पुढें त्यांचा कांहींअंशीं स्नेहसंबंध पूर्ववत चालू राहिला. ईश्वरकृपेनें त्या सत्कार्यानिमित्त व देशाच्या सुदैवानें सर्व बखेडा मोडला. एरवीं जनरल वाशिंग्टन यांच्या ताब्यांतील फौज, देशांतील लोकसमाज व जनरल गेट्स यांच्या हाताखालची फौज देखील या फेरफारास कबूल नव्हती असें समजतें. वाशिंग्टन यांच्या सद्वर्तनामुळें त्यांवर बसलेला लोकांचा पूर्ण भरंवसा सदरील विघ्न टळण्यास मुख्य कारण झाला. सारांश शुद्ध व नीतिमान आचरणाचा केवढा उपयोग होतो हें यावरून उत्तम प्रकारें दिसून येतें. हाताखालचे सरदार फि रले, कांग्रेस मधील कांहीं सभासद वळले, फौजेंत व देश

.तील लोकांत खटपट चालू झाली, वाशिंग्टनचा पराजय झाला, व गेटस्‌ला मोठा जय मिळाला इतक्या गोष्टी झाल्या तथापि लोकांचा भरंवसा ढळेना, हें सद्वर्त्तनाचें व खऱ्या स्वदेशप्रीतीच्या खात्रीचें केवढें चमत्कारिक फल आहे याचा वाचकांनीं नीट व अंतःकरणपूर्वक विचार करावा.

जनरल कानवे यांनीं थोड्याच दिवसांनीं राजीनामा दिला आणि ते निघून गेले; तथापि पुढें कांहीं महिन्यांनीं त्यांची प्रकृति जखम लागल्यानें बिघडून मरणोन्मुख असतां जनरल वाशिंग्टन यांस त्यांनीं चार ओळींचें पत्र पाठविलें. त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं, आतां मी थोडीं मिनिटें जगणार तर मला आपल्याविषयीं काय वाटतें तें कळवितों. आजपर्यंत मी जें आपल्या विरुद्ध बोललों, लिहिलें अथवा केलें याजबद्दल मला पश्चात्ताप होऊन खरोखर अत्यंत दुःख वाटतें. आपण माझ्या मतें खरोखरच थोर सत्पुरुष आहां; आपण आपल्या सद्गुणांनीं या देशाच्या स्वातंत्र्याच्या प्राप्त्यर्थ उद्योग केला त्यामुळें लोकांचें प्रेम, सन्मान व पूज्यबुद्धि हीं आपणास प्राप्त झालीं आहेत त्यांस आपण पात्र असून त्यांचा आपण पुष्कळ दिवस पर्यंत उपभोग घ्यावा असें मी इच्छितों. याप्रकारें त्या कुटाचा निकाल झाला.

पुढें लवकरच हिंवाळ्यानिमित्त उभयपक्षांच्या फौजा तळ देऊन राहिल्या. इंग्रज लोकांची फौज फिलेडेल्फिया येथें राहिली व त्यांच्याजवळ सुमारें तीस मैलांच्या अंतरावर वाल्लीफार्ज येथें अमेरिकन फौज तळ देऊन राहिली. या प्रसंगीं अमेरिकन लोकांच्या

फौजेची अत्यंत वाईट स्थिति होती. एकंदर सुमारें दहा अकरा हजार फौज होती. यांजपैकीं सुमारें तीन हजार लोक आजारी ह्मणून दवाखान्यामध्यें पडले होते. त्यांजपैकीं बहुतेक लोक, पायांत जोडे नव्हते व अंगांत घालण्यास बंडया नव्हत्या, किंवा पांघरण्यास घोंगडया नव्हत्या, ह्मणून आजारी होते. शिवाय अन्नाची सामुग्री देखील चांगली व पुरती नव्हती. याजबद्दल वाशिंग्टन यांनीं चांगलीं कडक व उघडपणें अडचणी कळवून कांग्रेसला पत्रें लिहिलीं. आणि लष्करी खात्याचा बहुतेक अंशीं हा दोष आहे असें दाखविलें. त्यावेळेस कांग्रेसनें बहुतेक कामांकरितां कमिट्या नेमिल्या होत्या त्याजमुळें कोणतेंही काम जेव्हांचें तेव्हां होईनासें झालें होतें. वेळप्रसंगाकरितां फौजेमध्यें नेहमींपेक्षां दोन दिवसांची अधिक अन्नसामुग्री असावी असा ठराव होता; परंतु तो ठराव पोकळ झाल्यामुळें फौजेस प्रसंगानुसार हालचाल करण्याची देखील पंचाईत पडूं लागली. शिवाय, अमेरिकन सरकारानें कागदांच्या नोटा काढल्या होत्या त्यांचा भावही अतिशय उतरत गेला. त्यामुळें लोकांस अत्यंत संकट प्राप्त झालें. अशा स्थितींत कांग्रेसच्या ठरावाप्रमाणें फौजेच्या तळाच्या आसपास वीस मैलपर्यंत लोकांपासून अन्न सामुग्री वगैरे खुशीनें किंवा जबरदस्तीनें घ्यावी ह्मणून मार्ग होता तोही कांहीं वेळ करून पाहिला; लोकही पुढें सामान लपवून ठेवून लटपट करीत व नाहीं ह्मणून सांगत. सारांश, फौजेचे त्या प्रसंगीं अतिशय हाल झाले व लोक अर्थांत मुदत भरण्याची वाट पाहत राहूं लागले इतकें झालें तरी फौजेंतील लोक किंवा इतर लोक यांनीं इंग्रज सर

काराच्या माफीची लालूच कबूल करण्याची इच्छा कधींही दाखविली नाहीं. ही मोठी महत्वाची, चमत्काराची आणि ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. याप्रमाणें हिंवाळा संपला व पुढच्या वर्षाच्या उद्योगाची तयारी करण्याचा प्रसंग व समय प्राप्त झाला.

मागच्या वर्षांत जनरल बर्गाइन यांचा पराजय होऊन ते अमेरिकन लोकांच्या हस्तगत झाले ही बातमी इंग्लंडांत समजल्याबरोबर हाहाःकार व संताप उत्पन्न झाला. आणि फ्रान्स देशांत अत्यंत आनंद व जयजयकार झाला, लार्ड चाथम यांनीं हें लढाईचें दुष्ट कर्म बंद करा ह्मणून पार्लमेंटमध्यें पुनः विनंति केली; परंतु तिजकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. नवीन तयारीची झपाट्यानें सुरुवात झाली. व याजबरोबर अमेरिकन लोकांशीं तह व्हावा अशाविषयीं कांहीं विचार चालू झाला.. त्यांत पूर्ण स्वातंत्र्य तर नाहींच, परंतु साधारण तोंडावरून हात फिरविण्याचा बेत होऊन त्याप्रमाणें मसुदा वगैरे लेख ताबडतोब अमेरिकेस रवाना झाले. तेथें तें ह्मणणें आल्यावर त्याचा विचार करण्याकरितां कांग्रेसकडून कमिटी नेमिली जाऊन रिपोर्ट झाला. त्यांत इंग्लंडच्या ह्मणण्याची व्यर्थता उत्तम रीतीनें व उघड रीतीनें दाखविली गेली. मग ते सर्व कागदपत्र वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होऊन लोकांस कळविले गेले. ही वाटाघाट चालली होती तोंच फ्रान्सच्या सरकारानें अमेरिकन लोकांचें स्वातंत्र्य मान्य करून त्यांजबरोबर दोस्तीचा तह केला. त्याची नक्कल मि० डीन नांवाचे गृहस्थ अमेरिकेस घेऊन आले. तेव्हां सर्व अमेरिकेंत आनंदच आनंद झाला व जनरल वाशिंग्टन यांनीं या आनंदप्रदर्शनार्थ पर-

मेश्वराचे आभार मानण्याकरितां तारीख ७ मे सन १७७८ रोज बुधवार नेमिला आणि त्या दिवशीं सर्व फौजेंत मोठ्या थाटाचे समारंभ झाले. यावेळेस जनरल वाशिंग्टन यांचा तळ वाल्लीफार्ज येथेंच होता.

याप्रमाणें या एकंदर स्वातंत्र्याच्या लढाईचें स्वरूप बदललें याच सुमारास जनरल हौ हे इंग्लंडास परत गेले व त्यांच्या जागीं सर हेनरी क्लिंटन यांची नेमणूक झाली. त्यांनीं फ्रान्स व अमेरिका यांचें मित्रत्व झाल्यामुळें लढाईच्या व्यवस्थेंत फेरफार केला. फिलेडेल्फिया सोडून देऊन न्यूयार्क येथें फौज जमविण्याचा त्यांनीं विचार केला. तो हेतु सिद्धीस नेण्याकरितां ते न्यूजर्सी प्रांतांतून फौज घेऊन गेले. मिडलटन येथें फौज नेऊन नंतर पाण्यांतून न्यूयार्क येथें जाण्याचा विचार होता; परंतु वाशिंग्टन यांनीं शत्रूच्या फौजेस उगाच मार्गांतून स्वस्थतेनें जाऊं द्यावयाचें नाहीं ह्या आपल्या सांप्रदायाप्रमाणें त्या सैन्यास वाटेंत कोठेंतरी गांठून हल्ला करण्याचा बेत केला. परंतु दिवस अतिशय कडक उन्हाळ्याचे होते व वाटेंत अडचणीचे रस्ते व झाडी होती त्यामुळें फारसा उपयोग व्हावयाचा नाहीं ह्मणून त्यांच्या हाताखालच्या सरदारांचें हल्ला करण्यास अनुमत नव्हतें. तथापि जनरल वाशिंग्टन यांचें मन स्वस्थ राहीना. त्यांनीं बेत मनांत आणून त्याप्रमाणें फौजेच्या टोळ्या करून निरनिराळ्या सरदारांची निरनिराळ्या ठिकाणीं कामगिरीवर योजना केली आणि आपण स्वतः फौज घेऊन संरक्षणाच्या व हल्ला करण्याच्या तयारीनें पुढें चालले. पुढें इंग्रजांची फौज मानमौथ गांवाजवळ आली तेथें त्यांनीं हल्ला करण्याचा निश्चय केला. १७७८च्या जूनच

२८ तारखेस सकाळीं मनमौथ येथून इंग्रजांची फौज निघाली तों अमेरिकन फौजेच्या टोळ्यांनीं गोळ्या टाकण्यास सुरुवात केली. पुढें जाऊं लागले कीं अमेरिकन फौज जोराचा मार चालवी. परंतु पाठीमागें विशेष भीति होती त्याजमुळें त्यांनीं चांगलीं मनुष्यें मागच्या बाजूस ठेविलीं होतीं. त्या मागच्या बाजूस जनरल ली यांस हल्ला करण्यास सांगितलें होतें; परंतु त्यांनीं आपल्या कामांत कसर केली याजमुळें त्यांच्या ताब्यांतील फौज लढाईच्या आरंभींच माघार घेऊन पळावयास लागली. इतक्यांत वाशिंग्टन यांनीं गोळ्यांचा भडिमार ऐकून लढाईची सुरुवात होऊन जनरल ली हल्ला करीत आहेत असें समजून त्यांच्या मदतीस ह्मणून तावडतोब ते पुढें आले आणि पाहतात तों आपली फौज पळत सुटली आहे असें त्यांस दिसून आलें. तेव्हां त्यांनीं जनरल ली यांस हें काय ह्मणून रागानें विचारलें त्यावेळेस त्यांनीं नीट जबाब न देतां उलट व अपमानकारक उर्मटपणाचा जबाब दिला. त्याजमुळें वाशिंग्टन यांस अत्यंत राग आला आणि त्यांनीं आवेशानें पुढें सरसावून शिपाई लोकांस हाका मारून थांबवून धरून आणि उत्तेजन देऊन सपाट्यानें जिवाची पर्वा न बाळगतां शत्रूवर हल्ला केला. शेवटीं इंग्रजी फौजेचा अतिशय कोंडमार झाल्यामुळें व मनुष्यें मरूं लागल्यामुळें पुढें जाण्याचा विचार सोडून देऊन त्यांनीं तळाच्या जागीं सुरक्षित ठिकाणीं मुक्काम केला. त्या वेळेस दुपारची कडक उन्हाची वेळ झाल्यामुळें अमेरिकन लोकही थकून गेले हें पाहून वाशिंग्टन यांनीं त्यांच्या आसपासच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुनः हल्ला करण्याच्या इराद्यानें त-

यारी ठेविली होती. परंतु फौजेचा एकंदर नाश होईल या भीतीनें सर हेनरी क्लिंटन हे, मध्यरात्रीनंतर, कांहीं फार जखमी झालेले सरदार व लोक टाकून बाकीच्या फौजेसह अगदीं गुप्तपणानें तेथून निघून गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं अमेरिकन लोक पाहातात तों इंग्रजी फौज बराच वेळ पूर्वी निघून गेली असें कळलें. मग पुढें जाण्यांत विशेष उपयोग व्हावयाचा नाहीं हें पाहून पाठलाग केला नाहीं. या प्रसंगीं इंग्रजांचे सुमारें तीनशें लोक, मेले व जखमी झाले. शिवाय कांहीं यांच्या हातीं सांपडले.

आतां लढाईच्या ऐन प्रसंगीं जनरल ली यांनीं वाशिंग्टन यांचा उपमर्द केला त्याजबद्दल फौजेंतील लोकांस मोठा राग आला होता; तथापि वाशिंग्टन यांनीं फारसें मनावर न घेतां, ते जनरल ली यांजकडून माफी मागण्याचें पत्र येईल किंवा या वर्तणुकीचें कारण तरी कळेल अशी वाट पाहात होते, इतक्यांत जनरल ली कडूनच उलटें तुह्मी असे रागानें कां बोललां याजबद्दल जबाब द्या ह्मणून वाशिंग्टन यांस उन्मत्तपणाचें पत्र आलें. हें पाहून जनरल वाशिंग्टन यांनीं त्यांस त्याचा निकाल कोर्ट मार्शल पुढें होईल ह्मणून उत्तर पाठविलें. आणि लागलेंच त्यांस कैद करून चौकशी सुरू केली. चौकशीअंतीं त्यांस एक वर्षपर्यंत कामावरून दूर करण्याच्या शिक्षेचा ठराव झाला व तो कांग्रेसनें मंजूर केला. याप्रमाणें त्यांच्या कारकीर्दीचा शेवट झाला.

ही मनमौथ येथील लढाई झाल्यावर थोड्याच दिवसांनीं कौंट डी इस्टेंग हे फ्रेंच लोकांचें आरमार व पुष्कळ फौज घेऊन अमेरिकन लोकांच्या मदतीस आले. यांत फ्रेंच लोकांचें औदार्य व स्वातंत्र्याची आवड हीं उत्तम प्रकारें दिसून आलीं आणि शिपाईगिरीच्या हुद्याच्या संबंधानें तंटा न व्हावा ह्मणू

फ्रेंच सरकारानें जनरल वाशिंग्टन यांस आपल्या फौजेंत सन्मानाचा लेफ्टेनेंट जनरल असा हुद्दा दिला. त्यामुळें त्यांनीं पाठविलेला मुख्य सरदार व वाशिंग्टन यांची सारखी व बरोबरीची योग्यता झाली. हें सर्व चांगलें झालें. तथापि स्वदेशाच्या स्वातंत्र्यार्थ परक्याची मदत घेणें योग्य व इष्ट नाहीं, व होईल तितकें करून ज्यांचें त्यांनींच स्वातंत्र्य संपादन केलें पाहिजे. कारण, परकी लोक बळावले ह्मणजे मदतीस येतात तेच धनी होऊन बसतात; ह्मणजे एकाच्या हातांतून सुटण्याचा प्रयत्न करावा आणि दुसऱ्याच्या हातांत पडावें असें होतें. याचीं आमच्या देशांत व इतर बाह्यदेशीं पुष्कळ उदाहरणें आढळतात. असो; याशिवाय अमेरिकन लोक फ्रेंच लोकांस शत्रू मानून त्यांशीं आजपर्यंत लढत आले होते याजमुळें सर्वांच्या मनांत संकोच वाटत होता. तथापि प्रसंगाप्रमाणें वागणें भाग आहे या धोरणानें सर्वांनीं आपलें वर्त्तन ठेविलें. फ्रेंच लोकांनीं अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य करून त्यांजकडून साह्य मिळावें एतदर्थ अमेरिकन सरकाराकडून प्रसिद्ध डाक्टर बेंजामिन फ्रांकलिन हे वकील गेले होते व त्यांनीं आपल्या चातुर्यानें ती कामगिरी उत्तम प्रकारें बजाविली. कांग्रेसचें जनरल वाशिंग्टन यांस ‘ फ्रेंच सरदाराचा विचार घेऊन एक विचारें पुढचा उद्योग चालवावा’ असें पत्र गेलें. त्याप्रमाणें वाशिंग्टन यांनीं आपल्याकडील एक दोन चांगल्या माहीतगार सरदारांस पुढचा विचार व उद्योग चालू करण्याकरितां फ्रेंच सरदाराकडे पाठविले. कामाचा विचार सुरू झाला; तथापि अधिकाराच्या व हुद्याच्या कारणांनीं कुरकुरी उत्पन्न झाल्या. इतक्यांत इंग्रज लोकांचें आरमार येऊन थडकलें. तेव्हां तो

कुरकुरीचा प्रकार बंद पडून सामना करण्याचा विचार ठरला. परंतु उभय पक्षीं मनें दूषित राहिलीं. न्यू इंग्लंड प्रदेशाच्या लोकांचीं मनें फ्रेंच लोकांविषयीं अगदीं शुद्ध नव्हतीं. इतक्यांत वाशिंग्टनच्या हाताखालील सरदार जनरल सलिव्हन यांजकडून कौंट डी इस्टेंग यांचा थोडा उपमर्दासारखा प्रकार झाला. त्याजमुळें कौंट यांनीं ती कुरकुर कांग्रेसपर्यंत नेली. त्यांनीं पत्र पाठवून त्यांचें समाधान केलें; परंतु जनरल वाशिंग्टन यांनीं खासगी पत्रें कौंट डी इस्टेंग यांस लिहून त्यांच्या मनांतील त्या कुरकुरीचें बीज इतकें सुंदर रीतीनें खणून काढलें व त्यांस इतकें आपलेंसें करून घेतलें कीं लढाईचा अखेर निकाल होई तोंपर्यंत फ्रेंच व अमेरिकन लोक यांजमध्यें पुढें कधींच कुरकुर झाली नाहीं. शिवाय, या संबंधांत वाशिंग्टन यांनीं मारकिस डी ल.फेट या फ्रेंच मित्राच्या मध्यस्तीनें सर्व शांत केलें. लाफेयेट हे फार थोर फ्रेंच घराण्यांतील पुरुष असून अगदीं तरुण, श्रीमान व लग्न झालेले असतां अमेरिकेस स्वातंत्र्याच्या म्हणा अगर सर्व मानव जातीच्या सुखाच्या कार्यास मदत करण्यासाठीं म्हणा, स्वतां आले होते. अमेरिकन फौजेंत ते मोठे सरदार झाले व वाशिंग्टनचे परम मित्र झाले. परस्परामध्यें अकृत्रिम प्रेम व मित्रत्व होतें व तें आमरण राहिलें. लाफेयेट हे वाशिंग्टन यांस पितृवत् व गुरुसमान मानीत व वाशिंग्टन त्यांजवर पुत्राप्रमाणें प्रेम करीत असत. फ्रेंच लोक व फ्रेंच सरदार या गृहस्थास फार मोठा व सन्माननीय पुरुष मानीत याजमुळें यांच्या मार्फतीनें कुरकुरीचें सर्वस्वी निर्मूलन झालें. या गोष्टीनंतर थोड्याच दिवसांनीं हे गृहस्थ फ्रान्स देशांत कांहीं गडबडीचा प्रसं

आहे असें पाहून रजा घेऊन स्वदेशीं गेले. कांग्रेस यांनीं त्यांचा यथायोग्य सत्कार व सन्मान करून बोळवण केली. या वर्षांत पुढें लढाईचे संबंधानें वाशिंग्टन यांच्या मार्फतीनें विशेष कांहीं झालें नाहीं; सबब वर्षअखेरीस ते हिंवाळ्यानिमित्त तळ देऊन राहिले. यापूर्वीं कांग्रेसचा बेत पुढच्या वर्षीं कानडा प्रांतावर हल्ला करून जिंकण्याचा होता. तो रहित करविला. कांग्रेस मंडळीनीं विचार करून बेत ठरवून, अमेरिकेंतील वकील बेंजामिन फ्रांकलिन यांनीं फ्रेंच सरकारची विशेष मदत मिळण्याचा उद्योग करावा ह्मणून तुह्मी त्यांस पत्र लिहा असें वाशिंग्टन यांस पत्र पाठविलें. वाशिंग्टन यांनीं तसें न करतां कांग्रेस यांस फार नम्रपणें व नानाप्रकारचीं कारणें दाखवून या उद्योगांत आपलें हित नाहीं अशी खात्री केली. त्यामुळें तो बेत रहित झाला. सारांश वाशिंग्टन हे जेथें ह्मणून स्वदेशहिताचें व संकटाचें काम येई तेथें आपण नेहमीं जसे काय उभे होते. अशा रीतीनें त्यांनीं आपल्या स्वदेशजननीची अश्रांत उद्योगानें सेवा केली आणि जगांतील लोकांस एक मोठा कित्ताच घालून दिला. सर्वांनीं हा कित्ता वळविण्यासारखा आहे हें सांगावयास नको.

सर्व कृत्यांमध्यें ही एक गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, दुसऱ्याच्या सहाय्यावर कोणत्याही कामाचें अवलंबन झालें ह्मणजे त्या कार्याचा घोटाळा व्हावयाचाच. दुसऱ्याकडून मदत येण्याची आशा उत्पन्न झाली कीं, स्वतःचा उद्योग शिथिल व्हावयाचाच. स्वतांचा झटून उद्योग व सर्व कार्यास सदोदित सहाय्य करणारा परमेश्वर याजवरचा भार झाला ह्मणजे कार्य मागें पडलेंच असें समजावें. हा

जगाचा अनुभविक सिद्धांतच आहे. त्याप्रमाणें अमेरिकेस फ्रान्स देशाची मदत मिळाल्यामुळें अमेरिकन लोकांच्या उद्योगांत शिथिलपणा आला व त्यामुळें लढाई संपण्यास अधिक दिवस लागले असेंही कित्येकांचें ह्मणणें आहे. इकडे लोकांमध्यें हेळसांड उत्पन्न झाली आणि तिकडे इंग्रज लोकांस अत्यंत राग व आवेश येऊन फ्रेंच लोकांशीं व पुढें अखेरीस स्पेन व हालंड या देशांशीं लढाईचा प्रसंग प्राप्त झाल्यामुळें त्यांनीं फारच मोठी लढाईची तयारी केली. त्यामुळें अमेरिकन लोकांस अखेरपर्यंत आपण होऊन मारणारे होण्याचें सामर्थ्य न येतां आपलें संरक्षण करीत करीत दबूनच लढाईचें काम चालवावें लागलें. लोकांच्या हेळसांडीमुळें वाशिंग्टन यांस त्यांजमध्यें ईर्षा उत्पन्न करून त्यांजकडून मदत मिळविण्याचे कामीं फारच श्रम पडले. फौजेंतील लोकसंख्या अतिशय कमी झाली व त्यांस अन्न व वस्त्रादि सामानसुमानांची इतकी उणीव पडली कीं कनेक्टीकट लैनीवरचे लोक दंगा करावयास प्रवृत्त झाले. तसेंच कांग्रेसवरचा शेतकरी वगैरे लोकांचा भरंवसा उडालासा होऊव ते सामुग्री पुरवीतनासे झाले. एकदा तर असा प्रसंग आला कीं, हायलंडस मध्यें जी फौज होती तिला जर त्यावेळच्या डेप्युटी कामिसरी जनरलच्या कामावर असलेल्या गृहस्थानें कांग्रेसची पत नाहींशी झाल्यामुळें स्वतांच्या जामिनगिरीवर सामुग्री मिळविली नसती व त्यानें जर त्या प्रसंगीं स्वदेशहितार्थ आपलें सर्वस्व खर्चलें नसतें तर अनर्थ झाला असता. अशा संकटाच्या समयीं इंग्रज सरकारच्या प्रधानमंडळानें स्नेहसंबंध जुळावा ह्मणून पुनः प्रयत्न केला. व आपले मुक्त्यार पाठवून बोलणें कळविलें. इकडूनही कांहीं

नेमिले; परंतु त्या बोलण्यांत अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य करण्याची गोष्ट नसल्यामुळें तो सर्व उद्योग व्यर्थ झाला. तो बेत फसल्यावर त्यांच्या कमिशनरांनीं कांग्रेसमधील प्रमुख गृहस्थांस पैसा देऊन फितूर करण्याचा प्रयत्न केला. फार तर काय; पण कांग्रेसचे मुख्याधिकारी प्रेसिडेंट जनरल रीड यांस फार मोठी रक्कम देऊन फितवावयाचा उद्योग केला. शेवटीं जनरल रीड यांनीं ही गोष्ट त्यांजपाशीं काढणाऱ्या कमिशनरास असें उत्तर दिलें कीं, मी फारच गरीब आहे खरा; परंतु मला विकत घेण्यापुरता तुमचा राजा श्रीमान नाहीं. याप्रमाणें हा नीच प्रकार सिद्धीस गेला नाहीं. इंग्लंडच्या सरकारानें गोड बोलून धमकी दाखवून व लांच देऊन कांग्रेसमधील सभासदांस आपलेंसें करून घेण्याचे सर्व प्रकार केले; परंतु ते थोर, योग्य व खरे स्वदेशभक्त होते ह्मणून आपल्या दृढनिश्चयापासून व कर्त्तव्यापासून यत्किंचितही ढळले नाहींत. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या वेळेप्रमाणेंच अर्वाचीन काळीं स्वातंत्र्याचें प्रेम व स्वदेशजननीची निष्प्रांजल सेवा याचें हें अत्युतम व ढळढळीत उदाहरण आहे. असा आनंदाचा दिवस ईश्वर ज्या राष्ट्रास दाखवितो तें धन्य होय

चाललेल्या लढाईच्या संबंधानें एक अत्यंत नीच प्रकार घडून आला त्याचा उल्लेख येथें केल्यावांचून राहवत नाहीं. व्योमिंग ह्मणून एक सुंदर वसाहतीचें ठिकाण होतें. तेथील लोक सुखी, स्वस्थ व अगदीं अलग होते. ते लढाईंत देखील सामील झाले नव्हते. परंतु इंग्रज लोक व त्यांनीं मिळविलेले इंडियन लोक यांनीं मिळून त्या वसाहतींतील लोकांवर हल्ला केला आणि त्यांच्या संरक्षणार्थ जे थोडे लोक होते त्यांस

ठार मारून, शेतांची नासाडी करून, घरें जाळून स्त्रीपुरुष वृद्ध अगर बालकें यांचा कांहीं एक विचार न करतां सरसकट सर्वांची कत्तल करून मारून फडशा पाडला, आणि तो प्रदेश ओसाड रान करून त्यांत फक्त मागें मेलेल्या मनुष्यांचीं हाडें मात्र ठेविलीं !! या कृतीस काय ह्मणावें हें समजत नाहीं. इंग्रज लोकांच्या नांवास हा निरंतरचा कलंक राहील. निरुपद्रविकांचा नाश करणें हें मोठें लांछन आहे.

या वर्षांत दुसरा एक ध्यानांत ठेवण्यासारखा अमेरिकन लोकांचा जय झाला. इंग्रज लोकांच्या फौजेनें जागोजाग चांगलीं ठिकाणें धरून ठेविलीं होतीं. त्याजमुळें सवड सांपडे तेव्हां जनरल वाशिंग्टन यांनीं स्टोनी पाइंट नांवाच्या किल्याची माहिती मिळविली आणि त्याजवर हल्ला करण्याचा बेत केला. हा बेत विशेष धाडसाचा व फार बिकट तसाच झटून लढण्याच्या आवश्यकतेचा होता, यामुळें त्यांनीं आपल्या हाताखालच्या जनरल वेन या सरदारास ही कामगिरी सांगितली. जनरल वेन हे धाडसाच्या कामास नेहमीं फार उपयोगी पडत त्याजमुळें त्यांसच तें काम त्यांनीं सांगितलें. वाशिंग्टन यांच्या लष्करी कामांत विशेष धूर्तता व धाडसपणा दिसून येतो. त्यांनीं जनरल वेन यांच्याकडून माहिती मिळवून सर्व बारीक व्यवस्थेपर्यंत त्यांस सुचवून रात्रीं काळोखांत अगदीं न बोलतां आणि बंदुकींत बार न भरतां संगीन बसवून सारखे चालत जाऊन हल्ला करावा अशी योजना केली. त्या किल्यांत इंग्रजांचे सहाशें लोक होते व त्यांजवर कर्नल जानसन हे सरदार होते. केवळ वीस वीस निवडक लोकांच्या दोन टोळ्या दोन सरदा[रां] लेफटेनेंट गिबन व लेफटेनेंट नाक्स यांजबरोबर पुढें पाठवू[न]

मागून थोड्या अंतरावर शें दोनशें लोक घेऊन जनरल वेन निघाले. हल्ला करण्याचा वेळ रात्रीं बारा वाजतां ठरला होता. त्याप्रमाणें ता. १५ जुलई सन १७७९ इसवी रोजीं रात्रीं ती टोळी तेथें पोंचली, आणि बारा वाजल्यावर थोड्या मिनिटांनीं हल्ला सुरू झाला. किल्यांतील लोकांच्या ध्यानीं मनीं-ही अशा हल्ल्याची कल्पना नव्हती. कारण किल्ला फार बळकट होता. किल्ल्यांतील लोकांनीं गोळ्या घातल्या; परंतु अमेरिकन लोकांनीं त्या नादीं न लागतां संगीनीनींच सपाटा उडविला. यांचे एकंदर शंभर लोक मेले व जखमी झाले इंग्रजांचे ६३ मेले आणि पांचशेंच्यावर कैदेंत सांपडले. याप्रमाणें जय होऊन जनरल वेन यांनीं पहांटेस दोन वाजतां लागलेंच किल्ला व फौज हातीं आल्याबद्दल वाशिंग्टन यांस पत्र पाठविलें. जनरल वेन यांस एक गोळीची जखम झाली; तथापि त्यांनीं किल्ला तसाच नेटानें सर केला. त्याजमुळें सर हेनरी क्लिंटन यांस कनेक्टीकटकडे लढाईचें तोंड लागलें होतें तें बंद ठेवून या बाजूकडे लक्ष पुरवावें लागलें. त्यांच्यानें वाशिंग्टनच्या फौजेवर हल्ला करवेनासा झाला तेव्हां ते न्यूयार्क येथेंच स्वस्थ राहिले.

याप्रमाणें हा प्रकार चालला असतां पोटोमाक नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत लोकांची इतकी दुर्दशा झाली होती व ते इतके निराश झाले होते कीं, इंग्रज लोक तो प्रदेश काबीज झाला असें देखील समजूं लागले होते; परंतु अशा वेळेस कितीएक स्वदेशभक्त व स्वातंत्र्यभक्त यांनीं लहान लहान टोळ्या रानांतून लपून झाडींतून, डोंगरांतून वगैरे लढाईचें काम सरासरी जारी ठेविलें होतें. त्या कामांत फिकन्स, संपटर, ह्युजर,

होरी वगैरे प्रमुख होते. त्या सर्वांत फ्रांन्सिस मेरियन हा मनुष्य तर विशेष विख्यात होऊन गेला यानें थोडीं रानवट धडधाकट तरतरीत माणसें मिळवून जंगलांतून सतत हल्ल्यांचा क्रम चालू ठेविला होता. हा मनुष्य मोठा हुषार, धाडसी, स्वदेशभक्त व स्वातंत्र्याचा अत्यंत भोक्ता होता. शरीरानें पातळ पण बळकट, श्रम व संकटें सोसणारा, विलक्षण चपळ, शूर, सावध, उद्योगी व पटाईत शिपाई असून तसाच मोठा तत्वज्ञानीहि होता. तो कधींही निराश न होतां आपला उद्योग सतत अश्रांत चालवी. चार्लसटन हें इंग्रज लोकांच्या हातीं पडल्यावर ते अगदींच बेफाम झाले व त्या प्रदेशांतील सरकार पक्षाचे टोरी लोक हेही अगदीं अविचारी बनून आपले देशबांधव शेजारीपाजारी यांच्या नाशास प्रवृत्त झाले. या सर्वांनीं मिळून अमेरिकन लोकांचीं घरें जाळलीं, त्यांच्या शेतांचा व बागांचा विध्वंस केला. आणि फार तर काय पण त्यांच्या बायका व मुली यांचा देखील अपमान केला. अशा संकट समयीं त्यांजशीं सामना करण्यासारखी फौज कोठेंही जवळपास राहिली नवती. तेव्हां या दुःखाच्या प्रसंगीं मेरियन याच्या उद्योगाचा फार उपयोग झाला. तो नेहमीं सावध राहून जंगलांतून चटदिशीं एकाएकीं येऊन इंग्रज लोकांवर पडून मारहाण करून पुनः जंगलांत निघून जाई. तो येतो कोठून व जातो कोठें तसेंच केव्हां येईल आणि कसा घाला घालील याचा नेम व पत्ता लागत नसे. या मनुष्याची एका प्रसंगाची गोष्ट मोठी चमत्कारिक आहे; ती या चरित्रांत कदाचित वाचकांस अप्रासंगिक वाटेल तथापि आमच्यानें उदाहरणार्थ ती येथें दाखल केल्याशिवाय रहावत नाहीं.

एके प्रसंगीं हे गृहस्थ एका जंगलांत असतां एक ब्रिटिश सरदार स्वस्थतासूचक निशाण घेऊन कांहीं कैदेंत सांपडलेल्या लोकांच्या वाटाघाटीकरितां यांजकडे आले. जंगलांत शिरण्याच्या ठिकाणीं पाहऱ्यावर असणाऱ्या शिपायानें त्या सरदारास डोळे बांधून जेथें जनरल मेरियन होते तेथें आणिलें. आणि डोळे सोडल्यावर त्या अदृश्य पण नेहमी अनुभवास येणाऱ्या जनरला पुढें उभें केलें. तेव्हां ते सरदार बोलले कीं, मी जनरल मेरियन यांजकडे कांहीं निरोप घेऊन आलों आहे त्यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं, हा मी येथें आहें व हे माझे शिपाई आहेत. त्या सरदारानें इकडे तिकडे पाहिलें तों कांहीं रानवट, अर्धे उघडे बोडके, कोणी रताळीं भाजीत आहेत, कोणी बंदुकींवर टेकून विश्रांती घेत आहेत, कोणी लांकडाचे ओंडके उशाला घेऊन निजले आहेत असें पाहिलें. ज्या कामाकरितां ते आले होते तें आटोपल्यावर ते सरदार जावयास निघाले. तेव्हां मेरियन यांनीं त्यांस जेऊन जावें अशा चालीप्रमाणें विनंति केली. प्रथम तर त्या सरदारास जेवणाची कांहीं तयारी कोठें न दिसल्यामुळें थट्टाच वाटली; परंतु पुनः जेऊन जाण्याविषयीं आग्रह झाला तेव्हां भुकेमुळें व चमत्कार पाहण्याच्या हेतूनें तें ह्मणणें त्यानें मान्य केलें. त्यावर जनरल यांनीं वाढण्याचा हुकूम फरमाविला. तेव्हां त्यांच्या लोकांनीं लागलेच जमिनीवर झाडांच्या स्वच्छ सालीं मांडून आगटींतून रताळीं काढून राख फुंकून वाढलीं. कारण मेरियन व त्यांची शिपाईमंडळी यांची सकाळची न्याहरी, दुपारचें जेवण व रात्रीचा उपहार यांस रताळी हेंच कितीएक दिवस अन्न असे. जेवतांना इकडच्या तिकडच्या गोष्टी निघून विनोदादि प्रकार झाले; परंतु शेवटीं

प्रकरण गंभीर भाषणावर येऊन ठेपलें. या भाषणांत कळलें कीं, मेरियन व त्यांची शिपाईमंडळी बिनपगारी चाकरी करिते. घरांवांचून उघड्यावर राहाते, कधीं कधीं वस्त्रांवाचून अर्धवट उघडी व कधीं कधीं अन्नावांचून अर्धपोटीं असते. तेव्हां मला तुमची दया येते असा त्या इंग्रज सरदाराच्या तोंडांतून उद्गार निघाला. तोंच मेरियन यांची मुद्रा गंभीर दिसूं लागली, आणि त्यांनीं मार्मिक जबाब दिला. तो विशेषेंकरून तरुण वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

स्वातंत्र्याकरितां जिवावर उदार झालेले हे शिपाई बहादूर हंसून बोलले कीं, तुह्मी माझी कींव करूं नका. मी तुमच्या पेक्षां फार सुखी आहें. मी आपल्या देशबांधवांस स्वतंत्र करण्याकरितां लढत आहें; परंतु तुह्मी आपल्या देशबांधवांस गुलाम करण्याकरितां लढत आहां. जेव्हां मला भूक लागते तेव्हां मी आपल्या मानवी बंधुजनांच्या सुखार्थ कांहीं तरी करीत आहें असें मानून मनाचें शांतवन करतों. जेव्हां मी भिजलेला असून मला थंडी वाजते तेव्हां मी आपल्या स्वदेशाच्या हितार्थ हें सोशीत आहें असें समजून मी आपल्या अंगांत उष्णता आणितों; आणि जेव्हां ज्या कार्यांत मी आपलें तन मन धन वाहिलें आहे त्याच्या संबंधानें निराशा उत्पन्न होते त्या वेळेस अद्यापि मनुष्यामध्यें सद्गुण आहे आणि परमेश्वराच्या येथें न्याय आहे असें समजून मी आपल्या मनास धीर देतों. तसेंच माझ्या देशांत पुढें होणाऱ्या प्रजेच्या कानावर माझें नांव देखील जाणार नाहीं किंवा त्यांच्या कार्यार्थ मी श्रम केले हें देखील त्यांस कळणार नाहीं तथापि त्यांच्या स्वातंत्र्याकरितां व सुखाकरितां मी झा

आहें या कल्पनेनें मला सुख होत असतें त्या सुखाची योग्यता मानवी प्राण्यांवर जुलूम करणारांस कधींहीं कळणार नाहीं. हें ऐकतांच तो ब्रिटीश सरदार अगदीं थिजून गेला. हें उत्तर किती मार्मिक आहे हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. स्वदेशजननीची सेवा किती निष्प्रांजल,किती निरपेक्ष व किती प्रेमळ बुद्धीनें तो खरा स्वदेशभक्त करीत होता हें उघड दिसून येतें. पगार अगर कोणत्याही प्रकारच्या मिळकतीची आशा नाहीं, खाण्यास अन्न नाहीं, अंगास पुरें वस्त्र नाहीं, विश्रांतीला निवाऱ्याची जागा नाहीं, फार तर काय, पण नुसत्या कीर्तीची आशा अथवा अपेक्षा नाहीं, केवळ सत्कार्यार्थ आपण इतकें सोसतों एवढ्या मनाच्या समाधानार्थ आपलें सर्वस्व व सर्वांहून प्रिय जो प्राण तो वेंचण्यास सदोदित तत्पर असणें हें केवढें मनाचें औदार्य व केवढें विलक्षण स्वदेश व स्वातंत्र्य प्रेम !!! परमेश्वर कृपा करून जेव्हां अशीं निस्सीम मनुष्यें उत्पन्न करतो तेव्हांच जगांत महत् सत्कार्यें घडून येतात. अशीं मनुष्यें ज्या देशांत निपजतात तो देश धन्य होय. तो ब्रिटिश सरदार आपल्या वरिष्ठाधिकाऱ्याकडे परत गेला. त्याच्या चर्येंत ग्लानता पाहून त्या अधिकाऱ्यानें त्याचें कारण विचारल्यावरून त्यानें सांगितलें कीं, महाराज, मी एक अमेरिकन सरदार पाहिला, तो व त्याच्या हाताखालचे अंमलदार व त्याचे शिपाई सर्व पगारावांचून, निवाऱ्याच्या ठिकाणांवांचून, वस्त्रांवांचून, अन्नावांचून कंदमुळें व पाणी यांवर निर्वाह करून, स्वतंत्रतेकरितां हे के सर्व हाल सोशीत आहेत. असे लोक जेथें आपल्या ाचें संरक्षण करित आहेत तो देश काबीज करण्याची

आपल्यास काय आशा आहे ? सारांश तो सरदार थोड्याच दिवसांनीं चाकरी सोडून स्वदेशीं परत गेला. मात्र त्याच्या मनांत बदल झाला कीं, जय मिळण्याची त्याला निराशा वाटली तें सांगवत नाहीं.

वर लिहिलेल्या हकीकतीवरून दक्षिणेकडील प्रदेशांवर किती संकट ओढवलें होतें तें दिसून येतें. अशा समयीं सर-हेनरी क्लिंटन यांनीं न्यूयार्कच्या संरक्षणापुरती फौज ठेवून त्या प्रदेशांत लढाई मोठ्या झपाट्यानें चालविली. त्यांनीं ता० १२ मे सन १७८० रोजीं सौथ क्यारोलैनाच्या राजधानीस वेढा घालून तें शहर घेतलें. त्याजबरोबर त्या प्रदेशांतील जनरल लिंकन यांच्या हाताखालील फौज शत्रूच्या हस्तगत झाली. जनरल वाशिंग्टन यांनीं पुर्वींच या सरदारास ताकीद देऊन ठेविली होती कीं, कोणत्याही जाग्यांत कोंडून घेऊन राहूं नये अगर एखाद्या शहराकरितां फौज धोक्यांत घालूं नये; परंतु या सांगण्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें हा मोठा अनर्थ झाला, आणि यामुळें यूनैटेड स्टेट्स देशाचा सर्व दक्षिण प्रदेश शत्रूच्या तावडींत सांपडला व ते नेहमी त्या प्रांतावर हल्ले करूं लागले.

इकडे फ्रेंच लोकांचें आरमार अमेरिकेस सहाय्यास येऊं लागल्यामुळें इंग्लिश आरमार त्याजपेक्षांही जास्त येऊन अधिक त्रास व्हावयास लागला अमेरिकन शिपायांची तर अतिशय दुर्दशा होऊन गेली होती. खावयास अन्न नाहीं, पांच पांच महिने पगार नाहीं, आणि पगाराचे पैसे मिळालेच, तर कागदांचे कपटे हातीं येत व त्यांस बाजारांत कोणी पुसेना फार तर काय सरदाराच्या पगारांचा पैसा आला तर त्याजबर त्य

च्या घोड्याचा देखील खर्च निभावत नसे. या अतिशय त्रासामुळें कांहीं सरदार लोकांनीं घोटाळा अगर बंडावा करण्याचा बेत केला. ज्यांजवळ खासगी पैसे होते त्यांनीं ते खर्चून निर्वाह केला व जे केवळ पगारावर अवलंबून होते त्यांची दुर्दशा झाली. तेव्हां चाकरी सोडून जाण्याचा त्यांनीं विचार केला. त्यांनीं तसें केलें असतें ह्मणजे सर्वांनीं तसेंच केलें असतें आणि सर्व फौज नाहींशी झाली असती. या वेळेस कांग्रेस वगैरे कोणाचें कांहीं चालेलसें दिसेना. पण अशा संकटाच्या वेळीं वाशिंग्टन आपले उभेच. जेथें अडेल तेथें वाशिंग्टन आहेतच त्यांनीं ज्या सरदारांनीं हा बेत केला होता त्यांस बोलावून आणिलें आणि त्यांस स्वदेशभक्ति, त्याजसंबंधानें आजपर्यंत भोगिलेलीं दुःखें पुढें होणारा दुःखदायक परिणाम इत्यादि अनेक गोष्टींविषयीं समजून सांगितलें आणि त्यांचीं मनें फिरवून पूर्ववत् स्वदेशसेवेस उल्हसित करून सोडलीं. हें काम त्याच्या सेनापतीच्या हुद्यानें झालें नाहीं. त्यांचे सद्गुण, त्यांचें स्वतांचें खासगी वजन, त्यांचें विलक्षण स्वदेशप्रेम आणि त्यांचें खासगी सदाचरण याच्या योगानें तो मोठा अनर्थ टळला.

शेवटीं, ही मोठी अडचणीची व आणीबाणीची वेळ फिलेडेल्फियाच्या एका सावकारी पेढीनें धान्य व वस्त्रें पुरविण्याचें काम पतकरून पार पाडली. तथापि एक विशेष गोष्ट या प्रसंगास झाली ती येथें सांगणें जरूर आहे. सर्व आठ वर्षांच्या एकंदर लढाईंत बायकांचे अतिशय हाल व अपेष्टा झाल्या. इंग्रज, इंडियन व हेशियन लोक वगैरे सर्वांनीं गांवें, तें व घरें लुटावीं आणि घरांस आगी लावून द्याव्या, बायकांवर जुलूम करावे, असे अनेक कहर अमेरिकन लोकांवर

गुदा; तथापि इंग्रज लोक माहिती विचारीत, फौजेच्या टोळ्यांचीं ठिकाणें दाखवा ह्मणून ह्मणत; परंतु तीं त्यांनीं शत्रूंस कधींही कळूं दिलीं नाहींत. त्या स्वतां निरनिराळ्या प्रकारचीं कामें करून व पोटास चिमटा घेऊन पैसा जमवीत आणि प्रसंगविशेषीं आपल्या अमेरिकन फौजेस तो देत. या हल्लींच्या अत्यंत संकटाच्या समयीं फिलेडेल्फिया येथील बायकांनीं आपल्या कुणग्यांतून फौजेच्या मदतीस पैशाच्या देणग्या देऊन तिचा बचाव केला. या गोष्टीवरून इत्यर्थ इतकाच होतो कीं, बायका समंजस व स्वदेशभक्त असल्या ह्मणजे पुरुष तसेच चांगले निपजतात. यास्तव स्त्रिया सुशिक्षित व समंजस असण्याची किती आवश्यकता आहे हें यावरून उत्तम प्रकारें दिसून येतें.

सन १७८० सालच्या स्वारीचा उद्योग मे महिन्यांत सुरू झाला. फ्रान्स देशांतील प्रसिद्ध स्वातंत्र्यभक्त मार्किस डी लफेयट हे लढाईच्या कामांत स्वतां मदत करण्याकरितां मे महिन्याच्या आरंभीं पुनः स्वदेशाहून अमेरिकेस येऊन दाखल झाले. तशीच फ्रान्सच्या सरकाराकडून नवीन फौजेची कुमक कौंट डी रोचेंबो या सरदाराबरोबर ता. १० जुलई रोजीं अमेरिकेंतील बंदरांत दाखल झाली. ही फौज पाठविली त्या वेळेस फ्रान्स देशाच्या राजानें जनरल वाशिंग्टन यांच्या ती पूर्ण ताब्यांत दिली व त्यांच्या हुकमाप्रमाणें सर्वांनीं वागावें अशी योजना केली. ही विशेष महत्वाची व उदारपणाची गोष्ट आहे. ही फौज अमेरिकेस आल्यापासून न्यूयार्क शहरावर हल्ला करून तें घेण्याचा वाशिंग्टन यांचा बेत होता. त्याकरितां फौजेची वगैरे व्यवस्था केली; परंतु अमेरिकेंतील

शिपाई लोकांची लवकर भरती झाली नाहीं. शिवाय पैशां-रांचीही मोठी कमताई होती. यामुळें तो बेत अमलांत आला नाहीं. प्रयत्न पुष्कळ झाला; परंतु इंग्रज लोकांची फौज अधिकाधिक वाढत गेली आणि इकडे कमताई पडली. जनरल वाशिंग्टन व फ्रेंच सरदार यांची प्रत्यक्ष गांठ बरेच दिवस पडली नव्हती, ती ता० २० सप्टेंबर रोजीं हार्टफोर्ड येथें प्रथम पडली व कोणत्या बेताप्रमाणें उद्योग करावयाचा हें ठरवून जनरल वाशिंग्टन परत आले. इतक्यांत एक अत्यंत मोठें भयंकर संकट तयार होतेंच. फितुराचा एक मोठा खटला उघडकीस आला होता. त्याची थोडी हकीकत येथें सांगणें अवश्य आहे. ही गोष्ट वाशिंग्टन यांच्या चरित्रास विशेषत: लागू नसल्यामुळें कदाचित् अप्रासंगिक वाटेल; परंतु त्यांजवर कसकशीं दुस्तर संकटें आलीं व त्यांतून ते कसे निभावले हें समजण्यास मार्ग होईल, आणि अमेरिकन लोकांची खरी योग्यता कळून येईल.

जनरल आर्नोल्ड नांवाचे सरदार यांनीं पैशाच्या लालचीनें अमेरिकन लोकांचें वेस्टपाइंट नामक महत्वाचें व त्या वेळचें फौजेचें मुख्य ठिकाण, फौज व सामानसुमानसुद्धां इंग्रजांच्या हवालीं करण्याचा दुष्ट बेत केला होता तो परमेश्वर कृपेनें सहजगत्या उघडकीस आला. हे सरदार योग्यतेनें व हुद्यानें जनरल वाशिंग्टनच्या अगदीं खालोखालचे दुसरे नंबरचेच होते, व ते तसेच राहते तर त्यांची कीर्ति अमेरिकेच्या इतिहासांत व लोकांत वाशिंग्टन यांच्या खालोखाल गाइली गेली असती. परंतु त्यांचें नशीब निराळ्या प्रकारचें होतें त्यामुळें दुर्लौकिक संपादण्यांत त्यांनीं पहिला नंबर मिळविला.

..पणीं शाळेंत ते मोठे बुद्धिवान असे समजले जात; परंतु त्यांची ..र्त्तणूक व स्वभाव ही चांगलीं नव्हतीं. मोठेपणीं त्यांचा खर्चिकपणा त्यांस फार बाधक झाला. ते नेहमीं कर्जबाजारी असत व शेवटीं या अघोर व निंद्य कर्मास देखील पैशाच्या अडचणीमुळें ते प्रवृत्त झाले. ते पैसा मिळविण्याच्या उद्देशानें आपल्या देशजननीस व तिच्या स्वातंत्र्यास विकावयास तयार झाले! त्यांनीं होऊन सर हेनरी क्लिंटन या इंग्लिश सरदाराशीं बोलणें सुरू केलें व त्यांनें आपल्याकडून मेजर आंड्रे, ब्रिटिश फौजेचे अजिटंट जनरल, या तरुण सरदारास या नाजूक व बारीक कामास जनरल आर्नोल्ड यांजकडे पाठविलें. त्यांच्या हावरस्ट्रा येथें गांठी पडून विचार होऊन त्या ठिकाणचा नकाशा व करारमदाराचे लेख आर्नोल्ड यांच्या हातचे घेऊन तो परत आपल्या छावणीस जाण्यास निघाला. तो बलचर नांवाच्या लढाऊ गलबतांतून आला होता व त्यांतूनच परत जावयाचा होता; परंतु कर्मधर्मसंयोगानें तें गलबत त्या ठिकाणापासून अमेरिकन लोकांच्या तोफांच्या भीतीमुळें नदींतून फार खालीं गेलें व त्याजवर जाण्यास होडी त्या वेळेस मिळाली नाहीं. त्याजमुळें पाय वाटेनें जाण्याचा त्याचा बेत झाला. तो प्रदेश अगोदरच हल्ल्यांनीं ओसाड झालेला होता तेव्हां मनुष्यें वाटेंत भेटण्याची फारशी भीती नव्हती. तथापि आर्नोल्ड वगैरेंच्या सूचनेवरून त्यानें आपला लष्करी पोषाख काढून त्यानें साधा पोषाख घातला आणि तो घोड्यावर बसून निघाला. आर्नोल्ड यांजकडील स्मिथ नांवाच्या मनुष्यानें त्यास बरेच लांबवर पोंचविलें आणि तो परत गेला. पुढें पुष्कळ लांब पर्यंत निर्विघ्न गेल्यावर आतां आपण पार पडलों असें

खील त्यास वाटलें. इतक्यांत टारीटौन नांवाच्या गांवा[illegible] पुलावरून जात असतां जान पाल्डिंग नांवाचा एक [illegible]ठी मनुष्य झाडींतून एकाएकीं बाहेर पडला आणि त्यानें घोड्याचा लगाम धरला. तेव्हां मेजर आंड्र यानें घाबरून तुम्ही कोणीकडून आलां म्हणून त्या मनुष्यास विचारलें. खालून आलों असें त्यानें सांगितलें. त्याजवरून आपणही तिकडूनच आलों असें तो बोलून गेला. आतां, खालून आलों या बोलण्याचा अर्थ इंग्रज लोकांच्या छावणींतून आलों असा त्यावेळेस समजत असत. अमेरिकन मनुष्य सहज बोलून गेला; परंतु मेजर आंड्रे मात्र बोलून फसला. त्याच्या मनांत हा आतां घोडा सोडून आपणास जाऊं देईल, परंतु त्यानें आणखी आपल्या दोघां सोबत्यांस झाडींतून बोलाविलें. आणि संशयानें त्यास झाडींत नेऊन त्याचा झाडा घेतला. त्या सरदारानें जनरल आर्नाल्ड यांचा पास दाखविला आणि तुह्मी मला विनाकारण उशीर करतां याबद्दल जनरल आर्नाल्ड तुह्मांवर रागावतील असा देखील धाक घातला. सर्व झाडा घेतला तरी कांहीं सांपडलें नाहीं तेव्हां तर तो सरदार विशेष रागानें बोलूं लागला. इतक्यांत एकानें त्याचे बूट शोधून पाहण्याविषयीं सुचाविलें. तेव्हां मात्र त्या सरदाराची चर्या बदलली आणि बुट काढावयास तो कांकूं करूं लागला. हें पाहून त्यांनीं जबरदस्तीनें बूट काढला तों वेस्ट पाइंट छावणीचा नकाशा व त्याजवर फौजेची व्यवस्था दाखविलेली आहे असें दृष्टीस पडलें. मग काय ? सर्व कागदपत्र बुटांतून काढले आणि ते सर्व जनरल आर्नाल्ड यांच्या हातचे. तेव्हां तें दगाबाजीचें विलक्षण प्रकरण त्यावरून अर्थात ठरलें. आतां हा प्रसंग चमत्कारिक व परीक्षेचा

ह. मेजर आंड्रे याचें सर्व भांडवल फुटलें तेव्हां त्यांतून सु-टका करून घेण्याकरितां त्या तिघां तरुण मनुष्यांस लालूच दाखविण्याचा त्यानें प्रयत्न केला. ते तिघेही मुलगे बऱ्याच कुलीन घराण्यांतील होते; परंतु गरीबच होते. तशांत लढा-ईच्या झपाट्यांत ते अगदीं दरिद्रावस्थेस पोंचले होते. मेजर यानें त्यांस मागाल तितका पैसा देतों व तो पैसा तुह्मांस मि-ळे तोंपर्यंत मी तुमच्या ताब्यांत राहातों असें देखील सांगितलें. परंतु पालिंडगनें त्यास स्पष्ट सांगितलें कीं, लाख रुपये दिले तरी तुह्मास फौजेच्या मुख्य ठिकाणींच गेलें पाहिजे. मग त्यांनीं कर्नल जेम्सन यांचें ठिकाण अगदीं जवळ होतें तेथें त्यास नेलें. ते थोडे दयाळू स्वभावाचे असल्यामुळें त्यांनीं मेजर आंड्रे यास आपण सांपडल्याचें वर्त्तमान लिहून जनरल आर्नाल्ड यांस कळविण्याची परवानगी दिली. याजमुळें जनरल आर्नाल्ड यांस फुरसत सांपडून इंग्रज लोकांच्या फौजेकडे पळून जाण्यास सवड झाली. त्यांनीं कांहीं बंदोवस्त, बायकोस सूचना, किंवा मेजर आंड्रे याची सुटका करण्याची तजवीज वगैरे कांहीं एक न करतां ताब-डतोब इंग्लिशांच्या लढाऊ गलबतावर जाऊन तेथून जनरल वाशिंग्टन यांस आपण शत्रूकडे गेल्याचें वर्त्तमान कळविलें. व आपल्या बायकोसही कळवा ह्मणून त्यांत सूचना लिहिली. याप्रमाणें जनरल आर्नाल्ड हे अत्यंत नीच जें फितुराचें, ह्मणजे स्वदेशजननी विकण्याचें, तें कर्म करून शिक्षा न मिळतां शत्रूकडे सुरक्षित जाऊन पोंचले व तिकडे फौजेंत अधिकारी होऊन राहिले. शेवट निरंतर मानासिक दुःखांत त्यांनीं आपलें आयुष्य घालविलें.

इकडे मेजर आंड्रे यानें आपलें जॉन आंडरसन ह्मणून खोटें नांव सोडून देऊन खऱ्या नांवानें जनरल वाशिंग्टन यांस पत्र पाठविलें. त्यांत त्यानें आपलें खरें नांव व लष्करी हुद्दा कळवून, ज्याप्रमाणें मला वागवाल त्याप्रमाणें तुमच्याकडील सांपडलेल्या लोकांची व्यवस्था लागेल असें मोघम सुचविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याची चवकशी होऊन ता. २ आक्टोबर सन १७८० इसवी सोमवार रोजीं शत्रूकडील हेर ह्मणून त्यास दोनप्रहरीं देहांत शासन मिळालें. याजबद्दल शत्रूकडील मंडळीस अत्यंत वाईट वाटलें. कारण त्यांस जो मोठा लाभ व्हावयाचा होता तो न होतां उलटा एक तरुण व हुशार सरदार मात्र गेला.

आतां हा होणारा भयंकर अनर्थ ज्या स्वदेशभक्तांनीं आपल्या प्रामाणिकपणानें टाळला त्यांचीं नांवें जगापुढें व विशेषतः आमच्या देशांतील लोकांपुढें सदोदित असावींत तीं हीं:—जान पाल्डिंग, ऐझाक वान वार्ट, व डेविड विलियम्स या तिघां पुरुषांनीं पैसा घेऊन श्रीमंत व्हावयाची इच्छा न धरतां केवळ आपलें स्वदेशजननीच्या संबंधाचें कर्त्तव्य काय तें समजून पैशास लाथ मारून उत्तम कीर्ति संपादन केली. आमचा देश आजपर्यंत या अशा लालचीच्या नीचपणानेंच बुडत आला. यापुढें तरी परमेश्वर कृपा करून या तिघां प्रामाणिक स्वदेशभक्तांप्रमाणें आमच्या लोकांमध्यें खरे स्वदेशभक्त उत्पन्न करो, आणि पूर्वीचा कालिमा नष्ट करो. असो, या तिघांचा जनरल वाशिंगटन यांनीं मोठा सत्कार केला; कांग्रेसनें त्यांस एकेक चांदीचें पदक देऊन नेमणुका करून दिल्या व प्रसिद्धपणें त्यांचे आभार मानले; तसेंच न्यूयार्क संस्थानानें प्रत्येकास जमिनी दिल्या

असो, हा मध्यंतरींचा अनर्थ टळला. पुढें फ्रेंच व अमेरिकन सरदारांनीं बेत केला होता तोही इंग्रज लोकांचीं जहाजें अधिक आल्यामुळें फसला. सारांश त्या वर्षांत कांहीं विशेष उपयोग झाला नाहीं. शेवटीं हिंवाळ्यामुळें अमेरिकन फौजेस तसेंच जाऊन राहावें लागलें. परंतु फौजेची व लोकांची स्थिति अतिशय दुःखकारक झाली होती. लोकांमध्यें शत्रूंच्या त्रासानें व लुटालुटीनें व स्वदेशाच्या फौजेस पुरवठा करावा लागल्यानें त्राण नाहींसें झालें होतें व ते अगदीं निराश झाले होते. कांग्रेसची सर्वत्र नापत झाल्यासारखी झाली होती. फौजेच्या हालअपेष्टेस तर पारावारच नाहींसा झाला होता; पगार नाहीं, पोटास अन्न नाहीं, अंगास वस्त्र नाहीं, पायांत जोडे नाहींत, असें होतें, व लढाई नीट रीतीनें लवकर संपण्याची आशाही दिसेना. जनरल वाशिंग्टन हे तर कांग्रेस व निरनिराळे प्रांतांचे गवर्नर यांस लिहून लिहून कंटाळले. लोकांकडून भरपूर मदत न मिळाल्यामुळें त्यांनीं फ्रेंच सरदारांशीं केलेला करार व्यर्थ झाला. त्या अपमानामुळें ते मनामध्यें अत्यंत दुःखी झाले होते. अशा संकटसमयीं फौजेतील शिपाई लोक कंटाळले व बंडावा करण्याचे बेतावर आले.

सन १७८१ सालास अत्यंत वाईट स्थितींत आरंभ झाला. सर्वत्र निराशा झाली होती. पूर्वींच्या सालांपेक्षां या सालीं फौजेंतील शिपाई अतिशय त्रस्त होऊन देशसंबंधाचें काम सोडून घरोघर जावयास निघाले होते. त्या वर्षाच्या पहिल्या तारखेच्या म्हणजे वर्षप्रतिपदेच्या महोत्सवाच्या दिवशींच रात्रीं पेन्सिल्वेनियाकडील तेराशें शिपाई हातांत हत्यारें घेऊन कांग्रेसकडे आमचा निकाल करा म्हणून म्हणावयास आपापल्या झोंपड्यां-

तून बाहेर पडले. आह्मीं आपलीं हत्यारें फेंकून देऊन घरो-घर जातों, आमच्यांपैकीं ज्यांचीं तीन वर्षें भरलीं असतील त्यांस घरोघर जाण्यास परवानगी मिळावी, आमच्या पगाराची बाकी चुकती करावी व जे कामावर जाण्यास खुषी असतील त्यांस पगाराचा पैसा रोख द्यावा असें त्यांचें ह्मणणें होतें. त्यांच्या प्रिय व विख्यात सरदारांनीं आपापल्याकडून त्यांची समजूत घालण्याकरितां केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. त्यांचे मुख्य सरदार जनरल वेन यांनींही आपली पराकाष्ठा केली. ते सर्व लोक प्रिन्सटन शहराकडे जावयास निघाले. त्यावेळेस तो भयंकर रागीट स्वभावाचा सरदार पिस्तुल पुढें करून आवेशानें पुढें सरसावला. तेव्हां ते एकदम सर्व बोलले कीं "जनरल साहेब, आह्मी तुह्मांवर प्रीति करतों, तुह्मांविषयीं आमची पूज्य बुद्धि आहे, परंतु तुह्मी पिस्तुल झाडलें कीं मेलोंच असें समजा. कारण तुह्मांस सोडून आह्मी शत्रूंकडे जात नाहीं. शत्रू जरी आतां या क्षणीं पुढें आले तर आह्मी आपल्या देशाच्या संरक्षणार्थ तुमच्या हुकमाप्रमाणें त्यांजशीं कटून लढूं. आह्माला स्वातंत्र्य आवडतें; परंतु आमच्यानें आतां उपासाचें दुःख काढवत नाहीं!" या त्यांच्या बोलण्याची प्रचिती थोड्या दिवसांनींच अनुभवास आली. इंग्रजांकडील सरदारांच्या कानावर हा बंडाव्याचा प्रकार गेला तेव्हां त्यांनीं त्या शिपायांस फितवून आपल्याकडे नेण्याकरितां माणसें पाठविलीं. तेव्हां या शिपायांनीं त्यांच्या बोलण्याचा अव्हेर करून त्यांस धरून आपल्या सरदारांच्या स्वाधीन केलें. हा बंडाचा प्रकार जनरल वाशिंगटन यांस कळला तेव्हां ते अतिशय पंचाइतींत पडले. शिपाई लोकांचे

हाल पाहून त्यांचा त्यांस अत्यंत कळवळा आला. इकडे कांग्रेस व प्रांतांचे गवर्नर यांस लिहून लिहून त्रास आला. आपण मध्यस्थी करावी तर ती व्यर्थ होण्याचा हा समय आहे, तेव्हां शिपायांनीं ऐकलें नाहीं ह्मणजे लष्करी खात्याची व आपली अब्रू जाणार, त्यांचें ह्मणणें कबूल करावें तर सर्व फौजेस हें वाईट उदाहरण होऊन मोठा अनर्थ होईल. अशी त्यांस पंचाईत पडली. कटाच्या वेळीं त्यांनीं आज हे लोक घरोघर गेल्यानें हिंवाळा असल्यामुळें विशेष नुकसान होणार नाहीं व तंट्याचा निकाल लष्करी खात्याकडून न होतां परस्पर सिविल खात्याकडून होईल तर होऊं द्यावा हें बरें, असें मनांत आणून आपण त्या कामांत न पडतां जनरल वेन यांस फौजेच्या दुसऱ्या आस पासच्या भागांवर चांगली नजर ठेवावी गडबड करणारांस थोडे दूर ठेवावें असें सुचविलें. शेवटीं पेन्सिल्वेनिया प्रांताच्या सिविल अधिकाऱ्यांनीं शिपाई लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें बंदोबस्त करून तंटा मिटविला.

परंतु हा एक तंटा या प्रकारानें मिटल्यामुळें फौजेंतील नर्सी प्रांतांतील शिपायांस उत्तेजन येऊन त्यांनीं पेन्सिल्वेनियाच्या शिपायांप्रमाणें दांडगावा करून त्यांच्या प्रमाणेंच मागणें केलें. हें वाशिंग्टन यांस कळतांच त्यांनीं हा अनर्थाचा प्रकार तावडतोब बंद करण्याचा निश्चय केला. त्यांनीं जनरल हौ यांस हुकूम फर्माविला कीं, तुह्मी एकदम त्यां दांडगावा करणारांवर चालून जाऊन त्यांचें ह्मणणें अगदीं न ऐकतां हत्यारें खालीं ठेवावयास लावून स्वाधीन व्हावयास लावा; मग तो प्रकार शांततेनें होवो अगर जबरदस्तीनें होवो, आणि त्यांच पैकीं कांहीं प्रमुख मनुष्यांस लागलीच सर्वां देखतां चव्व

करून फांशीं द्या. त्याप्रमाणें तो सरदार लागलाच चाल करून गेला. त्या लोकांस चोहोंकडून वेढून हत्यारें खालीं ठेवा ह्मणून हुकूम केला. त्या लोकांनीं थोडी टाळाटाळ केली. हें पाहून त्यानें त्यांस विचार करण्यास पांच मिनिटांचा मात्र अवकाश दिला. लोकांनीं भराभर हत्यारें आणून ठेविलीं आणि आपण स्वाधीन झाले. जनरल हौ यांनीं त्या वेळेसच चवकशी करून तीन मुख्य उद्योग करणारे ह्मणून शोधून काढून कोर्ट मार्शलापुढें विचार करून त्यांपैकीं दोघांस लागलीच गोळ्या घालून देहांत शासन केलें. एकाविषयीं पुष्कळ लोकांनीं त्याच्या चांगुलपणाबद्दल खात्री केल्यावरून त्यास क्षमा करून सोडून दिलें. आणि सर्व हकीकत जनरल वाशिंग्टन यांस कळविली. याप्रमाणें बंदोबस्त होऊन पुढील बखेडा अगदीं बंद झाला व स्वस्थता झाली. हें झाल्यावर जनरल वाशिंग्टन यांनीं पुनः कांग्रेस वगैरे सर्वांस फौजेचीं संकटें कळवून, परिणाम दर्शवून, योग्य रीतीनें पुरवठा करण्याविषयीं पत्रें लिहिण्याचा उद्योग सुरू केला. लोक तर शत्रूच्या फौजेच्या लुटालुटीनें त्रासले होतेच. तशांत घरच्या फौजेनेंही तसाच प्रकार केल्यानें त्यांचीं मनें विटून गेलीं होतीं. तरी देखील अमेरिकन लोकांत स्वदेशाविषयींचे प्रेम मोठें विलक्षण ह्मणूनच ते सर्व सोसून होईल तेवढें देत असतच. आतां अशा प्रसंगीं वाशिंग्टन यांच्या मनाच्या स्थितीचा व त्यांच्या उद्योगाचा विचार केला ह्मणजे त्यांजविषयीं अनुपम पूज्यबुद्धि उत्पन्न होते. त्याबद्दल वाचकांनीं थोडा विचार केला पाहिजे व त्या पुरुषाची खरी योग्यता काय आहे हें पाहिलें पाहिजे सत्कार्य, परमेश्वरकृपा, वै सत्याचा जय या विचारा

खेरीज चोंहोकडे निराशा दृष्टीस पडत होती. सहा सात वर्षांच्या सारख्या लढाईनें व तिच्या अनिवार व अत्यंत त्रासानें लोक निराश होऊन कंटाळले होते. शत्रूची वरचेवर चढती व सर्वांस रसातळीं मिळविण्याची पूर्ण उमेद दिसून येत होती. इकडे प्रजेनें राज्यकारभार पाहण्यास नेमलेली कांग्रेस मंडळी जरी स्वदेशप्रेमानें ओतप्रोत भरलेली होती तरी शक्तीनें एखादी गोष्ट करण्यास किंवा करविण्यास त्यांजमध्यें सामर्थ्य नव्हतें. इतकेंच नव्हे; पण त्यांच्या पैशाच्या नोटींस कोणी बाजारांत पुसेनासें झाल्यामुळें त्यांची चोहोंकडे व लष्करी खात्यांत तर विशेषेंकरून नापत झाली होती. शिवाय जगाच्या इतिहासांत अनुभवास आलेल्या वेळीं तो कान पिळी या न्यायामुळें सर्व पूर्ण अधिकार वाशिंग्टन यांस द्यावयास त्या स्वदेशभक्त मंडळीचें मन कचरत असे. जनरल वाशिंग्टन यांचें मुख्य काम स्वदेशास स्वातंत्र्य मिळवावयाचें व तें मिळण्याकडेच सर्वत्रांचे डोळे लागले असतां ज्यांच्या जीवावर हा हेतु संपादन व्हावयाचा त्या फौजेनें फारच हालअपेष्टा सोसल्या. परंतु, शेवटीं, त्या त्यांच्यानें सोसवेनाशा झाल्या याजमुळें ती दांडगाव्यावर आली. शेवटीं अशी स्वदेशाच्या फौजेची दुर्दशा आणि इकडे नवीन दोस्ती जडलेली व मदतीस आलेली अशी श्रीमान, चैनी व नांवाजलेली फ्रेंच फौज, तिशीं व तिच्या सरदारांशीं योग्यतेनें वागण्याचें अत्यंत संकट. कारण आपण दिलेलें वचन आपल्याकडून व आपल्या देशाकडून कसें पाळलें जाईल व आपली व आपल्या प्रिय देशाची अब्रू कशी राहील या धास्तींत ते नेहमीं असत. अशा सर्व प्रकारच्या अडचणींच्या स्थितींत जनरल वाशिंग्टन यांची खरी योग्यता

दिसून येते. त्यांच्या शिपाईगिरीच्या मोठेपणाची कीर्ति त्यांनीं मोठ्या रक्तपाताच्या लढाया मारल्या अशावर नाहीं. ती कीर्ति, त्यांनीं आपल्या अत्यंत संकटामध्यें आपली शिपाईगिरी शहाणपणाच्या व विचारीपणाच्या योगानें लढविली ह्या गोष्टीवर अवलंबून आहे. शिपाईगिरीविषयीं त्यांची जगांत केवढी कीर्ति झाली हें मोठमोठ्या नामांकित सरदारांच्या अभिप्रायावरून समजतें. युरोपांतील प्रशिया देशाचे वृद्ध व नामांकित सरदार व राजे फ्रेडरिक यांनीं आपली तसबीर जनरल वाशिंग्टन यांस नजर पाठविली तिजवर त्यांनीं " युरोपांतील सर्वांहून वृद्ध सरदाराकडून जगांतील सर्वांहून मोठ्या सरदारास, ही देणगी अगर नजर" असें लिहविलें होतें. परंतु गुणांविषयीं विशेष वाटाघाट आपणाला कर्त्तव्य नाहीं. त्यांस चोहोंकडून संकटांनीं ग्रासलें असतां त्यांचे जे सद्गुण दृष्टिगोचर झाले त्यांपैकीं ज्यांचा कित्ता सर्वत्रांनीं वळविण्यासारखा असून व जो गुण संपादन करण्याची आवश्यकता आहे तोच विशेषतः वाचकांपुढें आणावयाचा आहे. या प्रसंगीं त्यांचें स्वदेशप्रेम व स्वदेशभक्ति, त्यांचें विलक्षण धैर्य व त्यांची हिंमत व उमेद, त्यांची सहनाशीलता व त्यांची लोकांच्या कर्तृत्वाविषयीं साळढाळ, त्यांचा दृढनिश्चय, त्यांचा सतत व अस्खलित उद्योग, त्यांचा प्रामाणिकपणा व त्यांची निरपेक्षबुद्धि हे गुण ढळढळीत स्पष्टपणें दिसण्यांत येतात. लोक जरी कंटाळले, त्रासले व रागावले होते तरी या गुणांमुळें आमचा वाशिंग्टन आह्मांस या सर्व संकटांतून पार पाडील अशी त्यांची पूर्ण खात्री व भरंवसा होता, आणि त्याप्रमाणें परमेश्वरानें तें स्वातंत्र्यसंपादनाचें अपूर्व सत्कार्य त्यांजकडूनच सिद्धीस नेलें,

त्यांचें नांव अजरामर करून ठेविलें. अमेरिकन लोक तर त्यांस स्वदेशाचा पिता असें मानतात. असा किताब कोणास कधीं प्राप्त झाला नाहीं व यांजपेक्षां दुसरा कोणताही अधिक मोठा किताब जगांत असेल असें ह्मणवतही नाहीं. धन्य ते अमेरिकन लोक व धन्य धन्य ते वाशिंग्टन !!!

अशा बिकट स्थितींत सन १७८१ च्या आरंभीं तें लढाईचें काम बंद पडलें. वाशिंग्टन यांस अत्यंत भीति वाटून आपले साह्यकर्ते दोस्त यांजकडून आरमार, फौज व द्रव्य यांचें चांगलें साहाय्य मिळाल्यावांचून तें निभावणार नाहीं असें वाटूं लागलें. परंतु इतर साधारण लोकांत व वाशिंग्टन यांजमध्यें एक विलक्षण अंतर दिसतें तें असें कीं, अत्यंत संकटानें व्याप्त झालीं ह्मणजे सामान्य मनुष्यें हात पाय गाळून निराश होऊन बसतात, परंतु वाशिंग्टन यांस संकटाच्या महत्वाच्या मानानें अधिकाधिक उत्तेजन, हिंमत येऊन ते विशेष झटून उद्योग करीत. त्यांला स्वतांची खात्री वाटे, तशीच कार्याच्या न्याय्यतेविषयीं व चांगुलपणाविषयीं त्यांची खात्री होती. त्याप्रमाणेंच, आपल्या पक्षास परमेश्वराचें संरक्षण व साहाय्य आहे अशीही त्यांची खात्री होती, याजमुळें कधीं तरी आपल्यास आनंदाचा दिवस येईल अशा पूर्ण आशेनें ते उद्योग करीत असत.

सन १७८१ ह्या सालीं न्यूयार्कच्या आसपास व दक्षिणेकडे अशी दोहोंकडे लढाई चालू होती. न्यूयार्ककडे सर हेनरी क्लिंटन होते व दक्षिणेकडे लार्ड कार्नवालिस होते. वाशिंगटन उत्तरेकडे न्यूयार्क जवळ होते. इंग्रज लोकांचें ठाणें न्यूयार्क येथून उठविण्याचा त्यांचा फार दिवसाचा विचार होता व तोच बेत त्यांनीं फ्रेंच सरदारांबरोबर केला होता,

परंतु इंग्रज लोकांचें आरमार तेथें अधिक आल्यामुळें तो बेत मागें पडला होता. तथापि, जेव्हां प्रसंग येईल तेव्हां हात साधून घेण्याचा त्यांचा विचार होताच. कारण तें बंदर फार महत्वाचें होतें आणि तें हातीं आल्यावर बहुधा लढाई संपेल असेंही त्यांस वाटत होतें. मनांत तर हा विचार; परंतु अडचणींनीं त्यांस जसें काय जेरच करून टाकिलें होतें. फौज कमी होत चालली होती; आणि जी बाकी राहिली होती तिजमध्यें असंतोष अधिकाधिक होत चालला होता. हें चालू असतां एकंदर संस्थानांत अगर प्रांतांत फाटाफाटीचा भयंकर प्रसंग येण्याची भीति उत्पन्न झाली. वरमांटचा प्रांत व न्यूयार्कचा प्रांत यांजमध्यें प्रथम सरहद्दीच्या संबंधानें तंटा उत्पन्न झाला. आणि तो वाढून कांग्रेसनेंही त्यांत मध्यस्थी केली; परंतु तंटा न मिटतां निकरावर प्रकरण आलें. हा प्रसंग सर्वच इमारत बसवावयाचा, असें पाहून जनरल वॉशिंग्टन यांनीं वर्मांटचे गवर्नर यांस खासगी रीतीनें या तंट्याचीं मूळ व खरीं कारणें काय आहेत व लोकांचा मानस काय आहे हें विचारलें. त्यांनीं स्पष्टपणें असें कळविलें कीं, वर्मांटच्या लोकांच्या मनांत न्यूयार्कच्या अधिकाराखालीं राहावयाचें नाहीं. असा त्यांचा निश्चय आहे, आणि याजकरितां मारामारीचा प्रसंग आला तरी चिंता नाहीं. फारतर काय, इंग्रज सरकारच्या ताब्यांतील कानडाप्रांतास जाऊन मिळूं, परंतु न्यूयार्कच्या ताब्यांत राहणार नाहीं. आतां हा प्रकार अनर्थाचा म्हटला पाहिजे. परंतु वाशिंग्टन यांनीं वर्मांटचे गवर्नर यांस एक पत्र लिहिलें त्यांत शहाणपण, विचार निःपक्षपात व एकंदर चांगुलपणा इतका ओतप्रोत भरला होता कीं, वर्मांटच्या लोकांस शांत होऊन विचारच करावा लागला.

आणि शेवटीं त्यांनीं कांग्रेसचें ह्मणणें मान्य केलें. याप्रमाणें वाशिंग्टन यांच्या शहाणपणानें, उद्योगानें, मध्यस्थीनें व वजनानें मोठा अनर्थ टळला व सर्वत्र शांत झालें.

तसाच अमेरिकन लोकांचा उघडपणें व वाशिंग्टन यांचा आंतून खासगी रीतीनें फ्रेंच लोकांकडून आरमाराची, फौजेची व पैशाची मदत आणखी मिळावी ह्मणून उद्योग चालला होता. कर्नेल लारेन्स नांवाचे एक उत्सुक, स्वदेशभक्त, व उत्तम शिपाई व विद्वान गृहस्थ यांस फ्रान्सच्या दरबारांत युनैटेड स्टेट्स देशाची सांप्रतची अडचणीची स्थिति कळवून मदत मिळविण्याकरितां कांग्रेसनें मुद्दाम पाठविलें होतें. हे फ्रान्स देशास गेले तेव्हां जनरल वाशिंग्टन यांनीं सर्व कच्ची स्थिति दर्शवून पुढच्या परिणामाविषयीं अनुमान पुढें ठेवून साहाय्याची आवश्यकता उघड होईल असें एक सुंदर पत्र यांजजवळ दिलें. त्या पत्रांत त्यांनीं असें दर्शविलें कीं यूनैटेडस्टेट्सनें आपल्या सामर्थ्यापेक्षां अधिक श्रम केले व सामानसुमान व द्रव्यादिकांचा पुरवठा केला; त्यांच्या मुलुखाचें जें आतां उत्पन्न होईल तें लढाई पुढें चालविण्यास पुरें पडणार नाहीं; प्रजेपासून सक्तीनें पुरवठा मिळविण्याचे वेळोवेळीं प्रसंग आले; परंतु तो प्रकार या उपर चालविल्यास लोकांची अत्यंत नाखुशी होऊन घोंटाळा होईल आणि अमेरिकन व त्यांचे दोस्त फ्रेंच लोक यांचा उद्योग सिद्धीस जाणें कठीण पडेल; हल्लीं जो सामानाचा पुरवठा होईल तो पुरेसा न होता फौजेचे फार हाल होतील व ते हल्लींच कंटाळून दांडगाव्याच्या प्रकारावर आले आहेत; या सर्व कारणांमुळें फ्रेंच सरकाराकडून कर्जरूपी सहाय्य मिळण्याची अत्यंत आवश्यकता आहे व त्याच्या खालोखाल लढाईंत जय

मिळण्यासाठीं आरमार व फौज यांची मदत पाहिजे. तसेंच अशा प्रसंगीं जें कर्ज मिळेल त्याची फेड करण्याचें सामर्थ्य यूनैटेड-स्टेट्समध्यें असून फेडण्याची पूर्ण इच्छाही त्यांस आहे तेव्हां तें फिटेल याजविषयीं शंका घ्यावयास नको. अशा प्रकारचा मजकूर त्या पत्रांत होता. या पत्राचा उपयोग होऊन कर्नल लारेन्स यांच्या उद्योगास डाक्टर बेंजामिन फ्रांक्लिन हे त्या-दरबारीं यूनैटेडस्टेट्सच्या तर्फे वकील होते त्यांच्या वजनानें फळ आलें. फ्रान्सच्या सरकारानें स्वतां अजमासें पंचवीस लक्ष रुपये कर्ज दिलें व हालंडच्या संस्थानाकडून चाळीस लक्ष मिळालें त्याची जामीनगत पतकरली. याप्रमाणें द्रव्यसाहाय्य मिळालें. शिवाय आरमाराची व फौजेचीही चांगली मदत मिळाली. ही मदत मिळण्याचें ठरल्याबद्दलचें वर्तमान कळल्यावर जनरल वाशिंग्टन व फ्रेंच सरदार कौंट डी राचोंबो यांनीं भेटून विचार करून न्यूयार्क शहरास वेढा घालण्याचा बेत केला.

या बेताप्रमाणें वाशिंग्टन यांनीं आपल्याकडून निराळ्या संस्थानांस पत्रें लिहून आपापल्या मुलखांतून मनुष्यांची भरती करावी ह्मणून सुचविलें. परंतु त्यांच्या कपाळीं सर्व गोष्टी नीट जमून येण्याचें नव्हतें त्याप्रमाणें लोकांकडून मिळावी तशी मदत मिळाली नाहीं. याजमुळें वाशिंग्टन यांस खालीं पाहण्याचा व अत्यंत दुःख वाटण्याचा प्रसंग आला. शिवाय न्यूयार्क शहरास वेढा घालण्याच्या कामाच्या सुरुवातीस फार उशीर झाला. जुलई अखेरीस सरासरी जिकडून तिकडून बेताची जमवाजमव झाली आणि फक्त फ्रेंचलोकांचें आरमार येण्याची काय ती वाट राहिली होती. हजर असलेल्या फौजेची बेताप्रमाणें व्यवस्था लावून सर्व तयारी करून ठेविली होती.

फ्रेंच सरदार कौंट डी ग्रासे यांचें आरमार येऊन त्यानें जल-मार्ग रोंखला असता ह्मणजे इंग्रजाचे सरदार सर हेनरी क्लिंटन यांस कोंडून पडल्यामुळें मुकाट्यानें हस्तगत व्हावें लागलें असतें आणि मग अर्थात दक्षिणेकडील फौजही हस्तगत होऊन लढाईची समाप्ति झाली असती. परंतु यांच्या नशिबीं नेहमीं निराशा त्याजमुळें कौंट डी बारस यांच्या हाताखालील आरमार यास चेसपीककडे जाण्यास सुचविलें होतें; पण त्यांची तबेत तसें करण्यास लागली नाहीं याजमुळें वाशिंग्टन यांची निराशा होऊन वाईट वाटलें होतें. तों पाठींमागून फ्रान्स देशाहून येणारे सरदार आपल्या आरमारांसह न्यूयार्क जवळ यावे अशी इच्छा होती ती देखील ऐन प्रसंगीं फसली ह्मणून सर्व बेत व्यर्थ होऊन जनरल वाशिंग्टन यांचा पूर्ण हिरमोड होऊन त्यांस पराकाष्टेचें वाईट वाटलें. जनरल वाशिंग्टन यांस तारीख १४ आगस्ट रोजीं कौंट डी ग्रासे यांचें पत्र आलें त्याजवरून त्यांचा मानस न्युयार्कच्या बाजूकडे न येतां चेसापिकबे अखाताकडे आरमार नेण्याचा आहे असें कळलें. तें पत्र वाचीत असतां ते इतके त्रासले व त्यांस इतकें वाईट वाटलें कीं, जवळ बसलेल्या मंडळीस तो विलक्षण प्रकार पाहून उठून बाहेर जावें लागलें. फार दिवसांचा बेत, तशांत सर्व जमाजम होऊन तयारी झालेली; शिवाय, इंग्रजांच्या मदतीस त्याच सुमारास तीन हजार हेशियन लोक आले होते. हे नवीन आलेले लोक न्यूयार्कमध्यें न शिरतां सहज यांच्या हातीं सांपडले असते व लढाईचा सर्व निकाल झाला असता. परंतु सर्व बेत फसला. इंग्रजांस ही नवीन मदत आली; आणि अमेरिकन लोकांस मदत करणारें जें फ्रेंच आरमार तें

दुसरी कडे गेले. तेव्हां जय येण्याची आशा नाहींशी झाली. व तो विचार एकंदर सोडून द्यावा लागला आणि दुसरा बेत योजावा लागला.

हा उत्तरेकडील न्यूयार्कबद्दलचा बेत व्यर्थ झाला तेव्हां दक्षिणेकडे लार्ड कार्नवालिस यांच्याकडील फौजेची स्थिति तशाच प्रकारची आहे, आणि आपण उद्योग केला तर आपला लाग साधेल असें मनांत येऊन ते लागलेच त्या उद्योगास लागले. कांहीं झालें तरी हात पाय गाळून उगीच विचार करीत बसावयाचें नाहीं असा त्यांचा स्वभाव होता. हा दुसरा बेत मनांत आल्याबरोबर सदरील हिरमोडाच्या दुसऱ्याच दिवशीं ह्मणजे तारीख १९ आगस्ट रोजीं नव्या बेताच्या उद्योगास त्यांनीं मार्किस डी लाफेयट यांस पत्र लिहून सुरुवात केली. दक्षिणेकडे सौथ कारोलैना प्रांतांत व वर्जिनिया प्रांतांत लार्ड कार्नवालिस यांनीं पहिल्यानें तर अतिशय त्रास देऊन लोकांस अगदीं बेजार करून सोडलें होतें. दाक्षिणेकडील फौजेवर प्रथम अमेरिकेकडील जनरल गेट्स यांची योजना झाली होती; परंतु त्यांची पूर्वींची कीर्ति तिकडे कायम राहिली नाहीं. त्यांनीं अविचार करून क्यामडन येथें लार्ड कार्नवालिस यांशीं लढाईचा प्रसंग आणिला त्याचा परिणाम फार वाईट झाला. त्यांत जनरल गेट्स यांचा पराभव होऊन कांहीं चांगले सरदार मारले जाऊन सौथ कारोलैना हा प्रदेश त्यांस सोडून द्यावा लागला. पुढें कांग्रेसनें या सरदाराच्या वर्तणुकेविषयीं कोर्ट नेमून चवकशी करावयास वाशिंगटन यांस सांगितलें आणि त्यांच्या जागीं दुसरा तुह्मांस वाटेल तो सरदार नेमा

असा हुकूम केला. त्या हुकमाप्रमाणें त्यांनीं जनरल नथ्यानियल ग्रीन नांवाच्या सरदारास त्या फौजेवर नेमिलें. हा सरदार फार हुशार व अत्यंत स्वदेशभक्त होता. आतां ज्या कामावर त्याची नेमणूक झाली त्यांत अपेशाखेरीज कांहीं वांव्यास यावयाचें नाहीं असें सर्वांस वाटत होतें. कारण तो सर्व प्रदेश शत्रूच्या सरासरी पूर्ण हातांत होता व त्यांतील असंतुष्ट लोक उठून दांडगावा करावयास लागले होते. तेव्हां प्रजेस घरच्यांचा व बाहेरच्यांचा असा दुहेरी जाच होता. फक्त कोठें कोठें मेरियन, संटर, मोलट्री, पिकन्स, हारी, शेलबी, क्लीवलंड वगैरे स्वदेशभक्त जागोजाग थोड थोड्या लोकांच्या टोळ्या बरोबर घेऊन शत्रूस त्रास देत असत. अशा समयीं जनरल ग्रीन यांनीं शत्रूच्या हातून तो प्रदेश परत घेण्याची कामगिरी पतकरली अगर अपेशाचा वांटा उचलला. त्यांनीं मार्गन व हावर्ड व दुसरे स्वदेशभक्त यांची मदत घेऊन काम सुरूकेलें. त्यांचे व शत्रूचे सामने वारंवार होत; त्यांत शत्रूचा जय होई तरी त्यांचा अत्यंत नाश होई व त्यांस मागें पाऊल घ्यावें लागे. जनरल ग्रीन हा सतत झटणारा, हुशार व कधीं न थकणारा असा पुरुष असल्यामुळें झोंप व विश्रांति न घेतां त्यानें इंग्रजांचा एकसारखा पाठलाग चालविला होता. ऐन गर्मीच्या दिवसांत तर कांहीं महिने पर्यंत त्यास कपडे देखील बदलावयास झाले नाहीं. जनरल ग्रीन यांनीं लार्ड कार्नवालिस यांची अशी सारखी नऊ महिनें पाठ पुरविली आणि लार्ड कार्नवालिस यांचे पायच कारोलैना मधून अगदीं खणून काढून टाकले. शेवटीं शत्रूस वर्जीनिया प्रांतांत यार्कटौन या

ठिकाणीं बचावाकरितां स्वतःस कोंडून घ्यावें लागलें. हा प्रकार सरासरी उत्तरे कडील बेत फिसकटावयाच्या वेळेसच झाला. याजमुळें लार्ड कार्नवालिस यांची स्थिति मनांत आणून जनरल वाशिंग्टन यांनीं एक नवीन बेत चालू केला.

परंतु हा नवीन बेत चालू ठेवित असतां पहिला न्यूयार्कचा बेत कायम आहे असें दाखवावयाचें होतें. कारण तसें केलें नसतें तर तिकडून लार्ड कार्नवालिस यांस फौजेची कुमक गेली असती. सर हेनरी क्लिंटन यांचा न्यूयार्कास वेढा पडणार ह्मणून पक्का ग्रह झालेला होता. व त्यांस चाललेल्या तयारी वरूनही तसेंच वाटत होतें. शिवाय जनरल वाशिंग्टन यांनीं आपल्या सरदारांस लिहिलेलें एक पत्र त्यांच्या हातीं सांपडलें होतें त्यामुळें त्याबद्दलची त्यांची पक्की खातरी होती व त्या धोरणानें त्यांनीं बंदोबस्त राखून फौज लार्ड कार्नवालिस यांजकडे न पाठवितां आपल्याकडेच ठेविली होती. इकडे वाशिंग्टन यांनीं साधारण बंदोबस्त व देखावा कायम राहील अशी व्यवस्था करून आगष्ट अखेरीस दाक्षिणेकडे ते बरीच फौज घेऊन गेले. न्यूयार्क येथील इंग्लिश सरदारास ही व्यवस्था देखील कांहीं तरी फसवून घोटाळ्यांत घालण्याकरितां असावी असें वाटलें. सर हेनरी क्लिंटन यांस न्यूयार्क येथें भीति नाहीं असें वाटल्याबरोबर लार्ड कार्नवालिस यांच्या मदतीस ते फौज ताबडतोब पाठवितील असें मनांत आणून जनरल वाशिंग्टन त्वरा करून चेसापिकबेकडे गेले. जर्सी व पेन्सिल्वेनिया प्रांतांतून जलदीनें प्रवास केला. आणि फ्रेंच जाहाजांची मदत घेऊन तारीख १४ सेप्टेंबर रोजीं ते विलियम्सबर्ग येथें गेले. तेथून त्यांनीं फ्रेंच आरमाराच्या सरदाराकडे जाऊन पुढचा

बेत ठरविला. आणि त्या विचाराप्रमाणें जनरल वाशिंग्टन यांनीं तारीख २८ सेप्टेंबर रोजीं विलियम्सबर्ग येथून निघून शत्रूच्या यार्कटौन या ठिकाणाजवळ दोन मैलांवर जाऊन तळ दिला. बाकीच्या सरदारांसही निरनिराळीं ठिकाणें नेमून देऊन फ्रेंच आरमाराचे सरदार कौंट डी ग्रासे यांनींही जवळच पाण्यांत आपलें ठाणें दिलें. ता० ६ आक्टोबरपासून शत्रूचे तोफांचे मोरचे सुरू झाले. दररोज ते हळूहळू पुढें पाऊल टाकीत चालले. इकडे शत्रूची फौज जागा सोडून आंतच जाऊं लागली. फ्रेंच आरमारानें जलमार्ग बंद केला त्यावेळेस लार्ड कार्नवालिस यांची निराशा व्हावयास लागली. त्यांनीं संकटाच्या समयास पळून जाण्यास मार्ग ठेविला नाहीं हा त्यांजवर मोठा दोष आला; इंग्लिश आरमार आपणास सोडविण्यास समर्थ आहे अशा भरंवशावर ते फसले. अमेरिकन व फ्रेंच लोकांनीं सारखा तोफांचा मार करून व हल्ले करून बुरुज घेण्याचा सपाटा चालविला. तारीख १४ आक्टोबर रोजीं एका बुरुजावर अमेरिकन लोकांनीं व दुसऱ्यावर फ्रेंच लोकांनीं हल्ले करून शत्रूचा सारखा गोळ्यांचा मार चालू असतां त्यास न जुमानतां ते घेतले, आणि बरेच लोक सांपडले ते कैद करून आणिले. इंग्लिश लोकांनीं तारीख १५ रोजीं तोफांवर हल्ला केला; परंतु त्यांस लागलेंच परत जावें लागलें. दोहीकडचीं कांहीं मनुष्यें मेलीं व थोडीं शत्रूच्या हातीं लागलीं. पुढें दोन दिवस तोफा सारख्या चालू होत्या. शेवटीं तारीख १७ रोजीं लार्ड कार्नवालिस यांजकडून हस्तगत होण्याच्या संबंधाचें पहिलें पत्र जनरल वाशिंग्टन यांस आलें. त्याजवर त्यांनीं, आपलें कसें काय म्हणणें

असेल तें प्रथम लिहून यावें ह्मणजे ठराव करण्याकरितां कमिशनर नेमण्यांत येतील व तें लिहून येई तोंपर्यंत दोन तास लढाईचें काम बंद राहील असें कळविलें. नंतर उत्तर येऊन अमेरिकन लोकांकडील कर्नल लॉरन्स व फ्रेंच लोकांकडचे वैकौंट डीनोयेस असे दोघे हस्तगत होण्याच्या संबंधानें व्यवस्था, ठराव व शर्ती ठरविण्याकरितां कमिशनर नेमिले. तारीख १९ आक्टोबर रोजीं दोनप्रहरच्या सुमारास ठरावाच्या करारपत्रावर सह्या झाल्या. एक वाजतां दोन कोट स्वाधीन झाले आणि तीन वाजतां इंग्लिश फौजेनें हत्यारें ठेवून हस्तगत होण्याचा विधी झाला. हा प्रसंग अमेरिकन व फ्रेंच लोकांस अत्यंत आनंदाचा व भूषणाचा असून इंग्रज लोकांस अत्यंत दुःखाचा व अपमानाचा होता. याजमुळें जनरल वाशिंग्टन यांनीं हें अत्यानंदाचें शुभवर्तमान लागलेंच त्याच वेळेस लिहून, कागदपत्रांच्या नकलांसह त्यांचा आडिकांग् कर्नल टिलघमन यांजबरोबर तावडतोब कांग्रेसकडे पाठविलें आणि कच्ची विशेष हकीकत हे सरदार मुखजबानीं सांगतील असें कळविलें. या प्रसंगीं यार्कटौन येथें लार्ड कार्नवालिस यांची फौज सात हजार होती व १६० तोफा होत्या. हें शुभवर्त्तमान सर्व देशभर तावडतोब पसरलें आणि जागोजाग मोठा आनंद झाला.

फिलेडेल्फिया शहरांत त्याच रात्रीं बारा वाजतां बातमी पोंचली आणि रस्तोरस्तीं पाहरेकरी "बारा वाजले; आणि आनंददायक प्रातःकाळ आला, लार्ड कार्नवालिस हस्तगत झाले" असें ओरडत गेले. लोक लागलेच जागे होऊन दिवे लावून जागोजाग रस्त्यांत फिरून मित्रांस भेटून प्रेमानें आलिंगनें देऊं लागले व त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु स्रवूं लागले.

याप्रमाणें वायुवेगानें सर्व देशांत शहरांतून, गांवांतून, खेडयापाडयांतून, सांदी कोपऱ्यांतून ही आनंदाची वार्त्ता पसरली आणि जिकडे तिकडे "वाशिंग्टन यांनीं देश मुक्त केला. ईश्वर त्यांचें कल्याण करो" असे आशिर्वादांचे आनंदीआनंदोद्गार लोक काढूं लागले. सारांश यूनैटेटस्टेट्सभर सर्वत्र आनंदीआनंद होऊन गेला.

याप्रमाणें आठ वर्षांच्या लढाईचा शेवट झाला आणि यूनैटेटस्टेट्स स्वातंत्र झालें. तेथील लोकांनीं तन मन धनादि सर्वस्व आपल्या स्वदेशाच्या स्वतंत्र्याकरितां वेंचलें आणि जगास कित्ता घालून ठेविला. जनरल वाशिंग्टन वगैरे स्वदेशभक्त मंडळीनें जी अनुपम व निरपेक्ष स्वदेशभक्ति दाखविली ती अवर्णनीय आहे. वाशिंग्टन यांनीं आपल्या चाकरीबद्दल पगार घेतला नाहीं हें तर प्रसिद्ध आहेच; परंतु त्यांच्या घरी त्यांची ईस्टेट शेतें भातें वगैरे सर्व व्यवस्था पहाण्याकरितां त्यांचा नातेवाईक एक मि. लंड वाशिंग्टन नांवाचा गृहस्थ होता त्यानें शत्रूची फौज सामुग्री मागण्यास आली ती घरादारांचा सर्वस्व सत्यानाश न व्हावा ह्मणून दिली. ती गोष्ट वाशिंग्टन यांस कळल्याबरोबर त्यांनीं त्यास अतिशय रागानें पत्र लिहिलें कीं, माझे तुह्मी मुक्त्यार असतां शत्रूस सामुग्री देऊन अत्यंत वाईट उदाहरण दाखविलें. त्यापेक्षां तुह्मीं सामुग्री न देतां शत्रू जबरदस्तीनें घेऊन घरादारांस व धान्यांच्या कोठारास आग लावून सर्व नाश करते तरी मला फार आनंद झाला असता. याजवरून स्वदेशाच्या हिताकरितां सर्वस्व गेल्याची पर्वा त्यांला नवती हें स्पष्ट आहे. तसेंच दुसऱ्या एका मोठ्या अंमलदाराचें एक चमत्कारिक उदाहरण आहे तें येथें सांगितल्या

वांचून राहवत नाहीं. तें वाचून, तेव्हांचे अमेरिकन लोक स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं आपल्या सर्वस्वाची आहुती देण्यास कसे तयार झाले होते हें चांगलें दिसून येईल. नेल्सन नांवाचा एक मिलिशिया फौजेचा सरदार होता. त्याचा फार सुंदर व मोठा वाडा शेवटच्या लढाईच्या ठिकाणीं यार्कटौन येथें होता. त्या शहरावर अमेरिकन लोकांच्या तोफांचा मार चालला होता व त्या वाड्यांत शत्रूचें ठाणें होतें. तेव्हां गोलंदाज लोक तो वाडा वांचवून गोळे मारतात हें पाहून त्या सरदारानें त्या घरांत प्रत्येक गोळा मारणारास दहा रुपये बक्षिस देतों असें बोलून आपल्या वाड्यांत गोळे मारविले. त्यामुळें लागलेच थोड्यां वेळांत शत्रूस तो सोडून देणें भाग पडलें. तो वाडा गोळ्यांच्या योगानें अगदीं जाळीसारखा होऊन गेला. काय ही कृति आणि केवढी ही स्वदेशभक्ति !!! अशा योग्य पुरुषांची स्तुति करावी तेवढी थोडीच. असो. दुसऱ्या दिवशीं या जयप्राप्तीबद्दल लष्करांतलि छावण्यांत जे सरदार व शिपाई कांहीं कारणानें अटकेंत होते त्यांना सोडावें आणि परमेश्वराचे उपकार मानण्याकरितां योजना करावी असा जनरल वाशिंगटन यांनीं हुकूम फरमाविला पुढें कांग्रेसनें सर्व देशांत परमेश्वराचे आभार मानण्याकरितां दिवस नेमून त्या जगदीशाची आनंदानें उपकार मानून स्तुति केली.

हा आनंदोत्सव झाल्यावर लष्कर हिंवाळ्यानिमित्त छावण्यांतून राहण्यास निरानिराळ्या ठिकाणीं गेलें. फ्रेंच फौजेचा कांहीं भाग क्कौंट डी ग्रसे या सरदाराबरोबर वेस्ट इंडीजकडे गेला व बाकीची फौज वसंतऋतु सुरू होई तोंप-

र्यंत वर्जिनिया प्रांतांत राहिली, आणि पुढें कांहीं दिवसांनीं अमेरिकन लोकांचा दुवा घेत व जगास उत्तम उदाहरण दाखवून स्वदेशीं परत गेली. ही लढाईची अखेर झाल्यामुळें युरोपांत व अमेरिकेंत स्वस्थता झाली. युरोपांत फ्रान्स, स्पेन व हालंड देश अमेरिकेकरितां इंग्लंडच्या विरुद्ध झाले होते. लढाई संपल्यामुळें सर्व तंटा मिटला. इकडे वाशिंग्टन, फ्रेंच फौजेस सोडून उत्तरेकडे हडसन नदीवर, सर हेनरी क्लिंटनच्या फौजेच्या तोंडावर प्रसंग विशेषीं लढाईस तयार असावें अशा बेतानें जाऊन राहिले. तेथें असतां ते इतर लोकांप्रमाणें स्वस्थ बसले नाहींत. यार्कटौन येथील लढाई शेवटची असें सर्व मानीत होते, तथापि इंग्रज लोकांनीं तसें न मानल्यास व त्यांनीं पुनः हिंवाळा आटपल्यावर लढाईचा क्रम चालू केल्यास अनर्थ व घात होईल हें मनांत आणून त्यांनीं कांग्रेस वगैरेस समजून उमजून सावधगिरी व तयारी ठेवण्याकरितां मोठ्या निकरानें लिहिलें वाशिंग्टन यांनीं आपल्याकडून करावयाचें तेवढें करून शहाणपणा व धूर्तता दाखविली. परंतु कांग्रेसनें त्या बेताची तयारी ठेविली नाहीं. परंतु परमेश्वरसत्तेनें लार्ड कार्नवालिस यांचा पराभव झाल्यावर इंग्लंडांतील पार्लिमेंटांत प्रधानमंडळाच्या विरुद्ध फार लोक झाले, आणि तंटा मिटण्याकडेच प्रवृत्ति झाली व अनर्थ संपला. शेवटीं वादविवाद होऊन इंग्लिश पार्लमेंटामध्यें बहुमतानें असा ठराव झाला कीं अमेरिकेच्या मुलखांत जे लढाई चालविण्याविषयीं सुचवितील व सल्ला मसलत देतील ते आपल्या देशाचे व राजाचे शत्रू आहेत;

ही पार्लिमेंट सभा मानील. याजवरून लढाईची समाप्ति झाली आणि अमेरिकेंतील फौजेवर सर गाय कार्लेटन या सरदाराची नेमणूक होऊन त्यांस पुढील स्वस्थतेच्या विचाराविषयीं बोलणीं चालूं करण्याबद्दल हुकूम झाला. त्याप्रमाणें त्यांनीं तहाचीं बोलणीं चालविण्यास आपल्या तर्फे मुक्त्यार नेमावे ह्मणून कांग्रेसकडे पत्रव्यवहार सुरू केला. परंतु फ्रेंच व अमेरिकन लोकांमध्यें दोस्तीचा जो प्रथम तह झाला त्याच्या योगानेंएका राष्ट्रास परस्पर तह करण्याचा अधिकार नव्हता. दोन्हीं राष्ट्रांच्या विचारानें तह व्हावयाचा असा ठराव होता. त्याजमुळें या तहाच्या संबंधीं बोलणीं पारिस येथें सुरू होऊन काम चालू झालें. पुढें तारीख नोव्हेंबर सन १७८२ इसवी रोजीं, यूनैटेड स्टेट्स याच्या तर्फेचे मुक्यार मेसर्स जान आडम्स, बेंजामिन फ्रांकलिन, जान जे व हेनरीं लारेन्स आणि ग्रेटब्रिटन तर्फेचे मुकत्यार मेसर्स फिट्झरबर्ट व आसवाल्ड त्यांजमध्यें तहाचीं मूळ कलमें ठरलीं. परंतु तहनाम्यावर सह्या होऊन अगदीं अखेर निकाल होण्यास बरेच दिवस लागले. सन १७८३ च्या सेप्टेंबरच्या ३० व्या तारखेस तहनाम्यावर सह्या होऊन निकाल झाला. त्या तहनाम्यांत ग्रेटब्रिटनानें यूनैटेडस्टेट्स देशाचें स्वातंत्र्य मान्य करून त्याजवर कोणत्याही प्रकारची आपली राज्यसत्ता नाहीं असें कबूल केलें.

याप्रमाणें यूनैटेड स्टेट्स या देशांतील लोकांनीं अपरिमित दुःखें भोगून, असंख्य संकटें सोसून, विलक्षण अडचणींचा व ...शेचा वारंवार त्रास साहून, अनेक सशक्त स्वदेशभक्तांचे बळी देऊन, अप्रतिम व अमूल्य स्वातंत्र्य या जगांतील रत्न तें

संपादन केलें. स्वातंत्र्यावांचून मनुष्यप्राणी इतर जनावरां-. प्रमाणेंच होय. स्वातंत्र्याकरितां हातावर शीर घेऊन लढले ह्मणून यूनैटेड स्टेट्समधील लोक पृथ्वींतील स्वतंत्र राष्ट्रांतील राष्ट्र झाले आहेत. त्यामुळेंच ते आज मोठ्या योग्यतेस, उदयास व भरभराटीस आले आहेत. या स्वातंत्र्य प्राप्त्यर्थ अमेरिकन लोकांस अतोनातच मोल द्यावें लागलें खरें; परंतु त्यांस जें सुख, जी योग्यता व जो मान प्राप्त झाला आहे तोही तशाच बेताचा व महत्वाचा आहे. राजाच्या ताब्यांतील प्रजा त्याच्या जुलमामुळें त्रस्त होऊन, अन्याय सहन होईनासा झाल्यामुळें दांडगाईस प्रवृत्त झाली आणि योग्य व रास्त हक्क मागत असतां राजानें सक्ती करून प्रजेचा नाश करण्याचा क्रम सुरू केला तेव्हां ती त्याचा अधिकार झुगा[रून] देऊन स्वतंत्र झाली आणि स्वातंत्र्याकरितां आठ वर्षें सारखी लढून विजयी झाली अशी गोष्ट जगांत पूर्वी क्वचितच घडली असेल. आतां त्यांची अनुपम व खरी स्वातंत्र्यप्रीति, विलक्षण व अप्रतिम स्वदेशभक्ति, त्यांचे सद्गुण व त्यांचा वाशिंग्टन, फ्रांकलिन प्रभृति निरपेक्ष व देशाकरितां तनमनधनादि सर्वस्व वेंचण्यास तयार असणारे जे थोर व प्रमुख पुरुष त्यांवर पूर्ण भरंवसा आणि सत्कार्यास यशदाता व सर्व जगाचा अधिपति परमेश्वर साहाय्य करील अशी त्यांची पक्की खात्री, यांच्या योगानें हें सर्व त्यांस प्राप्त झालें. या यशप्राप्तीचा मोठा वांटा जनरल वाशिंग्टन यांचा आहे. फार तर काय त्या देशास व लोकांस स्वातंत्र्य प्राप्त करून देऊन त्यांना योग्य राज्यपद्धति घालू[न] देऊन उत्कर्ष व सुख यांचा उपभोग मिळे असें करून देण[्या] च्या मार्गास लावण्याकरितांच त्यांचा अवतार होता अस

ह्मणण्यांत दोष होईल असें नाहीं. तस्मात् धन्य तो देश, धन्य ते लोक व धन्य तो सत्पुरुष !!!

---

## भाग ७ वा.

### लढाई आटपल्यानंतरची व्यवस्था.

पुढें नोवेंबरच्या अखेरीस, वाशिंग्टन हे पुढील मदतीविषयीं कांग्रेसशीं विचार करण्याकरितां फिलेडेल्फिया येथें जाऊन राहिले. तेथून त्यांनीं निरनिराळ्या प्रदेशांस सामानाचा वगैरे पुरवठा करण्याविषयीं पत्रें पाठविलीं, सन १७८२ च्या आरंभीं एक विलक्षण गोष्ट घडून आली; तिजमुळें वाशिंग्टन यांस अतिशय राग येऊन त्यांच्या दृढनिश्चयामुळें तें प्रकरण फार लांब वाढलें. अमेरिकन फौजेपैकीं क्यापटन हडी नांवाचे सरदार एका लहानश्या टोळीसह टाम नदीच्या कांठीं एका ठिकाणीं असतां न्यूयार्क येथील इंग्रज लोकांनीं येऊन त्यांजवर हल्ला केला. बरेच वेळपर्यंत या सरदारानें आपला बचाव केला, परंतु शेवटीं तो त्यांच्या हातीं सांपडला. त्यांनीं त्यास न्यूयार्कमध्यें नेऊन कैदेंत ठेविलें. पुढें तारीख १२ एप्रिल सन १७८२ रोजीं तेथील लोकांनीं क्यापटन लिपेन काट यांच्या बरोबर कांहीं लोक देऊन त्यांच्या ताब्यांत क्यापटन हडी यांस दिलें, आणि त्यांस शहराबाहेर पाठवून त्यांनीं त्यांस एका टेंकडीवर नेऊन फांशीं दिलें. ही गोष्ट अत्यंत गैर झाली. लढाईच्या रिवाजाबाहेर प्रकार झाला याजमुळें जनरल वाशिंग्टन यांनीं सर हेनरी क्लिंटन यांस स्पष्ट, निश्चयाचें व निरवरमरीत पत्र लिहिलें. त्यांत असें होतें कीं, ज्या

सरदाराच्या हातून हा गुन्हा घडला त्यास आमच्या स्वाधीन करावे. नाहींतर तुमच्या फौजेपैकीं जे सरदार आमच्या कैदेंत आहेत, त्यांजपैकीं क्यापटन हडी यांच्या योग्यतेचा सरदार घेऊन त्यास विनाकारण शासन करावें लागेल; गुन्हेगार सुटून निरपराधी मनुष्यास देहांत शिक्षा होणें इष्ट व योग्य नव्हे, परंतु पुढें असा प्रकार न व्हावा एतदर्थ अशा प्रकारें सूड घेणें जरूर पडलें आहे तरी तावडतोब उत्तर यावें. या पत्राचा सुरळीत जबाब आला नाहीं व गुन्हेगारही त्यांनीं पाठविला नाहीं याजमुळें जनरल वाशिंग्टन यांस आपल्या ताब्यांत असलेल्या इंग्लिश सरदारांपैकीं एकाची निवड करावी लागली. त्या निवडीत क्यापटन चार्लस आसाजिल नांवाच्या तरुण सरदारावर हा प्रसंग आला. हा सरदार अगदीं तरुण एकुणीस वर्षांचा असून सर चार्लस आसजिल या श्रीमान् व कुलीन गृहस्थाचा एकुलता एक मुलगा व मोठ्या मालमत्तेचा वारस असा होता. तसाच तो मोठा सुशील होता, याजमुळें, त्यास फांशी देण्याचें ठरविणें हें अमेरिकन सरदारांस फार वाईट वाटलें. परतु निरुपायामुळें तसें करणें अवश्य आहे असें सर्वांस वाटलें. तथापि कैदेंत असलेल्या ब्रिटिश सरदारांनीं आपल्या सेनापतीस विनंतिपत्र लिहून एका सरदाराबरोबर पाठविण्याचा विचार केला. त्या विचारास अमेरिकन सरदार व वाशिंग्टन यांनीं अनुमत देऊन, जनरल वाशिंग्टन यांनीं काग्रेसची परवानगी घेऊन तें पत्र पुढें पाठविलें. परंतु ब्रिटिश सेनापतीनीं त्या गोष्टीचा नीट निकाल न करितां प्रकरण लांबणीवर टाकण्याचा घाट घातला. त्यांनीं क्यापटन लिपेट कार्ट या सरदारावर खटला करवून त्याची कोर्ट मार्शल पुढें चवकशी करविली.

परंतु चवकशी करणारांनीं त्यास निरपराधी ठरवून सोडून दिलें. याबद्दलच्या कागद पत्रांच्या नकला ब्रिटिश सेनापतींनीं जनरल वाशिंग्टन यांजकडे पाठविल्या आणि प्रकरण लांबणीवर भिजत टाकण्याकरितां दुसऱ्या आणखी लोकांबद्दल चवकशी करून निकाल मागाहून कळवितों असें लिहिलें. हा लटपटीचा प्रकार जनरल वाशिंग्टन यांस अगदीं आवडला नाहीं, परंतु या बाबतींत सर्व जोखीम आपल्यावर न घेतां पुनः कांग्रेसकडे सर्व कागदपत्र पाठवून काय करावें ह्मणून त्यांनीं विचारलें. त्यांनींही तें नाजूक प्रकरण तसेंच भिजत पडूं दिलें. त्याचा जबाबच पाठविला नाहीं इकडे जनरल वाशिंग्टन यांचा दृढनिश्चय पाहून इंग्रज सरकारच्या सेनापतींनीं सरदार लोकांच्या देखरेखीच्या व इतर बाबतींत पुनः कुरकुरीचा प्रसंग न येण्यासारखा अगदीं सक्त बंदोबस्त केला. याजमुळें वाशिंग्टन यांचा मुख्य उद्देश तर सिद्धीस गेलाच, परंतु त्या प्रकरणाचा मात्र निकाल होणें राहिला. क्यापटन आसाजिल यांस चालीप्रमाणें कडक प्रतिबंधांत तर ठेविलेंच होतें, तथापि त्यांच्या सद्गुणामुळें व योग्यतेमुळें त्यांजवर विशेष मेहर नजर राखून इतर कोणत्याही प्रकारें त्यांस वाईट वाटूं नये असा बंदोबस्त वाशिंग्टन यांनीं ठेविला होता. त्यांस खरोखर त्या सरदाराविषयीं फार वाईट वाटत होतें; परंतु हुद्याच्या संबंधानें पुढें आलेलें काम बजाविलेंच पाहिजे, अशा बेतानें व्यवस्था चालली होती या प्रकरणाचा लवकर निकाल व्हावा एतदर्थ त्यांनीं कांग्रेसपैकीं कांहीं सभासदांस खासगी पत्रें देखील पाठविलीं; परंतु निर्णय झाला नाहीं. पुढें इंग्लिश सेनापतीनीं योग्य बंदोबस्त केल्याबद्दल एकल्यावरून व दुसऱ्या आणखी कितीएक कारणांवरून

हें प्रकरण न लांबवितां आपला पुढच्या बंदोबस्ताविषयींचा हेतु सिद्धीस गेलासें पाहून क्यापटन आसाजिल यांस सोडून देण्याविषयीं जनरल वाशिंग्टन यांनीं काग्रेसला शिफारस पत्र लिहिलें. पुढें थोडे दिवसांनीं फ्रान्स देशाचे राजेसाहेब व त्यांच्या राणीसाहेब यांच्या संमतीनें फ्रेंच दरबारांतील कौंट डी वार्जिनस या कामगारानें जनरल वाशिंग्टन यांस लिहिलेलें शिफारस पत्र क्यापटन आसाजिल यांच्या मातुश्रींनीं मिळवून इंग्लिश सेनापति यांच्या मार्फतीनें वाशिंग्टन यांस पाठविलें तें त्यांस पोंचलें. जनरल वाशिंग्टन यांनीं तावडतोब तें पत्र व त्या बरोबरच्या क्यापटन आसाजिल यांच्या मातुश्रीचें कौंट डी वार्जिनस यांस अत्यंत हृदयभेदक पत्र अशीं कांग्रेसकडे पाठविलीं. त्याजवर त्या प्रकरणाचा लागलाच निकाल झाला. त्यांस सोडावें असें ठरलें. जनरल वाशिंग्टन यांनीं क्यापटन आसाजिल यांस तारीख १३ नोवेंबर सन १७८२ इसवी रोजीं मोकळीकेचें पत्र पाठविलें. तशीच त्यांनीं सर गाय कार्लेटन इंग्लिशांचे सेनापति व फ्रान्सचे दरबारी पुरुष कौंट डी वार्जिनस यांस याजबद्दल पत्रें लिहिलीं आणि हें प्रकरण संपविलें. या प्रकरणांत जनरल वाशिंग्टन यांचा दृढनिश्चय व हुद्याच्या संबंधानें पुढें आलेलें काम आपल्यास आवडत नसलें तरी योग्य रीतीनें बजाविण्याची बुद्धि हे गुण उत्तम प्रकारें दिसून आले. त्याचप्रमाणें क्यापटन आसाजिल यांच्या प्रकरणाचा सर्वांस समाधानकारक असा शेवट झाला.

याप्रमाणें हें प्रकरण सरासरी वर्षभर चाललें होतें. मध्यंतरीं असाच दुसरा एक चमत्कारिक प्रकार झाला. फौजेंतील लोकांच्या पगाराची बाकी तुंबल्यामुळें, कांग्रेस व इतर संस्थानांच्या प्रदे-

शाचे अधिकारी यांच्या धरसोडीच्या वर्तनामुळें, कंटाळले आणि नाखुश झाले. चांगली दृढ राज्यव्यवस्था असल्यावांचून ही स्थिति बदलावयाची नाहीं असें लोकांस वाटूं लागलें. व्यवस्थित व दृढ राज्यव्यवस्था होणें ती राजा सत्ताधीश असल्यावांचून व्हावयाची नाहीं असा त्यांच्या मनाचा ग्रह होऊन त्यांना जनरल वाशिंग्टन यांनीं राज्यपद स्वीकारावें असें वाटूं लागलें. ह्यावरून, त्यांच्या मनाचा कल समजावा आणि त्यांचें साहाय्य आपल्या बेतास मिळावें, या हेतूनें एका नामांकित लष्करी सरदारानें त्यांस पत्र लिहिलें. परंतु जनरल वाशिंग्टन यांनीं त्या पत्रास इतकें उत्तम व खरमरीत उत्तर लिहिलें कीं, त्या विचाराचा पूर्ण बीमोडच झाला. जनरल वाशिंग्टन यांनीं ह्या प्रकरणाच्या संबंधानें कर्नल लुईस निकोला या सरदारास तारीख २२ मे सन १७८२ इसवीचें न्यूबर्ग येथून पत्र लिहिलेलें आहे. त्यांतील तात्पर्य असें आहे कीं, त्या पत्रांतील मजकूर वाचून मला अत्यंत आश्चर्य वाटलें व फौजेच्या मनांत विलक्षण विचार आले आहेत हें ऐकून मला जसें दुःख वाटलें तसें सर्व लढाईंत कोणत्याही काळीं वाटलें नाहीं. ते विचार ऐकून माझ्या मनांत अतिशय तिटकारा उत्पन्न झाला. असो. तूर्त त्या पत्रांतील मजकूर मी आपल्या पोटांतच ठेवितों. पुढें प्रकरण वाढल्यास तो प्रसिद्ध करावा लागेल. तुह्मीं असा घातक मजकूर लिहिण्यासारखें माझ्या वर्त्तनांत काय पाहिलें तें मला समजत नाहीं. माझ्या मनाच्या परीक्षणावरून तर असले विचार दुसऱ्या इतके नापसंत कोणासच होणार नाहींत असें मला वाटतें. निराळीच दुसरी गोष्ट अशी आहे कीं, फौजेंतील लोकांस न्याय

मिळावा ही जशी माझी मनापासून इच्छा आहे तशी दुसऱ्या कोणाचीही असेल असें मला वाटत नाहीं व ती इच्छा पूर्ण होण्याकरितां मी कायदेशीर रीतीनें पाहिजे तें माझ्या सामर्थ्यानुरूप करावयास तयार आहें. वास्तव खात्रीनें व निस्सीमपणानें मी तुह्मांस सांगतों कीं, तुह्मांस आपल्या देशाचा कांहीं कळवळा असेल, तुह्मांस स्वतां तुह्माविषयीं व तुमच्या संततीविषयीं कांहीं विचार होत असेल, किंवा तुह्मांस मजविषयीं तुमच्या मनांत कांहीं वाटत असेल तर हे वाईट विचार व कल्पना मनांतून घालवून द्या आणि स्वतांकरितां किंवा दुसऱ्याकरितां अशी गोष्ट मला पुनः कळवूं नका याप्रमाणें वाशिंग्टन यांनीं तुकडा तोडून खटला पार केला. आतां या प्रसंगीं जनरल वाशिंग्टन यांच्या स्वदेशप्रेमाविषयीं व स्वातंत्र्याच्या आवडीविषयीं परीक्षा होऊन खात्री झाली. सोनें तावून निवून पूर्ण बावन्नकशी ठरलें. फौजेच्या पूर्ण साहाय्यामुळें व प्रेमामुळें वाशिंग्टन यांस आपल्या देशाचें राज्यपद सहज मिळालें असतें. परंतु तो पुरुष अगदीं वेगळ्या प्रकारचा होता. खरें स्वदेशप्रेम व खरें स्वातंत्र्य यांची या जगांत स्थापना करण्याकरितांच जसा काय त्यांचा अवतार होता. राज्यपदास त्यांनीं लाथ मारून अमर कीर्ति व नुसतें स्वदेशाचेंच नव्हे पण सर्व जगाचें प्रेम संपादून लोकांस उत्तम उदाहरण घालून दिलें.

असो. याप्रमाणें हें सन १७८२ चें साल फौजेच्या संबंधानें किंवा दुसऱ्या कोणत्या प्रकारानें कांहीं कमीजास्ती न होतां गेलें. लढाई तूर्त तहकूब राहिली होती ती निरंतरच बंद पडणार किंवा इंग्लिश सरकार पुनः लढाई करणार याचा नि[श्चय] होईना. सबब वाशिंग्टन यांनीं फौजेची तयारी ठेविली होती.

तसेंच लोकही अशा अर्धवट काळजीच्या स्थितींतच होते. पुढें सन १७८३ च्या आरंभीं लढाई मिटून स्वस्थतेचा तह होणार अशी खात्री वाटूं लागली. तेव्हां पुनः फौजेंत विशेष हाल चाल दिसावयास लागली. तह झाला तर फौज कमी होऊन लोकांस घरोघर जाण्याची वेळ येईल, व निकाल न होतां लोक तसेच घरीं गेले तर त्यांस पगाराच्या बाकीचा पैसा मिळण्याची व पुढच्या व्यवस्थेची आशा राहणार नाहीं असें त्यांस वाटावयास लागलें. फौजेंतील लोकांनीं आमच्या प्रकरणाचा निकाल करा ह्मणून प्रत्यक्ष प्रत्यक्ष कांग्रेसशीं बोलणें लाविलें आणि आपलें ह्मणणें कळविण्याकरितां आपल्या तर्फे एक कमिटी नेमिली. जनरल वाशिंग्टन यांनींही आपणाकडून विशेष उद्योग चालविला होता. इतक्यांत फौजेंतील कांहीं खटपटी लोकांनीं आपले हेतु साधण्यासाठीं फौजेस अधिक चेतविण्याचा उद्योग सुरू केला. मार्च महिन्याच्या १० व्या तारखेस एक बिन सहीचें जाहीरपत्रक वाटलें, त्यांत अमुक दिवशीं अमुक वेळीं अमुक ठिकाणीं प्रत्येक कंपनीचा एकेक सरदार व दुसरे मोठे सरदार यांची सभा भरावी, व तींत फिलेडेल्फिया येथून आपल्या मुखत्यारांचें पत्र आलें आहे त्याच्या संबंधानें विचार करावा अशी सूचना होती या पत्रकाच्या बरोबर एक विनंतीपत्र फौजेंत वाटलें गेलें होतें. यांत फौजेची दुःखदायक स्थिति, वर्णिली होती, आणि तिचें ह्मणणें व मागणें याजबद्दल कांग्रेसकडून विचार होणार नाहीं. शेवटीं लोकांस आपल्या उतारपणाचे दिवस उपास काढण्यांत व चिंध्या पांघरून उपाहारनिरद्द स्थितींत काढावे लागतील असें सांगितलें होतें, आणि

येणेंप्रमाणें या आपल्या प्रकरणाचा न्याय्य रीतीनें निकाल होत नाहीं तेव्हां त्याचा झोक आतां धाक दाखविण्याकडे वळविला पाहिजे असें त्यांत सुचविलें होतें. आणि या कामांत आपले प्रमुख सेनापति यांची मदत घेऊन तजवीज चालवावी असें त्यांत ह्मटलें होतें. हें पत्र फारच चांगल्या हृदयद्रावक व उत्तेजक अशा खुबीदार भाषेनें लिहिलेलें होतें. याजवर कोणाचीही सही नव्हती. या विनंतिपत्रांतील सर्व मजकूर खरा होता याजमुळें लोकांच्या मनांत तो भरून ते अगदीं वेडे झाले आणि तें प्रकरण अगदीं बंडाळ्याच्या व दंग्याच्या बेतावर आलें. फौजेनें यांत कांग्रेसच्या राज्याधिकाराचा व तसाच जनरल वाशिंग्टन यांच्या लष्करी अधिकाराचा उच्छेद केला असें झालें. इतका बिकट व नाजूक व सर्वस्वी घातक प्रसंग जनरल वाशिंग्टन यांस व त्या देशास कधींच आला नव्हता. लोकांजवळ हत्यारें व दारूगोळा वगैरे सर्व सामान तयार होतें, लोक लढाईच्या त्रासामुळें व अत्यंत दुःख भोगिल्यामुळें कंटाळून गेले होते, आणि कांग्रेसला विनंति करून करून दमले होते. तशीच पुढें सर्व प्रकारची सुखाची निराशा झाली याजमुळें ते जिवावर उदार होऊन बेहोष झाले होते. अशा प्रसंगीं त्यांस आळा घालावयाचें किंवा धाक दडपीनें दबविण्याचें काम फार दुर्घट होऊन गेलें. जनरल वाशिंग्टनही अत्यंत संकटांत व पंचाइतींत पडले. इकडे प्रजेनें सर्व राज्याधिकार कांग्रेसला दिला होता याजमुळें कांग्रेस सत्ताधीश होते तिच्या अधिकाराविरुद्ध वर्तन होणें ह्मणजे बंडाळा होतो. तसेंच फौजेनें अतिशय संकटें सोसून अपेष्टा भोगून आपल्या देशास पूर्ण राज्यसत्ता व स्वा-

संपादिलें, तेव्हां तिला न्याय न मिळणें हेंही अयोग्यच. असे विचार मनांत येऊन वाशिंग्टन गोंधळल्यासारखे झाले होते फौजेचें ह्मणणें रास्त होतें खरें परंतु कांग्रेसच्या हातीं सर्व प्रकारची सोय करण्यासारखी सबड नव्हती याजमुळें दोनही-कडे अडचण झाली. अशा प्रसंगीं जनरल वाशिंग्टन यांनीं हुकूम फरमाविला; त्यांत असें होतें कीं, काल निनावी कागद वांटण्याचा प्रकार झाला तो अगदीं गैर आहे, आणि त्यांत सभा भरविण्याचा वगैरे विचार आहे, तो सर्व प्रकार गैर आहे असें सरदारांसही वाटेल. तथापि सर्व मोठे सरदार व कंपनीचे सरदार मिळून पुढच्या शनवारीं सभा भरून फौजेनें कमिटी नेमिली तिचा रिपोर्ट ऐकावा व पुढें काय करायाचें त्याचा योग्य विचार व्हावा. सर्वांत योग्यतेनें वरिष्ट असेल त्या सरदारानें अध्यक्ष स्थानीं बसून सभेचें काम चालवावें. याप्रमाणें हुकूम करून ही सभा त्या दुसऱ्या सभेच्या पूर्वी भरविण्याची योजना करून वाशिंग्टन यांनीं ता० १२ रोजीं कांग्रेसला त्याबद्दल पत्र लिहिलें. व त्या बरोबर जाहीरपत्र, विनंतीपत्र वगैरे कागद पाठविले. शिवाय त्याच दिवशीं कांग्रेसपैकीं जोजेफ जोन्स नांवाच्या एका सभासदास सर्व कची हकीकत लिहून अडचणीचा प्रसंग सुचवून कांग्रेसकडून या प्रकरणाचा योग्य रीतीनें लवकर निकाल होईल असें करावें नाहीं तर अनर्थ होईल असें स्पष्ट दर्शविलें. मध्यंतरीं फौजेंतील लोकांचीं मनें शांत होतील अशा बेताच्या उपायांची त्यांनीं योजना केली. शिवाय प्रत्येक सरदाराची एकांतीं निरो घेऊन त्याजशीं बोलून त्यांनीं आपल्या प्रेमळ स्वभावानें व आपल्या वजनानें त्यांचीं मनें शांत करून सोडलीं. किती-

एक सरदार भेटीच्या खोलींतून बाहेर पडतांना अगदीं थिजून गेल्या सारखे दिसले व कांहींच्या गालांवर तर अश्रुधारा वाहल्यांचीं चिन्हें दिसलीं. याप्रमाणें प्रकार झाल्यावर तारीख १५ मार्च रोजीं जनरल वाशिंग्टन यांच्या हुकमाप्रमाणें सरदार लोकांची सभा भरली व जनरल गेट्स यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. जनरल वाशिंग्टनही स्वतां तेथें गेले, आणि त्यांनीं मंडळीकडे नजर फिरवून पाहिलें तों कामें केलेली, जखमा लागून थकलेली व वृद्ध झालेली अशी मंडळी त्यांच्या दृष्टीस पडली. ती पहातांच त्यांचें मन कळवळून त्यांची नजर मंदावल्यासारखी झाली. तेव्हां त्यांनीं बोलून दाखविलें कीं, मी आपल्या देशाच्या सेवेंत म्हातारा होत चाललों आहें, माझी दृष्टि मंदावत चालली आहे, परंतु माझ्या देशाच्या न्यायाविषयीं किंवा उपकार मानण्याविषयीं मला कधींही संशय आला नाहीं. नंतर त्यांनीं त्या प्रसंगाकरितां उचित असा लेख लिहून आणिला होता तो वाचला. त्यांत जसा एखादा वृद्ध पिता आपल्या मुलांस शहाणपणाच्या गोष्टींचा प्रेमानें उपदेश करतो तसा उपदेश भरलेला आहे. त्यांत त्यांनीं आपल्या लोकांस अनुलक्षून असें म्हटलें आहे कीं, अजून विचार करा, आपल्या अंतःकरणाकडे पाहा, आपल्या स्वदेशाविषयींचें प्रेम मनांत आणा, आणि काय करणें तें करा; आज तुम्हांस निराश होण्याचें कारण नाहीं. किती एक संकटांच्या व निराशेच्या प्रसंगीं तुम्हीं सर्वांनीं मला आनंदानें साहाय्य केलें तसें हल्लींच्या प्रसंगीं करा; कोणी शत्रूकडील लोकांनीं आपल्यामध्यें कलह उत्पन्न होऊन नाश व्हावा या हेतूनें दुष्टबुद्धीनें हा उद्योग चालविला आहे असें दिसतें, तो सिद्धीस जाऊं देणें हें आप

त्यास इष्ट नाहीं; मी आपल्याकडून सर्व प्रकारें तुह्मांस तुमचे हक्क मिळून न्याय मिळण्याकरितां प्रयत्न करीन. तुह्मी आजपर्यंत योग्यता व कीर्ति मिळवीत येऊन आपल्या देशास जगमान्य करून सोडलें व आपल्या फौजेस स्वदेशभक्त मंडळीची फौज असें जगवंद्य नामाभिधान संपादन केलेंत तें आपलें ब्रीद या प्रसंगीं कायम राखा. वास्तविकच आजचा हा प्रसंग आला नसता तर तुमच्या योग्यतेच्या पूर्णतेस कमीपणा आला असता. यास्तव आजच्या आलेल्या प्रसंगीं यश मिळवून पूर्ण कीर्तीस पात्र व्हा. हें त्यांचें ह्मणणें ऐकून मंडळी अगदीं थक्क होऊन मोहून गेली त्याजवर ते उठून चालते झाले आणि मंडळीनें आपलें सभेचें काम चालविलें. पुढें विचार होऊन सर्वांनुमतें ठराव झाले. त्यांत त्यांनीं असें सुचविलें कीं, जनरल वाशिंग्टन यांच्या ह्मणण्याप्रमाणेंच आमचे विचार आहेत. कितीही दुःख प्राप्त होवो व कितीही संकटें येवोत, लढाईच्या आरंभापासून आजपर्यंत जी आह्मी निर्मळ कीर्ति मिळवीत आलों तिजला आह्मी कलंक लागूं देणार नाहीं. कांग्रेस व आमचा देश यांजवर आमचा पूर्ण भरंवसा आहे व ते न्याय करतील अशी आमची पक्की खात्री आहे. आणि परवां निनावी विनंतिपत्रांत लिहिलेला मजकूर आह्मांस अगदीं मान्य नाहीं व त्याचा आह्मी तिरस्कार करतों. याप्रमाणें ठराव होऊन आलेल्या महत्संकटाचें निवारण झालें.

या गोष्टीवरून जनरल वाशिंग्टन यांची खरी योग्यता, त्यांचा पूर्ण प्रामाणिकपणा व त्यांचें स्वदेशाविषयीं निर्मळ व निष्प्रांजल प्रेम हीं दिसून येतात. असें विलक्षण संकट त्यांच्या सर्व आयुष्यांत त्यांजवर कधींही आलें नव्हतें

व त्यांची पूर्ण परीक्षा होण्याचा असा प्रसंगही कधीं आला नव्हता. फौजेंतील लोक संकटानें व दुःखानें त्रस्त झाले होते व त्यांस पुढें सुखाची मुळींच आशा नाहीं असें वाटूं लागलें होतें. कांग्रेस व लोक यांचाही निरुपाय झाला होता. अशा समयीं त्या निराश झालेल्या लोकांस चेतवून देऊन सर्व देशाचा उन्हाळा करावयाचा प्रसंग शत्रूंनीं मोठ्या खुबीदार रीतीनें आणिला होता. आणि वाशिंग्टन यांचें फौजेवरच्या लोकांविषयीं पुत्रवत् प्रेम आहे असें दर्शवून ते आपल्यास मदत करतील असें ह्मणून त्यांसही गोवून टाकण्याचा प्रयत्न केला होता. सारांश घाट मोठा उत्तम प्रकारचा घातला होता. फक्त वाशिंग्टन यांचें मन मात्र थोडें राज्यलोभाविषयीं लालचावयास पाहिजे होतें. शिपाई लोकांच्या दुःखाविषयीं त्यांचें मन खरोखरच कळवळत होतें, आणि कांग्रेस व निरनिराळ्या प्रांतांचे राज्यव्यवस्था पाहणारे यांस या बाबतींत निकाल करा ह्मणून लिहून ते अगदीं कंटाळून गेले होते. स्वहित साधण्यास ही त्यांस फारच उत्तम संधि होती. परंतु त्यांनीं स्वार्थास लाथ मारिली आणि निरपेक्ष बुद्धीनें फौजेची चांगली व्यवस्था लाविली. ही फौजेची व्यवस्था झाल्यावर वाशिंग्टन यांस कांहीं मोठा हुद्दा अगर उद्योग मिळावयाची तरी आशा होती ह्मणावी तर तीही नव्हती. त्यांस स्वतां केवळ एक मध्यम प्रतीच्या शेतकऱ्याच्या दर्जानें राहवें लागणार होतें. इकडे फौजेच्या ह्मणण्याप्रमाणें करावयास ते तयार झाले असते तर त्यांस सर्व देश जिंकून राज्याधिकारी राजा होण्यास मार्ग होता. इतर देशाच्या लोकांनींही कदाचित् त्यांस साहाय्य दिलें असतें कारण तो पंथ जगांत सर्वसाधारण आहे. परंतु या प्रसंगीं तो

ग्रंथ संग्रहालय

पुरुष निराळ्या प्रकारचा होता. सत्कार्याच्या व स्वातंत्र्याच्या प्रसंगींच मात्र तो शूर व धीट पुरुष होता तो "गतानुगतिको लोकः" याप्रमाणें पूर्वी चालत आलेल्या अन्यायपथानेंच चालणारा व आपस्वार्थी पुरुष नव्हता. तो नवीन स्वातंत्र्याच्या पंथाचा कित्ता घालून देणारा प्रमुख होता. यामुळें सत्य व खरें स्वदेशप्रेम यांस अनुसरून जें कर्तव्य होतें तेंच त्यानें मनःपूर्वक बजावलें आणि अमर कीर्ति संपादिली. वाशिंग्टन यांनीं थोडी हयगय केली असती, किंवा आपल्या चांगुलपणाचा व वजनाचा किंचित् दुरुउपयोग केला असता, अथवा निरपेक्ष व निष्प्रांजल स्वदेशप्रेमाचें सोज्वल सदुदाहरण दाखविण्यांत त्यांजकडून अंमळ कसर झाली असती तर आठ वर्षें लढून द्रव्य व प्राणनाश सोसून संपादलेलें स्वातंत्र्य नष्ट झालें असतें. परंतु स्वातंत्र्याचा नवीन झेंडा उभारण्याकरितां त्यांचा अवतार होता त्याजमुळें परमेश्वरानें त्यांस सद्बुद्धि, दृढनिश्चय व सत्यप्रेम देऊन वेळोवेळीं परम संकटांतून त्यांस पार पाडलें. पुढें पुष्कळ दिवसांनंतर ते निनावी लेख लिहिणाराचा हेतु वाईट नव्हता असें कळून आलें. परंतु त्याच्या कृतीनें अनर्थ होण्याचा प्रसंग आला होता तो वाशिंग्टन यांनीं महत्प्रयासानें टाळला.

वाशिंग्टन यांची अमेरिकन सेनापतीच्या नात्यानें ही शेवटची कामगिरी झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण १७८३ च्या मार्च महिन्याच्या अखेरीसच तहनामा होऊन लढाई आटपल्याचें वर्त्तमान वाशिंग्टन यांस कळलें. त्यांनीं तारीख १८ एप्रिल रोजीं लढाई बंद झाल्याचें वर्त्तमान फौजेंत जाहीर निरनिराळ्या प्रकारानें प्रकट केलें आणि दुसऱ्या दिवशीं हा हुकूम सर्व

पलटणींमध्यें वाचला जाऊन परमेश्वराचे आभार मानण्या-करितां वेळ नेमिला. याप्रमाणें लढाई संपली. तेव्हांपासून त्यांनीं लष्करी खात्यांतील मित्रमंडळीस व प्रांतोप्रांतींचे राज्याधिकारी यांस आपला सेनापतीचें काम सोडण्याचा इरादा कळवून देशहितसंबंधाच्या उपदेशाच्या चार गोष्टी पत्रद्वारें कळविल्या. पुढें जुलई व आगष्ट महिन्यांमध्यें ते फिरून महत्वाचीं ठिकाणें पाहून आले. नंतर पुढच्या व्यवस्थेसाठीं व बंदोबस्ताच्या तजविजी योजण्याच्या विचारासाठीं त्यांस कांग्रेसनें प्रिन्सटन येथें समक्ष बोलावून नेलें.

तेथें प्रथम सन्मानपूर्वक भेटी वगैरे होऊन विचार व्हावयाचा होता तो झाला. पुढें तहनाम्यावर सह्या व्हावयाच्या त्या होऊन इंग्लिश सरकार व अमेरिकन सरकार यांचा सल्ला झाला. शेवटीं तारीख २५ नोवेंबर रोजीं इंग्लिश फौजेनें सन १७७६ पासून आपल्या ताब्यांत ठेविलेलें न्यूयार्क हें शहर सोडून दिलें आणि ती चालती झाली. जनरल वाशिंग्टन यांनीं लवकरच फौजेसह त्या शहरांत प्रवेश केला व तेथील कामगार मंडळीच्या भेटी घेतल्या.

आतां हा लढाईच्या संबंधाचा प्रकार आटपला तेव्हां जनरल वाशिंग्टन यांनीं आपलें सेनापतीचें काम सोडून स्वगृहीं जाऊन स्वस्थ आरामांत आयुष्य घालविण्याचा विचार अमलांत आणण्याची तयारी केली. ते शेवटचें वियोगसंबंधाचें वर्तमान फौजेस लेखद्वारें कळवून मोकळे झाले होते. फक्त आपल्या बरोबरच्या सरदार लोकांची अखेरची भेट घेऊन कांग्रेसच्या हवालीं आपला अधिकार व सनद करण्याचें मात्र राहिलें होतें. डिसेंबरच्या ९ व्या तारखेस बारा वाजतां जनरल

वाशिंग्टन यांच्या विनंतीवरून फ्रान्सिस टावर्न येथें ते राहात होते त्या ठिकाणीं सर्व सरदार मंडळी जमली. पाठीमागून ते खोलींत आले. आणि मग आजपर्यंत जसे तुमचे सर्वांचे दिवस योग्यता व भूषण संपादण्यांत गेले तसे पुढचे उत्कर्षांत व सुखांत जावोत असें मी ईश्वरापाशीं मागणें मागतों असें ह्मणून त्यांस विनंति केली कीं, माझ्यानें प्रत्येकाकडे जाऊन भेटवत नाहीं तरी कृपा करून तुह्मीच एकेकजण येऊन मला भेटा. त्याजवरून त्यांच्या जवळच जनरल नाक्स हे सरदार बसले होते ते त्यांच्याजवळ आले व हातांत हात घालून त्यांनीं त्यांस प्रेमानें आलिंगन दिलें. याचप्रमाणें सर्वांच्या भेटी झाल्या. सर्वांचें अंतःकरण सद्गदित होऊन त्यांचे डोळे वियोगजन्य दुःखानें भरून आले होते. एक अक्षरही कोणाच्यानें बोलवलें नाहीं. या प्रेमभरित व वियोगजन्य दुःखकारक प्रसंगाचें वर्णन आमच्यानें करवत नाहीं. असो. ते तेथून लागलेच निघून, पायदळ पलटण उभी होती तिजमधून, जेथें त्यांस नेण्याकरितां होडी तयार होती तेथपर्यंत चालत गेले, आणि होडींत बसून सर्वांस सलाम करून चालते झाले. ही सरदार मंडळी तेथपर्यंत पाठोपाठ पोंचवावयास गेली होती. न्यूयार्क येथून आनापोलिस येथें कांग्रेस सभा जमली होती तिकडे ते गेले. वाटेंत जागोजाग त्यांचा लोकांनीं आदरसत्कार करून त्यांस मानपत्रें दिलीं. असो; ते लोकांचा दुवा व आशीर्वाद घेत घेत, ता. २० डिसेंबर रोजीं आनापोलिस येथें पोचले. वाटेंत लोकांनीं त्यांचा आदरसत्कार व जयजयकार केला तो आतां पुढें त्यांजपासून कांहीं मिळावयाचें होतें अशा स्वार्थबुद्धीनें केला नसून केवळ त्यांनीं केलेल्या कामांचे उप-

कार मानून आपली कृतज्ञता त्यांस प्रेमपूर्वक दर्शविण्याकरितां केला होता. ते फिलेडेल्फियामधून आले त्यावेळेस त्यांनीं सरकारचे आडिटर जनरल यांजकडे आपला सर्व खासगी हिशेब गुदरला. ज्यावेळेस सेनापतीचें काम त्यांनीं पतकरलें त्यावेळेसच आपल्यास पगार घ्यावयाचा नाहीं, फक्त त्या हुद्याच्या संबंधाचा खर्च मात्र घेईन, अशी त्यांनीं अट ठेविली होती. त्याप्रमाणें त्यांनीं जो पैसा खासगी खर्चाकडे घेतला होता तो जमा करून प्रत्येक पैसा तपशीलवार खर्चीं लिहिलेला असा सर्व आठ नऊ वर्षांचा हिशेब स्वतां लिहिलेला सरकारी कामगाराच्या हवालीं केला. एकंदर सर्व खर्च एक लक्ष पंचेचाळीस हजार रुपयांच्या आंत झाला. यांपैकीं पस्तीस हजार रुपये वरगुती खर्चास व वीस हजार गुप्त रीतीनें बातमी मिळविण्याकरितां व बाकीचा हुद्याच्या संबंधानें इतमामाकरितां वगैरे खर्च झाला होता. सारांश त्यांनीं सर्व खर्च अत्यंत काटकसरीनें केला होता. सरकारचा पैसा ह्मणून त्यांनीं यथेच्छ उधळला नाहीं. याजवरून त्यांची वास्तविक योग्यता सहज दिसून येते.

जनरल वाशिंग्टन आनापोलिस येथें पोंचल्यावर कांग्रेस सभेस, आपण राजीनामा देऊन घरीं जावयास आलों आहों तरी ज्याप्रकारें चार्ज घेण्याची तजवीज करावयाची असेल तशी करावी असें त्यांनीं सुचविलें. नंतर सभेनें ता २३ डिसेंबर हा दिवस नेमून भर सभेंत हा शेवटचा समारंभ करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्या दिवशीं बारा वाजतां कांग्रेसच्या दिवाणखान्यांत शेवटच्या वियोगाचा समारंभ झाला. समारंभ पाहण्याकरितां त्या गांवांतील व आसपासच्या मंडळींची

गर्दी जमली होती. कांग्रेसचे सेक्रेटरी यांनीं त्यांस सभेंत नेऊन भेटवून नेमलेल्या ठिकाणीं खुर्चीवर बसविलें. नंतर थोड्या वेळानें कांग्रेसचे अध्यक्ष बोलले कीं आपलें काय ह्मणणें आहे तें ऐकण्याकरितां यूनैटेड स्टेट्सची कांग्रेस सभा भरली आहे. त्याजवर जनरल वाशिंगटन यांनीं उठून साध्या रीतीनें आपलें ह्मणणें निवेदन केलें त्यांच्या बोलण्याचें तात्पर्य असें होतें कीं, ज्या महत्वाच्या गोष्टींवर माझा राजीनामा देण्याचा विचार तहकूब होता त्या आतां घडून आल्या सबब मी मोठें समाधान मानून आपण दिलेला अधिकार आपल्या स्वाधीन करून माझ्या देशाची चाकरी सोडून स्वस्थ घरीं बसण्याची परवानगी मागण्याकरितां येथें हजर झालों आहें. आपल्या लोकांस स्वातंत्र्य व राज्याधिकार प्राप्त झाला, तो सर्वत्र मान्य झाल्याबद्दल, तसेंच, युनैटेड स्टेट्स यांस सन्माननीय राष्ट्र होण्याचा प्रसंग प्राप्त झाला याजबद्दल मला फार आनंद होत आहे. सेनापतीचें काम जेव्हां मी पत्करिलें, तेव्हां, स्वातंत्र्य संपादन करण्याचें काम दुर्घट आहे असें माझ्या बुद्धीस वाटून, तें मी भीत भीत पत्करलें होतें परंतु तें तुमच्या सर्वांच्या साहाय्यानें व परमेश्वरकृपेनें सिद्धीस गेलें आहे सबब तो हुद्दा खुशीनें व समाधानानें सोडण्यास मी आज आलों आहे. या सर्व यशाबद्दल मी परमेश्वराचे व माझ्या देशबांधवांचे आभार मानतों. त्याप्रमाणेंच सर्व फौजेचेही आभार मानतों, त्यांतून जे सरदार नेहमीं मजजवळच होते त्यांचे उपकार मानून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस सहाय व बढती व्हावी अशी आपणाजवळ शिफारस करतों. आतां शेवटीं माझा प्रियदेश व त्यांजवर देखरेख करणारी मंडळी यांचें संरक्षण त्या सर्व

शक्तिमान प्रभूनें करावें एवढेंच माझें त्यापाशीं मागणें आहे. आतां या सभेची व सर्वांची मी प्रेमानें रजा घेतों. याप्रमाणें भाषण करून त्यांनीं आपल्या हुद्याची सनद अध्यक्षांच्या हातीं दिली.

पुढें ते उभे असतां अध्यक्षांनीं असें उत्तर दिलें कीं, ज्या अधिकाराच्या योगानें तुम्हीं मोठ्या संकटाच्या व लढाईच्या प्रसंगीं युनैटेडस्टेटसूच्या कांग्रेस सभेची फौज वागवून यश संपादन केलें त्या अधिकाराचा राजीनामा घेण्यास त्या सभेस फार वाईट वाटत आहे. आपल्या देशाच्या हक्कावर घाला पडावयास लागला तेव्हां लोकांनीं तुम्हांस कार्यार्थ बोलाविलें आणि तें काम तुम्ही पत्करलें व तेंहि त्या अशा प्रसंगीं कीं ज्यावेळेस कोणाचें सहाय्य नवतें, पैसा नवता, अगर तुम्हांस पाठबळ देण्यास सरकार देखील नवतें. तुम्ही ती लढाई मोठ्या शहाणपणानें व दृढनिश्चयानें व सर्व संकटांच्या प्रसंगीं कारभार चालविणाऱ्या लोकांची मानप्रतिष्ठा राखून चालविली. तुम्ही आपल्या देशबांधवांचें प्रेम व त्यांचा भरंवसा संपादून त्यांच्याकडून शिपाईगिरीचें काम कराविलें व त्यांची कीर्ति निरंतर पुढें राहील असें केलें. असा हा सारखा उद्योग युनैटेडस्टेट्स यांस मोठ्या उदार व थोर मनाच्या राजाचें व राष्ट्राचें सहाय्य मिळून परमेश्वरकृपेनें स्वातंत्र्य व सुरक्षितपणा मिळे तोंपर्यंत चालविलात. या सुखकर परिणामाबद्दल तुम्हांबरोबर आम्हींही समाधान व आनंद मानितों. पृथ्वीच्या या नव्या भागांत स्वातंत्र्यसंरक्षणार्थ तुम्ही लढून जुलूम करणारांस व जुलूम सोसणारांस उदाहरण दाखवून तुम्हीं आपल्या स्वदेशबांधवांचे आशिर्वाद घेत स्वस्थ विश्रांति घेण्यास

जात आहां. तथापि तुमची कीर्ति युद्धप्रसंगापुर्तीच न राहतां निरंतर पुढें लोकांस उत्तेजन देत राहील. तुम्हांप्रमाणेंच फौजेचे आम्ही उपकार मानतों आणि तुमच्या जवळ असणाऱ्या विश्वासू सरदारांचा आम्ही सर्व प्रकारें संभाळ करूं. तुम्हांबरोबर आम्हीही आपल्या अत्यंत प्रिय स्वदेशाचें बरेंवाईट करण्याचें सर्वस्व परमेश्वराच्या स्वाधीन करूं लागतों आणि आमच्या लोकांस सुखी व सन्माननीय राष्ट्र होण्याचा प्रसंग आला आहे त्याचा यथायोग्य उपयोग करून घेण्यास योग्य अशीं स्वदेशबांधवांचीं मनें व अंतःकरणें वळविण्याविषयीं तुम्हांबरोबर त्या प्रभूची प्रार्थना करूं लागतों. तसेंच तुम्ही जे आम्हां सर्वांस इतके प्रिय त्या तुम्हांस त्यानें सर्व प्रकारें सुखी ठेवावें व तुमचे दिवस जसे पूर्वी कीर्तिमान होण्यांत गेले तसेच पुढें सुखांत जाऊन शेवटीं जें बक्षीस या जगांत मिळावयाचें नाहीं तें त्यानें पुढें तुम्हांस द्यावें ह्मणून आम्ही त्या परमेश्वराची प्रार्थना करतों. याप्रमाणें तो अखेरचा समारंभ होऊन वाशिंग्टन यांची लष्करी कारकीर्द संपली आणि ते लागलेच दुसऱ्या दिवशीं तेथून मौंट वर्नान येथें नाताळच्या सणाकरितां आपल्या घरीं गेले. लढाईच्या साडेआठ वर्षांत फक्त दोन वेळ ते घरीं गेले होते.

आतां या समारंभाच्या प्रकाराचा विचार केला असतां कोणाचेंही अंतःकरण आनंदानें सद्गदीत होऊन गेल्यावांचून राहणार नाहीं. समारंभाचा प्रकार इतका साधा पण गंभीर होता कीं त्यास जगामध्यें दुसरा मासलाच नाहीं. एक पराक्रमी सत्पुरुष, आपल्या स्वदेशजननीची कामगिरी उत्तम प्रकारें बजावून, स्वसंतोषानें आपण होऊन आपला अधिकार

लोकांच्या तर्फेनें जमलेल्या मुक्त्यारांच्या हातीं परत देण्यास पुढें येतो आणि आतां माझें काम झालें, देश स्वतंत्र झाला व लोक निर्भय झाले तेव्हां मी आतां आपल्या घरीं स्वस्थ शेतकरी होऊन सुखवस्तु होण्यास जाण्याची परवानगी मागतों व हा आपण दिलेला सेनापतीचा अधिकार कृपा करून परत घ्या असें ह्मणतो ! कोण हा चमत्कारिक, अपूर्व व विलक्षण आनंदाचा प्रकार ! साधारण मध्यम प्रकारचा सुखवस्तु शेतकरी जमीनदार, यौवन, धन, ज्ञान, यांहीं व सदाचरण संपन्न, असून घरांत रूपवती व सद्गुणी पत्नी व लहानपणापासून प्रेमानें वाढविणारी वृद्ध मातुश्री असतां, स्वदेशावर जुलमाचा सत्तीनें दडपून जाण्याचा विकट प्रसंग आला, आणि त्याचे गुण पाहून लोकांची इच्छा अशा मनुष्यास सेनापतित्व देण्याची झाली. आणि त्यांनीं त्यास तें दिलें व त्यानें तें निमूटपणें पत्करलें. हें सेनापतित्व राजाचें अगर स्थापित झालेल्या सरकारचें नवतें तर देशाच्या सरकारच्या विरुद्ध व त्यांच्या समजुतीप्रमाणें बंडवाल्यांचें होतें. लोकांच्या समजुतीप्रमाणें स्वातंत्र्य रक्षणार्थ तयार झालेल्या स्वदेशभक्तांच्या फौजेचा हा सेनापति झाला. परिणाम उलट झाला असता तर घरदार, जमीनजुमला, चीजवस्त, स्त्रीपुत्र वगैरे सर्वस्व जाऊन अप्रतिष्ठेनें देहांत शासन भोगण्याचा प्रसंग आला असता. अशा विकट प्रसंगीं लोकांनीं त्यांस सेनापति नेमिलें व त्यांनीं सर्वस्वाची व प्राणाचीही पर्वा न करतां तें काम पतकरलें आणि ते परस्परच बाहेरगांवीं गेले होते तेथूनच घरीं न जातां व कोणास न भेटतां आपल्या कामावर हजर झाले. आठ वर्षें लढाई शहाण-

पणानें चालवून जय व स्वातंत्र्य मिळवून आतां आपल्या घरीं गेले. फौज त्यांस राजा करण्यास तयार झाली होती व पुष्कळ लोकही त्यांस राजा करण्यास तयार झाले असते; परंतु त्या सत्पुरुषास राजा होणें आवडलें नाहीं. राज्यपदापेक्षां त्यास शेतकी बरी वाटली. राजा होण्यांत त्यास सुख व भूषण वाटलें नाहीं व त्यांत देशाचें व लोकांचें हित आहे असें वाटलें नाहीं. तो राजा झाला असतां तर कदाचित् त्याच्या ताहयात लोकांस सुख झालें असतें; परंतु पुढचा नेम कोणीं सांगावा? तस्मात् एका मनुष्याच्या ताहयातीचा सुखाचा प्रकार त्यांस नापसंत वाटून निरंतरची सुखप्राप्ति होण्यासारख्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीची स्थापना व्हावी हेंच त्यांस पसंत वाटलें. सारांश, स्वतांचा व क्षणिक सुखाचा विचार मनांत न आणितां सर्वांच्या व निरंतरच्या सुखाचा त्यांचा विचार होता व याच निरपेक्ष व निर्मल बुद्धीनें त्यांनीं आपण होऊन सेनापतीच्या हुद्याचा राजीनामा दिला आणि लोकांचे आशिर्वाद घेत व स्वातंत्र्यसुख अनुभवीत शेतकीचा धंदा पुन्हा चालू केला. अशा स्थितींत वाशिंग्टन यांच्या आनंदास व सुखास पारावरच नाहीं असें ह्मटलें पाहिजे. असा भाग्यशाली पुरुष पूर्वीं कधींही झाला नाहीं व पुढेंही क्वचित् निपजेल. हा घरीं गेल्यावर त्यांच्या प्रिय पत्नीस व त्यांच्या वृद्ध मातोश्रीस किती आनंद झाला असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. सारांश धन्य तो स्वदेशभक्त, वाशिंग्टन ज्या देशांत तो जन्मला तो देशही धन्य ज्या लोकांत तो वागला ते लोकही धन्य ! ! !

असो, जनरल वाशिंग्टन तारीख २४ डिसेंबर सन १७८३

रोजीं आपल्या घरीं मौंट वर्नान येथें पोंचले. ते तेथें गेले तेव्हां अतिशय थंडी व बर्फ पडून रस्ते देखील कांहीं दिवस बंद पडले होते. याजमुळें त्यांस आपल्या मातुश्रीस फ्रेडरिक्सबर्ग येथें लागलेंच जाऊन भेटतां आलें नाहीं. ते आपल्या घरीं सरासरी नऊ वर्षे नवते याजमुळें त्यांच्या शेतीच्या कामास धक्का बसला होता. उत्पन्नही बरेंच कमी झालें होतें. अशा नाजूक स्थितींत ते होते. शिवाय आतां त्यांच्या भेटीकरितां व त्यांस पाहण्याकरितां जागोजागचे व देशोदेशचे लोक त्यांजकडे येतील याजमुळें त्यांस विशेष खर्च येईल असा संभव होता. ह्या गोष्टी मनांत आणून पेन्सिल्वेनिया स्टेटच्या कौन्सिलनें कांग्रेसमधील आपल्या मुक्त्यारांस, वाशिंग्टन यांस त्यांच्या कामगिरीबद्दल सरकारांतून कांहीं बक्षीस मिळण्याचा उद्योग करावा असें सांगितलें होतें. परंतु त्यांनीं अगोदर वाशिंग्टन यांच्या मनाचा खुलासा काढून मग काय करणें तें करावें असें सूचविलें होतें. त्यांनीं जनरल वाशिंग्टन यांस या बाबतींत लिहिलें तेव्हां त्यांनीं त्यांचे उपकार मानून गंभीरपणानें आपला स्पष्ट नकाराचा जबाब कळविला. त्या उत्तरानें, त्यांनीं,आपण स्वदेशाची सेवा, निरपेक्ष बुद्धीनें व स्वतांच्या उत्पन्नाच्या बाबतींत झीज सोसून केली हें जें मनाचें मोठें समाधान तें कमी होऊं द्यावयाचें नाहीं असा आपला आग्रह दाखविला. दुसरा एखादा स्वार्थसाधु व पैशाचा लालची मनुष्य असता तर त्यानें हें ह्मणणें मोठ्या खुशीनें मान्य केलें असतें; परंतु ह्यांचा प्रकार अगदीं निराळा होता. घरीं गेल्यावरोबर, हिशेब शेतीची स्थिति पाहून निरनिराळ्या कामांकरितां वेळेची वांटणी करून स्वातां सर्व आपल्या दृष्टीनें पाहण्याचा क्रम सुरू

झाला. त्यांनीं शिपाईगिरीचें मोठें काम करून जगास उदाहरण घालून दिलें. तसेंच साधारण मनुष्याच्या स्थितींत देखील आपल्या शेतकरी देशबांधवांस शेतीच्या कामांत कित्ता घालून देण्यास ते तयार झाले. शेती ही राष्ट्राची संपत्ति वाढण्याचें मुख्य साधन आहे व तोच त्याच्या सुखाचा पाया आहे असें वाशिंग्टन यांचें मत होतें. कारण शेतीच्या योगानें बहुतक सर्व प्राण्यांच्या निर्वाहाचे पदार्थ मिळतात तसेंच सर्व प्रकारच्या उद्योगास सामान मिळतें. तो धंदा प्रकृतीस मोठा हितकारक असून सर्व धंद्यांत तो श्रेष्ठ मानला जात आहे. तसा वाईट संवयी न लागण्यास तो धंदा फार उपयोगी पडतो. अगोदर शहरांपासून ह्मणजे चैनीच्या ठिकाणांपासून दूर अंतरावर तो चालतो याजमुळें दुर्गुणाच्या जवळच जात नाहीं. सारांश हा शेतीचा धंदा सर्व प्रकारें योग्य होय. आतां या योग्य धंद्यास यश येण्यास उद्योग काटकसर, अक्कल व सद्गुण यांचें ऐक्य लागतें. तेव्हां या गुणांचें उदाहरण दाखवून आपल्या देशबांधवांस उत्तेजन देण्याचा त्यांचा हेतु होता. फौजेमध्यें ते असत तेव्हां देखील त्यांनीं आपल्या घरच्या शेतीचा बंदोबस्त ठेविला होता. त्यांच्या कारभाऱ्याकडून दर आठवड्यास झाल्या कामाचा रिपोर्ट येत असे व पुढच्या कामाविषयीं ते सूचना करीत असत. आतां तें सर्व काम ते आपण प्रत्यक्ष करावयास लागले. प्रथम सर्व पाहणी करून नंतर या शेतीच्या संबंधाच्या निरनिराळ्या प्रकारच्या माहितीकरितां यूनैटेडस्टेट्स व इंग्लंड यांतील अनुभविक व माहीतगार लोकांस पत्रें लिहून त्यांशीं पत्रव्यवहार चालू केला. त्यांजकडून आलेल्या माहितीचा उपयोग आपल्या आसपासच्या लोकांस हितावह होईल असें त्यांस

वाटल्यास, ते त्या माहितीप्रमाणें प्रयोग करून पाहून तो लोकांस कळवीत. ते उगीच एखाद्या गोष्टीच्या नादास लागत नसत. आलेल्या माहितीचा नीट विचार करून, तिकडील जमीन वगैरेची स्थिति मनांत आणून, आपल्या देशाच्या हवामानाकडे पाहून, बेताचाच उद्योग सुरू करीत. त्यांत यश आल्यास ते उद्योग वाढवीत. असें करण्याचें कारण अमुक सुधारणा करावी असें सांगणें व त्याप्रमाणें करणें व तसेंच घडून येणें कठीण आहे. ही गोष्ट नेहमीं मनांत बाळगून ते आपलें काम चालवीत असत. सकाळीं ते वेळच्यावेळीं शेतांत काम पहात फिरत आणि काम करणाऱ्या लोकांस अमुक रीतीनें काम करा असें सांगून, त्याप्रमाणें झालें कीं नाहीं तें पहात असत. त्यांची नजर चोहोंकडे सारखी असे आणि यामुळें कांहीं कमीजास्त झालें कीं तें व्हांच त्यांच्या लक्षांत येई. जे काम बरोबर करीत त्यांस शाबासकी मिळे व जे कुचराई करीत त्यांस रागें भरत. लोकांस ते आळशी होऊं देत नसत. आळसानें यजमान व कामकरी या दोघांचेंही नुकसान होतें अशी त्यांची समजूत होती. हुकमाप्रमाणें काम झालेंच पाहिजे अशाविषयीं ते फार सक्त असत आणि तसें झालें ह्मणजे ते बक्षिसेंही देत असत. सारांश लोक त्यांस कडकपणामुळें भीत असत व दयाळूपणामुळें त्यांजवर प्रीति करीत असत

यांप्रमाणें शेतीचें काम चाललें असतां त्यांचे मित्र मार्किस आफ् लाफेयट तारीख १७ आगष्ट रोजीं त्यांच्या भेटीस फ्रान्समधून आले. ते पंधरा दिवस राहून आपल्या देशाचें काम अमेरिकेंत होतें तिकडे गेले. वाशिंगटनही, आपली जमीन ओहिओ व कानवा नद्यांच्या कांठीं होती ती डाक्टर क्रेक यांस बरोबर घेऊन अगदीं सडे फारसा इतमाम बरोबर न

घेतां पाहण्यास गेले. त्यांनीं मागचीं जुनीं ओळखीचीं ठिकाणें पाहिलीं आणि मानानगेहला नदीपर्यंत जाऊन ते परतले. सेप्टेंबरच्या पहिल्या तारखेस निघाले ते जंगल, डोंगर वगैरे ओसाड पडलेले प्रदेश पहात पहात ता० ४ आक्टोबर रोजीं घरीं मौंट व्हर्नान येथें आले. ह्मणजे एक महिना चार दिवसांत ते६८० मैल घोड्यावर फिरून आले. या प्रवासाचा हेतु, उगीच मुलूख पहाण्याचा नसून आपल्या देशांतील निरनिराळ्या भागांत व्यापार वाढवून ऐक्य वाढवावें असा होता. तसेंच सरहद्दीवरच्या लोकांचें मन दुसऱ्या परकी लोकांकडे न वळतां आपल्या देशांतच उद्योगधंदे व व्यापार वाढविण्याकडे लागावें असा त्यांचा उद्देश होता. हा हेतु सिद्धीस जाण्यास व्यापारास मार्ग सुगम करावयाचा होता. पोटोम्याक व जेम्स नद्या जोडून जलमार्गानें व्यापारास उत्तेजन द्यावयाचा इरादा होता. त्याप्रमाणें त्यांनीं वर्जीनियाच्या पार्लमेंट सभेस गवर्नर यांच्या मार्फत सुचविलें. ती सूचना गवर्नर व इतर सभासदांस पसंत पडून काम सुरू झालें. त्या कामाकरितां नवीन दोन कंपन्या स्थापन झाल्या. एक कंपनी वर्जिनियाच्या स्थानिक सरकारच्या मदतीनें व दुसरी मेरिलंडच्या स्थानिक सरकारच्या मदतीनें. या दोनही कंपन्यांचे अध्यक्ष जनरल वाशिंगटन यांस नेमिलें. सदरहू स्थानिक सरकारांच्या विचारानें वर्जिनिया कंपनीचे पन्नास व मेरिलंडच्या कंपनीचे शंभर असे दीडशें शेर ( भाग ) जनरल वाशिंगटन यांस देण्याचें ठरलें. या एकंदर शेरांचा आकार चाळीसहजार डॉलर्स ह्मणजे अजमासें एक लक्ष रुपये होता. हा प्रसंग पुनः परीक्षेचा व संकटाचा आला. कोणीही साधारण मनुष्यानें एवढी व लोकांनीं स्वसंतोषानें स्थानिक सरकारच्या संम-

तीनें दिलेली देणगी आनंदानें पतकरली असती. परंतु वाशिंग्टन यांचा प्रकार चमत्कारिक होता. द्रव्याच्या आशेनें तर ती देणगी त्यांस नकोशी होती, कारण अशा देणग्या वगैरे न घेण्याचा त्यांचा निश्चयच होता. कोणत्याही कामांत ओशाळगतीचा प्रकार त्यांस आवडत नसे. त्यांत आपल्या स्वातंत्र्यास धक्का बसतो. परंतु याप्रसंगीं त्यांस अडचण पडली. सर्व लोकांनीं व स्थानिक सरकारांनीं स्वसंतोषानें व प्रेमानें ही देणगी दिली ती नाकारण्यांत त्यांचा अपमान केल्यासारखें होऊन सर्वांस वाईट वाटेल, आणि देणगी तर मनापासून घ्यावयाची नाहीं असा त्यांच्या मनाचा दृढनिश्चय होता. शेवटीं, त्यांनीं स्वतांला ही देणगी तर नकोच; परंतु माझ्या मनाप्रमाणें एखाद्या सत्कार्यास लावण्याच्या परवानगीनें देत असाल तर पतकरतों असें कळविलें. लोकांनीं त्यांच्या इच्छेवर सर्व प्रकार ठेवला त्याजमुळे त्यांनीं ते शेर स्वदेशांतील विद्यावृद्धीच्या कामाकडे लावून दिले. या कृत्यामध्यें त्यांनीं स्वार्थ एकीकडे ठेवून देशाचें हित हाच आपला खरा स्वार्थ असें उत्तम उदाहरण दाखविलें.

जनरल वाशिंग्टन हे प्रवास करून आल्यावर त्यांस एकंदर देशाच्या स्थितीची सुधारणा करण्याविषयीं सूचना करण्याची विशेष इच्छा उत्पन्न झाली. कांग्रेसचे नवीनच नेमिलेले प्रेसिडेंट मि० रिचर्ड हेनरी ली यांस त्यांनीं पत्रद्वारें अशी सूचना केली कीं, आपल्या देशाच्या पश्चिमेकडील बाजूस जलमार्गाचा चांगला शोध लावावा, त्यांत व्यापाराच्या उपयोगी पडण्यासारखे जलमार्ग कसे व कोठें केल्यास सोय होईल हें पाहून सर्व देशाचा चांगला व पूर्ण नकाशा करवावा. याप्रमाणेंच जमिनी लोकांस वसाहतीकरितां देण्याच्या संबंधानेंही

सूचना केल्या होत्या. याप्रमाणें ते वरीं शेतीचा धंदा चालवून देशाच्या हिताच्या कामास अनेक तऱ्हेनें झटत असत. ते आपल्या घरच्या शेतीचें काम उत्तम रीतीनें चालवून दररोज अमुक काम झालें असें टिपून ठेवीत असत. नवीन प्रकारचा काय उद्योग केला, त्याचा परिणाम कसा काय झाला, हें सर्व ते लिहून ठेवीत. याप्रमाणें उद्योग चालला असतां व शेतीचा धंदा त्यांस विशेष आवडत असल्यामुळें त्यांचें लक्ष एकंदर देशाच्या शेतीकडे वळलें. तसेंच, तयार झालेला माल देशाच्या देशांत व्यापाराच्या योगानें पसरावा व लोकांत सुखवृद्धि व्हावी ही त्यांची विशेष इच्छा होती. व्यापाराच्या सोयीकरितां खुष्कीचे व पाण्यांतून मार्ग पाहिजे होते. ते तयार करण्यास अधिकार पाहिजे होता, तो कोठें एक ठिकाणीं नव्हता. कांग्रेस केवळ नांवाचें अधिकाराचें स्थान होतें. त्यांच्या हातीं पूर्ण सत्ता नव्हती. ही उणीव जनरल वाशिंग्टन यांस फार दिवसांपासून वाटत होती, ती दिवसानुदिवस अधिकाधिक वाटूं लागली.

वरील स्थितीचें साधारण स्वरूप असें होतें:- युनैटेड-स्टेट्स व इंग्लंड यांच्या कुरकुरी सुरू होऊन प्रकरण अगदीं निकरावर आलें तेव्हां सन १७७४ मध्यें तेरा स्टेट्स अगर संस्थानें यांपैकीं मासाचुसेट्स या संस्थानच्या सूचनेवरून फिलेडेल्फिया येथें तारीख २० सेप्टेंबर रोजीं मुख्त्यार मंडळी जमून पहिली राष्ट्रीय कांग्रेस जमली. त्या कांग्रेसचा उद्देश सर्वांच्या साधारण हिताचा विचार करणें व प्रसंगानुसार उपायांची योजना करणें हा होता. त्या मंडळीनें कांहीं नियम केले. त्यांत प्रत्येक संस्था-

नाचें एक मत असावें असा एक मोठा विशेष महत्वाचा नियम होता. हा सर्व लढाईच्या गडबडीच्या वेळीं चालला. तसेंच त्या मंडळीनें दुसरी कांग्रेस भरवावी अशी सूचना केली. तिजवरून सन १७७६ च्या मे महिन्यांत दुसरी कांग्रेस भरली आणि त्यांनीं लढाई करण्याचा ठराव केला, आणि सन् १७७६ च्या जुलैच्या ४ थ्या तारखेचा स्वातंत्र्याचा जाहिरनामा हा नामांकित लेख प्रगट केला. तो जाहीरनामा अमेरिकन लोकांनीं मान्य केला. तेव्हांपासून इंग्लिशसरकारचा संबंध तोडणें व राष्ट्रीय स्वातंत्र्य स्थापन करणें हा त्या मोठ्या गडबडीचा हेतु होता. हा हेतु सिद्धीस नेण्याकरितां कांग्रेसनें सर्व संस्थानांस स्थानिक स्वराज्याची व्यवस्था करण्याविषयीं सुचविलें, आणि त्याप्रमाणें ती सूचना अमलांत आली. तेव्हांपासून प्रत्येक संस्थानच्या पार्लमेंटाकडून कांग्रेसकरितां सभासद नेमिले जाऊ लागले. व त्यांच्या हातून सर्व राज्यकारभार चालू झाला. त्यांच्या हातीं सर्व सत्ता होती व ती अपरिमित होती. त्यानीं लढाई व सल्ला केला; फौज उभी केली व आरमार सज्ज केलें; परराष्ट्रांशीं दोस्ती व तह केले; कर्ज काढलें व राज्याचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं. या कारकीर्दीत या मंडळीचा अधिकार काय याजविषयीं कांहीं ठरलेलें नव्हतें. ही राज्यव्यवस्था केवळ त्या प्रसंगापुरती तूर्तची होती; तथापि त्या कांग्रेसनें हें आपलें काम करून सर्व संस्थानांच्या ऐक्याकरितां व राज्यव्यवस्था कायमची करण्याकरितां योजना केली. या मंडळीनें पुष्कळ विचार व वादविवाद करून आर्टिकल्स आफ् कॉनफिडेरशन अगर संस्थानांच्या ऐक्याचे करार म्हणून सन. १७७७ च्या नोवेंबरमध्यें कांहीं नियम ठरविले व ते सन १७७८ च्या

जुलैच्या ९ व्या तारखेस सर्वांस मान्य होऊन सभासदांच्या त्यांजवर सह्या झाल्या. परंतु हे करार सर्व संस्थानांकडून मान्य होण्यास बराच काळ लागला. सन १७८१ च्या मार्च महिन्यांत ते करार सर्व संस्थानांस मान्य झाले. परंतु हे करार मान्य होतात न होतात तों त्यांजमध्यें कमीपणा दिसावयास लागला, आणि त्यांत एक अशी भयंकर उणीव दिसूं लागली कीं, कांग्रेसला सर्व उपाय सुचवावयास अधिकार होता परंतु ते अंमलांत आणण्यास त्यांस मुळींच अधिकार नव्हता. त्या मंडळीनें कायदे करावे; परंतु ते संस्थानांनीं मानावेच अगर त्यांजकडून मानिले जावे असें करण्याबद्दल कांग्रेसला अधिकार दिलेला नव्हता. यामुळें अनुभवाअंतीं असें दिसून आलें कीं, ज्या संस्थानांच्या इच्छेस जे कायदे आले ते त्या संस्थानांनीं मानले. बाकीचे कांग्रेसचे कायदे तसेच वायफळ राहिले. कांग्रेसचे कायदे मोडल्याबद्दल कोणाही व्यक्तीस शासन करण्यास त्यांस अधिकार नव्हता. कर बसविण्यास, सारा वसूल करण्यास, व व्यापाराची व्यवस्था लावण्यास कांग्रेस सभेला अधिकार नव्हता. सारांश त्या वेळच्या कांग्रेसच्या संबंधानें एका शहाण्या राजकारणी पुरुषानें थोडक्यांत असें म्हटलें आहे कीं, कांग्रेस यांस तह करण्यास अधिकार आहे; परंतु त्या प्रमाणें वागण्याविषयीं शिफारस करण्यापेक्षां त्यांच्यानें अधिक करवत नाहीं. त्यांनीं परदेशीं वकील नेमावे; परंतु त्यांचा खर्च देण्याचा त्यांस अधिकार नाहीं. त्यांनीं कर्ज काढावें; परंतु त्याजपैकीं एक पैसा परत त्यांस देतां येत नाहीं. त्यांस नाणें पाडण्याचा अधिकार आहे; परंतु तें पाडण्याकरितां एक तोळाभर देखील धातू बाहेरून आणवितां येत नाहीं. त्यांनीं लढाई करण्याचें व अमुक फौज

ठेवण्याचें ठरवावें; परंतु एक देखील शिपाई ठेवण्याचा त्यांस अधिकार नाहीं. सारांश त्यांनीं पाहिजे ते ह्मणावें; परंतु त्यांस कांहीं एक करतां येत नाहीं. अशी त्या कांग्रेसची स्थिति होती. ह्मणजे कांग्रेसला सत्ता मुळींच नव्हती. जनरल वाशिंग्टन यांच्या समजुतीस व अनुभवास ही स्थिति लढाईच्या वेळीं उत्तम प्रकारें आली होती त्याजमुळें त्यांच्यानें उगीच बसवेना. जेव्हां जेव्हां प्रसंग येई तेव्हां तेव्हां ते आपल्याकडून सर्वांस सूचना करीत. लढाईच्या वेळेस अव्यवस्था होऊन वारंवार संकटें येण्यास व लढाई फार दिवस लांबण्यास ही कांग्रेसच्या अधिकाराची कमतरता विशेष कारण होती हें त्यांच्या लक्षांत पक्कें वागत होतें. परंतु संस्थानांचें इतपत ऐक्य कायम राहिलें व राज्यकारभार चालला तो केवळ संकटाच्या नेटानें चालला. लढाई संपली व आपण स्वतंत्र झालों असें लोकांस वाटलें कीं, सर्व बंधनें शिथिल होऊन राज्यव्यवस्थेचा घोंटाळा होईल आणि अत्यंत संकटानें संपादिलेलें स्वातंत्र्यही कदाचित् नष्ट होईल अशी जनरल वाशिंग्टन यांस भीति वाटत होती. तशांत कित्येक इंग्लिश राजकारणी पुरुषांनीं असें भाकित केलें होतें कीं, अमेरिकन लोकांच्या अंगावर तर सर्व पडूं द्या ह्मणजे सर्व घोळ होऊन त्यांचें राज्य नाहींसें होईल. याचें तात्पर्य इतकेंच कीं, लोकांच्या अंगावर सर्वस्वी व्यवस्था पडली ह्मणजे ते शिथिल होतात आणि त्याचा परिणाम घोंटाळा होतो. लोक पाणीदार व विचारी असले तर ते नेटानें काम पुढें सरकवीत नेतात आणि मग अर्थातच त्यांचा उत्कर्ष होतो. हें मनांत आणून जनरल वाशिंग्टन लोकांचीं मनें जागृत व तयार करण्याचा नेहमीं उद्योग करीत असत.

लढाई संपली असें ठरल्याबरोबर जनरल वाशिंग्टन हे राज्यव्यवस्था सुधारण्याच्या उद्योगास लागले. सन १७८३ च्या ३१ मार्च रोजीं कांग्रेसमधील आलेक्झांडर हामिल्टन नांवाचे गृहस्थ यांस यासंबंधाचा विचार करण्याविषयीं त्यांनीं पत्र लिहिलें. तसेंच सर्व संस्थानांचे गवर्नर यांसही या बाबतींत विचार करण्याकारितां त्यांनीं त्याच वर्षाच्या जून महिन्याच्या ८ व्या तारखेस पत्रें लिहिलीं. त्यांत त्यांनीं आपले विचार स्पष्टपणें कळविले. देशाची व लोकांची स्थिति अत्यंत बिकट आहे असें उत्तम रीतीनें दाखवून यूनैटेडस्टेट्स देशाचें बरें होण्यास काय पण त्याच्या अस्तित्वास चार मुख्य गोष्टी अत्यावश्यक आहेत असें त्यांनीं कळविलें. सर्व संस्थानांचें कधीं न तुटणारें असें ऐक्य असून राज्यसत्ता एका मुख्याधिकाऱ्याच्या हातीं पाहिजे. जो प्रसिद्धपणें न्याय झाला त्याजविषयीं लोकांची पूज्यबुद्धि पाहिजे. स्वस्थतेच्या वेळेकारितां फौज वगैरेचा बंदोबस्त पाहिजे. आणि यूनैटेडस्टेट्च्या लोकांमध्यें स्वस्थता व मित्रभावाचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे म्हणजे त्याच्या योगानें स्थानिक संबंधाचे रागलोभ विसरले गेले पाहिजेत. तसेंच सर्वांच्या हिताकरितां आपापला हेका सोडून देऊन सर्व राष्ट्राच्या फायद्याकरितां व्यक्तींनीं झीज सोसून कांहीं गोष्टींत नुकसान देखील सोसण्यास तयार झालें पाहिजे. या अवश्य गोष्टींचा विचार करण्यास सर्वांस विनंति केली. याप्रमाणें वाशिंग्टन यांनीं निरनिराळ्या गृहस्थांस वारंवार पत्रें लिहून त्यांनीं या गोष्टीचा विचार करावा असें केलें. त्यांच्या परिश्रमाचा व वजनाचा पुष्कळ उपयोग होत गेला. तराही संस्थानें आपापल्या हिताकरितां निरनिराळे विचार करून तक-

रारी उत्पन्न करीत आणि कांग्रेसला कोणी पुसेनासें होत चाललें होतें. जनरल वाशिंग्टन तर अगदीं निराश होत चालले होते. तथापि त्यांनीं आपला उद्योग व लिहिण्याचा व बोलण्याचा क्रम सोडला नाहीं. शेवटीं सन १७८५ च्या मार्च महिन्यांत या इष्ट हेतूच्या सिद्ध्यर्थ उद्योगास आरंभ झाला. मेरी लांड व वर्जिनिया प्रांतांच्या तर्फेचे मुख्त्यार, पोटोमाक व जेम्स वगैरे नद्यांच्या संबंधानें जळमार्गानें व्यापार चालू करण्याच्या विचाराकरितां, आलेक्झांड्रिया येथें जमले होते. ती मंडळी तशीच मौंट वर्नान येथें गेली, त्या प्रसंगीं, त्या मंडळीनें आपापल्या पार्लमेंटांस सुचवून दोन्ही संस्थानांच्या व्यापाराच्या सोईकरितां कांहीं नियम करण्यासाठीं मुक्त्यार नेमण्यांत येतील असें करावें व त्या समयास इतर संस्थानांकडून त्यांचे मुक्त्यारांनीं यावें ह्मणून सूचना करावी अशाविषयीं जनरल वाशिंग्टन यांच्या सांगण्यावरून सर्वांचा विचार ठरला. त्याप्रमाणें आना ोलिस येथें सन १७८६ च्या सेप्टेंबर महिन्यांत संस्थानांच्या तर्फेच्या मुकत्यारांची सभा भरली. त्या प्रसंगीं पांच संस्थानांचे मुकत्यार हजर होते. या जमलेल्या मंडळीनें आपापल्या स्थानिक सरकारास रिपोर्ट पाठविले. त्यांत त्यांनीं हल्लींच्या संस्थानांच्या ऐक्याच्या करारामध्यें दोष आहेत व त्यांच्या दुरुस्तीची जरूरी आहे असें दाखवून सर्व संस्थानांनीं आपापले मुक्त्यार पाठवून येत्या वर्षाच्या आरंभीं त्यांची सभा फिलेडेल्फिया येथें भरावी ह्मणून शिफारस केली. त्या शिफारशीचा विचार होऊन वर्जिनिया संस्थानाकडून पहिल्यानें मुक्त्यार नेमिले गेले व त्यांत जनरल वाशिंग्टन यांचें नांव पहिलें घातलें गेलें. इतर संस्थानांतही या सूचनेबद्दल विचार

होऊन मुकत्यार नेमले गेले. ही सभा फिलेडेल्फियामध्यें सन १७८७ च्या मे महिन्यांतील दुसऱ्या सोमवारीं भरावयाची असें ठरलें होतें. त्या सभेस जाण्यास वाशिंग्टन प्रथम कांकूंच करीत होते. एक तर त्यांस आपलें स्वस्थ राहणें, शेतीचा आवडता धंदा, व बाह्यप्रदेशांहून येणाऱ्या गृहस्थांच्या आगतस्वागताचें समाधान हीं सर्व सोडून जाणें बरें वाटेना. शिवाय त्यांनीं कितीएक वेळ बोलून दाखविलें होतें कीं, आपण राजकीय वगैरे संबंधाचें देशाचें काम सोडून आपलें आयुष्य स्वस्थतेंत घालविणार, त्या बोलण्यास विरोध येतो व लोक याजबद्दल आपल्यास काय ह्मणतील हा विचार त्यांच्या मनांत घोळत होता. तसेंच ही सभा फिलेडेल्फिया येथें भरणार होती व तेथें एक लष्करी सरदारांची सभा भरत असे तिची सभा मे महिन्याच्या पहिल्या सोमवारीं भरावयाची होती व तिचे हे अध्यक्ष होते; परंतु प्रकृतीच्या वगैरे कारणांनीं त्या अध्यक्षपदाचा त्यांनीं राजीनामा दिला होता. तेव्हां त्या सभेस येत नाहीं असें सांगून आतां या सभेस जावयाचें ह्मणजे त्या लोकांस वाईट वाटेल व आपल्या वर्तनांत मेळ नाहीं असें होईल ह्मणून त्यांचें मन मागें घेत होतें. शिवाय अंगास कळा लागण्याचा विकार त्यांला जडला होता त्यामुळें वेळेस आपली प्रकृति नादुरुस्त होऊन आपल्याबद्दल वर्जिनिया संस्थानांतून मुकत्यार न गेल्यास नुकसान होईल अशीही त्यांस भीति होती. अशा अनेक कारणांनीं ते घोटाळ्यांत पडले होते. परंतु त्यांच्या मित्रमंडळीनीं व दुसऱ्या थोर स्वदेशभक्तांनीं त्यांस अतिशय आग्रह केला व ते अशा प्रसंगीं असावे अशी सर्वांची इच्छा होती. याच समयास दोन विशेष गोष्टींनीं त्यांच्या

मनाचा निश्चय होऊन त्यांनीं सभेस जाण्याचें कबूल केलें. पहिली गोष्ट ही कीं, देशांतील अस्वस्थतेमुळें कितीएक लोकांस असें वाटूं लागलें होतें कीं, राजसत्ताक राज्य स्थापन व्हावें, नाहीं तर इंग्लंडची सत्ता कबूल करावी; आणि अशा मताचे जे लोक होते त्यांच्या मनांत ही सभा भरूं नये असें होतें व त्याजकरितां त्यांचा उद्योग चालला होता, आणि ती गोष्ट जनरल वाशिंग्टन यांस कळली होती. दुसरी गोष्ट ही कीं, मासाचुसेट्स संस्थानांत तर उघड दंगा होऊन बंडावा सुरू झाला होता व तो लवकर आंवरेल असें दिसेना. या गोष्टीमुळें त्यांनीं आपल्या मनाचे विचार एकीकडे गुंढाळून ठेऊन पुनः स्वदेशजननीच्या सेवेचें आमंत्रण पतकरलें. असे कांहीं भाग्यशाली पुरुष जगांत उत्पन्न होतात कीं त्यांचें स्वत्व नाहींसें होऊन ते केवळ लोकांच्या सौख्यदेवतेस बळी दिले जातात, व त्यांचें आयुष्य व शरीर चंदनासारखें परोपकारार्थ झिजत जातें. त्यांतीलच जनरल वाशिंग्टन होत असें समजलें पाहिजे

हें आमंत्रण पतकरल्यावर त्यांनीं कितीएक ऐतिहासिक पुस्तकें वाचून टांचणें व उतारे करून घेतले आणि संस्थानांच्या ऐक्याच्या संबंधानें काय केलें पाहिजे याजबद्दल पक्का विचार करून ठेविला. इतक्यांत मासाचुसेटस् संस्थानांतील बंडावा मोडून बंडवाले कानडा प्रांतांत परदेशीं पळून गेले असें समाधानाचें वर्तमान त्यांस कळलें. जनरल वाशिंग्टन मौंट वर्नान येथून फिलेडेल्फिया येथें जाण्याकरितां तारीख ९ मे रोजीं निघाले. वाटेंत तारीख १३ रोजीं त्यांच्या जुन्या सरदार मित्रमंडळीची चेस्टर येथें गांठ पडली व जागोजाग त्यांचा सन्मान होत गेला. त्या महिन्याच्या २५ व्या तारखेपर्यंत काम चालू होण्यास पुरेशी

इतकी मुक्त्यार मंडळी जमली नव्हती. ती जमल्यावर सभा भरून जनरल वाशिंग्टन यांस सर्वानुमतें अध्यक्ष नेमिलें.

ही सभा भरल्यावर प्रथम राज्यव्यवस्थेसंबंधीं नानाप्रकारच्या सूचना मंडळीनीं केल्या व त्यांजविषयीं विचार व्हावयाचा असें ठरलें. त्या सूचनांची प्रत प्रत्येक सभासदाजवळ विचार करण्याकरितां देऊन ठेविलेली होती. हा कागद गुप्त व जपून ठेवावयाचा होता असेंही ठरलें होतें. या सभेंत काय व कसा विचार चालला आहे याजबद्दल तूर्त वर्तमान बाहेर फुटूं द्यावयाचें नव्हतें. कारण त्याच्या योगानें वर्तमानपत्रांतून चर्चा होऊन उगीच उहापोह होऊन घोटाळा होण्याचा संभव होता. सदहू सभेचें विचाराचें व वादविवादाचें काम दररोज चार पासून सात तासपर्यंत याप्रमाणें सुमारें चार महिने चाललें होतें. वाशिंग्टन अध्यक्ष होते याजमुळें त्यांस वादविवादांत फारसें बोलतां आलें नाहीं; तथापि त्यांचे विचार लोकांस बहुतेक कळले होते व त्या धोरणानेंच बहुतेक निकाल झाला. सन १७८७ च्या सेप्टेंबर च्या १७ व्या तारखेस " कान्स्टिटयुशन " नांवाचा राज्यव्यवस्थेसंबंधीं नवा लेख त्या सभेंत तयार झाला आणि त्याजवर सर्व सभासदांच्या सह्या झाल्या. सर्व मंडळीस झालेल्या कामाबद्दल मोठ समाधान वाटलें. त्या सह्या होण्याच्या प्रसंगीं नामांकित स्वदेशभक्त बेंजामिन फ्रांकलिन कांहीं सभासदांस आनंदानें ह्मणाले कीं अध्यक्षांच्या पाठीमागें सूर्याचें चित्र काढलेलें आहे त्याजकडे वादविवादाच्या प्रसंगीं मी पाहात असें तेव्हां तो उगवता का मावळता सूर्य आहे याचा माझ्या मनानें निर्णय करवत नसे; परंतु तो मावळता नसून उगवताच आहे असें शेवटीं आतां

मला वाटतें. याप्रमाणें काम आटपल्यावर जनरल वाशिंग्टन यांनीं तो लेख कांग्रेस सभेकडे रवाना केला व तेथून त्याच्या प्रती प्रत्येक संस्थानाकडे विचार करून मंजूर होण्याकरितां गेल्या. नऊ संस्थानांनीं तो लेख मंजूर केल्यावर अंमलांत यावा असें ठरलें होतें. तेव्हां या गोष्टीस एक वर्ष लागेल असा अजमास होता. हें काम आटपल्यावर जनरल वाशिंग्टन स्वस्थ मौंट वर्नान येथें आपल्या घरीं जाऊन राहिले. वेळोवेळीं त्यांच्या मित्रमंडळीकडून जागोजाग या संबंधानें काय चाललें व काय झालें याचें वर्तमान त्यांस कळत असे शेवटीं सन १७८८ च्या जूनच्या २८ व्या तारखेस दहा संस्थानांनीं तो लेख मान्य केला. तेव्हां तो कायम झाला. दुसऱ्या बाकीच्या संस्थानांनींही तो थोडया दिवसांनीं मान्य केला; आणि कांग्रेस यांनीं तारीख १३ सेप्टेंबर सन १७८८ रोजीं हा लेख अमलांत आणण्याकारितां आक्ट ह्मणजे कायदा पास केला. त्यांत त्यांणीं असें ठरविलें कीं सन १७८९ च्या जानेवारीच्या पहिल्या बुधवारीं "प्रेसिडेंट" अगर मुख्य राज्याधिकारी नेमण्याकरितां लोकांनीं मुक्त्यार नेमावे. तसेंच पुढच्या फेब्रूवारीच्या पहिल्या बुधवारीं मुक्त्यार मंडळीनें अध्यक्षाची निवड करावी आणि पुढच्या मार्च महिन्याच्या पहिल्या बुधवारीं न्यूयार्क या शहरीं सरकारची सभा भरावी.

याप्रमाणें अमेरिकन लोकांस स्वातंत्र्य मिळण्याकरितां व स्वदेशाचा राज्यकारभार आपल्या हातीं येण्याकरितां वाशिंग्टन यांनीं लढाईचें काम केल्यानंतर, राज्यपद्धति व निरनिराळ्या संस्थानांचें दृढऐक्य व्हावयास पाहिजे होतें तेंही जमून आणण्याच्या कामीं त्यांसच मुख्यत्वें बराच उद्योग करावा

लागला आणि तोही परमेश्वरकृपेनें सफल झाला. सारांश देश-संपादन व राज्यस्थापन हीं दोन्हीं कामें झालीं. आतां फक्त राज्यव्यवस्था अंमलांत आणून दाखविण्याचें मात्र एक काम राहिलें होतें, त्याच्या तयारीची योजना कांग्रेस सभेनें ठरविली. प्रेसिडेंट नेमण्याचा प्रसंग सरकारी रीतीप्रमाणें येण्याच्या पूर्वींच सर्व संस्थानांतील लोकांच्या मनांचा असा धडा होऊन चुकला कीं, जनरल वाशिंग्टन यांसच प्रेसिडेंट नेमावें व त्यांनींच तें काम पतकरावें. जिकडे तिकडे लोकेच्छा प्रबळ होत चालली तेव्हां वाशिंग्टन यांची मित्रमंडळी त्यांस लोकवार्ता कळवून त्यांचें मन तें काम पतकरण्याविषयीं तयार करावयास लागली. त्यांच्या मनांत आतां या उतार वयाच्या वेळीं आपलें स्वास्थ्य सोडून पुनः राजकारणाच्या गडबडींत पडावयाचें नव्हतें. शिवाय तें काम मोठें जोखिमाचें असून मोठ्या घोटाळ्याचें होतें, व त्यांत कितीएक लोकांचीं मनें मतभेदामुळें दुखवलीं जाऊन अप्रीति उत्पन्न होण्याचा संभव होता आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तीस व अब्रूस धक्का बसण्याची देखील यांत भीति होती. तसेंच मला पुनः स्वदेशाच्या राजकारणाच्या गडबडींत पडावयाचें नाहीं असें ते कितीएक वेळ बोलून चुकले होते, त्या बोलण्यास हें काम पतकरल्यानें बाध येणार आहे व त्याजबद्दल लोक नांवें ठेवितील असेंही त्यांस वाटत होतें. परंतु मित्रमंडळीच्या विनंतीवरून त्यांनीं या सर्व अडचणींचा विचार करून व प्रसंग पाहून तें काम पतकरण्याचा निश्चय केला. इतक्यांत इकडे नेमलेल्या मुदतीस निवड होऊन तारीख ४ मार्च

सन १७८९ इसवी पासून चार वर्षें त्यांनीं प्रेसिडेंटचें काम करावें असें ठरलें.

---

## भाग ८ वा.

## जार्ज वाशिंग्टन यांची कारकीर्द.

हें वर्तमान खासगी रीतीनें त्यांस कळल्याबरोबर ते आपल्या तयारीस लागले. त्यांतील मुख्य व विशेष वर्णनीय गोष्ट ही कीं, ते आपल्या वृद्ध मातुश्रीस भेटण्यास, त्यांजपाशीं परवानगी मागण्यास व त्यांचा आशिर्वाद घेण्यास फ्रेडरिक्सबर्ग येथें गेले. तो प्रसंग विलक्षण सुखदुःखमिश्रित होता. आपला मुलगा आपल्या सर्व देशाचा मुख्य मनुष्य ह्मणजे सर्व लोकांच्या संमतीनें केवळ राजा झाला हें पाहून त्या आईस किती आनंद वाटला असेल हें सांगवत नाहीं. तसेंच ती अतिशय थकली होती व तिला जें दुखणें आलें होतें त्यांतून ती पार पडण्याची आशा नव्हती. तेव्हां ही शेवटचीच भेट ह्मणून ही गोष्ट अत्यंत दुःखाची होती. असो, त्या अलौकिक मायलेंकरांची प्रेमभरित व दुःखयुक्त शेवटची भेट होऊन वाशिंग्टन हे परत मौंट वर्नान येथें येऊन निघण्याची सर्व तयारी करून बसले. सरकारमार्फत सूचना येण्यास उशीर लागला. त्यांस कांग्रेसचें तूर्त काम चालविणारे प्रेसिडेंट मि. जॉन लांगडन यांचें ता. १४ एप्रिल रोजीं पत्र आलें आणि लागलेच तिसऱ्या दिवशीं ह्मणजे ता. १६ एप्रिल रोजीं ते मौंट वर्नान येथून निघाले. वाशिंग्टन यांनीं प्रेसिडेंटचें काम पतकरलें हें जेव्हां कळल्याबरोबर लोकांच्या पोटांत आनंद मावेनासा झाला.

ह्यामुळें वाटेंत त्यांच्या सन्मानार्थ व आनंदप्रदर्शनार्थ जागोजाग समारंभ झाले. वाटेंत आलेक्झांड्रिया येथील लोकांनीं सामोरें जाऊन त्यांस बोलावून नेऊन मानपत्र दिलें व त्याचें समर्पक उत्तर त्यांनीं दिलें. ते लोक अगदींच शेजारचे असल्यामुळें त्यांस त्यांच्या वियोगाचें दुःख वाटलें; परंतु स्वदेशहितसंबंधानें मोठें समाधान वाटलें. असेंच जागोजाग त्यांचें आगतस्वागत होत होत ते न्यूयार्कपर्यंत गेले. ट्रेंटन येथें एक मोठा चमत्कारिक व अलौकिक समारंभ तेथील स्त्रियांनीं केला होता. आसंपकिन नदीवरच्या पुलावर त्यांनीं कमान केली होती, आणि तीवर सन १७७६ च्या डिसेंबरची २६वी तारीख घालून, ज्या शूर पुरुषानें आयांचा बचाव केला तो लेकींचें संरक्षण करील असें लिहिलें होतें. बारा वर्षांपूर्वी जनरल वाशिंग्टन यांनीं त्या ठिकाणीं लढून शत्रूंपासून स्त्रियांचें संरक्षण केलें होतें, त्याचें हें वाक्य सूचक होतें. असो, त्या प्रसंगीं स्त्रियांचा मोठा समुदाय या पुलावर जमला होता. पहिल्यानें वृद्ध व पोक्त स्त्रिया, त्याच्यापुढें लहान वयाच्या, ह्याप्रमाणें अगदीं लहान कुमारिकांपर्यंत स्त्रिया तेथें उभ्या होत्या. स्वच्छ, व शुभ्र पोषाख केलेल्या कुमारिका फुलांच्या पाट्या घेऊन उभ्या केलेल्या होत्या वाशिंग्टन पुलावर आल्याबरोबर त्यांनीं त्या प्रसंगाकरितां तयार केलेलें गाणें प्रेमानें गावयास आरंभ केला जवळ आल्याबरोबर त्यांच्या पुढें त्या सुंदर सुवासिक फुलांच्या पाट्या ओतल्या. मौज पाहाण्याकरितां लोकांची गर्दी होऊन गेली होती. या समारंभानें वाशिंग्टन यांचें अंतःकरण विव्हळ होऊन गेलें. जो हात कशाही संकट समयीं व शत्रुसमोर तरवार धरली असतां चळावयाचा नाहीं तो तेथें टोपी संभाळण्यास

असमर्थ झाला. त्यांची टोपी हातांतून गळाली. तसेंच, जे डोळे कधींही व कसल्याही शत्रूस भ्यावयाचे नाहींत ते या प्रसंगीं सानंद प्रेमाश्रूंनीं स्रवूं लागले. सारांश या समारंभानें त्यांच्या मनावर पक्का अंमल बसविला व त्यांस मोहून सोडलें. हा समारंभ तारीख २१ एप्रिल सन १७८९ रोजीं झाला. याप्रमाणें जनरल वाशिंग्टन लोकांचा सन्मान घेत घेत न्यूयार्ककडे गेले. ते तारीख २३ एप्रील रोजीं बोटींत बसून न्युयार्ककडे जावयास एलिजाबेथ टौन येथून कांग्रेसकडून सामोरे आलेल्या मंडळीसह निघाले. ते निघाल्याबरोबर तोफांची सरबत्ती झाली. न्यूयार्क येथें पोचल्याबरोबर तेथील गवर्नर क्लिंटन वगैरे मंडळी सामोरी येऊन भेटली व स्वारी थाटानें राजरस्त्यांतून मिरवत जाऊन त्यांजकरितां तयार केलेल्या बंगल्यांत उतरली. नंतर गवर्नर यांनीं सर्वांस मेजवानी केली. पुढें सर्व तयारी झाल्यावर ता. ३० एप्रिल रोजीं त्यांनीं प्रेसिडेंट या हुद्याची शपथ घेतली. त्या दिवशीं सकाळीं देवळांतून प्रार्थना व उपदेश होऊन दोन प्रहरांनंतर शपथ घेण्याचा विधि झाला. त्या वेळेस सर्वांनीं त्यांचा जयजयकार केला. नंतर त्यांनीं सेनेट व हौस आफ रिप्रिझेंटेटिव्हस यांपुढें अधिकार स्वीकारल्याबद्दल भाषण केलें. त्या भाषणांत त्यांनीं या सर्व कृत्यांत जगत्पित्याचा कसा हात आहे आणि त्याच्या कृपेनें आजपर्यंत कसकशा सर्व गोष्टी घडत आल्या हें सांगितलें आणि त्याजबद्दल त्यांनीं त्याचे आभार मानिले. शिवाय प्रेसिडेंटच्या हुद्याबद्दल जें कायद्यानें नेमलेलें खासगीकारितां वेतन आहे तें पूर्वीच्या मसलन वहिवाटीप्रमाणें न घेण्याचा माझा मानस आहे तेव्हां तसें करण्यास मला सर्वांची परवानगी असावी, फक्त त्या हुद्याच्या

संबंधानें सरकारी खर्च होईल तो मात्र चालवावा असें त्यांनीं त्या भाषणांत सुचाविलें. त्यांच्या भाषणास समर्पक उत्तरें सेनेट व हौस आफ् रिप्रेझेंटेटिव्स यांजकडून मिळालीं. त्यांत जनरल वाशिंग्टन यांनी आपली स्वस्थता सोडून सर्व लोकांच्या ह्मणण्यास मान दिला याजमुळें सर्वत्रांस फार मोठें समाधान झालें आहे, तसाच सर्वांचा त्यांजवर भरंवसा असून त्यांच्या चांगुलपणाविषयीं व योग्यतेविषयीं सर्वांची खात्री आहे असेंही त्यांनीं बोलून दाखविलें, शेवटीं त्यांनींही प्रभुकृपेचें हें सर्व फल आहे असें कबूल करून जगत्पित्याचे आभार मानले. याप्रमाणें आरंभींचा समारंभ होऊन वाशिंग्टन आपल्या राहण्याच्या ठिकाणीं गेले. सायंकाळीं शहरांत दीपोत्सव झाला. याप्रमाणें जनरल वाशिंग्टन आपल्या नवीन महत्वाच्या हुद्यावर रुजू झाले.

परंतु त्यांनीं पतकरलेलें काम मोठ्या संकटाचें व जोखिमेचें होतें. पूर्वींची ठरलेली राज्यरीति नसल्यामुळें सर्वच गोष्टी नवीन करावयाच्या होत्या. सर्व जगांत ही प्रजासत्ताक राज्यपद्धति नवीन होती. त्यामुळें सर्वच अडचण होती. प्रेसिडेंट अगर त्या राज्याचे अध्यक्ष यांनीं लोकांस भेटावें कसें, त्यांशीं बोलावें कसें व वागावें कसें या सर्व गोष्टी आरंभापासून ठरवावयाच्या होत्या मोठ्या थोरल्या विस्तीर्ण वसाहत झालेल्या व मुळींच पाहणी न झालेल्या प्रदेशावर, व अमेरिकेंतील संस्थानांत असलेले निरनिराळ्या प्रकारच्या धर्मपंथांचे, व विचारांचे, समजूतदार, स्वातंत्र्याविषयीं बारीक व कडक नजर असणारे लोक अशावर राज्याधिकार नवीन ठरलेल्या राज्यपद्धतीप्रमाणें चालू करावयाचा होता. इंग्लंडच्या सरका-

राशीं तह झाला होता, तथापि मुलखाच्या संबंधानें देव-घेवीची व्यवस्था होणें राहिली होती. शिवाय परदेशांशीं व्यापारसंबंध बरोबर जुळलेला नव्हता, त्याजमुळें कुरबुरी होत्या. इतकें असून सरकारचा खजिना अगदीं रिकामा होता. आणि कर्जाचें मोठें ओझें झाळें होतें याजमुळें सरकारच्या पतीस धक्का बसावयाची वेळ आली होती. सारांश त्या प्रसंगीं त्यांस द्रव्यबळ, मनुष्यबळ, अधिकारबळ अगर कोणत्याही प्रकारचें साहाय्य नसतां ही नवीन राज्यपद्धति व तीही सर्वांनुमतें व सर्वांकडून मान्य झालेली नसतां चालू करावयाची होती, याजमुळें सेनापतीच्या कामापेक्षां हें काम त्यांस फार संकटाचें वाटलें. असें असतांही या कामांत देखील वाशिंग्टन यांस विलक्षण यशप्राप्ति झाली. या अपूर्व यशप्राप्तीस मुख्यत्वें, त्यांचें चांगुलपण, शुद्ध, पवित्र व निस्पृह असें सदाचरण, त्यांचें निष्प्रांजल व स्वार्थपराङ्मुख स्वदेशप्रेम, त्यांची केवळ स्वदेशहितपरबुद्धि व त्यामुळें लोकांचा त्यांवर पूर्ण भरंवसा व त्यांस सर्व प्रकारें साहाय्य करण्याची उत्कट इच्छा आणि या सर्वांहूनही अधिक अशी परमेश्वराची त्यांजवर कृपा, हीं सर्व मुख्य कारणें होतीं.

जनरल वाशिंग्टन यांनीं दरबारची वहिवाट व आपले लोकांशीं वर्तन हीं कशीं असावीं याजविषयीं कांहीं प्रश्न लिहून आडम्स, हामिल्टन, जे म्याडिसन वगैरे योग्य गृहस्थांकडून उत्तरें मागितलीं. तीं आल्यावर कर्नल हंफ्रीज व जेफर्सन यांच्या मतानें रीतरिवाजाची पद्धति यांनीं विचार करून ठरविली. याप्रमाणें घरगुती व दरबारची व्यवस्था ठरली व दुसरी एकंदर राज्यव्यवस्था व्हावयाची होती; इतक्यांत मध्यंतरीं त्यांची

पत्नी मिसेस वाशिंग्टन ह्या तारीख १७ मे रोजीं मौंटवर्नोन येथून निघून तारीख २७ मे रोजीं न्यूयार्क येथें दाखल झाल्या. त्याही स्वभावानें व वर्तनानें फार साध्या होत्या. घरगुती खर्चाची वगैरे व्यवस्था मि. साम्युअल फ्रान्सेस यांजकडे सोंपविलेली होती व त्यांनीं खर्च फार काटकसरीनें करून दर आठवड्यास हिशेब वाशिंग्टन यांस दाखवावा अशी सक्त ताकीद होती.

याप्रमाणें साधारण स्थिरस्थावर होऊन कांहीं स्वस्थता झाल्यावर त्यांनीं सर्व कामांवर असलेल्या कांमदारांकडून त्यांच्या खात्यांबद्दल लेखी रिपोर्ट आणवून व दुसरे सरकारी कागदपत्र पाहून एकंदर स्थिति कशी काय आहे तें पहाण्यास आरंभ केला तो इतक्यांत त्यांस काळपुळीसारखा विकार झाला आणि त्याजमुळें ते दोन अडीच महिनें अतिशय बेजार होते व कांहींवेळ तर त्या दुखण्यांतून पार पडतात किंवा नाहींत अशी देखील भीति उत्पन्न झाली होती. परंतु ईश्वरकृपेनें ते त्यांतून बचावले.

या आजारांतून बरे व्हावयास लागले तों इतक्यांत त्यांचें मन दुखण्यासारखी एक गोष्ट झाली. सावाना बंदरावर आर. माराकडील अधिकारी ह्मणून बेंजामिन फिशबर्न नांवाच्या गृहस्थाची नेमणूक होण्याकरितां त्यांचें नांव सेनेटकडे त्यांनीं पाठविलें होतें. सेनेटनें ती नेमणूक मान्य केली नाहीं इतकेंच नाहीं पण त्याचें कारणही वाशिंग्टन यांस कळाविलें नाहीं. त्याजमुळें त्यांस वाईट वाटलें. त्यांस ही गोष्ट रीतीप्रमाणें कळल्यावर त्यांनीं दुसऱ्या गृहस्थाचें नांव सेनेटकडे पाठविलें आणि तें पाठवितांना फिशबर्न यांची नेमणुक न करण्याचें कारण न कळवि-

त्याबद्दल दिलगिरी दाखविली. फिशर्बर्न यांची त्या कामास लायकीचीं व त्यांच्या एकंदर योग्यतेचीं कारणें लिहिलीं. शिवाय पुढें असें होऊं नये ह्मणूनही सुचाविलें. आणि अमान्यतेचें कारण कळलें ह्मणजे नेमणुकेचीं विशेष कारणें आपल्यास सांगण्यास मला मार्ग होईल असेंही कळविलें. हें पत्र गेल्याबरोबर तावडतोब दुसरी नेमणूक मान्य होऊन आली. आतां अशा प्रकारच्या सरकारी नेमणुकींच्या संबंधानें विशेष गोष्ट अशी कळविली पाहिजे कीं, वाशिंग्टन यांची नेमणुका करण्याच्या कामांत फार बारीक दृष्टि असे. कामास लायकी असलेल्या मनुष्याखेरीज मनुष्याची नेमणूक करावयाचीच नाहीं व देशाहितावर विशेष नजर असून आपपरपणाचा विचार मुळींच मनांत आणावयाचा नाहीं अशी त्यांची चाल असे. आपल्या नातलगांस किंवा संबंधीं मनुष्यांस बहुतेक जागा न देण्याचा कल असे; व दिलीच तर ते त्यांची खास योग्यता आहे असें पाहूनच देत. सर्व कामांत परमेश्वरास आपण जबाबदार आहों असें ते नेहमीं मानून त्या धोरणानें वागत असत हा प्रकार सर्वांनीं ध्यानांत वागविण्यासारखा आहे.

त्यांची प्रकृति साधारण स्थितींत सुधारत चालली होती तों इतक्यांत त्यांजवर अत्यंत दुःखाचा प्रसंग ओढवला. त्यांची वृद्ध मातोश्री वर्जिनिया प्रांतांत फ्रेडरिकसबर्ग येथें ता० २९ आगष्ट सन १७८९ इसवी रोजीं वारली. तिचें वय ८२ वर्षांचें होतें. वाशिंग्टन जेव्हां नव्या कामावर आले त्या वेळेस ते आपल्या आईस भेटून व ती शेवटचीच भेट असें समजून आले होते; परंतु तें कसेंही झालें तरी आईचें मरण त्यांजविषयीं अत्यंत दुःख झाल्यावांचून राहवयाचेंच नाहीं. त्यांनीं

आपल्या बहिणीस पत्र लिहिलें त्यांत त्यांनीं तिच्या शांतवनार्थ असें ह्मटलें कीं, आईचें मरण हें कसेंही झालें तरी अत्यंत भयंकर व दुःखकारक वाटावयाचेंच; परंतु परमेश्वरानें तिला इतके दिवस आपल्यामध्यें ठेविली व अखेरपर्यंत ती शुद्धीवर व वयाच्या मानानें सशक्त होती, ही विशेष कृपा समजली पाहिजे. कारण ऐशीं वर्षांवर फारच थोडे लोक वांचतात. आतां ती अधिक सुखाच्या स्थलीं गेली तेव्हां आपण परमेश्वरेच्छा समजून समाधान मानलें पाहिजे. मी इकडे आलों तेव्हां तिला भेटून व ती तिची शेवटचीच भेट समजून आलों होतों. असो. मिसेस मेरी वाशिंग्टन ही बाई फार साध्या वृत्तीची, प्रामाणिक व मुलांवर चांगल्या प्रकारचा दाब ठेवणारी व ममताळू अशी होती. पतीच्या पाठीमागें तिनें या सर्व मुलांचा सांभाळ करून त्यांस उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें. वाशिंग्टन हें त्याचें फल होय. वाशिंग्टन हे एवढे योग्यतेस आले व लोक त्यांची स्तुति तिच्या जवळ करीत; परंतु तिला कधींही विशेष अभिमान वाटला नाही. तो चांगला मुलगा निघाला व त्यानें आपलें कर्त्तव्य केलें एवढेंच ह्मणून ती स्वस्थ राही. सारांश धन्य ती आई व धन्य तो तिचा मुलगा !!!

असो. या वेळेपर्यंत नवीन राज्यपद्धतीची व्यवस्था जुळली नव्हती. वाशिंग्टन कामावर आले त्या वेळेस जे कामदार कामें करीत होते तशींच कामें त्यांजकडून चालली होतीं. तारीख १० सेप्टेंबर रोजीं नवीन परराज्यसंबंधीं खातें, खजिना खातें व लढाई खातें अशीं खातीं करून त्यासंबंधाचे खर्च वगैरेबद्दल कायदे मंजूर झाले.

लढाईच्या खात्यावर जनरल वाशिंगटन यांनीं जनरल नाक्स व खजिन्याच्या खात्यावर आलेक्झांडर हामिल्टन यांच्या नेमणुका केल्या. दोघेही गृहस्थ आपापल्या कामांस सर्व प्रकारें लायक होते. हे दोघे दोन खात्यांचे वाशिंगटन यांचे प्रधान झाले पुढें ता. २७ रोजीं वाशिंगटन यांनीं न्यायखात्याच्या व्यवस्थे-करितां एडमंड रांडाल्फ या गृहस्थास यूनैटेड स्टेट्सचे आटर्नी जनरल नेमिलें. तसेंच त्यांनीं यूनैटेड स्टेट्सकरितां ह्मणून सुप्रीम कोर्ट स्थापन केलें त्याचे चीफ जस्टिस जान जे यांस नेमिलें. यांच्या जोडीस दुसरे पांच जज्ज नेमिले व प्रत्येक प्रांतास एक डिस्ट्रिक्ट जज्ज नेमिला. याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर ता. २९ सेप्टेंबर रोजीं कांग्रेसचें काम ता. ४ जानेवारीपर्यंत तहकूब झालें.

कांग्रेसचें काम तहकूब झाल्यावर जनरल वाशिंगटन हे पूर्वेकडील संस्थानांची स्थिति पाहण्याकरितां व प्रकृति सुधा-रण्याच्या हेतूनें तारीख १९ आक्टोबर रोजीं आफिशिअल सेक्रेटरी मेजर ज्याकसन व प्रायवेट सेक्रेटरी मि. लियर यांस बरोबर घेऊन न्यूयार्क येथून निघाले. त्यांस डामडौल अगदीं आवडत नसे याजमुळें ते थाटमाट न करितां साध्या रीतीनें प्रवासास गेले. वाटेंत लोकांनीं जागोजाग त्यांचें मोठ्या प्रेमानें आगत स्वागत केलें. कोठें कोठें मानपानांत दांभिक डामडौलाचा प्रसंग आला; परंतु त्यांनीं आपल्याकडून तो होईल तितका टाळला. शेवटीं तारीख १३ नोवेंबर रोजीं ते न्यूयार्क येथें फिरून परत आले.

नंतर त्यांनीं परराज्यसंबंधी खात्यावर मि. टामस जेफरसन यांची योजना केली. प्रवासास बाहेर जाण्याच्या पूर्वी त्यांस एक

पत्र त्यांचा मानस कळण्याकरितां लिहिलें होतें. पुढें परत आ-ल्यावर पत्रव्यवहार होऊन नेमणूक झाली. हे गृहस्थ पारिस येथें फ्रेंच दरबारीं यूनैटेड स्टेट्सचे वकील होते; परंतु कांहीं खासगी कामाकरितां यूनैटेड स्टेट्समध्यें रजेवर आले होते. या समयास फ्रान्समध्यें ऐन थोरल्या दंग्याचा प्रसंग होता. फ्रान्समध्यें गडबडीच्या वेळीं हे होते याजमुळें राज्यपद्धति राजसत्ताक असणें ह्मणजे राजानें राज्य करणें त्यांस अत्यंत अप्रिय होऊन गेलें होतें. तसेंच थोडें कां-हीं झालें ह्मणजे त्यांस संशय वाटे व त्यामुळें ते त्या धोरणावर नेहमीं बारीक नजर ठेवीत त्यामुळें कितीएक वेळ त्यांस वाईट वाटलें व कुरकुरीही झाल्या.

४ कांग्रेस सन १७९० सालच्या जानेवारीच्या ४ थ्या तारखेस जमली; परंतु तारीख ८ रोजीं कामास आरंभ झाला. कामाच्या सुरुवातीच्या वेळच्या अध्यक्षांच्या भाषणांत जनरल वाशिंग्टन यांनीं कांहीं विशेष व महत्वाच्या गोष्टींविषयीं विचार झाला पाहिजे असें सुचविलें. देशाचें संरक्षण; परकीय राष्ट्रांशीं दळणवळण वाढविणें व त्यांच्या दरबारीं आपले व-कील ठेवणें व त्यांसंबंधी खर्च चालविणें; परदेशांहून आ-लेल्या लोकांस स्वदेशीय होण्याविषयीं कायद्याची योजना; यूनैटेडस्टेट्स मधील वजनें व मापें एकसारखीं असण्याविषयीं तजवीज; शेतकी, उद्योग धंदे व कारागिऱ्या आणि व्यापार यांच्या वृध्यर्थ उद्योग; टपालखातें व हापिसें व तें नेण्याकरितां रस्ते; विद्यावृद्धि व सरकारची पैशासंबंधी पत वाढणें याजक-रितां व्यवस्था, या सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत असें सुचविलें.

वरील सर्व गोष्टींपैकीं सरकारची पत राहणें व ती वाढणें हें अत्यंत आवश्यक आहे असें वाशिंग्टन व कांग्रेसचे सभासद यांस वाटत होतें. त्याजवरूनच त्यांनीं खजिन्याकडील कामगार मि० हामिल्टन यांस कांग्रेसच्या सुट्टीमध्यें या व्यवस्थेसंबंधी कांहीं व्यवस्थेचा लेख तयार करून ठेवावयास सांगितला होता. त्याप्रमाणें त्यांनीं आपला रिपोर्ट तारीख १४ जानेवारी रोजीं सादर केला. त्याचा विचार फेब्रुवारीमध्यें चालून तो कमिटी मध्यें तारीख ९ मार्च रोजीं मान्य झाला. त्यांत परकी लोकांचें ह्मणजे फ्रान्स, हालंड व स्पेन यांचे मिळून एक कोटि वीस लक्ष डालर्स देणें होते ते कराराप्रमाणें द्यावे अशी सूचना होती ती सर्वांस मान्य झाली. दुसरें देणें स्वदेशीय लोकांचें, चार कोटि वीसलक्ष डालर्स होतें तें मूळ ज्यांस नोटी दिल्या त्यांस अगर ज्यांनीं त्या नोटी खरेदी घेतल्या असतील त्यांस द्यावें अशी सूचना होती तीही मान्य झाली. परंतु तिसरें देणें निरनिराळ्या संस्थानांनीं अगर प्रांतांनीं लढाईच्या प्रसंगीं आपल्या जबाबदारीवर कर्ज काढलें होतें तें अडीच कोटी डालर्सचें होतें. त्याची जबाबदारी कांग्रेस व प्रेसिडेंट वगैरे मिळून जें मुख्य सरकार त्यांनीं इतर देण्याप्रमाणें आपल्यावर घेऊन सर्व एकंदर देण्याची नवीन कर बसवून व्यवस्था लावावी असें ह्मणणें होतें. त्यांजविषयीं वाद उत्पन्न झाला. आतां मि. हामिल्टन यांचें ह्मणणें ह्मणजे वाशिंग्टनचेंच ह्मणावयाचें. तेव्हां याजबद्दल अतिशय वेडावांकडा वराच वेळ वादविवाद होऊन शेवटीं तारीख १२ एप्रिल रोजीं ती सूचना अमान्य झाली. याचें मुख्यकारण या योगानें हें सरकार म्हणजे वाशिंग्टन त्यांचे कारभारी आपल्याकडे अधिक महत्व व अधिकार संपा-

दन करून घेत आहेत असें कितीएक सभासदांस वाटलें. वास्तविक पाहिलें तर वाशिंग्टन यांच्या मनांत पैशासंबंधीं देणें घेणें एका मुख्य सरकारच्या हातीं असल्यानें देशाचें व लोकांचें ऐक्य दृढ होऊन सरकारची पत व अब्रू सर्वत्र वाढेल यांत आपल्या देशाचें कल्याण आहे असें त्यांस वाटत होतें. अर्थात हें ह्मणणें अमान्य झालें तेव्हां त्यांस वाईट वाटलें व मि० हामिलटन यांस तर सर्व राज्याचीच फाटाफाट होते कीं काय असें भय वाटलें. अशा संधीस ह्मणजे तारीख २१ मार्च रोजीं मि० जेफर्सन आपल्या कामावर हजर झाले. त्यांचें मन कांहीं अंशीं दूषित व भयभीत झालें होतें; तथापि राज्याची फाटाफाट होणें हें चांगलें नांहीं अशी त्यांच्या मनाची खात्री होती. शेवटीं त्यांनीं आपल्या घरीं कांग्रेसची कांहीं मंडळी व मि०हामिलटन यांस जेवावयास बोलावून त्या दिवशीं खासगीरीतीनें विचार व वादविवाद करून त्या मंडळीचीं मनें त्या कर्जाचें जोखीम घेण्यास तयार केलीं. नंतर पुनः कांग्रेस व सेनेटमध्यें वादविवाद व विचार होऊन मि० हामिल्टन यांच्या पहिल्या सुचनेंत थोडा फेरफार करून एकंदर दोन कोटि पंधरा लक्ष डालर्स देण्याचें जोखीम पतकरावें असें ता. २४ जुलै रोजीं कबूल झालें. याजवरून एवढें सिद्ध होतें कीं, कधीं कधीं एकादी गोष्ट खरोखर देशहिताची असतां तिला लोक विरुद्ध होतात; तथापि जो स्वदेशभक्त असेल त्यानें रागावून अगर निराश होऊन हातपाय जोडून बसावें हें योग्य नाहीं. आपलें कर्त्तव्य नेहमीं करीत राहिलें पाहिजे. याजबद्दल उत्तम उदाहरण वाशिंग्टन यांनीं या प्रसंगीं दाखविलें.

हा महत्वाचा निर्णय होते वेळींच, कांग्रेस दहा वर्षें फिलेडेल्फिया येथें भरून सरकारचें काम तेथें चालावें असें ठरलें. या योगानें त्या प्रांताच्या लोकांस मोठें समाधान वाटलें. पुढें तारीख ७ आगष्ट रोजीं इंडिअन लोकांशीं तह झाला आणि मुलखाचे संबंधानें पडलेला लढा नाहींसा होऊन वारंवार होणारा तंटा बराच मिटला. कांग्रेसचें काम तारीख १२ आगष्ट रोजीं महकूब झालें. पुढें लागलेच दोन दिवसांनीं वाशिंग्टन हे मि. जेफरसन यांबरोबर ऱ्होड ऐलंडकडे गेले. हें संस्थान नुक्तेंच कान्स्टिटयूशन मान्य करून एकत्र संस्थानांपैकीं एक झालें होतें. तिकडील प्रदेश पाहून वाशिंग्टन दहा दिवसांत न्यूयार्क येथें परत आले. नंतर तेथून निघून मौंटवर्नान येथें कांहीं दिवस राहवयास गेले. तेथें असतां त्यांनीं कांहीं लष्करी लोक इंडियन लोकांवर स्वारी करण्याकरितां पाठविले. हे लोक सरहद्दीच्या प्रदेशावर वरचेवर हल्ले करून त्रास देत असतां वाशिंग्टन यांनीं त्यांस पुष्कळ प्रकारें कळविलें व त्यांनीं आपल्या हद्दींत स्वस्थ राहावें ह्मणून प्रयत्न केला परंतु तो व्यर्थ झाल्यामुळें त्यांनीं जनरल हार्मर यांजबरोबर तेराशें लोक देऊन ता० ३० सेप्टेंबर रोजीं रवाना केले. या स्वारीचा परिणाम नीट झाला नाहीं. या फौजेवर गुप्त हल्ला होऊन तिचा बराच नाश झाला असें ता. ३० नोवेंबर रोजीं कळलें. पुढें डिसेंबरच्या पहिल्या सोमवारीं कांग्रेसच्या कामास फिलेडेल्फिया येथें सुरुवात झाली.

कांग्रेसच्या कामास आरंभ झाल्यावर, एकंदर कर्जाचें ओझें सरकारानें आपल्यावर घेतल्यामुळें त्याचा खर्च वाढला होता, तो भागविण्याकरितां दारूवर नवीन जकात बसविली. ती

जकात बसविण्याकरितां कायदा करावा लागला तो पुष्कळ तकरारी होऊन पास झाला. नंतर, न्याशनल ब्यांक स्थापन करण्याकरितां नवीन कायदा करावा लागला तोही मोठ्या मारामारीनें पास झाला. सारांश वाशिंग्टन यांच्या प्रधान मंडळींत नेहमीं दोन पक्ष होत व ते पक्ष बाहेर लोकांत वाढत गेले. एक हामिल्टनचा पक्ष व दुसरा जेफरसनचा पक्ष. फीडरल व रिपब्लिकन या नांवानें अनुक्रमें दोन पक्ष प्रसिद्ध झाले. या दोघांच्या वर्तनांत नेहमीं विरुद्धपणा दिसे; तथापि ज० वाशिंग्टन मतभेदाच्या प्रसंगीं आपल्या मनाची खात्री होण्याकरितां सर्वांचीं मतें निरनिराळीं लिहून मागवीत आणि मग आपण सर्वांचा नीट विचार करून ठराव करीत असत. तसेंच त्या दोघांत नेहमीं मेळ घालण्याचा प्रयत्न करीत. सारांश, ते आपला हेका चालवीत नसत किंवा एका प्रधानाच्या सांगण्यावर भरंवसा अंधळ्याप्रमाणें ठेवीत नसत. कांग्रेसचें काम चालूं असतां केंटकी व वरमांट हे दोन प्रदेश यूनैटेडस्टेटस्‌मध्यें सामील करावे ह्मणून त्यांच्या लोकांकडून लिहून आलें. पुढें यूनैटेड सरकारास इंडियन लोकांवर पुनः फौज पाठवावी लागली. सेंट क्लेर यांस सेनापति नेमून त्यांजबरोबर फौज पाठविली. इंडियन लोकांच्या छाप्याच्या सपाट्यांत न सांपडण्याविषयीं वाशिंग्टन यांनीं त्यांस विशेष सूचना दिली. पहिल्या कांग्रेसची मुदत तारीख ३ मार्च सन १७९१ रोजीं संपली. त्या वेळेस कांग्रेसचें काम बऱ्या प्रकारें झालें असें सर्वांस कळविलें. जनरल वाशिंग्टन त्याच मार्च महिन्यांत दक्षिणेकडील संस्थानांतून फिरावयास गेले. त्यांनीं सर्व प्रवास घोड्यावर केला. यांनीं एकंदर १८७ मैल प्रवास नेमिल्या ठिकाणीं जाऊन

केला व लोकांस भेटून तेथील लोकस्थितीची माहिती मिळवून ते तारीख ६ जुलै रोजीं फिलेडेल्फियास परत आले. लोकांनीं जागोजाग त्यांचा यथायोग्य व प्रेमानें आदरसत्कार केला. नवीन राज्यपद्धति कितपत अंमलांत येऊन लोकांच्या सुखास कशीकाय कारणीभूत झाली आहे व लोकांस ती आवडून किती मान्य झाली आहे हें धोरण मुख्यत्वें त्यांस पाहावयाचें होतें. लोकांची सुखवृद्धि होत चालली हें पाहून त्यांस समाधान वाटलें. त्याप्रमाणेंच सरकारची पत चांगल्या प्रकारें वाढत चालली हेंही त्यांच्या लक्षांत येऊन त्यांच्या समाधानास विशेष भर पडली ते परत आल्यावर कांहीं दिवस मौंटवर्नान येथें जाऊन राहिले.

फिलेडेल्फिया येथें तारीख २४ आक्टोबर रोजीं दुसरी कांग्रेस भरली. जनरल वाशिंगटन यांचें तारीख २५ रोजीं भाषण झालें. त्यांत त्यांनीं लोकांची स्थिति चांगली आहे व पैशाच्या संबंधानें व्यवस्था केली तीही हितावह झाली आहे असें दर्शविलें. इंडियन लोकांवर पाठविलेल्या स्वारीचें काम चालू आहे असें कळविलें. या स्वारीचा परिणाम वाईट झाला असें पुढें कळलें. नवीन सेशनांत लोकसंख्येच्या वांटणीप्रमाणें त्यांचे मुक्त्यार कांग्रेसमध्यें घेतले जाण्यासंबंधीं नवीन कायदा मंजूर झाला. पाहिल्यानें प्रत्येक तीस हजार मनुष्यांस एक मुक्त्यार नेमावा असा कायदा होता तो बदलून तेहेतीस हजार मनुष्यांस एक असावा असा कायदा झाला. या कायद्याच्या विचाराच्या वेळीं सभासदांमध्यें फार कडाक्याचा वादविवाद झाला. त्याजमुळें वाशिंग्टन यांस फार वाईट वाटलें. तसे लोकांमध्यें पक्ष व्हावयास लागले व वर्तमानपत्रांत रागानें

चर्चा होऊं लागली, हें पाहून त्यांचें मन अगदीं खिन्न झालें. त्यांच्यानें वयाच्या मानानें थकल्यामुळें काम व्हावें तितकें नेटानें होईना, तेव्हां आपली एक वर्षाची राहिलेली मुदत संपली ह्मणजे कारभार सोडून घरीं जावें असें त्यांनीं मनांत आणिलें होतें व ती गोष्ट ते आपल्या कारभारी मंडळी जवळ बोलले होते, त्यावरून जेफर्सन यांनीं आपण तुह्मांबरोबरच काम सोडणार असा निश्चय कळविला. यावरून चांगले अनुभविक कामदार कामें सोडणार हें देशहितास नीट नाहीं असें वाटून त्यांस फारच खेद झाला. पुढें त्यांनीं ही गोष्ट माडिसन यांजपाशीं काढून त्याजबद्दल लोकांस कळविण्याकरितां लेखाचा मसुदा तयार करण्याविषयीं त्यांस सांगितलें. यावेळेस कारभार सोडणें नीट नाहीं असें वाशिंग्टन यांस त्यांनीं सुचविलें, परंतु ती गोष्ट त्यावेळेस तितकीच राहिली. नंतर इंडियन लोकांच्या बंदोबस्ताकरितां फौज वाढवून जनरल वेन यांची त्या स्वारीवर योजना झाली. जनरल सेंट क्लेर यांच्या ह्मणण्याप्रमाणें कमिटी नेमून पराजयाच्या कारणांची चवकशी झाली; तींत त्यांजवर कांहीं दोष नाहीं असें ठरलें. तारीख ८ मे रोजीं कांग्रेसचें काम तहकूब झालें आणि वाशिंग्टन आपल्या घरीं मौंटवर्नान येथें गेले. तेथें गेल्यावर पुनः तारीख १० मे रोजीं त्यांनीं माडिसन यांस काम सोडण्याच्या संबंधाच्या लेखाचा मसुदा तयार करण्याविषयीं लिहिलें. त्याजबद्दल बराच पत्रव्यवहार होऊन माडिसन यांनीं मसुदा तयार करण्याचें कबूल केलें. त्यांत काय मजकूर असावा हेंही वाशिंग्टन यांनीं त्यांस सुचविलें. पुढें तारीख २३ मे रोजीं जेफर्सन यांनीं वाशिंग्टन यांस पहिली मुदत संपल्याबरोबर

राज्यकारभार सोडणें नीट नाहीं अशाबद्दलचें पत्र पाठविलें. त्यांत त्यांनीं सुंदर रीतीनें साधकबाधक कारणें दाखविलीं होतीं. त्या योगानें वाशिंग्टनचें मन पुनः घोटाळ्यांत पडलें. स्वतांचें सुख व देशाचें सुख याचा विचार पडला. जेफरसन यांनीं आपल्या पत्रांत या वेळेस वाशिंग्टन यांनीं कारभार सोडल्यास त्यापासून देशाचें फार नुकसान होईल असें दाखविलें. मि० एडमंड रांडाल्फ यांनींही आपला अभिप्राय तशाच प्रकारचा दिला. याच समयास वाशिंग्टन यांच्या प्रधान मंडळींत मतभेद होऊन अतिशय कलह मातला. त्याची चर्चा वर्तमानपत्रांतून विशेष कडक रीतीनें सुरू झाली. त्यामुळें वाशिंग्टन यांस फार वाईट वाटलें. त्यांनीं आपल्याकडून समेट करण्याकरितां प्रयत्न केला. मि० हामिलटन व मि० जेफर्सन यांस पत्रें लिहिलीं. त्यांजकडून उत्तरेंही खरोखर कळवळ्याचीं आलीं. त्यांत दोघांचाही उद्देश स्वदेशहिताचा व वाशिंग्टन यांस राज्यकारभार चालविण्याच्या कामांत मदत करण्याचा होता; परंतु उपायांच्या संबंधानें मात्र मतभेद होता असें दिसून आलें. शेवटीं वाशिंग्टन यांनीं खरा व पूर्ण समेट होण्याची आशा दिसेना, तेव्हां दोघांनींही थोडाबहुत आपला हेका सोडून साधारण मेळानें चालावें असें सरासरी केलें.

असो. वाशिंग्टन यांनीं या प्रसंगीं आपला अधिकार सोडणें इष्ट नाहीं असें पुष्कळांस वाटल्यावरून त्यांनीं आपलें नांव प्रेसिडेंटच्या जाग्याकरितां एक उमेदवार ह्मणून प्रसिद्ध होऊं दिलें. लोकांनीं सर्वानुमतें त्यांची निवड केली. लोकांतील कुरकुरीमुळें वाशिंग्टन यांस थोडा

संशय होता; परंतु लोकांच्या मनांत त्यांजविषयीं पूज्यबुद्धि कायम होती. पुढें तारीख ४ मार्च सन १७९३ इसवी रोजीं त्यांनीं पूर्वीप्रमाणें नवीन प्रेसिडेंटच्या अधिकाराची शपथ घेतली. हे पुनः प्रेसिडेंट झाले त्या वेळेस एकंदरीनें स्थिति नीट नव्हती. प्रधानमंडळींत एक विचार नव्हता, लोकांमध्यें पक्ष वाढत चालले होते, शिवाय वाशिंग्टन यांची लोकप्रियता कमी व्हावयास लागण्याची भीति वाटत होती, या खेरीज फ्रान्समध्यें घोळ चालला होता. या वर्षी फ्रान्समध्यें अगदीं अनर्थ उडाला. हजारों लोकांचा विनाकारण प्राणनाश झाला. फ्रान्सचे राजे सोळावे लुई यांचा शिरच्छेद झाला. फ्रान्स व इंग्लंड यांजमध्यें लढाई सुरू झाली. फ्रान्स व त्याचे राजे यांनीं अमेरिकन लोकांस स्वतंत्र होण्याच्या कामीं साहाय्य केलें होतें, तेव्हां अमेरिकेंतील लोकांचीं मनें फ्रान्सच्या मदतीस जाण्यास फार उत्सुक झालीं होतीं. परंतु, जनरल वाशिंग्टन यांनीं आपल्या प्रधानमंडळांत विचार करून तारीख १९ एप्रिल रोजीं जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यांत अमेरिकन लोकांनीं कोणत्याही पक्षास मदत करूं नये व त्यांस सामान पुरवूं नये व दोघांपासूनही अगदीं अलग रहावें, असें स्पष्ट कळविलें. आतां फ्रान्सकडून वकील आले तर त्यांस आपल्या दरबारीं राहूं देण्यास हरकत करावयाची नाहीं असें मात्र ठरलें. पुढें ते वकील आले; परंतु त्यांनीं परस्पर येऊन लोकांनीं या लढाईत पडावें अशा प्रकारचा उद्योग चालू केला. वाशिंग्टन यांच्या मनांत युरोपांतील तंट्यांत पडण्यापासून फ्रान्सास उपयोग न होतां, आपलें मात्र विशेष नुकसान होईल असें आलें. यास्तव त्यांत पडणें नीट

व हितावह नाहीं असा त्यांच्या मनाचा निश्चय झाला होता. परंतु लोकांचीं मनें अगदीं उत्सुक होऊन गेलीं होतीं. वकील फिरत फिरत फिलेडेल्फिया येथें आपलीं वकिलीच्या संबंधाचीं पत्रें सादर करण्या करितां आले. तेथें असतां त्यांनीं नानाप्रकारचे उद्योग चालविले. अप्रयोजक अशीं बोलणीं बोलले व प्रेसिडेंट व त्यांचें प्रधानमंडळ यांच्या सांगण्याबाहेर वागावयास लागले. त्यावेळेस वाशिंग्टन यांनीं फ्रान्समधील दरबारी असलेले आपले अमेरिकेचे वकील यांस सर्व हकीकत कळवून येथें आलेल्या वकिलास परत बोलावण्याची फ्रेंच सरकार मार्फत तजविज व्हावी असें सुचाविलें. हा प्रकार झाल्याचें त्या वकिलांस कळल्यावर ते लोकांदेखतां कमीजास्त बोलून दाखवूं लागले व वाशिंग्टन यांनीं केलेला निर्णय गैर आहे असें ठरविण्याकरितां त्यांनीं कांग्रेसकडे अपील करण्याचा विचार केला. याप्रकारें वाशिंग्टन यांचा मानभंग किंवा त्यांच्या अधिकारविरुद्ध वर्तन करण्याचा त्यांचा झोंक पाहून लोक उलटले आणि त्यांजविषयीं व फ्रेंच लोकांविषयीं त्यांचा प्रथम विशेष कळवळा होता तो फिरून वाशिंग्टन यांजकडे वळला. इतके दिवस वाशिंग्टन यांजविषयीं लोक कुरकुरत होते व त्यांजविषयीं कांहींशी अप्रीतीही झाली होती. परंतु वाशिंग्टन यांनीं या लोकांच्या समजुतीची फारशी काळजी न करितां स्वदेशाचें हित तेंच आपल्या वर्त्तनाचें धोरण हें लक्षांत ठेऊन आपलें कार्य चालविलें. लोकही लवकरच उमजले आणि पुनः ताळ्यावर आले. असो. या वर्षाच्या अखेरीस मि. जेफर्सन यांनीं आपलें काम सोडलें आणि आनंदानें स्वस्थपणानें व शेतीच्या उद्योगांत आयुष्य घालविण्यास गेले. मि. जेफर्सन

विषयीं जनरल वाशिंगटन यांचा अभिप्राय फार उत्तम प्रकारचा होता. जनरल वाशिंग्टन यांनीं त्यांजविषयीं पुढें असें लिहिलें कीं, तो अत्यंत प्रामाणिक, मनाचा निर्मल, न्यायी व सरळ स्वभावाचा होता. त्याच्या कृतींत आप्त, मित्र अगर स्वतःचा स्वार्थ बिलकूल नसे. तसेंच तो खरा स्वदेशभक्त होता; तो शब्दशः शाहणा चांगला व थोर मनुष्य होता. सारांश अशा प्रकारचीं माणसें वाशिंग्टन यांनीं स्वदेशाचा राज्यकरभार चालविण्याच्या कामीं आपल्या जवळ केलीं होतीं. त्यांनीं कामावर पुढें कांहीं दिवस रहावें म्हणून वाशिंग्टन यांनीं आपल्याकडून पुष्कळ प्रयत्न केला; परंतु ते राहिले नाहींत. यांनीं आपलें काम सोडते वेळीं व्यापाराच्या संबंधानें रिपोर्ट केला होता. त्याजसंबंधानें वादविवाद पुष्कळ दिवस चालून कांहीं ठराव झाले व कांहीं गोष्टींचा विचार होणें राहिला. व्यापाराच्या संरक्षणाच्या संबंधानें कांहीं आरमार ठेवावें असा विचार होऊन कायद्याचा मसुदा कांग्रेस पुढें सादर झाला. त्याजविषयीं पुष्कळ कुरकूर व वादविवाद झाला; परंतु तो पास झाला.

फ्रान्सचे वकील मोशो जेनेट यांनीं समुद्रांत आरमाराच्या संबंधानें घोंटाळा केला त्याप्रमाणेंच जमिनीवरही उद्योग चालविला. अमेरिकन लोकांस चेतवून इंग्रज लोकांवर हल्ले करण्यास प्रवृत्त करण्याची खटपट केली. इंग्रज लोकांनीं फ्रेंच लोकांचें सामान अमेरिकन जहाजांवरून धरून नेलें. सारांश अमेरिकन लोकांस अलग राहतां येणें फार कठीण झालें. लोकांचीं मनें इंग्लिश लोकांशीं लढाई करण्यास उत्सुक झालीं. वाशिंग्टन यांच्या मनांत फ्रान्सच्या घोंटाळ्यांत पडूं नये व

इंग्लिश लोक व इतर दुसरे लोक यांजशीं लढाई करून वि-
रुद्धपणा वाढवूं नये असें होतें. सर्वांशीं मोकळेंपणानें व स्नेहानें
वागून व्यापारसंबंध मात्र चालूं राखावा हा त्यांचा मुख्य हेतू
होता. लोकांचा झोंक इंग्लिश लोकांविरुद्ध वाढला तेव्हां
वाशिंग्टन यांनीं मि० जॉन जे या गृहस्थास इंग्लंडास मुद्दाम
वकील ह्मणून पाठविलें. तथापि अमेरिकन लोकांचीं मनें अ-
स्वस्थ झालीं होतीं. त्यांत वर्त्तमान पत्रांची कडक व विरुद्ध
चर्चा सामील झाली त्याजमुळें काय अनर्थ होईल याचा नेम
लागेना. इतक्यांत पेन्सिल्वेनिया प्रांतांतील पश्चिम भागांत
दारूवर जकात बसविल्यामुळें बंडावा सुरू झाला. हें पाहून
वाशिंग्टन यांनीं प्रथम सामोपचारानें अमुक दिवसांच्या आंत
लोकांनीं आपल्या घरोंवर स्वस्थपणें जाऊन रहावें असा जा-
हीरनामा प्रसिद्ध केला. त्या दंगेखोर लोकांचा झोंक मुकाट्यानें
न बसण्याचा पाहून वाशिंग्टन यांनीं जागोजागच्या अ
धिकाऱ्यांच्या मार्फत लोकांस हा गैर प्रकार कळवून त्यांची
मदत मिळेल अशी योजना केली. लोकांची भराभर भरती होऊन
ठिकठिकाणांहून अनुभविक लष्करी सरदारलोक येऊन
फौजेची जमाजम तावडतोब झाली. वाशिंग्टन स्वतां त्या
फौजेची व्यवस्था पाहण्याकरितां व प्रसंग पडल्यास हल्ला
करण्याकरितां गेले. त्यांच्या सूचनेप्रमाणें पंधरा हजार मिलि-
शिया फौज जमली व चांगले अनुभविक सरदार आले होते.
त्यांजपैकीं एकास सेनापति नेमून दंगेखोर लोकांच्या प्रदेशांत
जाण्याची योजना करून ते फिलेडेल्फिया येथें परत आले.
हत्यारें हातीं धरून लोक दांडगाई करीत तोंपर्यंत त्यांस शासन
करावें व ते हत्यारें ठेऊन शरण येऊन घरोंवर गेल्यास त्यांस

घरीं जाऊं द्यावें, परंतु त्यांतील दोषी लोकांस चवकशी होण्या-
करितां माजिस्ट्रेटांच्या स्वाधीन करावें, आणि या सर्व प्रकारांत
निरपराधी रयतेस अगदीं इजा होऊं नये अशी सक्त ताकीद
देऊन ते गेले होते. दंगेखोर लोक हा भयंकर प्रसंग पाहून
व साधारण चोहोंकडे लोकांची मदत आहे हें पाहून तावड-
तोब शरण आले आणि बंडावा नाहींसा झाला. या प्रसंगीं
कांहीं गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या झाल्या. अमेरिकन लोकांची
योग्य समजूत व स्वदेशाविषयीं प्रीति व हितबुद्धि तशीच
त्यांची वाशिंग्टन यांजविषयींची पूज्यबुद्धि व स्वदेशहित
संबंधानें निरभिमानपणा हीं उत्तम रीतीनें दिसून आलीं.
वाशिंग्टन यांच्या सूचनेबरोबर लहान मोठे, श्रीमान् व गरीब
तसेच लहान मोठे लष्करी सरदार स्वदेशसेवेंत हजर होण्या-
करितां धांवत आले. लष्करी मोठे सरदार फौजेंत आले
आणि कितीएकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें हुद्यांच्या जागा
रिकाम्या नाहींत असें समजलें तेव्हां त्यांनीं आपल्या हाता-
खालीं काम केलेल्या सरदारांच्या हातांखालीं सरदारीच्या व
निवळ शिपायांच्या देखील जागा निरभिमानपणानें पतकरल्या.
तसेंच कितीएक घरचे विशेष संपन्न असे लोक येऊन खांद्यां-
वर बंदुका व पाठीशीं ओझें घेऊन शेंकडो मैल चालत गेले.
हा निरभिमानपणाचा व स्वदेशसेवेचा प्रकार पाहून कोणाचें
मन थक्क होऊन आनंदानें उचंबळणार नाहीं ! वाशिंग्टन
यांनीं हा प्रकार कांग्रेसच्या नजरेस आणून अत्यंत समाधान
प्रदर्शित केलें. हा समाधानप्रदर्शनाचा प्रकार तारीख १९
नोवेंबर सन १७९४ इसवी रोजीं कांग्रेसचें काम सुरू झालें
त्यावेळेस झाला. तसेंच तारीख २० आगष्ट रोजीं जनरल

वेन यांनीं इंडियन लोकांवर स्वारी करून पूर्ण जय मिळविला होता त्याचें वर्तमानही या प्रसंगीं कांग्रेसला कळविलें.

पुढें मि० हामिलटन यांनीं तारीख २० जानेवारी सन १७९१ इसवी रोजीं पैशाच्या व्यवस्थेसंबंधीं सरकारची पत वाढावी अशी योजना सुचविली. ती वाशिंग्टन यांनीं कांग्रेस पुढें सादर केली व ती मान्य झाली. नंतर त्या महिन्याच्या अखेर तारखेस मि० हामिलटन यांनीं आपल्या कामाचा राजीनामा दिला. त्यांची हुशारी, मेहनत व प्रामाणिकपणा यांजविषयीं वाशिंग्टन यांची पूर्ण खात्री होती. त्यांनीं घरगुती अडचणीमुळें काम सोडलें. मि० हामिलटन यांच्या जागीं मि० आलिवर वोलकाट यांची नेमणूक झाली. याच्या पूर्वींच्या ह्मणजे डिसेंबर महिन्यांत जनरल नॉक्स यांनींही आपल्या लढाई खात्याच्या कामाचा राजीनामा दिला व त्यांनींही अशा घरगुती अडचणीमुळेंच काम सोडलें. त्यांजवर वाशिंग्टन यांचें अत्यंत प्रेम होतें. त्यांच्या जाग्यावर कर्नल टिमोथी पिकरिंग यांची योजना झाली. कांग्रेसचें हें सेशन तारीख ३ मार्च रोजीं संपलें.

मि० जान जे हे इंग्लंडास वकील ह्मणून गेले होते त्यांनीं उद्योग करून सर्व लढे उरकून तहनामा केला व त्याजवर तारीख १९ नोवेंबर रोजीं वकीलांच्या सह्या होऊन तो ता. ७ मार्च सन १७९१ इसवी रोजीं मंजूर होऊन सह्यांकरितां इकडे आला. वाशिंग्टन यांनीं तो नीट तपासून पाहिला. तो जसा असावा तसा उत्तम नाहीं; तथापि देवघेवीच्या रीति प्रमाणें ठीक आहे तेव्हां मान्य करावा असा त्यांच्या मनाचा निर्णय झाला. कांहीं दिवसांनीं पाठीमागून मि० जे अमेरिकेस

परत आले. लागलेंच न्यूयार्क येथील लोकांनीं त्यांस गवर्नरच्या जाग्याकरितां निवडलें. त्याजवरून त्यांनीं मुख्य न्यायाधिशाच्या जाग्याचा राजीनामा दिला, पुढें या तह-नाम्याविषयीं वादविवाद होऊन सेनेटनें कांहींएक सूचना दाखल करून तो मंजूर केला. मध्यंतरीं लोकांमध्यें त्याजविषयीं चर्चा होऊन त्यांची नाखुषी झाली. पुढें त्यांतील तात्पर्य प्र-सिद्ध करून लोकांस कळविलें. लोकांच्या मनाचा झोंक इंग्लंडशीं तंटा करण्याचा होता याजमुळें त्यांस तो पसंत होईना. सर्व देशभर एकच हलकल्लोळ होऊन गेला. त्यांच्या सर्व कारकीर्दींत असा अडचणीचा प्रसंग कधींही आला नव्हता. सर्व लोक वाशिंग्टनच्या विरुद्ध झाले. परंतु समय तर अत्यंत नाजुक होता. हा तहनामा मान्य झाल्यानें फ्रेंच लोकांचा संबंध कमी होईल, परंतु तो मान्य झाला नाहीं तर लढाईचा अनर्थ लागलाच सुरू होईल आणि युरोपच्या ब्रह्मघोटाळ्यांत पडल्यासारखें होईल, तेव्हां आपला स्वदेशहिताचा जो मनापासून सर्व काळचा हेतु आहे तोच मनांत वागून जें करणें तें करावें, लोक पाहिजे ते ह्मणोत व करोत, असा वाशिंग्टन यांच्या मनाचा निर्धार झाला होता. त्याप्रमाणें तारीख १८ आगष्ट रोजीं वाशिंग्टन यांनीं सेनेटच्या ठरावाप्रमाणें तहनाम्यावर सही केली. पुढें दुसऱ्या दिवशीं मि. रांडाल्फ यांच्या वर्तणुकीबद्दल संशयास्पद असा एक लेख हातीं आल्याकारणानें त्यांनीं आपल्या कामाचा राजीनामा त्याच वेळेस दिला व त्याचें स्पष्टिकरण व उत्तर त्यांनीं पुस्तकरूपानें पुढें प्रसिद्ध केलें. त्यांत या संशयाबद्दल आपल्याकडे दोष नाहीं असें कळवून वाशिंग्टन यांजवर निरा-

ळ्याप्रकारें दोषारोप करण्याचा प्रयत्न केला होता त्याजमुळें त्यांचें ह्मणणें व्यर्थ झालें. नंतर पंधरा वर्षांनीं वाशिंग्टन यांस दोष दिला तो बरोबर नाहीं असें त्यांनीं कबूल केलें. त्यांच्या जागीं कर्नल पिकरिंग यांची नेमणूक व त्यांच्या जागीं मि० जेम्स म्याक हेनरी यांची योजना झाली. याच सुमारास मि० ब्राडफर्ड, आटर्नी जनरल हे वारले, त्यांच्या जागीं वर्जिनियाचे मि० चार्लस ली यांची नेमणूक नोवेंबरच्या अखेर तारखेस झाली. लोकांमध्यें अतिशय गडबड व चर्चा चालली होती त्याच वेळीं फ्रान्सचे प्रसिद्ध गृहस्थ लफेयट यांचे चिरंजीव जार्ज वाशिंग्टन लफेयट हे आपल्या शिक्षकासह बोस्टन येथें फ्रान्समधून आले आणि त्यांनीं आपल्या येण्याचें वर्त्तमान जनरल वाशिंग्टन यांस कळविलें. त्यांनीं त्यांस एका विद्यालयांत ठेवून त्यांचा विद्याभ्यास आपल्या खर्चानें चालू ठेविला.

डिसेंबरमध्यें कांग्रेसच्या कामाची सुरुवात झाली. त्या प्रसंगीं जनरल वाशिंग्टन यांनीं, हल्लींचा समय आपल्या देशास फार समाधानाचा आहे व असा समाधानाचा प्रसंग पूर्वीं कधीं आला नव्हता असें बोलून दाखविलें. त्यांनीं ज्या समाधानाच्या गोष्टी ह्मणून आपल्या भाषणांत सांगितल्या त्यांत जनरल वेन यांनीं इंडियन लोकांशीं केलेला तहनामा पहिल्यानें सांगितला. मोराक्को येथील बादशाहाच्या वडिलांशीं झालेला तहनामा आपल्यास मान्य आहे असें त्या बादशाहाचें पत्र आलें. तसेंच आलजियर्सच्या सरकाराशीं बोलणीं होऊन पुढें लवकरच तह होऊन कांहीं अमेरिकन लोक त्यांच्या ताब्यांत होते ते सुटतील अशा बेताचें वर्त्तमान आल्याचें कळविलें. स्पेनदेशाच्या सरकाराशीं तहनाम्याबद्दल बोलणीं

चाललीं होतीं त्यांचा लवकरच समाधानकारक निकाल होईल असें चिन्ह दिसत आहे, आणि ग्रेट ब्रिटनशीं झालेल्या तहनाम्याची कांहीं अटीनें मान्यता झाली आहे त्याजबद्दलचें त्या सरकारचें काय ह्मणणें तें अद्यापि कळलें नाहीं; परंतु समजल्याबरोबर कळविण्यांत येईल, याप्रमाणें परराज्य संबंधाची युनैटेडस्टेटस बद्दलची हकीकत कळवून आंतील राज्यव्यवस्थेच्या परिणामांच्या संबंधानें त्यांनीं असें कळाविलें कीं, देशांतलि सर्व भागांत भरभराट व सुधारणा यांचीं चिन्हें दिसून येत आहेत. लोकांवर करांचें ओझें समजुतीस येत नाहीं इतकें हलकें आहे; व उत्पन्न हल्लींच्या खर्चास पुरे इतकें आहे; सर्व संस्थानांत स्वतंत्रतेच्या मूलतत्वांस अनुसरून राज्यपद्धति स्थापित झाली आहे. कायदे सौम्य आणि हितकारी आहेत याजमुळें पूर्वीं कधीं नव्हतें अशा सौख्यांत सर्व राष्ट्र आहे. नुक्तें जें बंड उद्भवलें होतें त्याजाविषयीं ते बोलले कीं, जे लोक गैरसमजुतीनें घोटाळ्यांत पडले होते त्यांची चूक त्यांस समजून ते कायदेशीर रीतीनें वागावयास लागले, त्याजवरून कितीएक गुन्हेगारांस मृत्यूच्या शिक्षा झाल्या होत्या त्यांस क्षमा केली. याप्रमाणें समाधानकारक स्थिति सांगून पुढें ज्या गोष्टी करणें अवश्य होत्या त्यांजबद्दल सूचना करून शेवटीं वादविवाद करणें तो शांतपणानें व विचारानें करण्याविषयीं उपदेश केला. या भाषणावर सेनेट व हौस ऑफ रिप्रेझेंटेटिव्स् यांचीं समर्पक उत्तरें आलीं; कांहीं लोकांच्या कुरकुरी होत्या; परंतु बहुमतानें सर्वांनीं समाधान प्रदर्शित करून राष्ट्राच्या या उन्नत व उत्कर्षाच्या स्थितीस आपले श्रम कारणीभूत आहेत असें त्यांस कळाविलें.

फेब्रुवारीमध्यें ग्रेटब्रिटनशीं झालेला तहनामा तकरारीच्या शर्तीसह राजाकडून मान्य होऊन आला. त्याजवरून त्या महिन्याच्या अखेर तारखेस वाशिंग्टन यांनीं त्याजबद्दल जाहीरनामा प्रसिद्ध केला. हौस ऑफ रिप्रेझेंटेटिवसूमध्यें या तहनाम्याबद्दल पुनः चर्चा सुरू झाली व तो वादविवाद इतका वाढला कीं, प्रेसिडेंट व सेनेट यांस हौस आफ रिप्रेझेंटेटिवस् यांच्या संमतीवांचून तहनामा करण्याचा अधिकार नाहीं अशी तक्रार उत्पन्न होऊन याजसंबंधीं सर्व कागदपत्र या मंडळीपुढें सादर करण्याविषयीं प्रेसिडेंट यांस सूचना गेली. त्याजवरून त्यांनीं ते कागद तुह्माकडे पाठविण्याची हल्लीं जरूर नाहीं आणि कायदेशीरपणा व माझें कर्तव्य यांचा विचार केला असतां माझ्यानें आपल्या ह्मणण्याप्रमाणें करवत नाहीं, असें स्पष्ट लिहिलें. हा सर्व वादविवाद, तो तहनामा अंमलांत आणण्याकरितां ठराव करणें जरूर होतें त्याजमुळें झाला. देशांत पुष्कळ लोकांस राग येऊन वाशिंग्टन यांच्या संबंधानें गैरवाका बोलूं लागले. अखेरीस तो ठराव बहुमतानें पसार झाला.

याप्रमाणें राज्यकारभार चालला असतां लोकांमध्यें मतभेद होऊन पक्ष झाले त्याजमुळें वाशिंग्टन यांस फार त्रास झाला. पक्ष झाले ह्मणजे देशाचें खरें हित, न्याय व सत्य यांस लोक स्वभावतः विसरतात आणि पाहिजे ते बोलूं व करूं लागतात. त्याप्रमाणें अमेरिकन लोकांची स्थिति झाली. दोनही पक्षांचा हेतु स्वदेशकल्याणाचा असतां आपापल्या पक्षाचा जय व्हावा व आपल्या मताप्रमाणें विचार होऊन राज्यकारभार चालावा असा दुराग्रह वाढत गेला. याजमुळें वाशिंग्टन यांच्या खऱ्या

स्तुत्य हेतूस व उद्योगास दोष देऊन त्यांची वर्तमानपत्रांतून वगैरे अतोनात निंदा झाली. त्यासंबंधानें त्यांनीं आपल्या एका मित्रास एकदां असें लिहिलें कीं, मी आपल्या राष्ट्राची स्वतंत्र योग्यता कायम करण्याची योजना करीत असतां व कोणत्याही देशाच्या घोंटाळ्यांत न पडतां अगदीं अलग आमचा देश रहावा अशी तजवीज करीत असतां आणि या देशानें लढाईच्या संकटांत येऊं नये ह्मणून उद्योग करीत असतां, लोक मला एका राष्ट्राचे शत्रु व दुसऱ्याचे हस्तक असें मानून माझ्या राज्यकारभाराच्या गोष्टींची गैरसमजूतीनें भलती टीका करून वेगवेगळ्या कल्पना करून मजवर अपशब्दांचा भडिमार करीत आहेत. तो भडिमार इतका चमत्कारिक प्रकारचा आहे कीं, तसा कोणीं नीरो, (रोमचे प्रसिद्ध दुष्ट बादशाहा), एखादा मोठा गुन्हेगार किंवा एखादा साधारण भामटा याजवर देखील केला नसता. असा विलक्षण प्रकार झाला असतां दुसऱ्या एका मित्रास शांतपणानें त्यांनीं असें लिहिलें कीं, यद्यपि हा प्रकार अन्यायाचा व दुःखप्रद आहे, तथापि माझ्या वर्तणुकींत बदल व्हावयाचा नाहीं. फार झालें तर घरीं जाऊन स्वस्थ बसण्याची अधिक उत्सुकता मात्र मला होईल. मी आपलें स्वदेशसेवेचें कर्तव्य माझ्या समजुतीप्रमाणें व सामर्थ्याप्रमाणें यथार्थ रीत्या बजाविलें याजबद्दलचें माझ्या मनाचें समाधान तर कोणीही मजपासून घेऊन जाणार नाहीं. त्या सुखाचा उपभोग घेत मी स्वस्थ राहीन. समजून उमजून कांहीं वाईट काम किंवा चूक केली नाहीं एवढें समाधान मला बस्स आहे. यावरून वाशिंग्टन यांच्या मनाची थोरवी, सहनशीलता व स्वदेशसेवेची एकनिष्ठता हीं उत्तम रीतीनें दिसून येतात.

असो. याप्रमाणें त्यांच्या संबंधानें चर्चा चालली असतां त्याच सालच्या ह्मणजे सन १७९६ च्या सेप्टेंबर महिन्यांत १७ व्या तारखेस त्यांनीं आपली लोकांस शेवटची विनंति व राज्याधिकार सोडण्याची सूचना ह्मणून फिलेडेल्फिया येथील " डेली आडवरटैजर " या पत्रांत एक लेख प्रसिद्ध केला. हा लेख अत्यंत महत्वाचा आहे. त्यांत नानाप्रकारच्या सूचना, उपदेश व राष्ट्राच्या वर्तनाचें धोरण कसें असावें हें उत्त प्रेमळपणानें व हितबुद्धीनें कळविलें आहे. हा लेख प्रसिद्ध झाल्याबरोबर सर्व वादविवादाचा व विचाराचा झोंक फिरला. आतां अशा लेखाचें भाषांतर येथें देण्याचें मनांत आणाव-यास नको, कारण तो लेख फार मोठा आहे. यास्तव कोण कोणत्या गोष्टींचें त्यांत विवेचन केलें आहे हें सांगण्याचा मात्र येथें प्रयत्न केला आहे.

आरंभीं, त्यांनीं, यूनैटेड स्टेटसूची राज्यव्यवस्था पाहण्या-करितां मुख्याधिकारी निवडण्याचा समय आला आहे तेव्हां लोकांनीं कोणास निवडावयाचें या विचारास आतां लागलें पाहिजे अशी सूचना केली आहे. पुढें त्यांनीं असें ह्मटलें आहे कीं, ज्या मंडळींतून त्याची निवड व्हावयाची त्यांत मला समजूं नये असें सुचाविणें अवश्य आहे, कारण राज्याधिकार सोड-ण्याचा मी आतां निश्चय केला आहे. मागच्याच प्रसंगीं माझा तसा विचार होता; परंतु राज्यव्यवस्थेच्या संबंधानें कितीएक गोष्टी अर्धवट स्थितींत होत्या व कितीएक मित्रमंडळीचा विशेष आग्रहही कामावर राहण्याविषयीं होता ह्मणून त्या वेळेस तो विचार रहित केला. परतु आतां बहुतेक राज्यव्यवस्था मार्गास लागली व कारभार सुरळीत

चालू झाला. तेव्हां मला स्वस्थतेंत राहूं देण्यास आपण परवानगी द्यालच. आतां माझा स्वदेशसेवेचा संबंध सुटण्याचा समय आला आहे तेव्हां मला माझ्या प्रिय देशानें जो मान दिला व माझा गौरव केला त्याजबद्दल उपकार मानल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. तसेंच लोकांनीं मजवर भंवसा ठेऊन मला साहाय्य केलें त्याजबद्दल तर विशेषच उपकार मानिले पाहिजेत. शिवाय माझ्या उत्सुकतेप्रमाणें जरी मजकडून उपयोग झाला नाहीं तरी मला विश्वासूपणानें व झटून सेवा करण्याचे प्रसंग त्यांनीं दिले त्याजबद्दल मी त्यांचे उपकार मानतों. याप्रमाणें उपकारस्मरण झाल्यावर त्यांनीं त्या लेखांत परमेश्वरापाशीं मागणें मागितलें आहे. तें असें:—परमेश्वर कृपा करून तुमचें निरंतर उत्तम प्रकारें कल्याण करो; तुमचें ऐक्य व बंधुप्रेम चिरकाल राहो; तुह्मी जी ही राज्यपद्धति स्थापन केली आहे ती सारखी कायम असो; तुमच्या राज्यकारभारांतील सर्व खात्यांत चातुर्य व सद्गुण हीं जारीनें वास करोत; शेवटीं या देशाच्या लोकांस उत्तम प्रकारचें स्वातंत्र्याचें सुख प्राप्त होऊन दुसऱ्या लोकांस तुह्मी उदाहरण झाल्याचें भूषण तुह्मांस मिळो असें माझें त्याजपाशीं मागणें आहे. याप्रमाणें मागणें मागून पुढें त्या लेखांत त्यांनीं असें दर्शविलें आहे कीं, वास्तविक ह्मटलें तर हा लेख येथें संपावा परंतु तुमच्या हिताच्या संबंधानें कांहीं सूचना केल्यावांचून माझ्या मनाची तृप्ति होत नाहीं. हें पुढचें सांगणें माझ्या मतें पुष्कळ अनुभवाचें, विचाराचें व तुह्मीं नेहमीं मनांत वागवून त्याचें वारंवार मनन करण्यासारखें आहे. तें केवळ निरपेक्ष प्रेमबुद्धीनें सादर केलें आहे त्यांत माझा कांहीं स्वतांच्या स्वार्थाचा संबंध नाहीं. तर

तें ध्यानांत ठेवा. स्वातंत्र्याविषयीं तुमचें अत्यंत प्रेम असून तें अगदीं तुमच्यांत भिनून गेलें आहे. त्याजविषयीं विशेष सांगण्याचें कारण नाहीं. तसेंच ज्या राज्यैक्याच्या योगानें तुह्मांस एकराष्ट्रत्व प्राप्त झालें आहे तेंही तुह्मांस प्रिय आहे आणि तें तसें असलेंच पाहिजे, कारण तुमच्या खऱ्या स्वातंत्र्याच्या इमारतीचा राज्यैक्य हा मुख्य स्तंभच आहे. तुमच्या घरांतील शांततेचा व बाह्य प्रदेशाच्या स्वस्थतेचा, तसेंच, तुमचें संरक्षण, तुमचा उत्कर्ष यांचा, आधारच आहे. परंतु हें पाहूनच दुष्ट लोक व घरांतील व बाहेरचे शत्रु हा तुमच्या राजकीय ऐक्याचा कोट फोडण्यास निरनिराळ्या ठिकाणीं प्रयत्न करतील, पुष्कळ श्रम घेतील, युक्ति लढवितील, भूल पाडतील आणि तुमच्या मनांतील हा ग्रह फिरविण्याकरितां देखील उद्योग करतील, ह्मणून, हें राजकीय संबंधाचें ऐक्य तुमच्यांतील व्यक्तींच्या व एकंदर लोक समूहाच्या सुखास कारणीभूत असून किती मोलवान आहे हें मनांत आणून तुह्मी नेहमीं सावध राहिलें पाहिजे; त्याजविषयीं नेहमीं बोलून व विचार करून तें ऐक्य आपल्या राजकीय संरक्षणाचें व उत्कर्षाचें कारण आहे अशी समजूत होऊन लोकांच्या मनांत संवयी सारखें त्याजबद्दल दृढ प्रेम जागृत राहिलें पाहिजे. त्याजविरुद्ध प्रयत्न करणारांवर नेहमीं कडक नजर असावी व कोणत्याही कारणानें आपापल्यांत फाटाफूट होऊं देऊं नये. आतां हें वाशिंग्टन यांचें सांगणें आमच्या हल्लींच्या स्थितींत किती महत्वाचें व विचार करण्यासारखें आहे हें आमच्या हिंदुस्थानवासी लोकांनीं पाहिलें पाहिजे. वाशिंग्टन यांनीं पुढें असें ह्मटलें आहे कीं, यासंबंधानें देश व प्रांत यांची भिन्नता

मनांत न आणितां सर्व आपण अमेरिकन या नांवाखालीं मोडण्यांत समाधान मानिलें पाहिजे. आह्मी उत्तरेकडील, आह्मी दक्षिणेकडील, आह्मी पश्चिमेकडील किंवा आह्मी पूर्वेकडील असें ह्मणून मनांत व्यर्थ अभिमान बाळगून भेदभाव प्रदर्शित करणें हें योग्य नाहीं. कारण ही गोष्ट वैमनस्यास आणि नंतर देशाच्या अहितास कारणीभूत होते. त्याचप्रमाणें यांनीं कायदे मानून त्या कायद्यांप्रमाणें लोकांनीं वर्त्तन केलें पाहिजे, असें त्या पत्रांत सुचविलें आहे. कायदे लोकांनींच केले आहेत व त्यांत फेरफार करण्याचा अधिकारही लोकांकडेसच आहे तेव्हां योग्य वाटेल त्यासमयीं फेरफार करावा; परंतु तसें होई तोंपर्यंत लोकांनीं त्या कायद्यांप्रमाणें वर्तन केलेंच पाहिजे. तसेंच, तुह्मीं राज्यपद्धति स्थापन केली ह्मणजे त्या व्यवस्थेप्रमाणें तुह्मी वागावयास कबूल आहां हें सिद्धच आहे. तस्मात् कायदे व राज्याधिकार मानणें अवश्य आहे. तसेंच राज्यव्यवस्थेच्या संबंधानें निरनिराळीं खातीं केलेलीं आहेत त्या सर्वांनीं आपापल्या अधिकाराच्या मर्यादेप्रमाणें कामें चालवावीं; परंतु एकाचें वर्चस्व दुसऱ्यावर होऊं देणें नीट नाहीं. कारण तसा प्रकार वाढत गेल्यानें घोंटाळ्यांचा प्रसंग येतो व लटपटी लोक आपलें घोडें पुढें सरकवून आपला स्वार्थ साधण्यास उद्युक्त होतात.

याप्रमाणें सुचवून पुढें त्यांनीं लोकांमध्यें राजकीय संबंधाच्या बाबतींत पक्ष न होऊं देण्याविषयीं अगदीं निक्षून लोकांस सूचना केली आहे. त्यांचें सांगणें असें आहे कीं, कोणत्याही कारणानें लोकांमध्यें फाटाफूट होऊन पक्ष होऊं देऊं नयेत. त्याजपासून फार अनर्थ होतात. पक्ष झाल्यानें एकंदर लोकांच्या

मनाप्रमाणें व हितास अनुसरून गोष्टी न होतां त्या फक्त थोड्या लोकांच्या पक्षाच्या प्रमाणें घडतात. तसेंच, पक्ष झाल्यानें द्वेष उत्पन्न होऊन सूड घेण्याकडे व दुसऱ्या पक्षानें केलेलें कसेंही असो, तें व्यर्थ करण्याकडे धोरण जातें. लोकांचीं व सरकारी अधिकाऱ्यांचीं मनें अस्वस्थ होऊन संशयांत पडतात. गवगवा विशेष होतो आणि अखेरीस प्रकरणें दंगे धोप्यांवर जातात इतकेंच नव्हे; पण परकी लोकांस आपला शिरकाव करून घेण्यास व आपले हेतु साधून घेण्यास सवड होते. शेवटीं राज्यें लयास जातात. यास्तव पक्षांचा उपक्रमच होऊं देऊं नये. त्यांतून प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या ठिकाणीं तर विशेषच जपलें पाहिजे.

याप्रमाणें पक्ष न होण्याच्या संबंधानें सुचवून पुढें धर्म व नीति यांची राजकीय उत्कर्षास अत्यंत आवश्यकता आहे असें प्रतिपादन केलें आहे. राजकीय संबंधाच्या उत्कर्षास सर्व गोष्टींपेक्षां धर्म व नीति यांच्या साहाय्याची अधिक आवश्यकता आहे. कारण मानवी सुखाचे जे हे मुख्य आधारस्तंभ व मनुष्याच्या कर्तव्याच्या भरभराटीस जीं मुख्य कारणें तीं नको म्हणणारास स्वदेशभक्त म्हणविण्यास पात्रता येते म्हणणें व्यर्थ आहे. राजकारणी पुरुष व देवभक्त या दोघांस धर्म व नीति यांची सारखी जरूर आहे. न्यायकोर्टांत धर्माप्रमाणें शपथ घेण्याचा आधार नाहींसा झाल्यावर मग मालमत्ता, अब्रू व जीवित यांस सुरक्षितपणा कोठून येणार? तसेंच, धर्मावांचून नीति मनुष्यामध्यें राहते हें म्हणणेंही व्यर्थ आहे. त्यांतून केवळ शिक्षणाच्या योगानें मनुष्यामध्यें चांगुलपणा येतो असें म्हणणें कसें असेल तें असो; परंतु लोकसमाजामध्यें नीति-

मानपणा धर्मावांचून येतो असें विचार व अनुभव यांच्यानें तर कांहीं ह्मणवत नाहीं. तसेंच प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें मूळ बीज सद्गुण आहे. शिवाय, सर्व प्रकारच्या राज्यरीतीस हा नियम कमी जास्त प्रमाणानें लागू आहे. तेव्हां जो ह्मणून आपल्या देशाच्या व राज्याच्या हिताचा विचार करणारा व [illegible] आहे तो राज्यरूपी इमारतीचा धर्म व नीति हा जो [illegible]या तो नाहींसा करण्यास कधींही प्रवृत्त होणार नाहीं असेंही त्यांनीं स्पष्ट सुचविलें.

पुढें त्यांनीं सर्व प्रकारच्या लोकांत ज्ञानाचा प्रसार करण्याविषयीं शिफारस केली आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, साधारण ज्ञानाच्या प्रसारार्थ ह्मणून जे मार्ग असतील ते अत्यंत महत्त्वाचे असे समजून वाढवा. कारण ज्याअर्थी राज्यपद्धति लोकमतास वर्चस्व व वजन देते, त्याअर्थी लोकमत शहाणपणाचें सुधारलेलें असलें पाहिजे. वरील दोनही गोष्टींचा विचार आपल्या हिंदुस्थान देशाच्या हिताचा विचार करणारांनीं केला पाहिजे. धर्म, नीति व ज्ञान यांची आपल्या प्रिय देशांत व देशबांधवांत अत्यंत जरूर आहे. या गोष्टींवांचून कधींही आपल्या देशाचें बरें होण्याची आशा नाहीं. धर्मावांचून नीतीस आधार नाहीं; नीतीवांचून लोकांमध्यें भरंवसा उत्पन्न होत नाहीं; भरंवशावांचून ऐक्य होत नाहीं; व ऐक्यावांचून राजकीय हित व उत्कर्ष होण्याचा संभव नाहीं. तसेंच ज्ञानावांचून हिताहित समजत नाहीं व समजुतीवांचून ऐक्याची जरूर वाटत नाहीं हें ध्यानांत पक्कें वागवून आपल्या देशाच्या हितार्थ उद्योग करणें तो करावा.

यानंतर त्यांनीं राज्याच्या मजबुतीकरितां व संरक्षणाकरितां

उपाय सांगितले आहेत. त्यांत आपल्या राज्याची पत वाढविणें ही फार महत्वाची गोष्ट आहे असें सांगितलें आहे. पतीचा जितका कमी उपयोग होईल तितका बरा. एवढ्याकरितां राज्यांत स्वस्थता वाढवून खर्चाचे प्रसंग टाळावे; तथापि येणाऱ्या अरिष्टाच्या निवारणार्थ उपायांची योजना केली पाहिजे व त्याजकरितां खर्च करणें अवश्य आहे. तसेंच कर्ज वाढूं देऊं नका. लढ वगैरे कारणांनीं कर्जाचा प्रसंग आल्यास स्वस्थता झाल्याबरो जेवढें कर्ज सत्वर देऊन टाकतां येईल तितकें लवकर देऊन टाकावें. आपल्या वेळचें कर्ज आपल्या संततीवर लोटूं नये. आतां याकरितां व इतर खर्चाकरितां सरकारास उत्पन्न पाहिजे झटलें ह्मणजे कराची जरूर येतेच. कर देणें ह्मणजे सर्वांस दुःसह आहे; परंतु निरुपायामुळें ते दिलेच पाहिजेत. तथापि कोणत्या प्रकारच्या करानें लोकांस कमी वाईट वाटेल याचा विचार तुमच्या मुक्त्यारांनीं केला पाहिजे.

पुढें त्यांनीं सर्व राष्ट्रांशीं न्यायानें, विश्वासानें व खरेपणानें वागावें असें सुचविलें. सर्वांशीं स्नेहभाव वाढवावा. या स्वतंत्र, सुधारलेल्या व मोठ्या राष्ट्रानें (ईश्वरकृपेनें लवकरच आपलें राष्ट्र मोठें होईल,) न्यायानें, लोककल्याणबुद्धीनें व थोरपणानें वागण्याचें जगास नवीन उदाहरण दाखविलें पाहिजे. ह्मणून आपल्या लोकांनीं एका राष्ट्राशीं विशेष मित्रत्वानें व दुसऱ्याशीं शत्रुत्वानें वागणें नीट नाहीं. कारण दोनही प्रकारांत मनुष्य मित्रत्वानें व शत्रुत्वानें दुसऱ्याचा गुलाम बनतो आणि त्या धोरणानें संकटांत व घोंटाळ्यांत पडतो. सर्वांशीं स्नेहभाव वाढवून व्यापाराच्या संबंधाचे तह करावे; परंतु राजकीय संबंधानें कोणाशीं तह करूं नये. शिवाय परकी लोकांचें

वजन, खटपटी व संबंध आपल्या देशांत न होऊं देण्याविषयीं नेहमीं डोळ्यांत तेल घालून सावध राहिलें पाहिजे असें विशेष आग्रहानें त्यांनीं बजाविलें आहे. कारण त्याच्या योगानें आज पर्यंत पुष्कळ राज्यें बुडत आलीं आहेत. त्यांतून प्रजासत्ताक राज्यपद्धतींत तर परकी लोकांचा संबंध विशेष नाशकारक भयंकर आहे. शेवटीं त्यांनीं युरोपच्या संबंधानें असें ...विलें कीं, त्यांतील कितीएक गोष्टींचा कितीएक देशांशीं संबंध आहे तो आपल्यास मुळींच लागू नाहीं. यास्तव युरोपच्या घोंटाळ्यांत आपल्या देशानें कधींही पडूं नये. त्यांत आपलें हित नाहीं व आपला संबंधही नाहीं. आपला देश त्यांजपासून तुटून फार दूर आहे त्यामुळें आपणांस पाहिजे तसें स्वतंत्र रीतीनें वागतां येईल. आपण सर्व राष्ट्र कायम राहून, चांगल्या राज्याधिकाराखालीं असलों तर लवकरच बळकट राष्ट्र होऊं व कोणाच्यानेंही आपल्याशीं दांडगावा करवणार नाहीं. आह्मी कोणाच्या तंट्यांत न पडतां अलग राहिलों तर आपल्याशीं तंटा करण्यास उभें राहण्यास कोणाची छाती होणार नाहीं. तेव्हां अनायासें अशी सवड असतां आपण कशाकरितां बळेंच लोकांच्या खटल्यांत पडून आपलें नुकसान करून घ्यावें ? सर्वांशीं स्नेहभावानें, न्यायानें व नेकीनें वागून व्यापारधंदा वाढवून आपलें हित साधावें असें मला वाटतें.

अखेरीस त्या लेखांत त्यांनीं कळविलें आहे कीं, या सूचना तुमच्या जुन्या व आवडत्या मित्राकडून आल्या आहेत त्या तुमच्या ...नांते जशा बळकट ठसाव्या असें मला वाटतें तशा ठसणार नाहींत; तथापि त्यांजपासून थोडेंसें व प्रसंगानुसार कांहीं हित

झालें ह्मणज, पक्षाच्या संबंधानें जो रागाचा आवेश उत्पन्न होतो तो अंशतः थंड व सौम्य होण्यास, परकीय लोकांच्या लटपटीच्या संबंधानें तुह्मांस जागृत राखण्यास किंवा ढोंगी स्वदेशभक्तापासून सावध ठेवण्यास या सूचना कांहीं अंशीं तरी कारणीभूत झाल्या तर माझी इच्छा परिपूर्ण झाली असें मी समजेन. आतां माझ्या राज्यकारभाराच्या गोष्टींचा विचार केला तर मीं समजून उमजून चूक केल्याचें मला वाटत नाहीं; तथापि मजकडून कांहीं चुका झाल्याच नसतील असें नाहीं. झाल्या असतीलच; परंतु त्यांजपासून होणारे वाईट परिणाम परमेश्वरानें कृपा करून टाळावे असें माझें त्याजपाशीं मागणें आहे. तसेंच आज पंचेचाळीस वर्षें मी आपल्या देशाच्या सेवेंत मनापासून कळकळीनें घालविलीं तेव्हां माझा देश माझ्या चुका विसरेल अशी मी आशा करतों. माझा देश इतर दुसऱ्या गोष्टींत मजवर मेहरबानी करीत आला, त्याप्रमाणेंच या कामांतही मेहरबानी करील, अशी खात्री बाळगून, मी हा लेख संपवितो. ज्या देशांत माझा व माझ्या कितीएक पिढ्यांपर्यंत पूर्वजांचा जन्म झाला त्याजविषयीं माझ्या मनामध्यें प्रेमभाव उत्पन्न व्हावा हें स्वाभाविकच आहे, तेव्हां तें प्रेम मनांत बागवून, आपल्या देशाच्या स्वतंत्र्य राज्याच्या हितावह अशा कायद्यांखालीं, माझ्या दुसऱ्या स्वदेशबांधवांमध्यें; मी सुखानें वास करावा, ह्मणून माझी जी फार दिवसांपासून इच्छा होती, ती परिपूर्ण करण्याकरितां मी आपल्या घरीं जाऊन राहीन आणि आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचें संपादन सर्वांच्या कर्तृत्वाचें फळ आहे असें मानून आपल्या आयुष्याचे बाकीचे दिवस

सुखांत घालवीन असें ह्मणून त्यांनीं आपला लेख संपविला आहे.

हा लेख प्रसिद्ध झाल्यावर पुढें डिसेंबरच्या पांचव्या तारखेस कांग्रेसचें सेशन सुरू झालें. त्या शेवटच्या प्रसंगीं जनरल वाशिंग्टन यांनीं आपल्या भाषणांत शेतकी सुधारण्याकरितां एक विद्यालय, एक लष्करी खात्याच्या शिक्षणासाठीं विद्यालय, एक राष्ट्रीय यूनिवर्सिटी आणि आरमार हळु हळु वाढविण्याकारितां योजना असावी अशी शिफारस केली. फ्रान्सच्या संबंधानें त्यांनीं असें कळविलें कीं, फ्रेंच लोकांशीं स्नेहभाव राहवा एतदर्थ मी आपल्याकडून प्रयत्न करीत आलों व पुढेंही करीन; परंतु त्यांजकडून आपल्या व्यापारास इजा व्हावयास लागली आहे व त्यांच्या प्रधानमंडळीचा रोंखही फिरत चालला आहे ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. होईल तेवढें करून उपयोग न झाल्यास तुमचें साहाय्य द्यावें लागेल व तें तुह्मी प्रसंगीं द्याल ही माझी खात्री आहे. शेवटीं ते बोलले कीं, यूनैटेडस्टेट्सच्या मुक्त्यार मंडळीमध्यें आज मी उभा आहे; हा शेवटचा प्रसंग आहे व याजमुळें आरंभीं आपणामध्यें आलों त्यावेळचें स्मरण मला होत आहे. या दोनही समयांचा विचार केला असतां त्यावेळेस नवीन राज्यपद्धतीस आरंभ झाला, व आज आपणांस आपल्या देशाच्या संबंधानें समाधान मानण्यास सर्व प्रकारें कारण झालें आहे असें ह्मटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. तसेंच सर्व सृष्टीचा जो नियामक व सर्व राष्ट्राचा जो राजाधिराज त्यानें यूनैटेडस्टेटस् देशाचें संरक्षण करावें, त्यांतील लोकांमध्यें सद्गुण व सुख कायम राखावें, आणि त्यांच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ जी

राज्यरीति स्थापन झाली आहे ती निरंतर चालवावी, असें मागणें मागितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. याप्रमाणें त्यांचें भाषण झाल्यावर कांग्रेसच्या सभासदांनीं त्या भाषणाच्या उत्तरांत त्यांचें ह्मणणें मान्य करून हें जें सर्व यश प्राप्त झालें त्यास तुमचे सद्गुण, तुमचा दृढनिश्चय व तुमची राज्यकारभार चालविण्याच्या कामांतील दक्षता हीं पुष्कळ अंशीं कारण झालीं आहेत असें स्पष्टपणें ह्मटलें. तसेंच त्यांनीं त्यांच्या लष्करी व दिवाणी कामगिऱ्या स्मरून असें ह्मटलें कीं, आपण घरीं चाललां तरी आमचें प्रेम व आमची पूज्यबुद्धि हीं आपल्या बरोबर निरंतर वास करतील, परंतु आपल्या वियोगजन्य दुःखांत एक मोठें समाधान आह्मी मानून घेतों कीं, आपल्या उदाहरणापासून आपल्या पाठीमागून कामावर येणाऱ्या पुरुषांच्या मनांवर उत्तम ग्रह होऊन यूनैटेडस्टेटस् देशाचा राज्यकारभार शहाणपणानें, खरेपणानें व जोमानें सदोदित चालेल. आपणांस जें स्वातंत्र्य इतकें प्रिय आहे व ज्याशीं आपलें नांव सदोदित जोडून राहील त्याचा उपभोग आपणांस पुष्कळ काळपर्यंत मिळो. आणि आपल्या सद्गुणांच्या योगानें आणि आमच्या सर्व लोकांच्या प्रार्थनेनें आपल्या उतरत्या वयांत आपणांस येथें व पुढें उत्तम प्रकारचें निरंतर सुख प्राप्त होवो. असें आह्मी परमेश्वरापाशीं मागतों. याप्रमाणें कांग्रेसच्या दोनही सभांकडून उत्तरें मिळालीं.

यानंतर पुढें ते काम करीत असतां फ्रेंच सरकारचा संबंध अधिकच फाटत गेला. फेब्रुवारी महिन्यांत अध्यक्षांच्या निवडणुकीचा निकाल समजला. मि० आडम्स हे प्रेसिडेंटच्या हुद्याकरितां निवडले गेले व मि. जेफर्सन हे वैस–प्रेसिडेंट

झाले. त्या निकालाच्या दिवसापासून वाशिंग्टन हे दिवस आणि तास मोजीत बसले. शेवटीं तारीख ३ मार्च रोजीं ह्मणजे काम सोडण्याच्या पूर्व दिवशीं त्यांनीं नवीन प्रेसिडेंट वगैरे मंडळीस मेजवानी दिली आणि शेवटची रजा घेतली. या प्रसंगीं कांहीं मंडळीच्या तर डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता. ४ मार्च सन १७९७ इसवी रोजीं कांग्रेसच्या इमारतीच्या सभोंवतीं लोकांची अत्यंत गर्दी झाली. अकरा वाजतां मि. जेफर्सन यांनीं आपल्या वैस-प्रेसिडेंटच्या हुद्याबद्दल सेनेटच्या समोर शपथ घेतली. नंतर ते त्या मंडळीसह हौस आफ रेप्रेजेंटेटिव्हसच्या दिवाणखान्यांत गेले. थोड्या वेळानें जनरल वाशिंग्टन तेथें आले तों मंडळीनें मोठ्यानें जयजयकार केला. पुढें मि. आडम्स हे लागलेच जयजयकार होत असतां तेथें आले व त्यांनीं आपल्या हुद्याची चालीप्रमाणें शपथ घेतली. नंतर त्यांनीं आपलें पहिलें भाषण केलें त्यांत वाशिंग्टन यांच्या आठ वर्षांच्या कारभाराच्या संबंधानें बोलून शेवटीं ते ह्मणाले कीं, या पुरुषानें कितीएक मोठीं कृत्यें, शहाणपणानें, न्यायानें, सौम्य-पणानें व दृढनिश्चयानें केलीं व लोकांचीं मनें त्यांजसारख्याच सद्गुणांनीं, स्वदेशभक्तीनें व स्वातंत्र्याच्या आवडीनें उदित झालेलीं होतीं अशांस त्यानें स्वातंत्र्य व स्वस्थता मिळवून देऊन वाढती संपत्ति व अनुपम उत्कर्ष यांजप्रत पोंचविलें. याजमुळें हा पुरुष आपल्या स्वदेशबांधवांच्या कृतज्ञतेस पात्र झाला आहे. यानें परकी राष्ट्रांपासून उत्तम वाहवा मिळविली आणि पुढच्या संततीकरितां अमरकीर्ति संपादन करून ठेविली आहे. याप्रमाणें सर्व समारंभ आटपल्यावर त्यांनीं सर्वांची रजा

घेतली. त्यावेळेस प्रेम व वियोगजन्य दुःख यांनीं सर्व जमलेल्या मंडळीचे डोळे भरून आले.

याप्रमाणें जनरल वाशिंग्टन यांच्या स्वदेशसेवेची कामगिरी संपली आणि जसे ते या राज्याधिकाऱ्याच्या अत्यंत महत्वाच्या हुद्यावर शेतकऱ्याचें काम सोडून आले होते त्याप्रमाणेंच हा हुद्दा सोडून आठ वर्षांनीं पुनः शेतकऱ्याचें काम स्वस्थप व आनंदानें करण्यास गेले. आले त्यावेळेस लोकांच्या प्रे पूर्वक बोलावण्यानें आले आणि गेले त्यावेळसही लोकांचें प्रेम व आशिर्वाद घेऊन घरीं गेले. असें निरपेक्ष व केवळ स्वदेशहितबुद्धीनें, एक पैसाही न घेतां, स्वदेशसेवा बजावून, नियमित कामगिरी करून स्वसंतोषानें हुद्दा सोडून जाण्याचें दुसरें उदाहरण या जगाच्या आजपर्यंतच्या इतिहासांत कोठें आढळत नाहीं. सारांश ज्या देशांत असें रत्न निपजतें तो देश धन्य आणि जे अशा पुरुषास आपल्या देशाचा पिता मानतात ते लोकही धन्य होत ! ! परमेश्वर कृपा करो आणि अशा सत्पुरुषाचा कित्ता घेण्याची इच्छा व आवड आमच्या लोकांच्या मनांत उत्पन्न होवो.

---

## भाग ९ वा.

### जार्ज वाशिंग्टन यांचा शेवटचा आयुष्यक्रम.

जनरल वाशिंग्टन हे आपलें मुख्य राज्याधिकाऱ्याचें काम सोडून मौंटवर्नान येथें गेल्याबरोबर यांनीं आपला शेतकऱ्याचा धंदा व पूर्वीच्या उद्योगाचा नित्यक्रम सुरू केला. आठ वर्षे तेथें त्यांचें वास्तव्य नसल्यामुळें कितीएक गोष्टींत दुरुस्ती

करण्याचा प्रसंग आला होता. त्यांचे लष्करी, राजकारणी वगैरे पत्रव्यवहाराचे कागदपत्र सुरक्षित ठेवण्याकरितां एक नवीन इमारत बांधण्याचा त्यांनीं विचार चालविला होता. आतां ते जरी स्वस्थ घरीं एकांतांत जाऊन बसले होते तरी त्यांस स्वदेशांतील लोक प्रेमानें भेटण्याकरितां किंवा असा अद्वितीय, निरपेक्ष व थोर पुरुष पाहण्याकरितां ह्मणून मौंट वर्नानमध्यें त्यांच्या येथें येत असत. नेहमीं त्यांच्या येथें पाहुण्यांची गर्दी असे. त्यांच्या आदरातिथ्याच्या व्यवस्थेकरितां व सोयीकरितां त्यांनीं आपले नातलग लारेन्स लुइस यांस आपले येथें राहण्यास बोलाविलें. यांच्या घरांत त्यांनीं आपल्या कुटुंबाचीं दोन नातवंडें त्यांचा वडील वारल्यापासून जवळ आ-दलीं मुलें ह्मणून बाळगलीं होतीं. मिस्स् नेली कस्टिस ही नात व जार्ज डब्ल्यू पी. कस्टिस हा नातु या दोघांचें लहानपणापासून पालन व शिक्षण यांच्या येथेंच झालें होतें. या मुलांवर वाशिंग्टन यांचें अत्यंत प्रेम होतें आणि ती मुलगी आतां बरीच मोठी झाली होती. यामुळें तिच्या लग्नाच्या संबंधानें त्यांच्या मनांत काळजी उत्पन्न झाली होती. परंतु मि. लारेन्स लुइस हे वाशिंग्टन यांच्या येथें रहावयास आल्यावर कांहीं दिवसांनीं ती काळजी दूर झाली. लुईस यांजवरही जनरल वाशिंग्टन यांचें त्यांच्या गुणांमुळें विशेष प्रेम होतें आणि दैवयोगानें या नातलगाचा व त्या मुलीचा शरीरसंबंध जमून आला त्याजमुळें वाशिंग्टन यांस फार समाधान वाटलें.

ते आपल्या नेहमीच्या सांप्रदायाप्रमाणें सूर्योदयापूर्वीं उठून दिवा लावून एकांतांत ईश्वरस्तुतींत काल घालवून नंतर बाहेर

पायीं किंवा घोड्यावर बसून फिरावयास जात असत. या प्रमाणें सकाळचा एकट्याचा उद्योग व व्यायाम झाल्यावर मग मंडळींत मिसळून जेवणखाण होत असे. रात्रीं ते फार वेळ जागत नसत. विश्रांतीचा वेळ वाचन वगैरेंत घालवीत. तसाच सायंकाळच्या सुमारास लोकांकडून आलेल्या पत्रांचीं उत्तरें लिहिण्यांत वेळ जाई. पाहुणे मंडळीची व्यवस्था ठेवणें, त्यांजबरोबर जेवणें व बोलणें वगैरे सर्व पाहुणचाराचें काम लारेन्स लुईस यांजकडे सोंपविलेलें होतें. घरांतील मंडळींत व पाहुणे मंडळींत अगदीं साधेभोळेपणानें व मोकळेपणानें ते मिसळून वागत. मौजेच्या गोष्टी ऐकणें व मंडळीच्या विनोदामध्यें मिसळणें हें त्यांस फार आवडत असे; परंतु त्यांच्या मोठेपणामुळें तरुण मंडळीस त्यांच्या देखतां कांहीं बोलवतच नसे. हें पाहून वाशिंग्टन आपल्याकडून मोकळेपणा दाखवील व विनोद आपण होऊन देखील करीत; तथापि लोकांचीं मनें तितकीं प्रशस्त होत नसत याजमुळें त्यांस वाईट वाटे. सारांश त्यांचा स्वभाव फार चांगला असे. व ते निरभिमानानें व अगदीं साध्या रीतीनें लोकांशीं वागत व शेतकीच्या कामाची स्वतां चांगली देखरेख व व्यवस्था ठेवीत असत. नवीन निराळें बीं आणवून, शेतकीचीं हत्यारें मागवून, नानाप्रकारची माहिती बाहेरच्या देशांतील प्रसिद्ध शेतकामाचे ज्ञाते यांजकडून मिळवून, आपल्या शेतांमध्यें सुधारणा करीत असत. रोज शेतांत काय काम झालें असेल त्याची नोंद रोजनिशींत तपशीलवार करून ठेवीत असत. त्यांची शेती मोठी होती. जमीन मुबलग असून निरनिराळ्या प्रकारची होती. ते तींत पैसा घालून उत्पन्नही करीत असत. याप्रमाणें ते आपला वेळ आ-

नंदांत व स्वस्थतेंत घालवीत होते. इतक्यांत एक घोंटाळा उत्पन्न झाला.

फ्रान्स देशामध्यें पुष्कळ दिवस गडबड चालू होतीच, परंतु वाशिंग्टन यांनीं राज्यकारभार सोडल्यावर फ्रान्सचा व अमेरिकेचा बेबनाव अधिकाधिक होत गेला. शेवटीं फ्रेंच सरकारानें अमेरिकेच्या वकिलास परत घालवून दिलें. अमेरिकन सरकारानें फ्रान्सचा उपकार स्मरून होईल तेवढें करून तंटा करावयाचा नाहीं अशा बेतानें उद्योग चालीवला होता. त्यांनीं नवीन तीन गृहस्थ वकिलीच्या कामावर पाठविले; परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. फ्रेंच सरकारचे कारभारी लोक त्यावेळेस निर्मळ नव्हते. त्यांस मध्यस्थीकरितां पैसा पाहिजे होता. तो मिळेना याजमुळें प्रकरण लढाईवर येऊन ठेपलें. तेव्हां, अमेरिकन सरकारानें फ्रेंच सरकारचा रोंख अमेरिकन सरकार व प्रजा यांजमध्यें वितुष्ट आणून घोंटाळा करण्याचा आहे असें पाहून लढाईच्या तयारीची सुरुवात केली. फौजेची भरती करण्याचें व सरदार नेमण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. अशा अडचणीच्या प्रसंगीं अमेरिकन सरकारानें जनरल वाशिंग्टन यांस सेनापति नेमिलें व त्यांनीं तो हुद्दा मोठ्या संकटानें व कांहीं शर्तींनीं पतकरला. त्यांनीं कोण मुख्य सरदार नेमावयाचे तें सुचविलें. आणि व्यवस्था वगैरे आपण पाहूं, आणि अगदीं प्रसंग आलाच तर मात्र फौजेबरोबर व छावणींत राहून काम करण्यास येऊं असा करार केला. त्याप्रमाणें सरदारांच्या नेमणुका होऊन फौजेची भरती करून त्यांस कवाईत वगैरे शिकविण्याचें काम चालू झालें. कांहीं वेळ मधून मधून वाशिंग्टन स्वतां फिले-

डेल्फिया येथें जाऊन सरकारचे अधिकारी, सैन्याचे सरदार व सैन्य यांस भेटून पाहून येत असत. याप्रमाणें इकडे लढा-ईची तयारी चालू ठेवून तंटा मिटविण्याकरितां बोलणीं चालू ठेविली होतीं. इतक्यांत फ्रेंच लोकांनीं अमेरिकन लोकांच्या तयारीचा झोंक व त्यांत जनरल वाशिंग्टन यांनीं पुढाकार घेतला हें पाहून, तंटा मिटविण्याकरितां प्रयत्न सुरू केला. त्यांजपैकीं कांहीं थोर, सुज्ञ, राजकारणी पुरुष पुढें होऊन मध्यस्थी करण्यास तयार झाले. अशी वाटाघाट सुरू झाल्यामुळें जनरल वाशिंग्टन यांस लढाईस जाण्याचा प्रसंग आला नाहीं. पुढें तंटा मिटला व पूर्ववत मित्रत्व चालू झालें.

हें लष्कराच्या तयारीचें वगैरे काम चाललें होतें; तथापि शेतीच्या कामाची व्यवस्था ते लक्ष लावून पाहत असत. त्यांनीं आपल्या एकंदर शेतीची व्यवस्था कशी करावयाची, कोणत्या वेळीं, कोणत्या शेतांत, काय लावावयाचें व पेराव-याचें याचें कांहीं वर्षें सारखें काम करण्याचें एक व्यवस्थेचें पत्रक तयार केलें होतें. हें काम फार दिवस मनन करून त्यांनीं सन १७९९ च्या डिसेंबरच्या १०व्या तारखेस संपविलें. आणि तेंच त्यांचें या जगांतील शेवटचें काम होतें. कारण हें काम संपल्यावर पांचव्या दिवशीं ते मृत्यु पावले. ता० १० रोजीं त्यांची प्रकृति नेहमींप्रमाणें चांगली व सशक्त होती. दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता० ११ रोजीं हवा बिघडली आणि वारा व पाऊस होता व त्या रात्रीं चंद्राच्या सभोंवतीं मोठें खळें पडलें होतें. गुरुवार तारीख १२ रोजीं सकाळीं अभाळ आलेलें होतें. त्याच दिवशीं सकाळीं त्यांनीं यूनैटेडस्टेटूसमध्यें "मि-लिटरी आक्याडेमी" ह्मणजे लष्करीज्ञान शिक्षणाचें विद्यालय

स्थापन करण्याच्या संबंधानें जनरल हामिलटन यांस पत्र लिहिलें आणि नंतर दहा वाजतां शेताची रोजची पाहणी करण्याकरितां घोड्यावर बसून ते बाहेर गेले. एक वाजतां वारा सुटून पाऊस यावयास लागला व बर्फही पडूं लागलें. हे तसेच पावसांत फिरून तीन वाजल्यावर घरीं परत आले. कांहीं टपालच्या पाकिटांवरसह्या करावयाच्या होत्या त्या त्यांनीं केल्या आणि मंडळी जेवणाकरितां वाट पाहत बसली होती तिकडे पोषाख न बदलतां तसेच जेवावयास जाऊन बसले. त्या दिवशीं सायंकाळीं प्रकृति नित्याप्रमाणेंच दिसली; परंतु पावसानें त्यांस थंडी झाली होती. तथापि त्यांनीं तें मनावर घेतलें नाहीं. पुढें दुसऱ्या दिवशीं ह्मणजे शुक्रवार ता. १३ रोजीं त्यांचा आवाज बदलला व घसा दुखूं लागला. सकाळीं पाऊस पडत होता ह्मणून ते बाहेर फिरावयास गेले नाहींत. घरांत मंडळीनें औषधोपचार करण्याविषयीं ह्मटलें, परंतु त्यांनीं नको ह्मणून सांगितलें. क्षुल्लक थंडी झाली आहे दुखणें आलें तसें जाईल असें ह्मणाले. सायंकाळीं वर्तमानपत्रें टपालांतून आलीं तीं आपण वाचलीं व कांहीं दुसऱ्यांकडून वाचविलीं. नऊ वाजतां ते निजले. पहांटेस दोन तीन वाजतां त्यांनीं आपल्या कुटुंबास उठविलें आणि प्रकृति विशेष बिघडली असें सांगितलें. उजाडतांच डाक्टरांस व दुसऱ्या एका गृहस्थास तूर्त रक्त काढण्याकरितां ह्मणून बोलाविलें. त्यानें येऊन रक्त काढलें; परंतु त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. नऊ वाजतां डा. क्रेक आले. त्यांनीं गळ्यावर ब्लिस्तर लाविलें आणि आणखी थोडें रक्त काढलें पोटांत घेण्याकरितां चाटण करून दिलें, व दुसरें पातळ औषध दिलें;

परंतु कांहीं घशांतून खालीं जाईना. औषध वगैरे सर्व बाहेर परत आलें. अकरा वाजतां पुनः रक्त काढलें. तीन वाजल्यावर आणखी दोन डाक्टर आले. त्यांनीं सर्वांनीं मिळून प्रकृति पाहून पुनः रक्त काढलें. चार वाजतां त्यांच्या पोटांत थोडें औषध गेलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रकृतीचें धोरण मनांत आणून त्यांनीं साडेचार वाजतां आपल्या कुटुंबाकडून स्वतः लिहून ठेविलेलीं दोन व्यवस्था पत्रें आणविलीं आणि जुनें व रद्द झालेलें तें लागलेंच जाळून टाकून नवीन होतें तें त्या बाईस जपून ठेवावयास सांगितलें. जवळ एक विश्वासू कारभारी होता त्यास त्यांनीं सांगितलें कीं आतां मी फार वेळ वांचणार नाहीं. या दुखण्याच्या आरंभापासूनच मला आतां वांचणार नाहीं असें वाटलें. माझे कागदपत्र नीट लावून ठेवा व हिशेब वगैरे नीट पुरे करून त्यांचा निकाल करा. कारण याजबद्दल जशी तुह्मांस माहिती आहे तशी दुसरे कोणास नाहीं. सहा वाजावयाच्या सुमारास पुनः डाक्टर मंडळी जमली आणि त्यांनीं त्यांस संकटानें उठवून बिछान्यांत बसविलें. इतक्यांत डाक्टरांस ते बोलले कीं, "मी जातों असें मला वाटतें, तुह्मी आतां विशेष श्रम घेऊं नका. मला स्वस्थपणें जाऊं द्या. मी फार वेळ वांचणार नाहीं." त्यांच्या उपचाराचा कांहीं उपयोग झाला नाहींसें पाहून त्यांनीं त्यांस निजविलें आणि ते अत्यंत दुःखी होऊन बाहेर गेले. डा. क्रेक मात्र तेथें पलीकडे बसले. आठ वाजतां पुनः डाक्टर त्यांच्या पायांस ब्लिस्तरें लावून निराशेनें बाहेर गेले. दहा वाजावयाच्या सुमारास मोठ्या संकटानें ते आपल्या कारभाऱ्यास बोलले कीं " मी आतां

जातों. मला नीट रीतीनें पुरा व मी मेल्यावर दोन दिवसांच्या आंत पुरण्याच्या जाग्यांत ठेवूं नका." पुढें दहा मिनिटांनीं ते आपली नाडी पाहूं लागले तों हात मणगटापासून निसटला. डाक्टर क्रेक यांस त्या कारभाऱ्यानें जवळ बोलाविलें. त्यांनीं त्यांच्या डोळ्यांवर हात टेविले आणि त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. बाई बिछान्याच्या पायथ्याशीं बसल्या होत्या त्यांनीं हालचाल व पुढें स्तब्धपणा पाहून "गेले कां," ह्मणून विचारलें आणि धोरणानें समजून "बरें झालें. मीही आतां लवकर जाईन ह्मणजे एकदांचें सर्वच आटपलें" असें ह्मणून त्या स्तब्ध झाल्या.

याप्रमाणें या थोर पुरुषाचा काळ तारीख १४ डिसेंबर सन १७९९ इसवी शनिवार रोजीं रात्रीं दहा वाजल्यावर झाला. पुढें तारीख १८ रोजीं त्यांचा प्रेतविधि साधारण रीतीनें मौंटवर्नान येथें झाला. या दुःखकारक परिणामाविषयीं कांहींच सूचना लोकांस पूर्वीं कळली नसल्यामुळें व सर्व एकाएकीं झाल्यामुळें लोकांस मोठा आचंबा वाटला. ही बातमी तावडतोब पसरली व चोहोंकडे घरोघर, गांवोगांव, सर्व देशभर लोक दुःखानें व्याप्त होऊन अश्रू गाळून त्यांस दुवा देऊं लागले. असा अलौकिक व खरा थोर पुरुष पूर्वीं तर कधीं झालाच नाहीं व पुढें कधींही होईल किंवा कसें याचा विचारच. यूनैटेड स्टेट्सच्या सरकारात हें दुःखाचें वर्तमान कळल्याबरोबर त्यांनीं कांग्रेसचें वगैरे सर्व सरकारी काम बंद ठेविलें. तारीख २३ रोजीं सेनेट व हौस ऑफ् रिप्रेझेंटेटिव्स यांनीं दुःखप्रदर्शक पत्रें प्रेसिडेंट यांस पाठविलीं. त्यांनीं त्यांचीं उत्तरें दिलीं व एकंदर जमून ठराव केले.

संगमरवरी दगडाची इमारत वाशिंग्टन या शहरांत बांधावी व त्यांचें प्रेत तेथें ठेवण्याची परवानगी द्यावी. तारीख २६ रोजीं मोठा दुःखप्रदर्शनाचा विधी व्हावा, यूनैटेडस्टेट्स-मधील सर्व लोकांनीं तीस दिवस दुःखप्रदर्शनाचें चिन्ह ह्मणून डावे हातावर काळें फडकें वागवावें, अशा प्रकारचे ठराव झाले. सारांश त्या पुरुषाच्या मरणानिमित्त सर्व देशभर लोक दुःखी झाले हें त्यांच्या सरकारच्या जाहीर बाह्य व्यवस्थेवरून व लोकांच्या स्वतंत्र अंतरंग व्यवस्थेवरून दिसून आलें. एवढेंच नव्हे. त्यांच्या देशाच्या लोकांसच नुसतें दुःख वाटलें व त्यांच्या विषयीं सन्मान व पूज्यबुद्धि त्यांनीं दर्शविली असें नाहीं पण पृथ्वींतील इतर देशांतील लोकांनीं तसेंच दुःख व पुज्यबुद्धि-प्रदर्शन अनेक प्रकारें केलें. इतर देशांच्या आरमारांवरील निशाणांवर दुःखप्रदर्शनाचीं चिन्हें प्रगट झालीं. नेपोलियन यांनीं तर फ्रान्सच्या सर्व निशाणांवर दहा दिवस काळें चिन्ह वागवावें असा जाहीर हुकूम फरमाविला. पारिसमध्यें प्रेतविधि प्रसिद्धपणें झाला. इतर देशांमध्येंही असे प्रकार झाले. इंग्लंड, जें अमेरिकेचें शत्रु होतें, त्यानें देखील दुःख व सन्मान व पूज्यबुद्धि हीं प्रदर्शित केलीं व त्यांतील वर्तमान-पत्रांत त्यावेळीं त्यांची वाखाणणी झाली. याजवरून आपल्यांतील महा साधु रामदासस्वामी यांचें—

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचेपरी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जना नीववावें ॥

हें सांगणें या जनरल वाशिंग्टनच्या उदाहरणांत पूर्णत्वें

वडून आलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आणि ह्मणूनच या थोर व सत्पुरुषास अमेरिकन लोक "स्वदेशाचा पिता" ह्मणतात व मानतात. त्यांचा कित्ता आमच्या लोकांनीं घ्यावा असें आमचें ह्मणणें आहे व त्याच उद्देशानें हें चरित्र आह्मीं आमच्या प्रिय देशबांधवांपुढें सादर केलें आहे. आतां त्या पुरुषाच्या कोणत्या गुणांनीं तो एवढा प्रिय व वंद्य झाला याचा एकंदरीनें विचार करून त्यांतील कोणते गुण आपल्या लोकांनीं अनुकरणीय आहेत हें सांगून हें चरित्र संपवूं.

---

## भाग १०.

## जार्ज वाशिंग्टन यांचें गुणवर्णन.

जनरल वाशिंग्टन यांच्या आयुष्यक्रमाचा, त्यांच्या वर्तनाचा व केलेल्या कृत्यांचा विचार केला असतां तो पुरुष अद्वितीय होता असें ह्मटलें पाहिजे. त्यासारखा सर्व गुणांनीं युक्त असा पुरुष आजपर्यंत पृथ्वीवर झाला नाहीं व पुढें देखील होण्याचा संभव क्वचितच आहे आज पर्यंत या जगतांत जेवढे ह्मणून स्वदेशभक्त होऊन गेले त्यांमध्यें जनरल वाशिंग्टन मुकुटमणी होय. तसेंच आजपर्यंत मोठे योद्धे, उत्तम शहाणे, नामांकित राजकार्यधुरंधर राज्यकर्ते पुरुष झाले त्यांमध्यें यांसारखें सर्वोपरी उत्तम व अवश्य सद्गुणांचें संमीलन कोणामध्येंही नव्हतें. फार काय पण वाशिंग्टन हें एक अप्रतिम रत्नच होऊन गेलें. रावापासून तों रंकापर्यंत अगर राजापासून तों शेतकऱ्यापर्यंत सर्वांस निर्भय व निःशंकपणें उदाहरण घेण्यास वाशिंग्टन हा एक अनुपमेय व अत्यंत वळणशुद्ध कित्ताच झाला आहे असें ह्मणण्यांत अतिशयोक्ति

होईल असें आह्मांस वाटत नाहीं. कारण साधारण मध्यम प्रतीच्या शेतकऱ्याच्या स्थितींतील व साधारण प्रतीचें शिक्षण मिळालेला मनुष्य, आपल्या अपरिमित उद्योगानें, उत्तम सदाचरणानें, विलक्षण धैर्यानें, अप्रतिम शहाणपणानें व पूर्ण स्वदेशभक्तीनें या जगांतील अत्युच्च जें राज्यपद तेथपर्यंत चढून आपल्या आयुष्याचें कर्तव्य बजावून तेथून न घसरतां तें उच्चपद स्वसंतोषानें सोडून आनंदांत व आपल्या गृहसुखांत कांहीं काळ घालवून परमेश्वराच्या येथें निरंतर सुखोपभोग घेण्यास निष्कलंक निजधामास गेला, असें दुसरें उदाहरणच जगाच्या इतिहासांत आढळत नाहीं. राज्यकारभार चालविणारे व राज्यकर्ते राजे, शिपाईगिरीचा धंदा करणारे योद्धे, व गृहस्थाश्रमाचा सुखोपभोग घेणारे सुखवस्तु गृहस्थ या सर्वांनीं त्यांचें खुशाल निर्धास्तपणें व भूषणास्पद मानून अनुकरण करावें अशी त्यांची योग्यता होती.

वाशिंग्टन यांच्या अंगीं लहानपणापासून महत्कृत्यें करण्यास अवश्य अशा गुणांचा जसा काय सांठाच होत गेला होता. योग्य महत्कृत्यें करण्यास मनुष्यामध्यें चांगलें शरीरसामर्थ्य, यथास्थित मानसिक ज्ञान व खरें व्यवहारचातुर्य आणि शुद्ध व पवित्र नीतिमानपणाचें आचरण हे गुण अवश्य असावे लागतात. आणि या गुणांची वाशिंग्टन यांमध्यें उत्तम प्रकारची समृद्धि होती व त्यामुळेंच त्यांनीं अत्यंत दुःखें, हाल व श्रम सोसून, आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून व तनमनधनादि सर्वस्व वेंचून आपल्या प्रिय स्वदेशाकरितां लढाई करून स्वातंत्र्य संपादन केलें. आणि तें निरंतर उत्तम रीतीनें चालावें एतदर्थ राज्यकारभार चालविण्याचें प्रथम वळण घा-

लून दिलें. वाशिंगटन यांच्या सर्व गोष्टींत वळण व शुद्धपणा असल्यामुळें त्यांच्या आयुष्यक्रमाचा पाया दृढ व उत्तम प्रकारचा पडून तें सर्व आयुष्य यशस्वी व समाधानकारक झालें.

आतां जे सर्व अवश्य गुण मनुष्यास पाहिजेत त्यांत शरीरसामर्थ्य हा सर्वांत मोठा अवश्य गुण होय. त्यावांचून मुळींच चालावयाचें नाहीं. सर्व होणें, जाणें, करणें, सवरणें हें सर्वस्वी शरीर प्रकृतीवर अवलंबून आहे. मनुष्य उत्तम शहाणा व अत्यंत नीतिमान असो, त्यास शरीरसामर्थ्य नसेल तर त्याचा त्याला व जगाला कांहीं उपयोग होण्याचा संभव नाहीं. लहानपणापासूनच रोगी व अशक्त असेल तर त्याच्यानें ज्ञानसंपादन देखील व्हावयाचें नाहीं. सारांश आपल्या सर्व आयुष्यक्रमाची मदार शरीराच्या सामर्थ्यावर आहे शरीरामध्यें सामर्थ्य येण्यास व तें अखेरपर्यंत अंगांत कायम राहण्यास व्यायामाची अत्यंत आवश्यकता आहे. अन्नोदक शरीरांतील प्राणरक्षणार्थ अवश्य आहे त्याप्रमाणेंच तें पचून शरीरास हितप्रद व सामर्थ्यवान करण्यास व्यायाम पाहिजे, हा एक ईश्वरी नेमच आहे आणि तो सर्वांनीं पाळला पाहिजे. या नियमास अनुसरूनच वाशिंगटन यांची व्यायामाचे संबंधानें अगदीं लहानपणापासून तों अखेरपर्यंत वागणूक होती. मूळचें त्यांचें शरीर मोठ्या बांध्याचें निकोप व सदृढ असें होतें; त्यास त्यांनीं नानाप्रकारच्या कसरतींच्या अभ्यासानें व सतत व्यायामानें करून अत्यंत बळकट, श्रम व साहस सोसण्यास योग्य, व पुष्कळ दिवस सारखी ताकद राहण्याजोगें व सर्व प्रसंगास उपयोगी पडण्यासारखें तयार केलें होतें.

ज्याप्रमाणें वाशिंग्टन यांचें शरीर सर्व प्रसंगांस उपयोगी पडण्यासारखें व्यायामानें झालें होतें, त्या प्रमाणेंच त्यांचें मन खासगी अभ्यास, लक्षपूर्वक ग्रंथावलोकन व निरानिराळ्या विषयांचें योग्य मनन यांच्या योगानें सर्व प्रकारचीं लहान मोठीं कामें उत्तमप्रकारें बजाविण्यास तयार व योग्य झालें होतें. मूळचें त्यांचें शिक्षण कमी होतें. कारण अमेरिकेंत त्यावेळेस शिकण्याच्या चांगल्या सोयी झालेल्याच नव्हत्या. परंतु त्यांचें ग्रंथावलोकन मोठें होतें व त्यांचा वाचनाकरितांच ह्मणून नेहमींचा वेळ नेमिलेला होता तो सारखा अखेरपर्यंत कायम होता. त्यामुळें यद्यपि मोठे चांगले लिहिणारे किंवा भाषण करणारे वक्ते यांजमध्यें त्यांची गणना होणार नाहीं, तथापि त्यांच्या सर्व कामांस त्यांचें ज्ञान पुरें पडलें व त्यांमध्यें कांहीं कमीपणा आहे असें कोठें कधींही कोणाच्या पाहण्यांत आलें नाहीं. त्यांचे कामाकाजासंबंधाचे व खासगी लेख अद्यापि उपलब्ध आहेत व ते सर्वमान्य आहेत.

वाशिंग्टन यांचें शरीर व मन यांप्रमाणेंच त्यांचा नीतिमानपणा अलौकिक होता. त्यांच्या अंगीं या अत्युत्तम गुणांचें फार सुंदर रीतीचें संमीलन झालें होतें, यामुळें त्यांस एवढी अपूर्व योग्यता प्राप्त झाली. सर्व नीतीमानपणाचा मूळ आधारस्तंभ व सर्व सद्गुणांचा जिवंत झरा असा जो परमेश्वरावर भरंवसा, तो पूर्णत्वेंकरून त्यांच्या मनाच्याठायीं सदोदित जागृत होता. ईश्वराच्या ठिकाणीं त्यांची अत्यंत निष्ठा होती. अतिशय उद्योग करीत असतां भयंकर संकट ओढवलें कीं, ते त्याच्यापाशीं साहाय्य मागावयास धांवलेच. हेंच पुष्कळ अंशीं

लोकांचा त्यांजवर भरंवसा बसण्यास व हा आपणास संकटां-तून खरोखर पार पाडील असें लोकांस वाटण्यास कारण झालें. स्वातंत्र्याच्या आठ वर्षें चाललेल्या या लढाईमध्यें एक वेळ तर त्यांच्या देवावरच्या निष्ठेमुळें मोठा भयंकर अनर्थ टळला. एके प्रसंगीं लढाई बरेच दिवस चालली असतां अडचणीची इतकी पराकाष्ठा झाली कीं, सर्व सैन्य उलटून बंडावा करण्याच्या बेतावर आलें. त्या लोकांचाही निरुपाय झाला होता. पोटास पूर्तें अन्न मिळेना, अंगास वस्त्रें नाहीं-तशीं झालीं, पायांत जोडे नाहींत, व हें अत्यंत जरूरीचें सामान घेण्यास पगाराचे पैसे नाहींत, राहण्याच्या सोयी नीट नाहींत व थंडीचा तर मोठा कडाका पडला होता. अशी स्थिति झाली होती. हा प्रकार पुष्कळ दिवस चालला होता त्यामुळें फौजेचे लोक कंटाळून बेहोष झाले होते; आणि बंडाव्याच्या मसलती करावयास लागले होते. वाशिंग्टन यांनीं असा प्रसंग न यावा ह्मणून काँग्रेसला नानाप्रकारें व वारंवार लिहून तावडतोब मदत मागितली होती. आणि इकडे शिपाई वगैरे लोकांस समजून सांगून त्यांचीं मनें आंवरून धरलीं होतीं. परंतु शेवटीं अनर्थाचा वेळ येऊन ठेपलाच तेव्हां ते एके दिवशीं छावणीपासून दूर रानांत जाऊन मोठ्यानें गाण्हाणें गाऊन परमेश्वराची प्रार्थना करीत होते. इतक्यांत कांहीं शिपाई लोक छावणीबाहेर फिरावयास गेले होते तों त्यांनीं त्यांचे शब्द ऐकिले. या रानांत कोण बोलतो आहे हें पाहण्या-करितां ते हळूच तेथें गेले तों त्यांचा सेनापति गुडघे टेंकून परमेश्वराची प्रार्थना करीत आहे असें त्यांनीं पाहिलें. तो प्रकार पाहून त्यांचीं मनें फिरलीं आणि आपला सेनापति इतकी एक-

निष्ठेनें प्रार्थना करीत आहे तेव्हां आपल्यास खरोखर यश येईल, दांडगाई करणें योग्य नाहीं असें त्यांस वाटून त्यांनीं आपल्या शिपाई मंडळींचीं मनें शांत केलीं आणि तो भयंकर अनर्थ टळला. सारांश सत्कार्य करणें असेल त्याचा भरंवसा देवावर असलाच पाहिजे. तरच लोकांचा भरंवसा त्या मनुष्यावर बसेल व लोकांच्या भरंवशानेंच महत्कार्यें घडून येतात. तेव्हां वाशिंग्टन यांच्या या देवावरच्या भरंवशामुळेंच त्यांस एवढें यश मिळालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

देवावरच्या भरंवशाप्रमाणेंच त्यांच्या मनांत निर्मल व खरी स्वदेशप्रीति व स्वदेशभक्ति हीं वास करीत होतीं. देवाच्या व देशाच्या कार्याकरितां ते सर्वस्व वेंचण्यास नेहमीं तयार असत. त्या कार्याकरितां घरदार, संपत्ति, आपली अब्रु व आपलें जीवित देखील अर्पण करण्यास त्यांची सिद्धता होती. सारांश त्यांस आपल्या देशाची खरी कळकळ असून आपल्या देशबांधवांविषयीं खरा कळवळा होता. स्वदेशभक्तांच्या संबंधानें एकंदर सर्व पृथ्वींतील मंडळी पाहिली तर या तोडीचा दुसरा स्वदेशभक्तच निपजला नाहीं असें ह्मणणें भाग पडेल. त्यांचें निर्मल, निरपेक्ष व निःसीम प्रेम दुसरे कोठेंही सांपडणें कठीण आहे. आलेक्झांडर, सीझर व नेपोलीयन हीं मोठमोठीं माणसें स्वार्थपरतेनें घसरलीं. वाशिंग्टन यांचें सरासरी सर्व आयुष्य स्वदेशसेवेंत गेलें; परंतु त्यांच्या सर्व कारकीर्दींत स्वदेशप्रेमाच्या कीर्तिसूर्यास कलंक लागण्यासारखें एकही कृत्य आढळणार नाहीं. ते आपल्या देशाकरितां पाहिजे तें करावयास तयार होते व त्याप्रमाणें आपल्या सर्वस्वाची आशा सोडून सेनापतीचें अत्यंत नाजूक व भयंकर काम त्यांनीं पतकरलें. त्या आठ वर्षांत

व पुढील प्रेसिडेंटच्या जाग्यावर आठ वर्षांत त्यांनीं चाकरी-बद्दल ह्मणून पगारादाखल एक छदाम देखील घेतला नाहीं. तसेंच त्यांच्या उद्योगानें व माहितीच्या व आश्रयाच्या योगानें वर्जिनियांत एक कंपनी स्थापन झाली व तिचा व्यापार वाढून लोकांस मोठा लाभ झाला. त्या कंपनीनें वाशिंग्टन यांस कांहीं भाग अति आग्रहानें दिले; परंतु त्या भागांचें उत्पन्न आपण न घेतां त्यांनीं विद्यावृद्धीच्या कामाकडे लावून दिलें. सारांश स्वदेशसेवा निरिच्छ बुद्धीनें करून त्याजबद्दल कांहींएक घ्यावयाचें नाहीं असा त्यांचा दृढनिश्चय होता. त्यांनीं हाल, वनवास, त्रास व संकटें अपरिमित सोसलीं. अतिशय संकटसमयीं तर त्यांचें स्वदेशप्रेम उचंबळून तें त्यांस अधिक झटून, मेहनतीनें, व काळजीनें आपलें काम करावयास लावी. त्यांच्या जबरदस्त स्वदेशप्रेमानें त्यांच्या अंतःकरणांत लोभास उभें राहूं दिलें नाहीं. लढाई संपून जय मिळाल्यावर लष्करी लोक त्यांस देशाचा राजा करावयास तयार झाले होते; परंतु त्यांनीं त्या राज्यपदास लाथ मारून सर्वांची निर्भर्त्सना केली. तसेंच त्यांनीं ताहयात प्रेसिडेंटाच्या कामावर राहावें असें लोकांचें ह्मणणें असतां त्यांनीं तें नाकारून आपलें देशसंबंधाचें कर्तव्य संपल्यावर तो हुद्दा सोडून देऊन ते पुनरपी शेतकरी बनले. सारांश, असा निष्कलंक स्वदेशभक्त आजपर्यंत सर्व पृथ्वीवर झाला नाहीं. ह्मणूनच लोक त्यांस पृथ्वींतील स्वदेशभक्तमंडळींत मुकुटमणि असें समजतात. आणि त्यामुळेंच अमेरिकन त्यांस स्वदेशाचा पिता असें मानितात.

देवावर भरंवसा व स्वदेशप्रीति यांशिवाय प्रामाणिकपणा, निरपेक्षबुद्धि, स्वातंत्र्यप्रियता व धैर्य हे मुख्य गुण, विशेष

प्रमाणानें वाशिंग्टन यांमध्यें होते. सत्य भाषण व सत्यप्रियता त्यांमध्यें लहानपणापासून होती. त्यांचें आचरण सर्वकाल सर्व प्रसंगीं प्रामाणिकपणाचें होतें. यामुळें लोकांचें त्यांजवर प्रेम व भरंवसा दृढ होता. समाजाग्रणी होऊं इच्छिणारांनीं नेहमी आपलें आचरण प्रामाणिकपणाचें ठेविलें पाहिजे, तरच लोकांचा भरंवसा त्यांजवर बसून कार्यसिद्धि होण्याचा संभव असतो. लटपटीच्या वर्तनानें कधींही कोणतेंही सत्कृत्य सिद्धीस जात नाहीं. प्रामाणिकपणाप्रमाणेंच निरपेक्षबुद्धि त्यांच्या अंतःकरणांत दृढ वास करीत होती. द्रव्य, अब्रू, मान, किंवा कीर्ति संपादन करण्याच्या हेतूनें कधींही स्वदेशाचें काम त्यांनीं केलें नाहीं. स्वदेश ही आपली माता, इच्या हितार्थ उद्योग करणें हें आपलें कर्तव्यकर्म असें समजून ते आपलें काम करीत असत. अधिकार, द्रव्य, मान, कीर्ति इत्यादिकांचा लोभ त्यांस नव्हता. जे करावयाचें तें निरिच्छ बुद्धीनें, केवळ स्वदेशहितार्थ व लोककल्याणाच्या हेतूनें, आपलें कर्तव्यकर्म मानून करावयाचें असें त्यांचें निर्मल व निरपेक्ष आचरण सदोदित होतें. यामुळें कसाही प्रसंग आला, कितीही संकटाचें काम करावयास त्यांनीं सांगितलें कीं, लोक तें निमुट पणें करीत. लोक पक्कें समजत कीं, हा जें सांगतो त्यांत त्याचा कोणत्याही प्रकारचा स्वार्थ नसून केवळ देशहितार्थच त्याचा उद्योग आहे. सेनापतीचा अधिकार व प्रेसिडेंटशिपचा अध्यक्षाचा हुद्दा आपण होऊन व लोकांच्या मर्जीविरुद्ध सोडणें, सोळा वर्षें स्वदेशाची सेवा एक छदाम न घेतां करणें, व वर्जिनिया प्रांतांतील कंपनीनें दीडशें शेर अति आग्रहानें व प्रेमानें दिले असतां त्यांचें उत्पन्न खासगीकडे न लावतां पाहिजे

तिकडे काढून देण्यास मोकळीक मिळाल्यावर ती देणगी पतकरणें ह्या गोष्टी त्यांच्या निरपेक्षतेची उत्तम साक्ष देतात.

याप्रमाणेंच त्यांची स्वातंत्र्यप्रियता अवर्णनीय होती. स्वातंत्र्याची आवड ही त्यांच्या मनांत लहानपणापासून वृद्धिंगत होत आली होती. त्यांस कोणावरही आपला भार पडूं नये असें वाटे. त्यांचा भाऊ लारेन्स हा त्यांजवर अत्यंत प्रेम करी; परंतु त्याजपाशीं त्यावर अवलंबून राहणें हें त्यांला आवडत नसे. त्यांला नेहमीं स्वतंत्र उद्योगधंदा करून योग्यता संपादन करावी असें वाटत असे. ते स्वातंत्र्याचे अत्यंत भक्त होते ह्मणूनच त्यांनीं आपले सैन्यांतील सरदार व शिपाई यांस आपण राजा होऊन लोकांस गुलाम करूं इच्छित नाहीं, व तुह्मांस राजाचें राजबंधन पाहिजे होतें तर मग इंग्लंडच्या प्रभूस सोडावयाचें कारण नव्हतें असें स्पष्ट सांगितलें. स्वातंत्र्यावांचून लोकांचा उत्कर्ष होऊन त्यांस खरें सुख प्राप्त व्हावयाचें नाहीं असा त्यांचा सिद्धांत होता. यामुळेंच त्यांस स्वातंत्र्याचें माहेरघर असा जो शेतीचा धंदा तो मनापासून आवडत होता.

वाशिंग्टन यांजमध्यें धैर्य हा एक मोठ्या महत्वाचा मुख्य गुण होता. लढाईच्या कामांतील त्यांचें धैर्य तर प्रसिद्धच आहे व त्याची वाखाणणी सर्व जग करीत आहे. मोठमोठे नामांकित योद्धे त्यांच्या धैर्याची तारीफ करतात. परंतु याहीपेक्षां अधिक धैर्य त्यांच्यामध्यें होतें. मनुष्य मरणाच्या भीतीची फारशी पर्वा करीत नाहीं; परंतु जनापवादाची विशेष पर्वा करतें व त्यास तें विशेष भितें एखादा मूर्ख व निर्लज्ज मनुष्य जनापवादास न भितो; परंतु साधारणतः सर्व मनुष्यें, ज्या समा-

जांत राहतात त्या समाजाची भीति बाळगतात. यांत चमत्कार आहे कीं, यद्यपि एखादी गोष्ट सत्यास अनुसरून व हितावह असली तरी जनापवादाच्या भीतीमुळें मनुष्याच्यानें ती करवत नाहीं. अशाच प्रसंगीं जो मनुष्य, लोकांची भीति न धरतां व त्यांच्या विरुद्ध मताची पर्वा न करतां सत्य व परमेश्वर यांस स्मरून आपणास जें हितावह व योग्य वाटतें तेंच करतो त्यासच खरा धैर्यवान समजलें पाहिजे. आपण प्रत्येक गोष्टींत लोक काय ह्मणतील याजकडे पाहतों आणि आपलें खरें कर्तव्य सोडून देतों व या योगानें आपलें, आपल्या कुटुंबाचें व आपल्या देशाचें नुकसान करतों. आपण कृत्याच्या चांगुलपणाकडे, खरेपणाकडे व परमेश्वराच्या संमतीकडे लक्ष न देतां भित्रेपणामुळें लोकापवादास भिऊन माघार घेतों व हेळसांड करतों. त्याचा सर्वांस अनुभव आहेच. परंतु वाशिंग्टन यांचें वर्तन तसें नसे. त्यांनीं एकदा एखाद्या गोष्टीचा किंवा प्रकरणाच्या हिताहिताचा व चांगुलपणाचा शोध करून अंगिकार केला कीं, मग ते कधींही माघार घेत नसत. फिरकोळ लहानसान गोष्टींचा विचार नको; परंतु ते युनैटेडस्टेट्सचे अध्यक्ष असतां फ्रान्सांतील राज्यक्रांतीच्या धामधुमीच्या प्रसंगीं अमेरिकेंतील बहुतेक लोकांचें मन फ्रेंच लोकांकडे वळलें असतां त्यांच्या रागाची, कठोर अपशब्दांची व वर्तमानपत्रें वगैरेंतील विरुद्ध चर्चेची काडीमात्र पर्वा न करितां स्वस्थपणें व निमूटपणें सर्व सोसून फ्रेंचांच्या धामधुमींत ते पडले नाहींत. फ्रेंचांच्या धामधुमींत पडणें कोणासच हितावह होणार नाहीं अशी त्यांच्या मनाची शोधाअंतीं खात्री झाली होती यामुळें त्यांनीं लोकांच्या रागाची वावटळ मोठ्या धैर्यानें सोसली.

अध्यक्षांचा हुद्दा देखील सोडण्यास तयार होते. कितीए-कांनीं तर त्यांजवर अति विलक्षण व नीच प्रकारचा दोषारोप देखील केला होता. फ्रेंच लोकांनीं आपल्यावर उपकार केले ते फेडण्याचा समय असतां तसें न करतां ते इंग्लिश जे आपले शत्रु त्यांजकडे वळले तेव्हां फितुर झाला असें ते ह्मणूं लागले. वाशिंग्टन यांचें ह्मणणें असें होतें कीं, फ्रेंच लोक अविचारानें वागत आहेत त्यांस मदत करण्यानें त्यांचें हित न होतां आपला सर्वस्वी नाश होईल, तेव्हां माझें कांहीं होवो व लोक कांहीं करोत ज्यांत माझ्या देशाचें हित नाहीं तें मी कधींही करणार नाहीं. या संधीस त्यांनीं इंग्लंडची दोस्ती राखून आपल्या देशास हितावह असे व्यापारादिकांच्या संबंधाचे तहनामे करून घेतले! अखेरीस सर्वांस वाशिंग्टनची दूरदृष्टि, स्वदेशहितबुद्धि व शहाणपणा हीं कबूल करून त्यांचे उपकार मानावे लागले. हेंच खरें धैर्य होय. या प्रमाणें प्रामाणिकपणा, निरपेक्षबुद्धि, स्वातंत्र्यप्रियता व धैर्य हे चार मुख्य गुण त्यांजमध्यें होते.

याखेरीज वाशिंग्टन यांजमध्यें दुसरे पुष्कळ सद्गुण होते. शरीरानें न थकतां सारखा अव्याहत उद्योग करण्याचा एक मोठा गुण त्यांजमध्यें होता. शिवाय, मनास त्रास न होऊं देतां कोणत्याही गोष्टीचा सतत पाठलाग करण्याचा चांगला गुणही त्यांजमध्यें होता. लोकांकडून कितीही त्रास झाला तरी जहाल न जातां व न कंटाळतां सर्व सहन करून घेण्याजोगी सहनशीलता त्यांच्या अंगी असे, व जें योग्य तेंच ते नेहमीं करीत. तसेंच एखादी गोष्ट हातीं धरली ह्मणजे दोन दिवस टुरटुर करून सोडून देण्याची

त्यांची वहिवाट नव्हती; परंतु तिचा अखेर निकाल होई तोपर्यंत तिचा सतत पाठलाग करण्याचा त्यांचा बाणा असे. आरंभशूरपणा त्यांच्यांत नव्हता. तशीच त्यांमध्यें लोककल्याणाची व देशबांधवांस सुखी व स्वतंत्र करण्याची अत्युत्कट इच्छा होती. यामुळें ते कोठेंही असोत व कोणत्याही स्थितींत असोत त्यांचें लक्ष व वजन नेहमी लोककल्याणाकडे असे. दानधर्म करण्याच्या कामीं ते नेहमी तत्पर असत; परंतु त्या धर्म करण्यांत आळसाची वृद्धि न व्हावी असा त्यांचा कटाक्ष असे. आपल्या शेजारीं व सभोंवतीं गरीब अथवा अडचणींत पडलेल्या लोकांस ते सहाय्य करीत त्या लोकांच्या मदतीसाठीं आपल्या घरचें धान्य देऊन व प्रसंगाविशेषीं नवीन बाहेरचें विकत घेऊन त्यांस साह्य करीत असत. त्यांत त्यांचें पाहणें ह्मणून एवढेंच असे कीं, होत असलेला धर्म सत्पात्रींच झाला पाहिजे. कसलाही प्रसंग आला असतां त्यांतून पार पडण्याचें शहाणपण त्यांजमध्यें होतें. त्यांजमध्यें पोकळ अभिमान नव्हता. कोणतेंही काम त्यांजकडे आलें तर तें नेहमी आपल्याजवळच्या सरदारांचा सल्ला घेऊन व सेक्रेटरी वगैरे कामगारांकडून लेखी माहिती मिळवून त्यांत आपल्या अकलेप्रमाणें साधक बाधक गोष्टींचा पूर्ण विचार करून निर्णय करीत असत. माहिती मिळविण्याच्या संबंधानें लाज अगर पोंकळ अभिमान ते धरीत नसत व कोणाच्या धोरणानें चालत नसत. लोकांचें ऐकून घेऊन आपल्यास योग्य वाटेल तें करीत असत. तसेंच त्यांला मनुष्याची परीक्षा उत्तम असून योग्य मनुष्याची नेमणूक ते करीत. पक्षपात अगर मोहबत त्यांजपाशीं मुळींच नसे, स्नेही, नातलग अथवा दुसरे संबंधी

यांचा विचार मनांत न आणितां ज्या कामास जो योग्य त्याचीच नेमणूक व्हावयाची, राग, लोभ, द्वेष वगैरेंचा विकार देशाच्या काम करण्यांत होऊं द्यावयाचाच नाहीं असें त्यांचें निर्मळ वर्तन होतें. त्यांचा स्वभाव फार गोड होता. त्यांचें सौजन्य व सुस्वभाव यांच्या योगानें त्यांनीं लोकांस आपलेसें करून सोडलें होतें. मर्यादशीलता व नम्रता त्यांस कोठें बेताबाहेर अथवा जहाल जाऊं देत नसत. याप्रमाणें सर्वगुणसंपन्न असून ते मोठे विलक्षण उद्योगी व काम करणारे मनुष्य होते. वेळेची वांटणी करून नेमलेल्या वेळीं नेमलेलें काम करण्याची त्यांस लहानपणापासून संवय होती यामुळें कितीही काम असलें तरी तें करून ते स्वस्थ असत. त्यांच्या नित्याचरणांत अत्यंत नियमितपणा होता. उठणें, निजणें, बसणें, खाणें, पिणें, व्यायाम, वाचन, कामकाज वगैरे सर्व गोष्टी नियमित यंत्राप्रमाणें वेळच्यावेळीं व योग्य रीतीनें होत असत. सारांश योग्य सवयींचा, सद्गुणांचा व सदाचरणाचा तो एक वर्णशुद्ध कित्ताच होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें वॉशिंग्टन यांजमध्यें नानाप्रकारचे सद्गुण होते. शिवाय त्यांच्यामध्यें या सद्गुणांच्या संबंधानें अपूर्वत्व दिसून येतें. त्यांमध्यें पुष्कळ सद्गुण असून ते सर्व अगदीं बेताच्या प्रमाणानें होते, यामुळें त्यांजमध्यें सर्व सद्गुणांचा उत्तम मेळ होता. या त्यांच्या सद्गुणांस कमीपणा आणण्यासारखें दुर्गुणाचें अगदीं वारें त्यांस नव्हतें. त्यांनीं आठ वर्षें सेनापतीचें व पुढें आठ वर्षें राज्याध्यक्षत्वाचें अशीं सोळा वर्षें मोठीं जबाबदारीचीं कामें केलीं; परंतु त्यांनीं अमुक एक आगळीकीची किंवा गैर गोष्ट केली असें कोणाच्या कधींही ह्मणण्यांत आलें नाहीं

इतकेंच नव्हे पण शिपाईगिरीच्या संबंधानें युरोपांतील सरदारांत विख्यात व वयोवृद्ध प्रशियाचे राजे यांजकडून वाशिंग्टन यांस एक चीज नजर आली तिजबरोबर "युरोपांतील सर्वांत वृद्ध सरदाराकडून पृथ्वींतील सर्वांहून थोर सरदारास नजर" असा लेख आला. तसेंच पृथ्वींतील अत्युच्च प्रतीचे साडेनऊ पुरुष यांत त्यांची गणना झाली आहे. हें अत्युच्च पद त्यांस एका इंग्लिश ग्रंथकाराकडून मिळालें आहे हा मोठा चमत्कार आहे. १८९० च्या आगष्ट महिन्याचा फॉर्टनैटली रिव्यू, या मासिकपुस्तकांतील पृष्ट २८२ याजवर पुस्तककर्ता प्रिन्स बिस्मार्क या राजकारणी पुरुषाच्या शहाणपणाचा व योग्यतेचा विचार करीत असतां, ते पेरिक्लीज, सीजर, शार्लिमेन, विलियम १ ला, लॉर्ड चाथम, वाशिंग्टन, पिट्ट, स्टेन व केवर यांजबरोबरीचे पृथ्वींतील पहिल्याप्रतीच्या मुत्सद्यांत गणले जाण्यास लायक नाहींत असें लिहिलें आहे. पृथ्वींतील थोर नीतिमान पुरुषांमध्यें तर सर्व निर्विवादपणें यांस पहिली जागा देतात. एवढीं मोठीं महत्वाचीं व नाजुक कामें करून ते निष्कलंक निर्दोष व कीर्तीनें सोज्वल असे कृतकार्य होत्साते स्वस्थतेंत शांतिसुखाचा व कृतज्ञ देशबांधवांचें प्रेम व आशिर्वाद या देणगींचा उपभोग घेण्याकरितां स्वगृहीं एकांतांत जाऊन राहिले. प्राचीन व अर्वाचीन कालीं निरनिराळ्या देशांत नामांकित सत्पुरुष व स्वदेशभक्त होऊन गेले; परंतु त्यांमध्यें कांहीं सद्गुण असून कांहीं दुर्गुणांचें मिश्रण होतें. वाशिंग्टनसारखें देवावर व स्वदेशावर निर्मळ व अकृत्रिम प्रेम, निष्कलंक व पवित्र आचरण, त्यांजसारखा प्रामाणिकपणा, त्यांजसारखी अप्रतिम निरपेक्षबुद्धि, अंतःकरणपूर्वक

लोककल्याणेच्छा व स्वदेशहितार्थ सर्वस्व वेंचण्याची तयारी हीं त्यांमध्यें नव्हतीं. याजमुळें सर्व जगांतील स्वदेशभक्त मंडळींत वाशिंग्टन हा अपूर्व, अप्रतिम व अद्वितीय पुरुष होऊन गेला. ह्मणूनच वाशिंग्टन यांस स्वदेशभक्त मंडळींतील मुकुटमणी असें समजतात. त्यांच्या या अलौकिक गुणांनीं त्यांच्या देशबांधवांचें त्यांवर खरें प्रेम व पूर्ण भरंवसा बसला व त्यांस त्या देशाचे लोक स्वदेशाचा पिता असें मानूं लागले.

याप्रमाणें जार्ज वाशिंग्टन यांचें चरित्र आहे. आतां शेवटीं या चरित्रापासून आपल्या लोकांस कोणता उपयोग करून घेतां येईल याचा विचार कर्तव्य आहे. जगांत जे थोर व सत्पुरुष होऊन जातात, व त्यांच्या हातून जीं सत्कर्माचरणें घडतात त्यांपासून आसपासच्या व त्यावेळेच्या लोकांस प्रत्यक्ष लाभ होऊन अप्रत्यक्ष रीतीनें पुढें सर्व लोकांस त्यांच्या गुणांचें उदाहरण घेण्यानें लाभ होतो. तेव्हां वाशिंग्टन यांजसारख्या रावापासून रंकापर्यंत उदाहरण घेण्यालायक पुरुषाच्या गुणांचें अनुकरण आपल्या लोकांनीं केल्यास खरोखरच आपल्यास व आपल्या देशास अत्यंत लाभ होईल. त्यांतून त्यांनें ज्या गुणांच्या योगानें ही अनुपम योग्यता संपादन केली ते गुण सामान्य लोकांस संपादन करवणार नाहींत असें नाहीं. फक्त आपल्या लोकांनीं घरोघर त्या सत्पुरुषाच्या गुणांचें लहानपणापासून अनुकरण होईल अशी योजना मात्र केली पाहिजे. आतां अमेरिकेच्या लोकस्थितींत आणि आमच्या आर्यभूमीच्या लोकस्थितींत जमीनअस्मानाचें अंतर आहे हें येथें कबूल केलें पाहिजे. आपल्या लोकांपेक्षां तेथील लोक शिक्षणानें व समजुतीनें फार पुढें सरकले होते. तेथील स्त्रिया व पुरुष

चांगले व सारखे शिकलेले असून स्वदेशभक्ति व स्वातंत्र्य-प्रीति हीं त्यांच्या अंतःकरणांत अगदीं खिळून जाऊन केवळ स्वाभाविक व सर्वत्र होऊन गेलीं होतीं. आमच्या लोकांस शिक्षण नसून त्या गुणांचें तर नांव देखील ठाऊक नाहीं. तेव्हां आमच्या लोकांस शिक्षण देऊन प्रथम जमीन तयार करून नंतर त्या सद्गुणांचें बीजारोपण करणें हें पहिलें मोठें काम आहे. वाशिंग्टनच्या आईनें देवाविषयीं पूज्यबुद्धि, स्वदेश-प्रेम व प्रामाणिकपणा हे मुख्य गुण त्यांच्या अंतःकरणांत उत्तम रीतीनें बिंबवून दिले होते. स्वजननी, स्वदेशजनना व जगज्जननी यांच्या प्रेमसंपादनाचा मार्ग दाखविणें व त्यांस लावून देणें हें जें आईचें मुख्य व खरें कर्त्तव्य तें वाशिंग्टनच्या आईनें उत्तम रीतीनें बजाविलें होतें. या स्त्रीशिक्षणाचें महत्व केवढें आहे व त्यांची किती अवश्यकता आहे हें वाशिंग्टनच्या आईच्या उदाहरणावरून सहज दिसून येतें. जगांत बहुधा जे जे ह्मणून थोर व योग्य पुरुष निपजले त्यांच्या योग्यतेस त्यांच्या आयाच विशेषतः कारण झालेल्या आहेत अशी इतिहास साक्ष देत आहे. तेव्हां आमच्या देश-बांधवांस आया व मुलें तयार करावयाचीं आहेत. नंतर देखील नुस्तें राजकीय स्वातंत्र्य संपादावयाचें नसून तीनही प्रकारचें ह्मणजे राजकीय, सामाजिक व धर्मसंबंधीं स्वातंत्र्य संपादन करावयाचें आहे. या तीन प्रकारच्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीवांचून आमच्या इकडे देशोन्नति व देशबांधवांचा उत्कर्ष होण्याचा संभव दिसत नाहीं. यास्तव अमेरिकन लोकांपेक्षां आपल्यांस फार अधिक व महत्वाचें काम करावयाचें आहे. तेव्हां वाशिंग्टनसारखी पुष्कळ मंडळी आपल्या इकडे निप-

जली पाहिजे. हें मनांत वागवून आह्मांस त्या मानानें उद्योग, प्रयत्न व श्रम केले पाहिजेत.

देशोन्नतीच्या इमारतीचा दृढ पाया, परमेश्वराविषयीं पूज्य बुद्धि, स्वदेशाविषयीं प्रेम आणि सत्याविषयीं व प्रामाणिकपणाविषयीं आवड या मुख्य गुणांवर घालून नंतर इतर गुणांचें संपादन केलें पाहिजे. वाशिंग्टनच्या कीर्तिरूप इमारतीचा हाच पाया होता हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. त्यासारखी सदोदित व्यायामानें शरीरसंपत्ति संपादन करणें अवश्य आहे. सर्व गोष्टी घडून येण्यास शरीरसामर्थ्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्याजवांचून अगदीं चालतच नाहीं. हें शारिरीक साधन असून शिक्षणाच्या योगानें ज्ञानसंपादन झालें पाहिजे. हें प्रथम शिक्षणानें, नंतर वाचनानें, मननानें व विद्वज्जनांच्या समागमानें सतत वाढवीत गेलें पाहिजे. तसेंच निरनिराळ्या प्रकारच्या चांगल्या संवई लागण्याची तजवीज केली पाहिजे. वेळेची वांटणी करून नियमित वेळीं नेमिलेलें काम वेळच्यावेळीं करणें; जें काम हातीं घेणें तें विचार करून शक्ति पाहून व खात्री करून घेऊन घेणें; हातीं घेतलें तें तडीस नेणें; जें करणें तें चांगलें करणें; निजणें, बसणें, बोलणें, चालणें, अभ्यास करणें, व्यायाम करणें मंडळींत वागणें वगैरे सर्व गोष्टी वेळच्यावेळीं व बेतानें करणें; सतत उद्योग करणें; अशा प्रकारच्या चांगल्या सवई लहानपणापासून लागतील अशी योजना झाली पाहिजे. वर्तनाच्या संबंधानें पाहिलें तर मंडळीमध्यें वागणें तें मर्यादेनें व सौजन्यानें वागलें पाहिजे. स्वभाव नेहमी आनंदी व मनमिळाऊ असला पाहिजे. आचरण नेहमी पवित्र, सद्गुणयुक्त व नीतियुक्त असलें पाहिजे, वडील,

वरिष्ठ व अधिकारी यांजविषयीं पूज्य व सन्मानयुक्त बुद्धि असावी, यांत आज्ञापालन हें मुख्य कर्तव्य समजलें पाहिजे. शिवाय कर्तव्याच्या संबंधानें परोपकार हें पुण्य व परपीडा हें पाप असें समजून बहुसमाजाच्या हितांत आपलें हित व परोपकारांत आपला खरा स्वार्थ आहे, अशी समजूत व त्या प्रमाणें वागण्याचें धोरण पाहिजे. सारांश परोपकारार्थ व देशहितार्थ तनमनधनादि सर्वस्व फार तर काय अब्रू व प्राण देखील वेंचण्यास तयारी, अशी नेहमी मनाची वृत्ति पाहिजे. हे गुण वाशिंग्टनमध्यें होते व त्यामुळेंच ते एवढ्या पदवीस चढले. तेव्हां या त्यांच्या गुणांचें अनुकरण आमच्या लोकां-कडून व विशेषतः तरुण मंडळीकडून व्हावें आणि आमच्या प्रिय स्वदेशाची उन्नति व त्याचा उत्कर्ष त्यांच्या हातून व्हावा; या हेतूनें हें चरित्र लिहिलें आहे. त्यांच्यासारखा लढण्याचा प्रसंग येण्याची कल्पनाच करणें नको व त्या कल्पनेचा उप-योगही नाहीं; परंतु मनुष्य कोणत्याही स्थितींत असो, त्या स्थितीचें कर्तव्य त्यानें यथायोग्य रीतीनें बजावून स्वदेशसेवेस नेहमी अंतःकरणपूर्वक तयार व तत्पर असलें पाहिजे. वाशि-ग्टन यांजविषयीं आवड उत्पन्न झाली कीं, त्यास स्वातंत्र्याची आवड उत्पन्न व्हावयाचीच असें एका मोठ्या पुरुषाचें ह्मणणें आहे आणि तें यथार्थ आहे. तसाच दुसरा एक ग्रंथकर्ता ह्मणतो कीं, जेव्हां लोकांच्या मनांत राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवा-वयाचे विचार येतील तेव्हां त्यांनीं वाशिंग्टनचें उदाहरण नमुन्याकरितां पुढें घेतलें पाहिजे. हेंही सर्वथैव प्रमाण आहे. आह्मांस आमच्या इंग्रज सरकारापासून योग्य व कायदेशीर रीतीनें जेवढें स्वातंत्र्य संबंधाचे राजकीय हक्क मिळतील तेवढे

मिळवावयाचे आहेत. तसेंच सामाजिक व धर्मसंबंधानें स्वातंत्र्याचे मानवी अधिकारास योग्य असे हक्क संपादन करा-वयाचे आहेत. तेव्हां ज्याअर्थीं राजकीय, सामाजिक व धर्मसंबंधाचें आमच्या राष्ट्राकरितां स्वातंत्र्य आपणास मिळा-वावयाचें आहे त्याअर्थीं वाशिंग्टनसारखी योग्यता आपल्या लोकांपैकीं पुष्कळांच्या अंगीं आली पाहिजे. सारांश जार्ज वाशिंग्टन या सत्पुरुषाच्या कृतींचा, त्यांनीं तनमनधनादि सर्वस्व वेंचून संपादिलेल्या योग्यतेचा व त्यांच्या सद्गुणांचा नीट व निःपक्षपातानें विचार करून त्यांजविषयीं आपल्या लोकांच्या मनांत प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न करून त्यांची ईश्वर-भक्ति, त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांचा स्वदेशबांधवांविषयीं कळवळा, त्यांची उद्योगप्रीयता, त्यांची सहनशीलता, त्यांचें धैर्य, व त्यांचें स्वदेशप्रेम इत्यादि त्यांच्या सद्गुणांचें अनुकरण आपल्या मुलांकडून व तरुणांकडून करवून देशोन्नतीच्या व देशोत्कर्षाच्या सत्कार्यसिध्यर्थ प्रयत्न आमच्या प्रिय देशबां-धवांनीं करावा अशी आमची त्यांजपाशीं विनयपूर्वक विनंति आहे; आणि त्यांस अशा प्रकारें स्वदेशसेवा करण्यास बुद्धि व सामर्थ्य देण्याविषयीं, सर्वांचा परमप्रिय व सर्व सिद्धिदाता जो परमेश्वर त्याजपाशीं अनन्यभावें व अंतःकरणपूर्वक मागणें आहे.

दा. कि. ३८०

समाप्त.

REFBK-0003880

REFBK-0003880

व गरीब स्थितींतील केवळ आपल्या अंगच्या..
नें इतक्या उच्चपदास चढले. त्यांस पुढें संतोष
त्यांचा देश जावत्कालपर्यंत राहील तावत्काळ त्यांचें नांव
त्या देशांतील लोकांच्या मनांत प्रेमानें चिरकाल राहील
कारण या पुरुषानें स्वातंत्र्याचीं महातत्वें अमलांत आणून,
हा जगविख्यात झाला व त्यांत त्यांच्या योगानें त्या देशांतील
लोक उत्तम व अनुपमेय उत्कर्ष पावून सुखी झाले. आतां
तीं स्वातंत्र्याचीं महातत्वें सर्व पृथ्वीभर पसरून चोहोंकडे
एकंदर फरफारकरण्याच्या बेतांत आहेत. सारांश वाशिंगटन हे
राजवाड्यांत जन्मले नव्हते; परंतु त्यांचा जन्म साधारण मध्यम
स्थितींतील कुटुंबांत झाला, आणि साधारण प्रतीच्या मनुष्यांस
जीं ज्ञानप्राप्तीचीं वगैरे साधनें मिळण्यासारखीं आहेत, त्याच
साधनांचा यथायोग्य उपयोग करून स्वतांच्या परिश्रमानें व
योग्याचरणानें आपल्या प्रिय देशास व देशबांधवांस पारतंत्र्या-
पासून मुक्त करून त्यांचे ते उद्धारकर्ते झाले. या वरून उ-
त्तम प्रकारच्या सदाचरणास व सत्कृत्यास केवळ पूर्वीचें महत्व,
संपत्ति, सत्ता इत्यादिकांची आवश्यकता आहेच असें नाहीं
हें उघड होतें.

वाशिंगटन जन्मले तेव्हां शरीरपिंडानें ते इतरांपेक्षां मोठे
होते अशी बोलवा आहे. पुढें सतत व्यायामाच्या योगानें
त्यांच्या अंगीं शरीरसामर्थ्य अधिक येऊन त्यामुळें बालपणीं,
तरुणपणीं जसे शक्ति, चपलपणा, कष्टाळूपणा, व साहस,
दृढनिश्चय, आणि उत्सुकता, हे गुण होते, ते तसे उतारवयांत
सुद्धां कायम राहिले, अशी त्यांची मोठी आख्या आहे.

लहानपणीं त्यांचा आरंभींचा अभ्यास हाबी नांवाच्या